# पत्री

११२-८

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ११२८



REFBK-0005343

पां. स. साने

तुझ्या करांतील बनून पांवा । कृतार्थ हा जन्म मदीय व्हावा ।।

# पत्री

REFBK-0005343

कवि

## पांडुरंग सदाशिव साने

प्रथमावृत्ति

शके १८५७ ] किंमत १॥ रुपया [ सन १९३५

—मुद्रक—

शंकर रामचंद्र दाते, बी. ए.

अ. वि. गृहाचा लोकसंग्रह छापखाना,

६२४ सदाशिव पेठ, पुणें.

—प्रकाशक—

दोधू गंगाराम शिंपी

अध्यक्ष, तरुण सेवक–संघ

खादीभांडार, अंमळनेर.

# अनुक्रमणिका.

| | | पृष्ठ |
|---|---|---|
| | प्रकाशकाचें निवेदन | १ |
| | कवीचे दोन शब्द | २ |
| | परिचय ( लेखक—आचार्य भागवत ) | ५ |
| | पत्री—समर्पण (कविता) | |
| | **कविता आत्मपर** | |
| १ | हृदय मदीय तव सिंहासन होवो... … … | १ |
| २ | मजवर कृपा करावी … … … | १ |
| ३ | एक किरण … … … … | २ |
| ४ | माझी बुडत आज होडी … … … | ३ |
| ५ | अति आनंद हृदयिं भरला … … … | ४ |
| ६ | मम जीवन हरिमय होऊं दे … … … | ५ |
| ७ | मजला तुझ्यावीण जगिं नाहिं कोणी … … | ६ |
| ८ | तव अल्प हातून होई न सेवा … … | ७ |
| ९ | सदय—हृदय तूं प्रभु मम माता … … | ८ |
| १० | दिसतात सुखि तात! सारेच लोक … … | ८ |
| ११ | देवा धांव धांव धांव … … … | ९ |
| १२ | दुःख मला जें मला ठावें … … … | १० |
| १३ | नयनीं मुळिं नीरच नाहीं … … | ११ |
| १४ | वेल … … … … … | ११ |
| १५ | जीवन—तरु … … … … | १४ |
| १६ | मज माहेराला नेई … … … | १५ |
| १७ | येतो का तो दुरून … … … | १६ |
| १८ | पूजा मी करूं रे कैशी ? … … … | १७ |
| १९ | कर्ममय पूजा … … … … | १८ |
| २० | मजूर … … … … … | १९ |

२१ श्रमाची महती ... ... ... ... २०
२२ मन माझें सुंदर होवो ... ... ... २१
२३ मी केवळ मरुनी जावें ... ... ... २२
२४ असो तुला देवा माझा सदा नमस्कार ... ... २३
२५ प्रभो काय सांगूं तुला मी वदोनी... ... ... २४
२६ वेणु ... ... ... ... २५
२७ मनमोहना ... ... ... ... २५
२८ मनो–मंदिर–राम ... ... ... २६
२९ हृदयाकाशीं मेघराशी ... ... ... २७
३० देवा झुरतो तव हा दास ... ... ... २८
३१ प्रभु सतत मदंतर हांसूं दे ... ... ... २९
३२ जागृत हो माझ्या रामा... ... ... २९
३३ हे नाथ! येईन तव नित्य कामीं ... ... ३०
३४ हे तात! दे हात करुणासमुद्रा ... ... ३१
३५ तुजवीण आधार मज कोणि नाहीं ... ... ३२
३६ कांहीं कळेना कांहीं वळेना ... ... ३३
३७ आईचा मार ... ... ... ... ३४
३८ दिव्य आनंद ... ... ... ... ३५
३९ कैसें लावियलें मी दार ... ... ... ३६
४० हंस रे माझ्या मुला ... ... ... ३९
४१ झुरतों मी रात्रंदिवस ... ... ... ४१
४२ काय सांगूं देवा कोणा सांगूं ... ... ४३
४३ नमस्कार ... ... ... ... ४४
४४ गाडी धीरे धीरे हांक ... ... ... ४५
४५ आशानिराशा ... ... ... ... ४७
४६ ये रे मला तार ... ... ... ४८
४७ निराधार ... ... ... ... ५०
४८ दाखव मज अपुले चरण ... ... ... ५१
४९ येवो वसंतवारा ... ... ... ५३

| | | |
|---|---|---|
| ५० | माझें ध्येय ... ... ... ... | ५६ |
| ५१ | तुझ्या हातांतला ... ... ... | ५७ |
| ५२ | रडण्याचें ध्येय ... ... ... | ५८ |
| ५३ | द्विविध अनुभव ... ... ... | ५८ |
| ५४ | हे सुंदरा अनंता ... ... ... | ६१ |
| ५५ | रडायाचा लागलासे देवा एक छंद ... ... | ६४ |
| ५६ | रामवेडा ... ... ... ... | ६५ |
| ५७ | आई दार उघड ... ... ... | ६६ |
| ५८ | देवाजवळ ... ... ... ... | ६७ |
| ५९ | जीवननाथ ... ... ... ... | ७३ |
| ६० | सुखामृताची मग नित्य धार ... ... ... | ७४ |
| ६१ | तुला देतों मी जमिन ही लिहून ... ... ... | ७४ |
| ६२ | आशा ... ... ... ... | ७५ |
| ६३ | सोन्याचा दिवस ... ... ... | ७५ |
| ६४ | प्रेम कां करावें ... ... ... | ७६ |
| ६५ | प्रार्थना ... ... ... ... | ८१ |
| ६६ | प्रसन्नता ... ... ... ... | ८१ |
| ६७ | प्रकाश केव्हां भवनीं भरेल? ... ... ... | ८२ |
| ६८ | हृदयाचे बोल ... ... ... ... | ८४ |
| ६९ | जीवनार्पण ... ... ... ... | ८८ |
| ७० | जीवनांत माझ्या सदा राम गुंफिन ... ... | ९० |
| ७१ | तुजसाठिं जीव हा उरला ... ... ... | ९१ |
| ७२ | करुणाष्टक ... ... ... | ९३ |
| ७३ | जीवनबाग ... ... ... ... | ९४ |
| ७४ | भाग्याचे अश्रु ... ... ... | ९५ |
| ७५ | तळमळतो रे तुझा तान्हा ... ... ... | ९६ |
| ७६ | निर्वाणीचें सांगणें ... ... ... | ९६ |
| ७७ | कधिं येशिल हृदयिं रघुराया ... ... ... | ९७ |
| ७८ | कां मजला देतां प्रेम ? ... ... ... | ९८ |

७९ अश्रु ... ... ... ... १०४
८० माझा देव .. .. .. .. १०६
८१ प्रभु मम हृदयिं आज येणार ... ... ... १०७
८२ फुलाची आत्मकथा ... ... ... १०९
८३ मयसभा राहिली भरुन ... ... ... ११७
८४ खरा धर्म ... ... ... ... १२१
८५ कशासाठीं जगावें ? ... ... ... १२२
८६ जीवनांतील दिव्यता ... ... ... १२४
८७ मित्रासाठीं प्रार्थना ... ... ... १२६
८८ संत ... ... ... ... १२८
८९ मेघासारखें जीवन ... ... ... १२९
९० वंदन ... ... ... ... १३१
९१ मदीय त्या नमस्कृती ... ... ... १३२
९२ नवीन संन्यास ... ... ... १३३
९३ विपत्ति दे तीहि हवी विकासा ... ... ... १३४
९४ दुःख आनंदरूप ... ... ... १३५
९५ प्रेमधर्म ... ... ... ... १३६
९६ परी बाळाला सकळ तीं समान ... ... १४९
९७ ग्रंथमहिमा ... ... ... ... १५०
९८ गुढीपाडवा ... ... ... ... १५३
९९ नागपंचमी ... ... ... ... १५४
१०० दसरा ... ... ... ... १५६
१०१ संक्रांत ... ... ... ... १५७
१०२ लहान मित्राबद्दल ... ... ... १५८
१०३ लहानपणची आठवण ... ... ... १५९
१०४ मृत्युमित्र ... ... ... ... १६६
१०५ शांति कोण आणतें ? ... ... ... १६७
१०६ गायीची करुण कहाणी ... ... ... १६६
१०७ जीवन–मित्रास ... ... ... १७२

१०८ कसें तरी मग जग दिसतें ? ... ... ... १८१
१०९ प्रेमाचें गाणें ... ... ... १८२
११० आत्मा ओत रे ओत ... ... ... १८४
१११ निरोप ... ... ... ... १८५

## देशभक्तिपर

११२ भारतमाता ... ... ... १८७
११३ मनमोहन मूर्ति तुझी माते ... ... ... १८८
११४ माझी एकच इच्छा ... ... ... १८९
११५ प्रभु ! भारतिचें वैभव कोठें गेलें ... ... १९२
११६ स्वातंत्र्याचे अम्ही शिपायी ... ... १९६
११७ आमचें कार्य ... ... ... १९७
११८ देशभक्त किति ते मरती ... ... ... १९८
११९ भारतसेवा ... ... ... २०१
१२० जा रे पुढें व्हा रे पुढें ... ... ... २०३
१२१ बलसागर भारत होवो ... ... ... २१०
१२२ हा देश वैभवीं न्यावा ... ... ... २११
१२३ भूषण जगताला ... ... ... २१२
१२४ भारत जननी सुखखनि साजो ... ... २१२
१२५ हृदय जणुं तुम्हां तें नसे ... ... ... २१३
१२६ माझा महाराष्ट्र भाग्यें सजो ... ... २१४
१२७ भारतमाता माझी लावण्याची खाण ... ... २१४
१२८ मरणही ये तरी वरिन मोदें ... ... २१६
१२९ दिव्य मी स्वर्ग निर्मीन ... ... ... २१७
१३० देशासाठीं मरूं ... ... ... २१८
१३१ तेव्हां धडे उघ्नती ... ... ... २१९
१३२ तुफान झालों ... ... ... २२०
१३३ प्रिय भारता सुंदरा ... ... ... २२३
१३४ दुबळी मम भारत—माता ... ... ... २२३
१२५ देशभक्तांची विनवणी ... ... ... २२४

१३६ मातृभूमि–गान ... ... ... २२६
१३७ गाऊं मी कसलें गाणें ? ... ... ... २२६
१३८ स्वातंत्र्य ... ... ... ... २३१
१३९ स्वातंत्र्य–देवीचें शुभ आगमन ... ... २३३
१४० स्वातंत्र्यानंदाचें गाणें ... ... ... २३४
१४१ भारतास ... ... ... ... २३७
१४२ भारता ऊठ ... ... ... २४०
१४३ वंदे मातरम् ... ... ... २४१
१४४ भारत जननी तव शरणम् ... ... ... २४२
१४५ सुसंस्कृत कोण ... ... ... २४३
१४६ खरा हुतात्मा ... ... ... २४५
१४७ ऊठ झुगारून देई बेडी ... ... ... २४८
१४८ प्रभु प्रार्थना ... ... ... २५०
१४९ राष्ट्राचें उद्यान ... ... ... २५१
१५० राष्ट्र–पताका ... ... ... २५४
१५१ प्रतिज्ञा ... ... ... २५६
१५२ झेंडागीत ... ... ... ... २५७
१५३ नवयुवक .. ... ... ... २५९
१५४ बालवृद्धसंवाद .. ... ... २६२
१५५ एकच वेड ... ... ... २८१
१५६ स्वातंत्र्य–दिव्य–दर्शन .... .... ... २८३
१५७ भारतांतील मुलें ... .. ... २८९
१५८ महाराष्ट्रास ... ... ... २९०
१५९ राणा प्रताप ... ... ... २९१
१६० महात्माजींस ... ... ... २९३
१६१ खरे सनातनी ... ... ... २९५
१६२ खंड–काव्य ... ... ... ३०३
१६३ माझी पत्नी ... ... ... ३७७
शुद्धिपत्र ... ... ... ३७९
अभिप्राय ... ... ... ३८०

# प्रकाशकांचें निवेदन.

अमळनेर येथें कांहीं दिवसांपूर्वी आम्ही तरुण सेवकसंघ स्थापन केला. खादी वापरणें व खपविणें, स्वच्छता निर्माण करणें, खेड्यांतून वगैरे जाणें, थोर व उदार विचारांच्या माणसांचीं व्याख्यानें करविणें, सत्साहित्य प्रसिद्ध करणें वगैरे या संघाचे हेतू आहेत.

श्री साने गुरुजी यांच्याजवळ पुष्कळ वाङ्मय लिहिलेलें आहे. आम्हीं तें वाचलें आहे. हें वाङ्मय प्रसिद्ध होत नाहीं म्हणून आम्हांस हळहळ वाटे व वाईट वाटे. शेवटीं हा संघ स्थापन करून त्यांचें वाङ्मय प्रसिद्ध करणें हेंहि एक आम्हीं आमचें कार्य ठरविलें.

कार्याला पैसे पाहिजेत. श्री. साने गुरुजींच्या कांहीं मित्रांनीं अर्थसाहाय्य केलें. कांहीं मदत परत करण्याच्या अटीवर मिळाली. श्री. साने गुरुजीचें हें वाङ्मय खपेल अशा आशेनें आम्हीं हें कार्य आरंभिलें आहे. पत्रीची सर्व आवृत्ति खपली तर सशर्त मदत परत करूनही कांहीं रक्कम उरेल. तिच्यांतून दुसरें पुस्तक छापून त्या पुस्तकाच्या विक्रींतून तिसरें. अशा रीतीनें हें सारें सुंदर साहित्य प्रसिद्ध करण्याचा आमचा संकल्प आहे.

यांत पैशाचा हेतु नाहीं. ४२५।४५० पानांच्या या पुस्तकाची किंमत १॥ रुपया ठेवीत आहोंत यावरूनच ही गोष्ट सर्वांच्या लक्षांत येईल. शक्य तितकें स्वस्त हें साहित्य असेल. विक्रीच्या पैशांतून पुन्हां दुसरें पुस्तक, असें चालणार. हें करतांना १०।२० रुपये उरलेच तर ते विधायक कामालाच आम्ही देणार आहोंत.

श्री. साने गुरुजींजवळ आम्ही प्रथम त्यांच्या गोष्टी, कादंबऱ्या, नाटकें मागत होतों. परंतु ते म्हणाले "या कविता म्हणजे माझें जीवन. या आधीं प्रसिद्ध करा. इतर पुस्तकें पुढें प्रसिद्ध होवोत वा न होवोत." हे त्यांचे शब्द ऐकून आम्ही पत्रीच प्रसिद्ध करण्याचें ठरविलें. यापुढील पुस्तक "श्यामची आई" हें करुणरसपूर्ण व कोंकणांतील सृष्टिवर्णनांनीं नटलेलें कथात्मक पुस्तक प्रसिद्ध होईल.

आमच्या या संकल्पास सर्वांनीं साहाय्य करावें व परमेश्वरानें आमच्या हातून हें कार्य करवून घ्यावें.

राष्ट्रीय आठवडा १९३५
अमळनेर

अध्यक्ष
तरुण-सेवक-संघ अमळनेर

# कवीचे दोन शब्द

कृतज्ञता दाखविणें व आभार मानणें हेंच मुख्यतः माझें काम आहे. परंतु त्याच्या आधीं एकदोन गोष्टी सांगावयाच्या आहेत. या काव्यसंग्रहांत मी चाली दिल्या नाहींत. इतर भाषांमध्यें असा प्रघात नाहीं. संग्रहांतील कांहीं कवितांच्या चाली नवीन व संमिश्र असल्यामुळें त्यांना नांवें मी देऊं शकत नव्हतों. नवीन नवीन जीं अनेक नांवें योजिलीं जात आहेत, त्यांच्याशीं माझा परिचय नाहीं. शिवाय ज्या चाली देण्यांत येतात त्या तरी कितीकांस माहीत असतात ? असा सर्व विचार करून चाली न देण्याचेंच मीं ठरविलें. कांहीं मित्रांना ही गोष्ट आवडली, कांहींस आवडली नाही. कांहीं वाचकांची गैरसोय होईल. परंतु त्याला इलाज नाहीं.

माझी कविता पत्रीरूपानें बाहेर पडत आहे. आणखी २५० पानें भरतील एवढी कविता शिल्लक आहे. परंतु हा भाग खपला तर दुसरा भाग पुढें मागें प्रसिद्ध होईल. आज हा पहिला भाग प्रसिद्ध होत आहे, याचें श्रेय अनेक मित्रांना आहे. एरंडोल येथील माझे थोर त्यागी सत्याग्रही मित्र श्री. शंकर भाऊ कावरे यांच्या मद-तीचा प्रामुख्यानें निर्देश करावयास हवा. अमळनेरच्या छात्रालयांत ६।७ वर्षांपूर्वी चिरंजीव विश्वनाथ पांडुरंग चिटणीस या नांवाचा एक विद्यार्थी होता. त्याच्या वडिलांनीं मदत दिली आहे. पुणें येथील मारवाडी विद्यार्थी भुवनांतील विद्यार्थ्यांनीं मदत केली आहे. चोपडें तालुक्यांतील अडावद गांवचे माझे तरुण मित्र श्री. मुरलीधर भाऊ कावरे यांनींही प्रेमानें साहाय्य केलें आहे. परंतु झालेल्या एवढ्या अर्थसाहाय्यानें भागत नव्हतें. तरुण सेवकसंघानें परत करण्याच्या अटीवर कांहीं मदत मिळविली. यामुळें आज ही पत्री बाहेर येत आहे. या सर्व साहाय्यकांचे मी किती उपकार मानूं ?

माझ्या काव्यबाळाला मुद्रणाचें आंगडेंटोपडें या सख्यांनीं चढविलें. परंतु या काव्यबाळाला थोरामोठ्यांच्या आशीर्वादाची जरूरी होती. या

बाळाच्या आईची फारशी कोणाजवळ ओळख नाहीं तरीही चार थोरांच्या घरीं ती गेली व आशीर्वाद मागती झाली. त्यांनीं या बाळाला आशीर्वाद दिले व दोन उपदेशाच्या व सावधगिरीच्या गोष्टीही सांगितल्या. प्रो. लागु व प्रो. पोतदार हे माझे गुरुच आहेत. ते माझें कौतुक करणारच, कारण त्यांनींच लावलेलें व वाढवलेलें हें रोपटें आहे. परंतु इतर थोरांनींही आशीर्वाद दिले याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें.

सर्वांत थोर काम आचार्य भागवत यांनीं केलें आहे. आचार्य भागवत आजारी होते व अजूनही नीट बरे झाले नाहींत. परंतु ध्येयवादी, त्यागी व कर्तव्यपरायण त्यांचा स्वभाव! आजारांतही प्रस्तावना लिहिण्याचें त्यांनीं कबूल केलें. ही प्रस्तावना लिहिण्याचें सांगताना मला संकोच वाटत होता. परंतु शेवटीं त्यांच्यावर भार टाकलाच. भार टाकला एवढेंच नव्हे तर त्यांना लौकर द्या असा तगादाहि लाविला. प्रस्तावनेंतील निम्मे भाग एका दिवसांतच त्यांनीं लिहून काढला. त्यांच्या मनावर किती ताण पडला असेल याची मला कल्पना आहे. त्यांची प्रस्तावना किती सुंदर व सोज्वल आहे हें वाचल्यावरच कळेल. अशी उद्‌बोधक व स्फूर्तिप्रद प्रस्तावना त्यांनीं लिहून दिली याबद्दल मी सदैव कृतज्ञ राहीन.

पत्रींतील गुणबिंदूचा या सर्व थोरांनीं सिंधू केला आहे व दोषसिंधूचा बिंदु मानला आहे. परंतु मी जपून वागेन. स्तुतीनें हुरळून न जातां त्यांनीं दाखविलेले दोष दूर करण्याचा प्रयत्न करीत राहीन.

पत्रीचें प्रकाशन तरुण–सेवक–संघ करीत आहे. तरुण–सेवक–संघांतीलच बाळगोपाळ या माझ्या बाळाला खांद्यावर घेऊन सर्वत्र हिंडवणार आहेत. या बाळाला घरोघर पोंचवून माझ्या इतर बाळांनाही मुद्रणाचा पोषाख चढवून ते सर्वत्र घेऊन जाणार आहेत. माझें हृदय भरून आलें आहे. त्यांचे आभार मी मानूं शकत नाहीं.

लोकसंग्रह छापखान्याचे चालक श्री. शंकरराव दाते यांचे मी मनापासून आभार मानतों. शक्य तितक्या लौकर व शक्य तितकें चांगलें छपाईचें काम त्यांनीं करून दिलें आहे. वेष्टनावरील चित्र चित्रशाळेंतील श्री. दाणी यांनीं करून दिलें. श्री. दाणी यांची गांठ पुणें येथील ट्रेनिंग स्कूलमधील शिक्षक,

शालापत्रकाचें काम पाहणारे श्री. सुभेदार यांनीं घालून दिली. तसेंच मुद्रितें तपासतांना माझे विद्वान् व रसिक मित्र श्री. पु. सां. दीक्षित जे पूर्वी अमळनेरच्या इंग्रजी विद्यालयांत शिक्षक होते व जे सध्यां पुणें येथें शब्द-कोशांत काम करीत आहेत—यांनीं अनेक फेरफार सुचविले. या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतों.

ही पत्री सर्वांना प्रिय वाटो व पत्रींतील विचारांप्रमाणें अल्पस्वल्प तरी आचार माझ्या हातून घडो अशी प्रभुचरणीं प्रार्थना करून मी निरोप घेतों.

चैत्र शु. ११।१८५७
सोमवार १५ एप्रिल १९३५
४४९ अ. सदाशिव पुणें नं. २

पांडुरंग सदाशिव साने.

# परिचय

'Who touches this book, touches the man'

—*Walt Whitman.*

१९३० च्या अखेरीस त्रिचनापल्लीच्या तुरुंगांत मला श्री. साने यांचा तीन महिने निकट सहवास लाभला. या संग्रहांत प्रसिद्ध होणाऱ्या बऱ्याच कविता तेथेंच लिहिल्या गेल्या. त्या लिहीत असतांच वाचण्याची मला संधि मिळत असे. कवि आणि त्यांचें काव्य या दोघांविषयीं माझे मनावर फार चांगला परिणाम झाल्यामुळें महाराष्ट्रांतील जनतेला त्या दोघांची ओळख व्हावी असें मला वाटे. आज यामुळेंच मी 'परिचय' करून देण्याचें काम स्वीकारलें आहे.

श्री. साने हे महाराष्ट्राला अपरिचित आहेत असें नाहीं. नामदार गोखले, इतिहास संशोधक राजवाडे, ईश्वरचंद्र विद्यासागर यांचीं त्यांनीं लिहिलेलीं चरित्रें प्रसिद्ध आहेत. 'विद्यार्थी' मासिकाचे संपादक म्हणूनहि त्यांचें नांव वाङ्मयसेवकांत आलेलें आहे. हा संग्रह अमळनेरला प्रसिद्ध होत आहे. कित्येक वर्षें अमळनेरलाच शिक्षण-कार्यांत असल्यामुळें अमळनेरच्या विद्यार्थि-वर्गांत ते अत्यंत लोकप्रिय झाले आहेत. गेलीं चार वर्षें सत्याग्रह आणि विधायक कार्यक्रम यांतच त्यांनीं घालविलीं असल्यामुळें खानदेशांतील आबालवृद्धांस त्यांची ओळख झाली आहे. विद्वत्ता, स्वार्थत्याग, सेवापरा-यणता आणि साधुवृत्ति या गुणांमुळें ते त्या भागांत सर्वत्र 'साने गुरुजी' या नांवानें ओळखले जातात. तथापि पुणें साताऱ्याकडील महाराष्ट्राला त्यांचा विशेष परिचय नाहीं. भिडस्त स्वभावामुळें ते स्वतः समाजापुढें यावयास बुजतात. म्हणूनच इतरेजनांच्या प्रयत्नाची आवश्यकता.

श्री. साने यांचा लेखनव्यासंग जबरा आहे. बंगालचे प्रसिद्ध देशभक्त त्यागमूर्ति चित्तरंजन दास यांच्या निधनानंतर त्यांचे चरित्राची आणि वाङ्मयाची खूप माहिती मिळवून श्री. साने यांनीं दासबाबूंचें विस्तृत चरित्र

लिहिलें. त्यासाठी [illegible]वाबूंच्या बंगाली भाषेतील कविता समग्र अभ्यासिल्या. आज तें चरित्र प्रकाशकांची वाट पहात दप्तरी पडून राहिलें आहे. तुरुंगांत तर त्यांच्या हातांत पेन्सिल आणि वही सारखी दिसायची. गेल्या चार वर्षांतील बहुतेक काळ त्यांचा तुरुंगांतच गेला. तेथें मिळेल ती सवड साधून त्यांनीं विविध प्रकारची विपुल ग्रंथरचना केली आहे. Amiel's Journal या सुंदर विचारांनी भरलेल्या ग्रंथाचें त्यांनीं सुंदर भाषेंत भाषान्तर केलें आहे. तामिल वाङमयांत वेद ग्रंथ म्हणून मान्यता पावलेला प्रख्यात 'कुरल' हि मराठींत आणिला आहे. कविता, खंडकाव्य, नाटकें, 'तीं धडपडणारीं मुलें' 'श्यामची आई' 'शशीची गोष्ट' इत्यादि कथावाङमय, स्फुट आत्मनिवेदनपर निबंध, असें पुष्कळ साहित्य त्यांचेपाशीं तयार झालें आहे. कधीं काळीं हें सारें वाङमय समाजापुढें आलें पाहिजे.

श्री. साने यांचें इतर वाङमय जेव्हां प्रकट व्हावयाचें असेल तेव्हां होईल. सध्यां प्रसिद्ध होत असलेल्या त्यांच्या काव्यसंग्रहामुळें त्यांची पारख महाराष्ट्राला खास होईल. कारण त्यांच्या सर्व अन्त:करणाचा आविष्कार यांत सामावलेला आहे. त्यांची ईशभक्ति, देशप्रीति, आणि काव्यस्फूर्ति या संग्रहांत पूर्णतया प्रकट झाली आहे. शुद्धतेची तळमळ आणि सेवेची कळकळ एकवटून आली आहे. या कवितांत त्यांच्या आशा–आकांक्षा, निराशा–हताशा स्पष्ट झाल्या आहेत. ही कविता म्हणजे त्यांची 'वाङमयी मूर्ति'च होय.

यांतील कांहीं कविता अमळनेर येथील 'विद्यार्थी' मासिकांत आणि पुण्याच्या 'लोक–शिक्षणां'त प्रसिद्ध झाल्या असल्या तरी बहुतेक कविता पहिल्यानेंच प्रकाशित होत आहेत. पुस्तकरूपानें जरी त्या आज प्रथम प्रकट होत असल्या तरी त्यांतील कांहीं कविता यापूर्वींच लोकहृदयांत जाऊन बसल्या आहेत. सत्याग्रह–संग्रामांत तात्कालिक स्फूर्तीनें प्रकट झालेल्या कविता समाजांत विजेच्या वेगानें पसरल्या. त्यांतील कित्येक टिकाऊ स्वरूपाच्या असूनहि आजच्या राजवटींत ग्रंथ–निविष्ट होणार नाहींत. तथापि त्यांनी जनमनाचा तावा सरळ मार्गानेंच घेतल्यामुळें हळहळ वाटण्याचें कारण नाहीं. तुरुंगांत जे विविध वृत्तींचे आणि विविध ठिकाणचे लोक जमले होते ते सारे एकाच थोर भावनेनें भरलेले असल्यामुळें साने यांच्या कवितांचा त्यांच्यामध्यें खूप प्रचार झालेला आहे. कवीच्या तोंडून साध्या रीतीनें

ऐकूनहि आंतील उत्कट भावनांच्या योगानें या कवितांनी अनेकांना मुग्ध केलें आहे. आज ग्रंथरूपानें प्रकट होत असल्यानें या समाजाकडून त्यांचें प्रेमानें स्वागत केलें जाईल यांत मला शंका नाहीं.

या काव्यांत कवीनें आपलें सर्व हृदय उघडे करून दाखविल्यामुळें कवीच्या चरित्र–परिचयाची आवश्यकता नाहीं. कवींसंबंधीं आजच्या काळांत अत्यंत समाधान देणारी गोष्ट ही आहे की त्यांच्या जीवनांत प्राचीन शुद्ध परंपरा आणि आधुनिक नवीन प्रगति–कारक विचार यांची मोहक जुळणी झालेली आहे. आणि त्यामुळेंच त्यांच्या वाङ्मयांतहि जिवंत-पणा, साहजिकपणा आणि आपलेपणा उत्पन्न झाला आहे. लहानपणीं सरळ आणि शुद्ध अशा संस्कृतींत त्यांची वाढ झालेली असल्यामुळें भारतीय जीवनांतील अत्यंत उच्च अशा वृत्तींचा त्यांच्यांत सहजच परिपोष झाला आहे. खेड्यांतील राहणीचा ताजेपणा, निर्व्याजता, संतोषवृत्ति यांचा त्यांच्या बाल मनावर अत्यंत परिणाम झालेला आहे. निष्पाप स्त्रीहृदयाच्या सांनिध्यांत त्यांच्या हृदयांत देवाविषयीं अलोट प्रेम जागृत झालेलें आहे. याच बरोबर एम्. ए. पर्यंतच्या आधुनिक शिक्षणानें त्यांच्यांत तीव्र विवेक, स्वातंत्र्यप्रीति आणि समतेचा हव्यास गाजून राहिला आहे. यामुळें जीवनांत भारतीय भक्ति आणि युरोपीय शक्ति यांचा समन्वय झालेला दिसतो. त्यांचें वाङ्मय–लोलुप मन बालपणींच स्त्रीगीतें, पोथ्या–पुराणें यांच्यांतील विविध रस चोखून पुष्ट होत होतें. विद्यार्थी दशेंत प्राचीन–अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा त्यांनीं कसून अभ्यास केला, भारतीय इतिहास–संस्कृतीशीं परिचय करून घेतला. संस्कृत वाङ्मयांतील काव्य, साहित्य आणि शास्त्र, अद्वैत यांचा आस्वाद घेतला; बायबल–कुराण, गीता–धम्मपद इत्यादि धर्म वाङ्मय आत्मसात् केलें; इंग्रजी वाङ्मयांतील उत्तमोत्तम कवि आणि विचारवान् लेखक यांच्या संगतींत रात्रीच्या रात्री काढल्या, कविसम्राट् रवीन्द्रनाथ टागोर आणि इस्लामी महा कवि महंमद इक्बल यांच्या काव्य-सृष्टींत यथेच्छ विहार केला आणि आपल्या शुद्ध भावनांचें पोषण करून घेतलें. Goethe चें Faust त्यांना फार आवडलें. त्या वर त्यांनीं विविधज्ञानविस्तारामध्यें एक लेखहि लिहिला होता. अमेरिकन कवि Walt whitman याची कविता त्यांना फार आवडावयाची. त्यांच्या

'Leaves of Grass' या नांवाची तर त्यांना अशी मोहनी पडली होती कीं पुढें मागें आपल्या हातून कविता निर्माण होऊन प्रसिद्धीचा प्रसंग आल्यास त्यांना 'तृणपर्णें' हें नांव द्यावयाचें असें त्यांनीं विद्यार्थि-दशेंतच योजून ठेविलें होतें. तथापि आपल्या स्वतःच्या संस्कृतींत ते इतके मुरलेले, वाढलेले, कीं या सर्व प्रकारच्या अध्ययनानंतरहि त्यांच्यांत अनुकरणाची आसक्ति उत्पन्न झाली नाहीं. वनस्पतीची वाढ जशी होते त्याप्रमाणें त्यांच्या जीवनाचीं मुळें खोलवर पसरलेलीं असून आकाशांतून मिळणाऱ्या प्रकाश, उष्णता इत्यादि बाह्य उपाधींचा त्यांच्या वैशिष्ट्याची वाढ होण्याकडेच उपयोग झाला आहे. अनेक प्रकारच्या अनुभवांनीं आणि अध्ययनानेंहि ते भारतीयच राहिले. आणि या काव्यसंग्रहाला 'तृणपर्णें' न म्हणतां 'पत्री' हेंच उचित अभिधान त्यांनीं दिलें. 'पत्री' या नांवानें काव्याची सहज स्फूर्तता, कवीची शालीनता आणि भक्ति स्पष्ट होते. अमेरिकन 'तृणपर्णां'त भारतीय भक्ति मिसळली कीं 'पत्री' तयार होते.

त्यांचा विद्या-व्यासंग दांडगा असूनहि त्यांच्या लिखाणांत कोणा विशिष्ट ग्रंथकाराचा ठसा उमटलेला आढळत नाहीं. लिहिण्याची शैली, अथवा विचारांची प्रणालि विशिष्ट छापाची दिसत नाहीं. इतर लेखकांच्या कल्पनाहि त्यांच्या लेखनांत शोधून पाहिलें तरी सांपडत नाहीत. नुसत्या काव्यावरूनच त्यांचें ग्रंथावलोकन कोणी जाणूं जाईल तर तो फसल्याशिवाय राहणार नाहीं. खंडकाव्यांतील रात्रीच्या वर्णनांत झाडांवर फिरणाऱ्या वटवाघुळाला 'पुंज तमाचा जणुं उडत' असें वर्णिलें आहे. ती कल्पना Conrad च्या लिखाणांतून आली आहे असें ते म्हणतात. त्यांतच 'नवभारताचा उदय' गाइला आहे, त्यांत 'ज्ञानहि वाढो आदर वाढो' असें म्हटलें आहे. त्यांत टेनिसनच्या प्रसिद्ध वचनाचा अनुवाद आला आहे, हें इंग्रजी काव्य वाचणाऱ्यांस सहज आढळून येईल. तेथीलच 'स्वातंत्र्य शाहिराचें गाणें' पाहिलें तर त्यांत कवि स्वतःची काव्य-कल्पना सांगत आहे. व्हिटमनच्या अशाच एका कवितेची आठवण सहज होण्यासारखी आहे. 'बाल-वृद्ध-संवाद' या कवितेंत निशाणाचा उल्लेख आहे. व्हिटमनच्या एका कवितेंत निशाणाविषयीं फार उदात्त विचार ग्रथित केलेले आहेत त्याचें स्मरण होण्यासारखें आहे. क्वचित् 'उपजणें मरणें न चुके नरा'

' अवघाचि संसार सुखाचा करीन ' ' सुखामृताचे तुम्ही डोह थोर ' असे चरण वाचतांना ते वामन, तुकाराम, ज्ञानेश्वर यांच्यांतून आले असल्याचें वाचकांना सहज समजेल. ' ध्वांत ' ' शंपाहत ' ' पोत ' 'अगार ' असले दुर्बोध शब्द, दीर्घसमास आणि कविसंकेत यांमधून कवीचें संस्कृत भाषेचें ज्ञान डोकावतांना आढळेल. रूपांतरित कविता अगदींच थोड्या असून त्या त्या ठिकाणीं कवीनें तसा स्पष्ट निर्देश केला आहे.तथापि सामान्यत: या संग्रहांतील कविता अगदीं स्वतंत्र आहेत असेंच दिसून येईल. त्यांतील भावना कवीच्या प्रत्यक्ष जीवनांतूनच आलेल्या आहेत. कवि आपल्या भावनांमध्यें इतका बुडून गेला आहे कीं त्याला बाह्य सृष्टीची वा बौद्धिक पाण्डित्याची जाणीवच राहूं नये. यामुळें या काव्यसंग्रहांत कवीची स्वत:ची तळमळ प्रकटली आहे. काव्य देशभक्तीचें असो, देवप्रेमाचें असो वा उपदेशरूप असो. त्यांत बौद्धिक कृत्रिमता नाहीं. हार्दिक सहजता भरपूर आहे. कवीचें मन ध्येयवादी आहे. उत्कृष्ट भावनेनें उदात्त ध्येयांना कवटाळावयास तो जात आहे. पण त्या प्रमाणांत प्रत्यक्षांत कृति होत नाहीं, सिद्धि मिळत नाहीं, यामुळें तो निराश होऊन स्वत:च्या अशुद्धतेबद्दल, दुर्बलतेबद्दल स्वत:ला धिक्कारीत आहे. आपण पूर्ण शुद्ध , पूर्ण सेवामय, पूर्ण ज्ञानमय, पूर्ण आनन्दमय व्हावें हा त्याचा हव्यास आहे. आपल्या अपूर्णतेची त्याला दाहक जाणीव आहे व या अपूर्णतेंतून सुटण्याला तो वाटेल तें दिव्य करावयाला तयार आहे. कवीची ही भूमिका नीट पारखून घ्यायला हवी.

सृष्टीचा विकास होतांना जड स्वरूपापासून मानव स्वरूपापर्यंत मजल आली म्हणजे सारेंच तन्त्र बदलतें. मनुष्येतर सृष्टि केवळ कार्यकारण भावानें बांधलेली आणि कोणातरी विश्वशक्तीच्या पकडींत सांपडून यन्त्रवत् फिरत असलेली दिसते. तिला स्वत:च्या जीवनकार्याची जाणीव नसते आणि स्वातंत्र्याची अनुभूतिहि तेथें आढळत नाहीं. मनुष्यसृष्टींत मानवी आत्म्याला पूर्णतेचीं स्वप्नें पडूं लागतात आणि विश्वशक्तीचें किंचित् आकलन होऊं लागतें. निसर्गाच्या जड नियमांच्या जागीं नैतिक ध्येयकल्पना आरूढ होतात. विश्वशक्ति हें आपलेंच अन्तर्यामी तत्त्व आहे. तेंच आपलें खरें स्वरूप आहे. त्याचें कार्य तेंच आपलें कार्य आहे अशा भावना बळावत

जातात आणि विश्वशक्तीचा सहचारी आणि सहकारी म्हणून तो आपलें स्थान निर्माण करूं लागतो.

आत्मविकासासाठीं, आत्मस्वातंत्र्याठीं सर्व सृष्टीची चाललेली धडपड मनुष्यजीवनांत अत्यंत तीव्र स्वरूप धारण करिते. केवळ इन्द्रियांच्या प्रेरणांनी त्याचें समाधान होत नाहीं. आपल्या ज्ञानशक्तीचा कसून उपयोग करून आपला जीवन-धर्म तो शोधण्याची पराकाष्ठा करितो. आणि त्याच्या आचरणानें तो क्षणिकाच्या आवरणांतून आपली मुक्तता करून शाश्वत शांति आणि अनंत आनंद यांचा अखंड अनुभव घेऊं शकतो.

मनुष्यजीवनांतील या भेदामुळें मानवी 'संसारा'ला 'संस्कृति' हें उच्च स्वरूप प्राप्त होतें. जीवन हें पुरुषार्थासाटीं आहे. जीवनाचा अत्यंत उच्च पुरुषार्थ म्हणजे स्वतःचें स्वरूप जाणणें आणि अनुभविणें. आपल्या ऋषींनीं यालाच 'आत्म-ज्ञान' असें म्हटलें आहे. मानवी जीवनांत अनंत वृत्तींचा खेळ चालला असल्यामुळें या अंतिम पुरुपार्थाची सिद्धि बाह्य सृष्टींत अनेकविध मार्गांनीं चाललेली दिसून येते. जाणत-अजाणत, चुकत-माकत जीवनाचा प्रवाह धिम्मेपणानें तिकडेच चालला आहे. आवश्यकाच्या बंधनांत सांपडलेलें जीवन आवश्यकाच्या प्राप्तीसाठीं धडपडत असतां-असतांच आवश्यकाच्या पलीकडे उड्डाण करून जातें. सुख आणि सौंदर्य, सामर्थ्य आणि साधुत्व यांचा जीवनाला उपयोग आहे म्हणून जरी प्रथम त्यांच्या प्राप्तीसाठीं मनुष्याचा प्रयत्न सुरू झाला तरी शेवटीं सुख-सौन्दर्याच्या आणि सामर्थ्य-साधुत्वाच्या निर्मितींतच त्याला विशेष आनंद दिसू लागतो. आणि त्यांनाच पुरुषार्थांचें रूप मिळतें. जीवनाच्या इतिहासांत असा नियम आढळून आला आहे कीं मनुष्य कोण्याहि पुरुषार्थाच्या मागें लागला तरी त्याला एका विशिष्ट प्रकारच्या संयमांतून, तपश्चर्येतून जावें लागतें आणि त्याला मिळणाऱ्या आनंदाची मीमांसाहि एकाच प्रकारची होते. इन्द्रियसुखासाठीं झटणाऱ्या मनुष्याला सुख हें ध्येयरूपानें प्रिय असलें तरी प्रत्यक्ष झगड्यांत सुखासाठीं तो दुःख भोगण्यास तयार होतो. आणि प्राप्ति होईपर्यंत तो संयमानें वागण्यांत शहाणपणा समजतो. इन्द्रियांच्या भावी सुखासाठीं आज तो त्यांना शिस्त लावून देतो व त्यांत त्याला आपण सुखासाठींच हें करीत आहों अशी कल्पना असल्यामुळें समाधान

वाटत असते. या सर्व प्रयत्नांनीं त्याला शेवटीं यश आलें तर त्याला होणाऱ्या आनंदाची मीमांसा पुढीलप्रमाणेंच होते. प्रयत्नाच्या पूर्ततेमुळें त्याला आपल्या स्वातंत्र्याची आणि सामर्थ्याची प्रतीति होते. अवश्यकतेच्या पलीकडे जाण्याची आपली पात्रता आहे या जाणिवेनें त्याला दुःख राहात नाहीं. आणि आपल्या अनंततेचा आस्वाद घेतां आल्यामुळें तो पूर्ण आनंदी होतो. हाच नियम इतर कोणत्याहि पुरुषार्थाला लागू आहे. ध्येयाची कल्पना, त्यासाठीं जीवनांतील सर्व शक्तींचा विनियोग, तात्कालिकाची विरक्ति, सतत साधनेची आराधना, यामुळें आवश्यकाच्या पकडीतून सुटका आणि त्यामुळें आपल्या अनन्तत्वाची प्रतीति हा क्रम अबाधितपणें आढळून येतो.

जीवनाशीं अखंड समरस होण्याचा हव्यास ही मनुष्याला पूर्णत्वाकडे नेणारी शक्ति आहे. नदी जशी वेगानेंच शुद्ध होत जाते, त्याप्रमाणें जीवन हें प्रामाणिक धडपडीनेंच पवित्र बनतें. पण प्रवाहाचा जोर नसला म्हणजे नदी वाळूंतच लुप्त व्हावी अथवा तिचें प्रवाहित्व संपून तिला सांचलेल्या तळ्याचें रूप यावें त्याप्रमाणें जीवनाचा आवेश लुला झाला कीं मन ठराविक ठिकाणींच फेऱ्या घालीत राहातें आणि त्याचें प्रगतिपरत्व नाहीसें होऊन त्याला संकुचित स्वरूप प्राप्त होतें. कोणताहि पुरुषार्थ धरून निघाल्यास हरकत नाहीं पण मनुष्याची दृष्टि क्षणिकावर खिळून न राहतां ती चिरकालिकाचा शोध करणारी झाली पाहिजे. आणि स्वतःच्या व्यक्ति-जीवनापुरतीच मर्यादित आणि कृपण न होतां विश्वजीवनाइतकी व्यापक आणि उदार होत गेली पाहिजे. मनुष्य–दृष्टि जितकी अनित्यावरून नित्यावर आणि स्वतःवरून विश्वावर स्थिर होत जाईल त्या मानानें त्याच्या पुरुषार्थाचें स्वरूप उत्तरोत्तर शुद्ध आणि महनीय होत जाईल. या संकुचित-पणाच्या आपत्तींतून वांचण्याचा एकच मार्ग म्हणजे आपल्या वृत्ती सत्यप्रिय आणि समर्थ राखणे हा आहे. सत्यप्रियतेंतूनच सामर्थ्य निर्माण होतें. पुरुषार्थाचें स्वरूप अधिकाधिक उज्वल बनत गेलें कीं त्यासाठीं लागणारा त्याग करण्याची इच्छा स्वभावतःच उत्पन्न होत जाते. म्हणून कळकळ अथवा सत्यतेची तळमळ हीच जीवनांतील मुख्य वस्तु आहे. मनुष्य कोणत्याहि वृत्तीनें प्रेरित झाला असेना. त्याच्या जीवनांत ही तळमळ

असेल तर त्याच्या उद्धाराची काळजी करण्याचें कारण नाहीं. तो स्वतःच आपला उद्धार करीत जाईल.

तथापि कांहीं आयुष्यांत इतक्या अप्रत्यक्ष रीतीनें होणाऱ्या विकासापेक्षां जीवनाचे उच्च धर्म जाणल्याबरोबर प्रत्यक्ष त्यांच्या आचरणानेंच तात्काल जीवन–साफल्य घडवून आणावें अशी तीव्र इच्छा उत्पन्न होते. लहानसान पुरुषार्थ त्यांना साधक न वाटतां बाधकच भासूं लागतात. आपण प्रयत्न-पूर्वक इन्द्रियमनाच्या वृत्ति अन्तर्मुख बनवून जीवनांतील मांगल्याचें आपल्या आचरणांत कायमचें प्रस्थापन करावें अशी त्यांची तळमळ चालूं लागते. संपूर्ण शुद्धि, संपूर्ण प्रेमवृत्ति यांचा केव्हां आविष्कार होईल असा त्यांना ध्यास लागतो. ध्येयार्थी पुरुषांत तीव्रतेनें जीवन–शुद्धि घडवून आणणारे हे पुरुष 'मुमुक्षु' 'संत' या नांवानें इतिहासांत सर्वत्र प्रसिद्ध आहेत.

श्री. साने यांची भूमिका या मुमुक्षूची आहे. भारतीय भक्तीच्या वाता-वरणांत आणि महाराष्ट्राच्या ज्ञानेश्वर–तुकाराम या संतांच्या संगतींत त्यांचें जीवन वाढत आल्यामुळें त्यांना इतर कोणत्याहि कलांपेक्षां या जीवनकलेचें महत्त्व अधिक वाटतें. विविध कलांचा जन्म जीवनाचा अर्थ समजावून घेणें आणि इतरांना समजावून देणें यासाठींच असल्यामुळें जीवनाला विरोधी अशी कलाच संभवणार नाहीं. कोणतीहि कला घेतली तरी तिच्या द्वारें जड द्रव्यावर मानवी कल्पनांचें प्रभुत्व स्थापित होऊन आत्मानंदाचा आस्वाद घेण्याची सोय झाल्याचें आढळून येतें. कलावंताच्या मनांत असलेलें सौंदर्य पाषाणांतून, आकृतिवर्णांतून, शब्दांतून, अथवा सुरांतून प्रगट होत असतें. ज्या अंशानें तें सौंदर्य सिद्ध झालें असेल त्या अंशानें त्या कलाकृति विश्वांत अमर होतात आणि जीवनाला उदात्त करीत राहतात. जीवनकलेची उपासना करणारा संत हा पाषाणादि बाह्य साधनांचा आश्रय न घेतां आपलीं साधुत्वाचीं–मांगल्याचीं दर्शनें आपल्या प्रत्यक्ष जीवनांतच प्रगट करितो. जीवनांतील प्रत्येक स्फूर्ति ही कृतीसाठींच निर्माण झालेली असते. कृतीच्या उदात्ततेवरच जीवनाचें मूल्य ठरतें. जीवन जर अशुद्ध झालें असेल तर शुद्ध कला निर्माण होणार नाहीं. जीवनाचा ताल सुटला कीं कला बेताल व्हावयाचीच. माणसें क्षुद्र वृत्तीचीं झालीं तर त्या समाजांत जीवन आनंददायक वाटणार नाहीं. चांगलीं चित्रें आणि

दुराचारी माणसें अथवा वाईट चित्रें आणि सदाचारी माणसें यांपैकीं आपण कशाची निवड करूं? वाङ्मयांत आदर्श पुरुष–स्त्रियांचीं वर्णनें असण्यापेक्षां जीवनांत तशा व्यक्ति दर्शनाला मिळणें यांत अधिक आनंद आणि औचित्य नाहीं कांय? संगीतांत बदसूर येऊं नये म्हणून जपतात त्याचप्रमाणें किंबहुना त्याहूनही अधिक जीवनांत बदसूर निघूं नये म्हणून जपणें अगत्याचें नाहीं काय? काव्यांत शब्द निवडून वापरावयाचे पण भाषणांत अपशब्दाची गल्लत होणें हें बरें आहे का? वाङ्मय रसात्मक असतें त्यापेक्षां जीवित अधिक रसात्मक झालें पाहिजे. या दृष्टीनें आपल्या सर्व इन्द्रियांनीं केवळ सत्यं–शिवं–सुंदराचें पूजन करणारे संत हेच मोठे कलावान् होत यांत शंका नाहीं.

आज भारतीय जीवन बेताल आणि बदसूर झालें आहे. जागतिक जीवनाचाच तो बिंदु असल्यामुळें जागतिक वातावरणांत उत्पन्न झालेल्या अनेक विकृतींचा मल त्यांत उतरला आहे. जगांत शास्त्रीय ज्ञानाची झपाट्यानें वाढ झाल्यामुळें मनुष्यजीवनाला उपयुक्त अशा अनेक सुखांचा पसारा निर्माण झाला आहे. संपत्तीच्या राशी भोंवतीं असूनहि अन्नाचा कण पोटांत न गेल्यामुळें मनुष्यांच्या मुखावर प्रेतकळा दिसत आहे. मानस शास्त्राचे सिद्धान्त आणि राजकीय व्यवस्थेचे विचार प्रगल्भतेला पोंचूनहि सामाजिक समाधान अगर संस्कृतीची स्थिरता उत्पन्न झाली नाहीं. व्यक्तिस्वातंत्र्य आणि विवेकवाद यांनीं समाजांतील दौर्बल्य आणि जडता यांचा संहार करण्याचा प्रयत्न चालविला; समता आणि लोकशाही या तत्त्वांनीं मनुष्यमात्राला समर्थ आणि स्वतंत्र होण्याची संधि आणून दिली; तथापि प्रत्यक्ष अनुभवांत जुलूम वाढता आहे. आर्थिक बेकारीनें उपासमारी होत आहे आणि पारतन्त्र्य वाढून जीवन निराश आणि निरानंद झालें आहे. जीवनाचे प्रश्न सोडविण्याठीं मोठमोठ्या क्रान्त्या आणि प्रतिक्रान्त्या होत आहेत. तथापि अद्यापि जीवनाचा धर्म सांपडून त्याप्रमाणें समाज वागल्यानें तो सुखी होईल अशी स्थिति दिसत नाहीं.

संस्कृतीचे ऐवजीं अशी विकृति उत्पन्न होण्याचें कारण काय? मानवी संस्कृति केवळ सुखवादावर उभारतां येणार नाहीं. व्यक्तिस्वातंत्र्याच्या योग्य क्षेत्रांतच त्या तत्त्वाचा विस्तार झाला पाहिजे. आत्मविकासाच्या

बाबतींत व्यक्तीला स्वातंत्र्य मिळालें पाहिजे. परंतु भौतिक दृष्ट्या इतरांचा नाश करून स्वतःचा विलास चालविण्याचें कृत्य व्यक्तिस्वातंत्र्यांत न मोडतां तें सामाजिक अत्याचारांत मोडेल. शास्त्रीय ज्ञान ज्या मानानें वाढेल त्या मानानें त्याचा लाभ सर्वांच्या वांट्यास आला पाहिजे. संपत्तीची मालकी व्यक्तींच्या हातीं न राहतां ती सर्व समाजाच्या हातीं गेली पाहिजे. आणि सर्व समाजाचें हित तें आपलें हित अशी विश्वकुटुंबी वृत्ति वाढली पाहिजे. आज विश्वकल्याण चिंतणाऱ्या उदार विभूतींचें युरोपांत नजन नाहीसें झालें असून ढोंगी मुत्सद्दी आणि लोभी व्यापारी यांचे हातांत सर्व कारभार आला आहे. लोभ आणि भोग यांवरच सर्व आचार अधिष्ठित झाल्यामुळें द्वेष आणि हिंसा यांचें साम्राज्य विश्वावर विस्तारत चाललें आहे. नुसत्या उपदेशानें अथवा प्रतिद्वेष आणि प्रतिहिंसा केल्यानें ही विसकटलेली घडी नीट होईल असें मानून कोणीं फसवणूक करून घेऊ नये. ही विकृति तात्त्विक दृष्ट्या दुष्ट असून तिच्यांत केवळ भौतिक सुखवाद आणि नास्तिक जडवाद यांचें मिश्रण आढळून येतें. मानवी जीवनाला आवश्यक असणाऱ्या उच्च श्रद्धेची आणि उदात्त भावनांची त्यांत भयंकर उणीव राहिली आहे.

या विकृतीचा परिणाम पाश्चात्य वाङ्मयावरहि पडत चालला असून ध्येयवादी आणि उदात्त सौंदर्याचे उपासक अशा लेखकांपेक्षां भोगलोलुप आणि स्वैराचारी वृत्तीचे लेखक आपल्या मोहक लिखाणानें उथळ मनांचा ताबा घेत आहेत. पाश्चात्य वाङ्मयाचा महाराष्ट्राशीं प्रथम परिचय झाला त्यावेळीं पाश्चात्यांच्या थोर लेखकांच्या उच्च विचारांचा येथील विद्वद्वर्गावर खोल परिणाम झाला. त्यामुळें मराठी वाङ्मयांत देशाभिमान, सामाजिक समता, ज्ञानसंवर्धन, इत्यादि गोष्टी प्रकटल्या आणि त्यांचा आचारहि महाराष्ट्र जनतेनें जोमानें चालविला. तथापि अलीकडे यूरोपांतील विकृतीनें तेथील ध्येयवादाला ग्रह दिल्यानंतर आमच्या समाजसुधारकांस वाटणाऱ्या आशा निष्फल झाल्या. आतां आमच्या इकडेहि साहित्याची मंमाराशीं फारकत होऊन उथळ कलाविलास मिरवूं लागला आहे.

जीवनाच्या या विकृतीला आणि वाङ्मयाच्या अधःपाताला तोंड देण्याचे

सामर्थ्य जिच्यांत आहे अशी नव संस्कृति निर्माण करण्याचें ध्येय हृदयाशी बाळगून जीवनाच्या सर्व क्षेत्रांत शुद्धतेचा प्रवाह खेळविणारे शेंकडो वीर पाहिजे आहेत. जगाच्या इतिहासांत अधःपाताच्या काळीं समाजांत नव चैतन्य खेळविणारे लोक वारंवार निर्माण झाले आहेत. आजहि यूरोप-अमेरिकेंत असे कांहीं पुरुषार्थी लोक या विकृतीशीं वाङ्मयांतून आणि जीवनांतून सारखे झुंजत आहेत. ज्यांची दृष्टि केवळ पार्थिवांतच रममाण झालेली नाहीं, विश्वांतील मांगल्यावर ज्यांची अखंड श्रद्धा आहे, विश्वसेवेसाठी जे आपल्या सर्वस्वाचें मोल अर्पिण्यास आनंदानें तयार आहेत, विषमता पाहून ज्यांचें अंतःकरण तळमळून जातें, ज्यांच्या चित्तांत प्राणिमात्राबद्दल निर्वैर भाव नांदत आहे, त्रैलोक्याचें राज्य मिळालें तरी जे सत्यापुढें त्याला तुच्छ मानतील, शत्रूंवर आणि छळकांवरहि जे प्रेमच करितील आणि हृदयांतून रक्ताची धार वाहत राहिली तरीहि जे कोणाच्या हिंसेचा विचार मनांत आणणार नाहींत असे विश्वकल्याणार्थ देहगेहाची पर्वा सोडून निघालेले निर्भय वृत्तीचे संत हेच आज जगाचे तारक होतील. भारतीय संतांनीं आपल्या इतिहासांत हा चमत्कार एकदां नव्हे अनेकदां करून दाखविला आहे. आणि श्री. साने यांच्या या संग्रहांतील भावना तपासल्या म्हणजे या बाबतींत भारतीय परंपरा अद्यापि त्रुटित झाली आहे असें वाटत नाहीं. ही श्रद्धा जोंपर्यंत भारतीय रक्तांत खेळत आहे तोंपर्यंत भारतीय संस्कृतीच्या उज्वल भविष्याबद्दल कोणी निराश होण्याचें कारण नाहीं.

विश्वांतील मांगल्यावरचा दृढविश्वास संतांच्या जीवनाचा मुख्य आलंब असल्यामुळें सामाजिक दुःखाचें निरसन करण्यास लागणारा उच्च आशावाद समाजांत संतच निर्माण करूं शकतात. व्यक्तिगत सुखाची अनास्था ही संतांची सहज मनोवृत्ति असल्यामुळें विश्वहितार्थ व्यक्तिसुखाचा बळी देण्यास लागणारी त्यागवृत्ति संतच आचरून दाखवितात. स्वार्थाचा आणि पशुवृत्तींचा आपल्या जीवनांतून कायमचा वध केल्यामुळें विश्वप्रेम करण्याची पात्रता संतांमध्येंच उत्पन्न झालेली असते. सामान्य माणसें संसाराच्या आपत्तींनीं गांजलेलीं आणि निराश झालेलीं असतात. त्यांना सुखाचा मार्ग निर्माण करून देण्याचें कार्य या विश्वसंसारी संन्याशांनाच करतां येतें. ध्येयवादी समाजसुधारक आणि अध्यात्मवादी संत यांत वृत्तीचें साम्य असेल

आहे. तथापि संतांच्या अध्यात्मवृत्तीमुळें त्यांना निर्वैरता आणि निरहंकारिता सुलभ असते व त्यामुळें त्यांच्या निष्ठेला अहिंसेचें आणि शुद्ध प्रेमाचें स्वरूप येतें. द्वेषानें, मत्सरानें, लालसेनें आणि हिंसाप्रियतेनें आहाळून जाणाऱ्या आजच्या जागतिक समाजाला समाधानांचा मार्ग दाखवून सात्विकतासंपन्न करण्याचें कार्य अध्यात्मवादी संतच करूं शकतील. संतांच्या या विशिष्ट शक्तीमुळें त्यांना समाजविकासांत फार मोठें स्थान आहे हें सर्वांनीं लक्षांत बाळगिलें पाहिजे.

जीवन आणि वाङमय यांचा संबंध अगदीं निकटचा आहे. जीवनाच्या अप्रकट शक्ति प्रथम वाङमयांत स्फूर्तिरूपानें प्रगट होतात आणि वाङमयांत वावरणाऱ्या वृत्ती शेवटीं जीवनांत कृतिरूप घेतात. प्रत्यक्ष जीवनाचे मागें आदर्श जीवनाचा –पूर्ण जीवनाचा– रेटचा आहे. आदर्श जीवनाचीं अस्फुट दर्शनें प्रत्यक्ष जीवनांत थोर कलावंतांच्या प्रतिभादृष्टीला दिसत राहतात. आदिशक्ति ही शब्दरूपानें व्यक्त होऊं लागते. आणि सामान्य जनांना आपल्या जीवनाचा अर्थ समजण्याचें साधन म्हणून वाङमयाचा अवतार झाल्याचें अनुभवास येतें. वाङमयनिर्मितीच्या मागें ही जीवनाची प्रकट होण्याची धडपड असते हें ध्यानांत धरलें असतां वाङमयकारांना दैवी संपत्तीचे पुरुष, दिव्य दृष्टीचे द्रष्टे, क्रान्तदर्शी कवी, जीवनाचे महर्षी, अशीं गौरवाचीं नांवें कां दिलीं जातात, तें सहज दिसून येईल. वाङमय हा शब्द या ठिकाणीं व्यापक अर्थानें योजिला असून जीवनाच्या दिव्यतेची साक्ष पटविणाऱ्या सर्व कलाशक्तींचा वाचक समजण्यास हरकत नाहीं. कवि, कलाकार, वाङमयकार हे शब्दही याच अर्थानें समजावे. कवि जेव्हां केवळ पद्यकार अथवा काव्य–शिल्पी नसतो तेव्हां तो जीवनाचा भाष्यकार असतो. हें भाष्य तर्कमार्गानें लिहिलेलें नसतें. भावनांच्या ओलाव्यानें आर्द्र झालेलें आणि हृदयाच्या रसांनीं रसाळ झालेलें असतें. सामान्य जनांची दृष्टि दृश्यावरच इतकी दृढ झालेली असते कीं दृश्याचे पोटीं जीं अनंत अदृश्यें सामावलेलीं आहेत तीं त्यांना कोणीतरी दाखवावीं लागतात. कवीचें कार्य हें असतें कीं आपल्याजवळची दिव्यदृष्टी देऊन सांसारिकांना परम अर्थाचीं, ऐहिकांना परलोकाचीं दर्शनें घडवून आणावयाचीं; नित्याच्या अवलोकनानें आंधळे झालेल्या स्त्री–पुरुषांना साध्याहि

विषयांतील मोठा आशय दाखवावयाचा. आवश्यकांच्या कोंडींत सांपडलेल्या देहवाद्याला अनंत आकाशप्रदेशांत आत्म्याचें स्वातंत्र्य लाभेल असें करावयाचें; अपूर्णतेच्या बंधनांत सांपडल्यामुळें असत्य, कुरूप आणि पापमय भासणारी सृष्टि सत्य, सौंदर्य आणि साधुत्व यांनीं पूर्णपणें भरलेली आहे याचा पूर्ण प्रत्यय आणून द्यावयाचा; महाकवि आपल्या उच्च सौंदर्यदृष्टीनें या विश्वांतील वस्तूंमध्यें अडकून पडलेल्या परमशुद्ध अर्थाला आपल्या मूळच्या पूर्ण स्वतंत्र रूपांत पाहूं शकतो व त्या आदर्श अनुभवाचीं गोड गाणीं गात गात तो संसारांत फिरत जातो. तो जेथें जाईल तेथें जीवनांत ताजेपणा, साधेपणा, शुद्धपणा पसरतो आणि जीवनाला उदात्तता आणल्याबद्दल जग त्याचें कायमचे ऋणी राहतें. या वाङमयानें निर्माण केलेल्या दृष्टींत जीवनाला शुद्ध करण्याचे सर्वच धर्म असतात. ती नियतीच्या कठोर नियमांनीं निबद्ध नसते. प्रत्यक्ष जीवनांतील सुखदु:खें आणि आशानिराशा यांचा एकाच आनंदरसांत विलय होऊन जातो; जड निसर्गांचीं कवचें उकलून आंतील चैतन्य प्रतीत होतें आणि मानवी भावनांचीं संकुचित आवरणें फुटून त्यांतील विश्वव्यापी रसाची उपलब्धि होते.

जीवनाच्या उच्च प्रदेशांतून उत्पन्न होऊन संसाराच्या मरुभूमींत वाहणाऱ्या या भावगंगा संसाराला आरामाचें स्वरूप आणतात. नाना फुलांनीं आणि फलांनीं ही भूमि भरून जाते. काव्याचा—वाङमयाचा परिपाक आनंद हा आहे, बोध किंवा उपयुक्तता नव्हे असें म्हणतात त्याचा खरा अर्थ समजला पाहिजे. काव्यानें संसार मंडित होतो आणि पंडितहि होतो. काव्याचा आनन्द हा जीवनाचा आनन्द असल्यामुळें हजारों उपदेशांपेक्षां जीवनाला शुद्धता आणण्याचें सामर्थ्य त्यांत अधिक भरून राहिलेलें असतें. काव्यांत ज्ञान असतें तें जीवनाचें असतें. तर्काच्या भाषेंत तें सगळें मांडतां आलें नाहीं तरी तर्कानें जाणलेल्या ज्ञानापेक्षां तें अधिक जिवंत आणि म्हणूनच जीवनाला अधिक उपकारक असतें. कलेचा नीतीशीं संबंध काय ? या प्रश्नाचें खरें उत्तर हें आहे कीं समाजाच्या विशिष्ट व्यवस्थेसाठीं रूढविलेल्या विशिष्ट नीतिकल्पनेच्या मर्यादा कला पाळीत नसली तरी ती जीवनाच्या नीतीचा आविष्कार करण्याकरितांच प्रगट होत असल्यामुळें ती आपल्या आचरणानें तिचाच प्रसार करील. जीवनाच्या मंगल श्रद्धेचा ज्यांत भंग झालेला असेल तें काव्य वा कला या नांवालाच पात्र नाहीं. तो केवळ

शवाचा शृंगार आहे. जीवन–विरहित वाङ्मय हें केवळ वंचिताचा विरंगुळा आहे.

संतांच्या जीवनांत प्रगट होणारी शुद्ध आचरणाची तळमळ आणि कवींच्या काव्यांत प्रगट होणारी शुद्ध जीवनाची कळकळ या तत्त्वतः एकच आहेत. संत आपल्या जीवनांत काव्य प्रगट करीत असतात आणि कवि आपल्या काव्यांत जीवन प्रगट करीत असतात. संत आपल्या जीवनाला कलेचें सौंदर्य आणितात; कवि आपल्या कलेला जीवनाची शुद्धि अर्पण करितात. या दृष्टीनें आदर्श संत हा एक महाकविच होय, आणि त्याचप्रमाणें महाकवि हा आदर्श संत होय असें म्हणावयास हरकत नाहीं. समाजाला दोघांचाहि उपयोग आहे. सत्योपासक तत्त्ववेत्ता, सौंदर्योपासक कवि, आणि साधुत्वोपासक संत हे विश्वांतील तीन थोर महात्मे आहेत. सत्य, सौंदर्य आणि साधुत्व हीं जीवनाचीं त्रिविध तत्त्वें आहेत. तथापि जीवन हें एकजिनसी असल्यामुळें सत्य, सौंदर्य आणि साधुत्व हीं जीवनाचीं तीन दर्शनें परस्परविरोधी नसून तीं एकाच वस्तूचीं तीन अभिधानें आहेत. प्रत्यक्ष संसार हा जीवनाच्या प्रकटीकरणाचें क्षेत्र असल्यामुळें त्यांत अपूर्णता आहे. अपूर्ण असल्यामुळेंच तो अशुद्ध आहे. या अपूर्णतेंतून पूर्णतेकडे जाण्याची ओढ म्हणजेच सृष्टीचा विकास. या विकासाला ज्ञान, प्रेम आणि कृति यांची सारखीच आवश्यकता आहे. प्राचीन महर्षींमध्यें सत्याचें ज्ञान, जीवनाचें प्रेम आणि आचरणाचें साधुत्व मिसळून गेलेलें होतीं. मानवी संस्कृति शुद्ध आणि विकासोन्मुख राहावी असें वाटत असेल तर या त्रिविध वृत्तींची समाजांत जोमानें जोपासना झाली पाहिजे. म्हणजे जीवन शुद्ध होईल आणि वाङ्मय निर्मळ होईल.

समाजांत या वृत्ती क्वचित् भिन्नतेनें आणि क्वचित् अभिन्नतेनें आढळतात. ज्या ठिकाणीं ज्ञानाचा हव्यास, शुद्धतेची तळमळ या गोष्टी एकवटून प्रकट होतील त्याला 'अयं समुदितः सर्वो गुणानां गणः' असेंच म्हणावें लागेल. जीवनाचें साधुत्व आणि काव्याचें सौंदर्य जेथें एकत्र अवतरलें असेल त्या काव्याला भारतीय लोक 'सन्त–काव्य' अशा विशिष्ट नांवानें संबोधितात. आधुनिक काळांत विश्व–विश्रुत रवीन्द्रनाथ टागोर हे 'सन्तकवि' म्हणून उदाहरणादाखल सांगतां येतील. पाश्चात्य राष्ट्रांत

रवीन्द्रांना मिळालेली मान्यता पाहिली म्हणजे हें भारतीय ध्येय विश्व-ध्येय होण्याच्या लायकीचें आहे याविषयीं शंका राहात नाहीं.

श्री. साने यांच्या जीवनाचा आणि वाङमयाचा साकल्यानें विचार केला म्हणजे आतांपर्यंत केलेल्या विवेचनांतील विचार-सरणी त्यांना कशी लागू पडते हें दिसून येतें. आपणांपुढें जरी त्यांचें काव्यच असलें तरी तें त्यांच्या जीवनाशीं अत्यन्त निगडित असल्यामुळें आपणांला त्यांच्या जीवनाकडे दृष्टि दिली पाहिजे. त्यांचें जीवन जसें भारतीय राहिलें आहे त्याचप्रमाणें त्यांचें वाङमयध्येयहि भारतीयच आहे. 'सन्त' आणि 'कवि' यांच्या आतांपर्यंत स्पष्ट केलेल्या भूमिका त्यांच्यांत एकवटल्या असल्यामुळें त्यांच्या काव्याला 'सन्त-काव्य' हा शब्द लावावयाला हरकत नाहीं. 'सन्त-काव्य' या दृष्टीनें त्यांचें स्थान कोणतें ठरेल तें त्यांच्या काव्याच्या आधारानें ठरविण्याचा प्रयत्न करितां येण्यासारखा आहे.

प्रस्तुत काव्यसंग्रहाचे सामान्यतः चार खंड पडतात. पृष्ठ १ ते ११६ पर्यंत एक खंड होतो. यांतील कविता बहुतेक ईश्वरविषयक आहेत. पृष्ठ ११७ ते १८६ पर्यंत दुसरा खंड होतो. यांतील बहुतेक कविता संसार विषयक आहेत. पृ. १८७ ते ३०२ तिसरा खंड होतो. यांतील बहुतेक कविता देशभक्तिपर आणि स्वातंत्र्यविषयक आहेत. पृष्ठ ३०३ ते ३७६ पर्यंत 'सत्याग्रही' नामक खंड-काव्य आलें आहे. त्यांत देशभक्तीचाच मुख्य सूर असून संस्कृतीच्या विविध अंगासंबंधीं कवीचे विचार साकल्यानें आले आहेत. आदि अंतीं 'पत्री' समर्पण आहे.

पहिल्या खंडांतील कवितांत कवीची ईश्वरप्राप्तीची तळमळ व्यक्त झाली आहे. या सर्व कवितांत ज्याप्रमाणें भक्तीच्या काव्याला अग्रस्थान मिळालें आहे, त्याचप्रमाणें कवीच्या जीवनांतहि इतर वृत्तींपेक्षां भक्तिच प्राधान्य मिळवून राहिली आहे. आपल्या हृदयसिंहासनावर अभिनव रमणीय आणि गुणनिधान अशी प्रभूची मूर्ति सदैव विलसत राहावी अशी कवीची प्रार्थना आहे. कवीच्या मनोमंदिरांत रामप्रभु बाल्यापासून बसून प्रेमसुखाच्या गोड गोष्टी सांगत असल्याचें कवीला स्मरत आहे. तारुण्याच्या उमेदींत ध्येयांची गर्दी उडाल्यामुळें कधीं प्रतिभावान् ग्रंथकार व्हावें, प्रभावी सत्कवि व्हावें, अथवा इतिहास-संशोधक व्हावें असें वाटावें; तर कधीं लोक-

सेवेंत रक्त आटवावें असें वाटावें; पण या कोणत्याच ध्येयानें मनाला विसांवा न वाटल्यामुळें पुन्हां ईश्वराच्याच पायीं लोळण घ्यावी असा कवीचा ध्यास आहे. आपलें मन सुंदर व्हावें, आपल्या हृदय–भवनांत सर्वत्र प्रकाश भरून राहावा यासाठीं कवीचें मन रात्रंदिवस झुरत आहे. रामानें जागृत व्हावें, आपलें अंतर हंसूं लागावें, आपला जीवनतरु पुष्पित आणि फलित व्हावा या हेतूनें तो मनमोहनाचा धांवा करीत आहे. देवाविना कोणताच आधार नाहीं या व्याकुळतेनें जीव कासावीस झाला तरी त्याच्या भेटीच्या अपेक्षेनेंच, केवळ रामासाठींच त्याचा जीव उरला आहे. रात्रींच्या वेळीं इतर मंडळींना दिवसाच्या श्रमानें स्वस्थ झोंप लागली तरी कवीनें जागें राहावें, कोठडीच्या दारांत उभें राहून बाहेर अंगणांतील झाडांचीं पानें सळसळलीं कीं ' तो येतो आहे ' या आशेनें हात बाहेर काढून बसावें आणि निराश होऊन अश्रु गाळावे अथवा आपण अशुद्ध आहों म्हणून देव भेटत नाहीं यासाठीं कंदिलावर हात भाजून घ्यावा इतकी उत्कटता कवीच्या मनांत उसळत आहे. देवाजवळ बसून रडावयाचा छंद त्याला लागला आहे. या राम-वेड्याच्या अंतरींचें दुःख इतरांना समजणें शक्य नाहीं म्हणून त्यानें रघुरायाला आपली तळमळ एकांतीं निवेदन करावी, निराधार होऊन प्रभूला आपले चरण दाखविण्याची विनवणी करावी, आपल्या आशा–निराशा आपले अश्रू बरोबर घेऊन शतजन्मांच्या उपवासाचें पारणें होईल या आशेनें आईच्या दाराशीं उभें राहावें आणि दार उघडावें म्हणून विनंति करावी, आपल्या जीवनाच्या पडित वावरांत प्रभूनें स्वतःच्या इच्छेला येईल त्या प्रकारें मशागत करावी आणि जीवन–बाग सजवावी अशी त्याची इच्छा आहे. तथापि त्याच्या भेटीची अजून वार्ता नाहीं. 'येतो का तो दुरून' या अत्यंत सुंदर कवितेंत ही तळमळ व्यक्त झाली आहे. रडून रडून आतां नयनांत मुळीं नीरच राहिलें नाहीं. अश्रुविणें रडणें हें किती दाहक असतें हें बाहेरून पाहाणाराला कसें समजेल? किती विनवण्या केल्या, अश्रूंचे सडे घातले तरी दर्शन होत नाहीं तर आतां जगण्यांत तरी अर्थ काय आहे म्हणून कवीला 'मी केवळ मरुनी जावें' असें तीव्रतेनें वाटूं लागतें. सृष्टींतील सारे लोक दुःखी दिसतात. या हंसणाऱ्या सृष्टींत मी रडत राहण्यापेक्षां

मला नेत कां नाहींस ? विनाकारण इतरांच्या आनंदांत हा मिठाचा खडा कशाला ? सारी निसर्गसृष्टि हांसत, नाचत येत आहे आणि कवीच्या हृदयांत मात्र नैराश्य पसरलें आहे. आपली होडी बुडत आहे, आपल्याला कृपेचा हात हवा आहे. सर्वत्र अंधार दाटला आहे, एका किरणाची याचना आहे. असे आर्तीचे उद्गार येत आहेत. आतां तर निराशाच गडद दाटली. हें जीवन व्यर्थ आहे. नव्हे मनुष्यजीवनही व्यर्थच आहे. आनंद हा भ्रमच आहे. सृष्टि स्वार्थानेंच भरली आहे. डोळे बांधून टाकले कवीनें. नको तें दुष्ट दर्शन ! सगळे महात्मे–थोतांड आहे सारें. सारेच आसक्त. ते रामकृष्ण नव्हते का विवेकानंदासाठीं व्याकुळ होत. जगांत पूर्ण शुद्धता नाहींच ! असा वैताग वाढला. हें पूज्यनिंदन, ही सृष्टीची शिसारी, हा मनुष्याबद्दलचा तिटकारा म्हणजे केवळ निराशेची प्रतिक्रिया! वैतागाची पराकोटी अशी कीं एक तत्त्वज्ञानच बनविलें कवीनें त्याचें. Philosophy of Stone 'पाषाण–दर्शन.' माणूस ही विकृतीची शेवटची पायरी. पूर्णता म्हणजे शांतता. माणसांपेक्षां पशू किती शांत ! पशूपेक्षां वनस्पती ! आणि वनस्पतीपेक्षां जड सृष्टि. पाषाण हीच स्थितप्रज्ञाची प्रतिमा झाली पाहिजे ! अमळनेरच्या 'तत्त्वज्ञान–मंदिरांत' असतांना या अवस्थेंतून कवी गेला आहे.

**'निराश होतों बनतों भ्रमिष्ट**
**विनिंदितों व्यक्ति जगद्–गरिष्ठ ।। '**

हे हृदयाचे बोल त्या अवस्थेचे दर्शक आहेत.

"कैसें लावियलें मी दार" या कवितेंत या भ्रमांतून झालेली सुटका वर्णिली आहे. माझें रडणें माझ्याच कृतीचें आहे.

**'पायांपाशीं माणिकमोतीं**
**प्रकाशसिंधू सदा सभोंतीं**
**भिकार तिमिरीं केली वसती**
**आणि अतां रडणार ! '**

या सुंदर ओळींत या विकृतीची स्पष्ट कल्पना आल्याचें दिसतें. आशा-निराशांच्या या हेलकाव्यांतहि कवीची श्रद्धा वाढत आहे. आपली जीवनाची वेल प्रभूच्याच अंगणांत लागलेली आहे. तिच्याकडे प्रभू दुर्लक्ष करणार नाहीं. आपली जीवन–कळी केव्हां तरी फुलेलच अशी 'आशा' कवीला

वाटते आहे. अंतरींच्या वासनाविकारांबद्दल जरी त्याला तीव्र जाणीव आहे तरी

**' जन्म मरणांचीं । पाऊलें टाकीत**
**येतों मी धांवत । भेटावया**
**दिवसें दिवस । होऊनि निर्मळ**
**चरणकमल । पाहिन तुझें '**

अशी त्याला खात्री वाटत असून तो ' सोन्याचा दिवस ' लवकरच उजाडल्याशिवाय राहणार नाहीं याविषयीं त्याला विश्वास वाटत आहे.

या श्रद्धेच्या जोरावर आतां जगावें असें तर वाटतेंच आहे. पण जीवनांतील दुखःकारक प्रसंगीं आनंद अनुभविण्याची सोयहि आतां झाली आहे. तुरुंगांतील चक्की पिसण्यासारख्या प्रसंगीं जात्याच्या खुट्यावर परमेश्वराच्या पायाचीच कल्पना केल्यामुळें चिंता, भीति सरल्याचें आणि शोक–खेद गळाल्याचें ' अति आनंद हृदयिं भरला ' या गीतांत सुचविलें आहे. विकासाला विपत्तीचीहि जोड होते याची जाणीव झाल्यामुळें ' आईचा-मार ' या कवितेंतील वृत्ति अत्यंत बिकट प्रसंगीं कवीला तारक होऊं लागली आहे. आतां निराशा आली तरी टिकत नाहीं. लगेच आशाहि प्रकट होते. हा ' द्विविध अनुभव ' सुरेख वर्णिला आहे. विश्वावर निरपेक्ष प्रेम करावें आणि कोणी प्रेम करूं लागलें कीं,

**' प्रेमाच्या पाठीमागें**
**आशांचे असती लागे '**

हें ओळखून सावध राहावें व त्यांनाहि सावध करावें हा अनुभव कवीला आला आहे. आतां ' अश्रू ' हें हृदयशुद्धीचें साधन झालें आहे. दुबळ्या निराशेचें चिन्ह राहिलें नाहीं.

**' रड तूं सदैव बाळा । भरूं दे तुडुंब हृदय**
**येईल भक्ति मग ती । होईल सच्चिद् उदय '**

अशी आतां साधना सिद्ध होत आहे.

ईश्वरविषयक भक्तीचा आविष्कार समाजसेवेंत झाला म्हणजे त्याला विशेपच माधुरी प्राप्त होते. अखिल चराचर हें प्रभूची कर्ममय पूजाच

करीत आहे अशी कवीची श्रद्धा असल्यामुळें आपल्या जीवनांत सर्वत्र सेवा भरून जावी असा ध्यास त्यास लागला आहे. आपण प्रभूच्या नित्य कामीं यावें. आपले अंतःकरणांत प्रभूचें वास्तव्य झालें म्हणजे सर्व क्षुद्र वासना आपोआप नाहींशा होतीलच अशी वृत्ति आतां आहे. प्रभूच्या करांतील पांवा बनून आपला जन्म कृतार्थ व्हावा असें वाटूं लागलें आहे. भक्ति आणि युक्ति यांचा अनुभव एकाच सेवेंत मिळावा असे विचार वाढत आहेत.

**'मदंतरींची मिसळून भक्ति। मदीय कर्मीं, मिळवीन मुक्ति'**

असें 'माझें ध्येय' कवि सांगत आहे.

'येवो वसंतवारा' आणि 'हे सुंदरा अनंता' या दोन कविता फार सुंदर उतरल्या आहेत. सृष्टींत वसंत आला तरी आपल्या मनांत अद्यापि शिशिरच आहे, याबद्दल कवीला वाईट वाटत आहे.

**'संसार मायभूचा। सारा धुळींत आज**
**कांहीं करावयाला। येई मला न काज'**

अशी देशभक्ति ईश्वरभक्तींत मिसळून जात आहे. अथवा ईशभक्ति देश-भक्तींत परिणत होत आहे.

**'त्वत्स्पर्श अमृताचा। मजला मृता मिळूं दे**
**मम रोम-रोमिं रामा। चैतन्य संचरूं दे'**

या गोड ओळी सदैव गुणगुणत राहाव्या इतक्या मधुर आहेत. दुसऱ्या कवितेंत सायंकाळच्या सृष्टिवैभवाचें अत्यंत हृदयस्पर्शी वर्णन आहे. कवीला निसर्गाचें विलक्षण वेड आहे. पानें, फुलें, आकाश आणि पाऊस यांत तो देहभान विसरून जातो. आकाशांतील श्यामल मेघांना सुवर्णाची किनार मिळाल्यामुळें

**'घालूनियां किरीट। कान्हाच का उभा तो**
**ऐसा कधीं कधीं तो। अभास गोड होतो'**

अथवा

**'होतांच वासरान्त। होतांच भास्करान्त**
**जणं पूर वैभवाला। चढतो वरी नभांत'**

हें पाहिल्यानंतर कवीच्या मनांत उदात्त आशावादाचे सूर येतात आणि कवि

**' येतां समीप अन्त । जीवासहि अनंत**
**ऐसें मिळेल भाग्य । करुं मी किमर्थ खंत ? '**

असा स्वत:लाच धीर देतो.

या दोन्ही कविता समग्र वाचल्या पाहिजेत इतक्या त्या भावपूर्ण, सहजस्फूर्त आणि आशावादानें भरलेल्या आहेत.

' हृदयाचे बोल ' यांत सर्व मन:स्थिति कवीनें एकवटली आहे. आशा-निराशा वर्णिल्यावर कवीची मागणी हीच आहे कीं आपल्या सर्व इंद्रियांनीं ईशपदाभोंवतीं प्रदक्षिणा कराव्या. आपल्या सर्व कृतींच्या मागें ईश्वराची विलोभनीय श्यामल मूर्ति पार्श्वभूमीच्या रूपानें राहावी आणि आपल्या सर्व कर्मांत मांगल्य प्रकट व्हावें.

' जीवनांत माझ्या सदा, राम गुंफीन ' या सुंदर गीतांत फारच प्रेमळ-पणा भरलेला आहे. मूळच्या एका प्रख्यात स्त्रीगीताच्या चालीवर याची रचना झाल्यामुळें त्यांत विशेषच मार्दव भासतें. त्यांतहि आपल्या सर्व इंद्रियांनीं सत्यं–शिवं–सुंदराचें पूजन व्हावें हीच तळमळ आढळून येते.

दिव्य आनंदाचे क्षण कवीनें अनुभविले आहेत आणि त्यांच्या आधारावर त्याला पूर्णतेची शक्यता पटलेली आहे. गाडी धीरे धीरे हांकीत गेलें असतां इष्ट स्थानीं पोचूं असा आत्मविश्वासही उत्पन्न झाला आहे. ' प्रभु मम हृदयिं आज येणार ' या कवितेंतील आश्वासन कविजीवनाला फुलविण्यास समर्थ आहे.

या खंडांतील शेवटची कविता ' फुलाची आत्मकथा ' आहे. कवीचें जीवनविषयक सर्व तत्त्वज्ञान त्यांत स्पष्टच आलें आहे. श्रद्धा आणि तपस्या यांच्या आधारानें मानवी आत्मा परमेश्वरी प्रसादाला पात्र होतो आणि सेवेंत त्याची परिणति झाली म्हणजे कृतार्थता होते असा त्याचा सारांश आहे.

जीवनाची आधारशक्ति ही काय स्वरूपाची आहे हें मनुष्यबुद्धीला समजणें अशक्यप्राय आहे. तथापि आपल्या जीवनांत अत्यंत उच्च अशी अवस्था ज्या नैतिक मूल्यांनीं उत्पन्न होते त्यांच्याच द्वारां त्या शक्तीचें

माणूस आकलन करूं शकतो. कवि हा भावनेंतच खेळत, वाढत असल्यामुळें, आपल्या अन्तःकरणांतील उच्च आकांक्षा वर्णन करितांना त्याला रंग आणि रूप निर्मावें लागतें. विश्वशक्तीला कसेंहि वर्णिलें तरी तें वर्णन अपुरेंच होईल. मानवी पूर्णतेच्या कल्पनाहि मानवी बुद्धीनेंच मर्यादित होतात आणि त्यामुळें विश्वशक्तीचें मानवी रीतीनें केलेलें वर्णन उच्च तत्त्वज्ञान दृष्ट्या नेहमींच गौण समजलें जातें. तथापि धर्मभावनेचा परिपोष होण्याच्या दृष्टीनें या चित्र-कल्पनांना मानवी जीवनांत महत्त्वाचें स्थान आहे. कवितेचा अर्थ वाच्यार्थानें न घेतां ध्वनीनें घ्यावयाचा असतो तें यासाठींच. वरील कवितांत कवीची ईश्वरदर्शनाची तळमळ म्हणजे पूर्णतेची तळमळ आहे हें ध्यानांत बाळगल्यास आधुनिक परंपरेंत वाढलेल्या वाचकांनाहि या भावनांशीं समरस होतां येईल आणि रसास्वाद घेतां आल्यामुळें आनंद मिळवितां येईल. रामकृष्णादि नांवें ऐतिहासिक व्यक्तींपुरतीं मर्यादित राहिलीं नसून भारतीय संस्कृतींत त्यांना अत्यंत व्यापक अर्थ आला आहे आणि त्याच भावनेनें कवीनें त्यांचा उपयोग केला आहे. ईश्वरप्राप्तीमार्गें म्हणजे जीवनाचे पूर्णतेमार्गें लागलेल्या पुरुषांना कांहीं विकृति जडण्याचा संभव असतो. स्वार्थवृत्ति नष्ट करण्याच्या प्रयत्नांत पुष्कळ वेळां लोक-संग्रहकारक कर्मांचा सुद्धां नाश होतो आणि भोगत्यागाच्या कल्पनेनें केवळ जीवनार्थ इन्द्रियपोषण देखील पापमय वाटूं लागतें. सुदैवानें श्री. साने यांचे लेखनांत या विकृति फारशा आढळत नाहींत. तथापि जेथें आढळतील तेथें त्या विकृतींकडे वाचकांनीं क्षमावृत्तीनेंच पाहिलें पाहिजे. कांहीं वेळां साधकाच्या अवस्थेंत असतांना या विकृति अपरिहार्य असतात. त्यांच्या मागची दिव्यतेची 'तृषा पाहून आपण समाधान मानलें पाहिजे. श्री. साने यांच्या भक्तिपर कवितांवरून ते एक उच्च प्रकारचे साधक आहेत हें दिसून आलेंच आहे. पूर्णावस्थेची प्राप्ति झाल्याचें ते बोलत नाहींत आणि ज्या दृष्टीनें ते पूर्णतेकडे पाहात आहेत त्या दृष्टीनें सर्वांशीं पूर्णता प्राप्त होण्याचा इतक्यांतच संभव नाहीं.

मनोवृत्तींवर जय मिळविण्यासाठीं यूरोपांतील मध्यकालीन संतांचा चालणारा प्रयत्न बराचसा कृत्रिम आणि वैयक्तिक स्वरूपाचा होता. सगुण-पूजा, भजन, नामस्मरण, मठवास, देहदंडन इत्यादि प्रकार चालत. क्वचित्

ध्यान-धारणादि योगमार्गाचाहि अवलंब होई. या बाबतींत भारतीय संतांचे आणि विशेषतः महाराष्ट्रीय संतांचे साधनमार्ग अधिक सरळ आणि संसारांत राहून साधावयासारखे असत. तरीहि केवळ नामस्मरणाला जास्त महत्त्व आलेंच होतें. आधुनिक काळीं धर्माची कल्पना सामुदायिक होत चालली आहे आणि जनसेवा हाच मुक्तीचा मार्ग होऊं लागला आहे. यामुळें मुक्तीचा अर्थ केवळ व्यक्तिसापेक्ष न राहतां तो समाजालाहि उपकारक होत आहे. भक्तीचें अन्तरंग सेवेच्या बहिरंगाशीं जोडल्यानें समाजसुखाला सात्त्विकता लाभते आणि आत्महिताला जडतेचें स्वरूप येत नाहीं. संसार मस्त होत नाहीं आणि धर्म आळशी राहात नाही. भक्तीची शुद्ध स्वरूपांत जोपासना केल्यानें लोक-संग्रह आणि मुक्ति या दोनहि ध्येयांचा लाभ घडतो.

भक्त हा ज्या मानानें जीवनाशीं समरस होत जाईल त्या मानानें त्याचें सेवाक्षेत्र व्यापक होत जाईल. याचा अर्थ संसारांतील सर्व भानगडींत त्यानें गुंतून पडावें किंवा इतरांच्या जीवनांत व्यर्थ ढवळाढवळ करावी असा नव्हे. परंतु आपली सेवेची दृष्टि व्यापक आणि शुद्ध बनवावी. सर्व प्रकारच्या आसक्तींपासून त्यानें आपल्या चित्ताची सोडवणूक करून घ्यावी, आणि आपल्या वृत्तिभेदाप्रमाणें वांट्यास येणारी सेवा करून ती ईश्वराच्या पायीं निष्कामतेनें अर्पण करावी. श्री. साने यांच्या भक्तीची कल्पना अशीच असल्यामुळें त्यांच्या ईश्वरभक्तीचें पर्यवसान सात्त्विक देशभक्तींत झालें आहे. देशभक्ति म्हणजे दरिद्रनारायणाची सेवा. ईश्वरभक्तीची जशी इतिहासांत विकृति झालेली आढळते त्याचप्रमाणें देशभक्तीच्या शुद्ध कल्पनेचीहि विकृति आज सर्व जगभर पसरलेली आहे. असली पाशवी सुखाच्या मागें धांवणारी देशभक्ति हिंदुस्थानला कधींच करितां आली नाहीं. आजहि तसली विलासी देशभक्ति आपल्या येथें रुजणार नाहीं. देशभक्ति म्हणजे शेजार धर्म; आजच्या काळांत तो स्वदेशी धर्म. प्राणिमात्रांचें पालन पोषण होऊन विकासाला योग्य वातावरण त्यांना मिळावें यासाठीं आवश्यक त्या वृत्ति, आणि वस्तू निर्माण करणें हें देशभक्तीचें मुख्य सूत्र आहे. त्यांत द्वेषाला जागा नाहीं; लोभाला वाव नाहीं. भारतीय स्वातंत्र्य हें सर्व भारतीयांच्या रक्षण-वर्धनासाठीं जसें असेल तसेंच तें जगांतील इतर राष्ट्रांच्याहि रक्षण-

वर्धनाच्या आड येणार नाहीं. भक्तीच्या अंकुशाखालीं वावरणारी देशसेवा या प्रकारची होईल.

दुसऱ्या खंडांतील कवितांत ही व्यापक दृष्टि वापरलेली आढळेल. या कविता समाजविषयक, संसार विषयक आहेत. त्यांत समाजांत आज आढळून येणारी धार्मिक जडता, वैचारिक कृपणता दाखविली आहे. आतां कवीला जीवनांतील दिव्यता दिसूं लागली आहे व ती तो इतरांना आशावादानें सांगत आहे. 'मेघासारखें जीवन' ही आत्मनिष्ठ कविता चांगली आहे. संतांचा नवीन संन्यास वर्णिला आहे ; प्रेमधर्माचा महिमा गाइला आहे. ग्रंथांचें महत्त्व, मित्रप्रेमाचें मधुरत्व, सणांचें रहस्य, एक दोन कथात्मक कविता आणि कांहीं इंग्रजी कवितांचीं रूपांतरें आलीं आहेत. या सर्व विषयांच्या निवडींत कवीची एक विशिष्ट तात्त्विक दृष्टि आणि भावनेची नाजुकवृत्ति दिसून येते. 'परी बाळाला सकळ तीं समान' या कवितेंतील बालमनाची अव्याज मनोहरता अत्यंत हृदयभेदक आहे. अंतःकरण रसिक असेल तर सृष्टींत किती उदात्तता भरलेली आढळते याचा ही कविता उत्कृष्ट नमुना आहे. 'कसें तरी मग जग दिसतें' यांत संसाराला रमणीयता आणणाऱ्या वस्तु सांगून व त्या नसत्या तर जग कसें दिसलें असतें असें विचारून, वाचकाची शुद्ध वृत्ति जागृत केली आहे. इंग्रेजी कवितांतील कल्पनांचे निवडींत देखील तीच शुद्ध वृत्ति वापरलेली आढळून येईल.

यापुढील तिसऱ्या खंडांत मातृभूमीचें प्रेम ही एकच भावना भरून राहिली आहे. श्री. साने यांच्या अंतःकरणांत स्त्रीचें मातृरूप इतकें व्यापून राहिलें आहे कीं जन्मदात्री माता, अन्नाच्छादन देऊन वाढविणारी आणि भक्तिभावाचें वळण लावणारी भारतमाता आणि विश्वमंगलाच्या ध्येयाकडे बोलाविणारी जगन्माता या मातृत्रयीचें त्यांच्या काव्यांत अखंड स्तोत्रगायन चाललेलें असतें. आपल्या कविता व लेख विद्यार्थी—मासिकांत 'मातृ—भक्त' या नांवानें ते प्रसिद्ध करीत असत. त्यांच्या मातृसूक्तांची भाषा कित्येक वेळां इतकी मोघम असते कीं ते कोणत्या मातेचें आवाहन करीत आहेत हें स्पष्ट होत नाहीं व त्यामुळें त्यांचें माधुर्य अधिकच वाढतें. मराठी भाषेंत संतांनीं जगन्माउलीला आळविलें आहेच आणि श्री. साने

यांच्या 'मातृगीतांनीं' इतर स्वरूपांचेंहि पूजन करण्याची सोय झाली आहे. मातृप्रेमाचा इतका मधुर आविष्कार अन्यत्र सांपडत नाहीं.

'मनमोहन मूर्ती तुझी माते' या सुंदर कवितेंत भारत मातेचा महिमा वर्णिला आहे. ही कविता देशसेवकांच्या प्रार्थनेंत जाऊन बसली आहे. सकल जगाला प्रेमानें कुरवाळणारी, आपल्या अमृतस्पर्शानें शांत करणारी, सकळ धर्मांना बालकांप्रमाणें स्नेहानें वाढविणारी, भेदभाव न मानणारी, अशी भारतमूर्ति ध्यानीं ठेवून तिच्या सेवेंत मरणहि सुधारस वाटतो अशी कवि ग्वाही देत आहे. आधींच कवीचें भावनोत्कट हृदय आणि भारतीय स्वातंत्र्याची देशांत नौबद झडूं लागली. त्याबरोबर कवीचें सारें जीवन स्वातंत्र्यरसानें भरून गेलें. लाहोरला स्वातंत्र्याचा ठराव पास झाला. १९३० साल उजाडलें आणि कवि म्हणतात 'माझ्याहि हृदयांत उजाडलें.' शाळेंतील नोकरी सोडून ते स्वातंत्र्याच्या चळवळींत सामील झाले. आणि आजपर्यंत त्यांतच सेवा करीत आहेत. स्वातंत्र्य-समर स्थगित झाल्यामुळें दरिद्रनारायणाची प्रत्यक्ष सेवा करण्याचें कार्य सुरू झालें आहे आणि श्री. साने हे खानदेशांतील भागांत ग्रामसेवाकार्य करीत आहेत.

मातृभूमीचें प्रेम त्यांना किती वाटतें तें पुढील ओळींवरून दिसेल.

> **'तुझ्या धूळिमाजी वाटे लोळणें सुखाचें**
> **इथें पाय पावन फिरले राम जानकीचे'**

'प्रभु भारतिचें वैभव कोठें गेलें ?' या कवितेंत आलेला भारतीय प्राचीन वैभव आणि आधुनिक विपन्नता यांचा विरोध हृदयस्पर्शी झाला आहे. उपनिषदांच्या भूमींत विषमता भरली, अमृतत्वाचा घोष चाललेल्या भूमींत मरणाचा डर भरला, सत्यदेवांच्या जागी अनृतदेव दिसूं लागले असें वर्णून, प्रभूला आपली भीषण भेरी गर्जविण्याचे आवाहिलें आहे. 'जा रे पुढें व्हा रे पुढें,' 'हा देश वैभवीं न्यावा,' 'तुफान झालों', 'गाऊं मी कसलें गाणें', 'स्वातंत्र्यानंदाचें गाणें', 'खरा हुतात्मा', 'नवयुवक' इत्यादि कवितांतून निरनिराळ्या प्रकारांनीं पण देशभक्तीचेच विचार आले आहेत. 'बालवृद्धसंवाद' लांबट असला तरी कांहीं ठिकाणीं आकर्षक झाला आहे. 'स्वातंत्र्यदिव्य-दर्शन' ही एक चांगली कविता आहे. 'खरे सनातनी' या कवितेंत सनातन धर्माच्या नांवाखालीं समाजांत चाललेले अधर्माचे प्रकार

कसे अयोग्य आहेत आणि खरा धर्म कसा उदार आणि प्रेमपूर्ण असतो याचें मनोहर वर्णन आलें आहे.

भारतमातेचें दैन्य पाहून कवीचें मन कळवळून जातें. उदात्त संस्कृतीला जन्म देणाऱ्या, संतऋषींच्या या पवित्र प्रदेशाला हीन कला आलेली पाहून आपल्या सर्वस्वाचें खत घालून पुन्हां हें राष्ट्रीय उद्यान फुलवावें–सजवावें असें त्याला वाटतें. आपण इतके सत्पुत्र असतां मातेचें दास्यमोचन होत नाहीं याबद्दल त्याला लाज वाटते. आपल्या कर्तव्यपालनानें आपण स्वातंत्र्य पुन्हां आणूं शकूं या आत्मविश्वासानें तो तरुणांस देशकार्यासाठीं आवाहन करीत आहे. व्यक्तीचा प्रपंच तूर्त कांहीं काळ बाजूस ठेवन या राष्ट्र–प्रपंचास सर्वांनीं लागावें अशी त्याची शिकवण आहे. राजकीय स्वातंत्र्याबरोबरच सामाजिक उद्धारहि झाला पाहिजे. खरें स्वातंत्र्य एकांगी असूं शकत नाहीं. देशाचा खरा उद्धार हा सर्वांगांनीं एकदम होत असतो याची त्याला स्पष्ट जाणीव आहे. आणि स्वातंत्र्याबरोबरच त्यानें समानतेचीं–सद्धर्माचींहि गाणीं गाइलीं आहेत. कवीचा देशाभिमान हा व्यापक आहे. शुद्ध आहे. भारतमातेचीं गाणीं गाण्यांत त्याला आनंद वाटतो. केवळ प्रांतिक अभिमान त्याला रुचत नाहीं. जातीय वृत्ति त्यांत नाहीं. तथापि महाराष्ट्राविषयीं त्याला यथार्थ अभिमान आहे आणि या संग्रहांतील एकदोन कवितांत तो चांगल्या प्रकारें व्यक्त झाला आहे. 'राणा प्रताप' आणि 'महात्माजींस' या स्फुट कवितांतहि स्वातंत्र्यप्रेम आणि त्यागाची तळमळ प्रगटलीं आहेत.

चवथ्या खंडांत 'सत्याग्रही' नामक खंडकाव्य आलें आहे. मुद्रण–स्वातंत्र्याच्या मुस्कटदाबीमुळें तें संपूर्ण स्वरूपांत येऊं शकलें नाहीं. तथापि वाचकांना तें अपूर्णसें भासणार नाहीं. या खंडकाव्यांत कवीचें सर्व काव्य-सामर्थ्य आणि विचारसर्वस्व एकवटून आलीं आहेत. त्रिचनापल्लीच्या तुरुंगांत असतांना तेथील सत्यनारायण नांवाचा एक अल्पवयी सत्याग्रही –बंदी अतिसारानें मरण पावला. वस्तुत: तो सत्याग्रह करून आला नव्हता. पण इतर स्वयंसेवकांबरोबर त्यालाहि पकडून शिक्षा देण्यांत आली होती. शिक्षा झाल्यानंतर मात्र त्याच्या स्वाभिमानी वृत्तीला जागृति आली.

माफी मागून सुटावें म्हणून त्याच्या घरच्या मंडळींनीं पुष्कळ प्रयत्न केले. मरण समोर दिसूं लागल्यावरहि त्यानें माफी मागण्याचा विचार मान्य केला नाहीं. आनंदानें मरण स्वीकारलें. या घटनेचा आमच्या सर्वांच्याच मनावर परिणाम झाला. श्री. साने यांनीं त्यावर लगेच काव्य रचिलें. सत्याग्रहविषयक सारेंच तत्त्वज्ञान त्यांत गोंवण्याच्या कल्पनेनें मुळाचा बराच विस्तार झाला आणि त्याला खंडकाव्याचें रूप आलें. मातापित्यांनीं मृत पुत्राविषयीं केलेला शोक इतक्या उत्कटतेनें वर्णिला गेला आहे कीं तें वर्णन वाचतांना वाचक ढळढळां रडल्याशिवाय राहात नाहीं.

**अंधार आज भरला भरल्या घरांत**
**त्याहून दाट भरला भरल्या मनांत**
**लावी कुणी तरि तदा सदनांत दीप**
**आशा नसे तिळ परी हृदयासमीप**

असलीं हृदय–भेदक चित्रें त्यांत अनेक सांपडतील. आईच्या तोंडीं इतके घरगुती शब्द आणि स्वाभाविक कल्पना घातल्या आहेत कीं वाचकाला आपण जिवंत पात्रांशींच बोलतों आहोंत असा भास होतो. कवीची उच्च शब्दशक्ति येथें प्रकट होते.

**फत्तरासहि फुटतील झरे राजा**
**किती पडतिल हृदयास घरें माझ्या**
**काय समजाविशि ? बोलसी कशाला**
**जगीं समजावी कोण माउलीला ?**

असल्या श्लोकांनीं हृदय विदीर्ण होणार नाहीं असा कोण वाचक असेल ? अतिशय थोडक्या शब्दांनीं एखाद्या प्रसंगाचें वेधक चित्र निर्माण करण्याची कला कवीजवळ आहे. 'रात्रीचें बाहेरचें स्वरूप' या खालील बारा ओळी वाचल्यानें कोणाचीहि खात्री पटेल.

या काव्यांत कथानक विशेषसें नाहींच. सत्याग्रह–तत्त्वज्ञान सांगण्याच्या मिषानें कथानक आलें आहे. कवीला आपल्या समाजांत काय काय विचार यावयास पाहिजेत, कोणत्या वृत्ति निर्माण झाल्या पाहिजेत, तें सर्व

यापुढील भागांत आलेलें आहे. त्यांत प्रथम ' लोकांच्या मनोवृत्तींचें वर्णन ' करून उन्नति व्हावयास केवळ भावना अथवा वलगना उपयोगी पडत नाहींत. विचार, भावना आणि कृति या तिघांचें मीलन व्हावें लागतें असें म्हटलें आहे. ' दीनशरण्या शुभलावण्या ' हें मातृगीत फार ओजस्वी झालें आहे. संस्कृतीच्या सर्व विचारांचें सार यांत सामावलें आहे. यापुढील श्लोकांत जगांतील सर्व राष्ट्रें स्वातंत्र्यानें विराजत आहेत. भारताला मात्र अद्यापि पारतंत्र्यांतच खितपत पडावें लागलें आहे याविषयीं कवि-मनाला हळहळ वाटते. हिंदी स्वातंत्र्याचे आड स्पृश्य-अस्पृश्य, हिंदु-मुसलमान असे झगडे उभे आहेत. त्यांचा कोणत्या दृष्टीनें निकाल लावला पाहिजे याचा कवीनें उत्कृष्ट ऊहापोह केला आहे. अस्पृश्यता हा आपल्या उदार धर्मावरील कलंक असून आपण तो लवकर धुवून टाकला पाहिजे आणि मुसलमानांबद्दल केवळ द्वेषभावानें विचार करण्याचें सोडून दिलें पाहिजे. इस्लामी संस्कृतीमध्यें ज्या उदात्त गोष्टी आहेत त्यांचा अभ्यास वाढला पाहिजे. संशयानें वातावरण कलुषित झालें म्हणजे मनाची मैत्री अशक्य होते. समाजांत क्षोभकारक प्रसंग घडले असतांहि चित्ताची शांतता कायम टिकविणें आणि तात्कालिक प्रसंगांच्या वऱ्यावाईट उर्मींनीं नित्य तत्त्वांचें दर्शन झांकोळलें जाणार नाहीं अशी खबरदारी घेणें अत्यंत आवश्यक आहे. क्षुद्र वृत्तींच्या आहारीं जाऊन कलहाला प्रवृत्त झाल्यावर धर्म, जाति इत्यादि कल्पनांचें त्यांत मिश्रण करून देणें हें तर फारच अश्लाघ्य आहे. अविचारी अनुयायांच्या अमानुष आचारांनीं धर्माचें नांव इतिहासांत अनेक वेळां कलंकित झालें आहे. या धर्मवेडावर सद्धर्माचा प्रसार हाच एक उपाय आहे. नुकसान सोसूनहि सत्तत्त्वांचा आचार करण्यानेंच समाजांत शांतता आणि सदाचार निर्माण होतात. भारतीय संस्कृति सत्य-संग्राहक-वृत्तीची असल्यामुळें धर्मकलहाचें निर्मूलन होण्यास सर्व धर्मांचा प्रेमानें अभ्यास करणें आणि प्रत्येकाला विकासाला आवश्यक अशा संधि मिळवून देणें याच गोष्टींवर येथें भर दिला जातो. जातीय आंदोलनांच्या या काळांत ही उच्च धर्मवृत्ति समाजांत पसरविण्याची अत्यंत जरूरी आहे. महंमद, ख्रिस्त, बुद्ध यांच्या उपदेशाची महती श्री. साने यांनीं अत्यंत आत्मीयतेनें वर्णिली आहे.

लोखंडाहुनि अग्नि थोर, जल तें अग्नीहुनी उद्बळ
वारा वारिहुनी तयाहुन असे मोठा गिरी निश्चल
त्या अद्रीहुनि, थोर जें सदय जें निष्पाप जें अंतर
ऐसें या जगतास नित्य करितें श्रीमत्कुराण जाहिर

या श्लोकांतील कुराण शब्दामागें श्रीमत् हें विशेषण इतकें सहज आलें आहे कीं प्रथम हा श्लोक वाचल्यावर त्यांतील शुद्ध भावनेनें माझें मन अगदीं द्रवून गेलें. श्री. साने यांनीं या रचनेनें महाराष्ट्रास अगदीं अभिनव अशी दृष्टि दिली आहे, यांत मला शंका नाहीं. अभिमानाच्या आंधळ्या वृत्तीनें वागतांना समाज परस्पर दोषांचेंच आघ्राण करितात. कार्लाईलनें म्हटलें आहे. "Nations like dogs, seem to approach each other sometimes only to sniff at the shameful parts. या कर्दमी वृत्तीनेंच संसारांत सर्वत्र चिखल उपसलेला आढळतो. सत्याचा उपासक असें कधींही करणार नाहीं. त्याला आपल्याप्रमाणेंच इतरांचे दोष पाहूनही फार वाईटच वाटेल. इतरांच्या गुणांचा तो गौरवच करील. स्वतःला उदात्त बनविण्यानेंच आपण इतरांची उन्नति करूं शकतों या वृत्ती जितक्या सर्व सामान्य माणसांपर्यंत जाऊन पोंचतील तितकें भारतीय उत्थान सुलभ होईल. भारतीय स्वातंत्र्य या उदात्त संस्कृतीचा जगाला संदेश पोंचविण्या-साठीं निर्माण करावयाचें आहे.

शांतीचा जगतास सत्पथ भला दावावया भारत
होतो मुक्त, म्हणून ईश्वरकृपें तो जाहला ना मृत

अशी कवीची श्रद्धा आहे.

हे विचार अव्यवहार्य वाटतील. पण मग सत्य हेंच अव्यवहार्य ठरेल. जीवन हेंच अव्यवहार्य होईल. सरळ मनाच्या मनुष्याला असें वाटणार नाहीं. सुखार्थी मनुष्याची गोष्ट सोडा. ध्येयार्थी मनुष्य असें कधींच मानणार नाहीं. विश्वाच्या इतिहासांत या ध्येयार्थी पुरुषांनीं अनेक वेळां अव्यवहार्य सत्यें व्यवहार्य करून दाखविलीं आहेत. या 'ध्येयार्थी'चें स्तोत्र श्री. साने यांनीं फारच सुन्दर वर्णिलें आहे.

सत्याचा समाजांत प्रसार व्हावयाचा तो केवळ उपदेशानें होत नाहीं. सत्यासाठीं जी सत्यार्थी पुरुष तपश्चर्या करितात, सुखाचा जो होम करितात त्या तपश्चर्येंतून, त्या होमांतून, सत्याची दिव्य मूर्ति निर्माण होऊन जन-मनामध्यें प्रतिष्ठा पावते. सत्यार्थी असणाराला सुखार्थी राहतां येत नाहीं. सत्य आणि सुख हीं विश्वजीवनाचीं लक्षणें असल्यामुळें संपूर्ण जीवनांत तीं दोन्ही अविरोधानें वागतील असें मानण्यास हरकत नाहीं.परंतु तें विश्वजीवन अद्यापि निर्माण व्हावयाचें आहे आणि तें निर्माण करण्याचें सामर्थ्य व्यक्ति-जीवनांतूनच निष्पन्न होत असल्यामुळें व्यक्ति ही सुखार्थी होऊन चालणार नाहीं. व्यक्ति जितकी सत्यार्थी असेल त्या मानानें समाजांतील अपूर्णता नाहींशी करण्याचे प्रयत्न तिचे हातून होतील आणि विश्वजीवन सुखी होण्याचें ध्येय शक्य कोटींत येऊं लागेल. ज्या पुरुषाला हें ज्ञान असतें तो सत्यार्थी बनतो. सत्यासाठीं सोसावा लागणारा छळ त्याचे चित्ताची शांति ढळवूं शकत नाहीं. तो एकेक सत्य आपल्या मरणाचें मूल्य देऊनहि समा-जांत सिद्ध करीत जातो, समाजाची उन्नति आणि समाजाचें सुख या सत्यार्थी वीरांच्या मरणांतूनच पैदा होतात. समाजानें यांचेंच स्तवन केलें पाहिजे. सुखार्थी व्यवहारचतुर माणसांना या सत्यार्थींचें श्रेष्ठत्व नडूं लागलें म्हणजे सत्यार्थींच्या ध्येयवादाला ते नांवें ठेवूं लागतात. तथापि समाजानें या पुष्पित वाणीनें भुलून जाऊं नये आणि सत्यार्थींची कास सोडूं नये.

**घालोनी स्वशिरिं किरीट कंटकांचा**
**हालांचा मिरवुन कंठिं हार साचा**
**मृत्यूला निरखुनिही करीत चाल**
**भेटाया मुदित अशास विश्वपाळ**

अशा ध्येयार्थी पुरुषांच्या तेजस्वी जीवनामुळें समाजांत कर्तव्यस्फूर्ति जागृत होते आणि जिणें मोलवान् होतें.

महात्मा गांधी आणि रवीन्द्रनाथ टागोर हे दोन थोर ध्येयार्थी घेऊन त्यांच्या ध्येयांचें विवेचन सविस्तर केलें आहे. यंत्रशक्तीनें मनुष्याची आत्मशक्ति बद्ध केल्यामुळें संस्कृतीचे ऐवजीं बाणगट वृत्ति वाढत चालली

आहे आणि भौतिक विजय हेंच ध्येय बनत आहे. वास्तविक पाहता यंत्र-शक्तीनें मानवी आत्म्याची जडाच्या बंधनांतून सुटका करणें शक्य झालें आहे. भौतिक विलास हें माणसाचें ध्येय नसून नैतिक विकास हें त्याचें ध्येय आहे. शक्ति असूनहि ती शिवाची अनुसारिणी नसेल तर समाजांत अमंगलाचाच विआव्कार झाल्याशिवाय राहणार नाहीं. या साठीं मनुष्यानें आपलें नैतिक श्रेष्ठत्व प्रथम ओळखलें पाहिजे. हा रवीन्द्रांच्या सर्व जीवनाचा आणि गायनाचा मथितार्थ आहे. हा संदेश हिंदुस्थानांत पसरविण्यासाठीं त्यांनीं प्रथम शांतिनिकेतन येथें आश्रम काढला आणि नंतर ते विश्वाला तोच संदेश सांगत फिरले. ‘ विश्व–भारती ’ विद्यापीठाचें ध्येयहि याच संदेशाचें जगांत प्रस्थापन करणें हें आहे. महात्मा गांधींचें कार्य प्रत्यक्ष जनतेपुढें आहेच. वाङमयांत आणि शिक्षणांत ज्या वृत्ति रवीन्द्र निर्माण करीत आहेत त्याच वृत्ति महात्मा गांधी प्रत्यक्ष सामाजिक व्यव-हारांत उतरवीत आहेत. भारतीय संस्कृतीचा आदर्श जगाला तारक होईल यांत त्यांना तिळमात्र शंका नाहीं. केवळ भौतिक सुखांच्या अमर्याद वाढीनें माणसाची नैतिक उन्नति होत नाहीं हा त्यांचा मुख्य सिद्धान्त आहे. आणि साध्याचें सौंदर्य कितीहि मोहक असलें तरी साधनाची शुद्धता जर राखली गेली नाहीं तर तें साध्य हस्तगत ेत नाहीं असा त्यांचा दृढ विश्वास आहे. यासाठीं जीवनांतील नैतिक मूल्यें सिद्ध करण्यासाठीं त्यांनीं साबरमतीस सत्याग्रहाश्रम काढला आणि त्याच्या द्वारा भारतीय समाजाला नवसंस्कृतीच्या निर्मितीचें साधन म्हणून सत्याग्रहाचें तत्त्वज्ञान अर्पण केलें. या तत्त्वाचा आचार अद्यापि चालू असल्यामुळें त्याच्या यशस्वितेबद्दल इतक्यांतच साशंक होण्याचें कारण नाहीं. अनेक संशयात्म्यांचा आजवर भ्रमनिरास झाला आहे आणि सत्याग्रह वृत्ति जितकी समाजांत पसरत जाईल तितकें तिचें नवसंस्कृति निर्माण करण्याचें सामर्थ्य अधिक प्रगट होईल. आज या तत्त्वाचें कांहीं ध्येयार्थी पुरुषांनीं आकलन केलें आहे आणि आपल्या जीवनाचे द्वारा ते समाजांत त्याचा प्रसार करीत आहेत. योग्य वेळीं त्याचीं फळें मिळाल्याशिवाय राहणार नाहींत. दरिद्रनारायणाच्या जीविताशीं एकरूप होऊन सत्य आणि अहिंसा यांच्या द्वारें सर्व सामाजिक प्रश्न सोडविण्याची या तत्त्वज्ञानाची आकांक्षा आहे. धर्म, समाज आणि राज-

कारण यांतील सर्व प्रश्नांचा या तत्त्वज्ञानांत समन्वय करण्यांत आला असल्यामुळें विश्वशांतीसाठीं याचाच आश्रय सर्व लोकांना करावा लागेल अशी श्रद्धा बाळगण्यास हरकत नाहीं.

टागोर आणि गांधी यांच्या स्वभावांत भेद असल्यामुळें त्यांच्या मतांतही कित्येक ठिकाणी भेद दिसतो. तथापि साधकाचे दृष्टीनें त्या दोघांच्या विचारांचा समन्वय होऊं शकतो असें मला कित्येक वर्षे वाटत आलें आहे. श्री. साने यांचे या बाबतींतील विचार मला त्यामुळें फार आवडले. महात्मा गांधींच्या साधनानेंच रवीन्द्रांचें साध्य निर्माण होऊं शकेल अशी माझी स्वतःची समजूत आहे. यापेक्षां या विषयाचा अधिक विस्तार करण्याचें हें स्थळ नव्हे.

यानंतर 'स्वातन्त्र्य-शाहिराचें स्फूर्ति-गीत' आलें आहे. त्यांत निवळ निसर्ग-सौंदर्य आणि व्यक्तीच्या जीवनांतील वैषयिक व्यवहार ह्या संसारांत इतर कवीप्रमाणें मला गोडी वाटत नाहीं. तथापि

**हृदय कवीचें परि मम आहे। प्रबळ भावना-वारा वाहे**
**प्रतिभा स्फुरते मदंतरंगीं। काव्य नाचतें मनस्तरंगीं**
**चिता भडकली मदीय चित्तीं। गीत थरथरे ओठावरतीं**
**गीत कशाचें? मद्देशाचें। स्वातंत्र्याचें समानतेचें.**

असें सांगून,

**कठोर हृदयें मृदु नवनीतें। करितिल माझीं नवीन गीतें**
**मृदु नवनीता वज्र करीन। दिव्य असें मी निर्मिन कवन**
**त्यागा उन्मुख मरणा सन्मुख। मानितील त्यामध्यें खरें सूख**
**अशी जनांची वृत्ति करीन। स्वातंत्र्याचीं गीतें निर्मुन**

असें आपलें विशिष्ट ध्येय आत्मविश्वासानें मांडलें आहे. हें खरोखरच स्फूर्तिगीत आहे. आणि त्यामुळें मनाला चटका लावून जातें.

यापुढें एक गीत असून त्यांत 'नवभारताचा उदय' गाइला आहे. 'स्वातंत्र्य-प्रभात' वर्णन करणारें त्यापुढचें गीत तर अधिकच सरस वठलें आहे.

त्रिचनापल्लीस असतांनाच महात्मा गांधींना सरकारनें बिनशर्त मुक्त केल्याचें समजलें. समेटाच्या वाटाघाटी चालल्याच होत्या. त्यामुळें गांधींचा विजय समजून 'गांधी सुटले'–इत्यादि गाणें कवीनें रचलें. पुढें त्यांत 'ग्रहण सुटलें' असा बदल करून या खंडकाव्यांत त्याला शेवटीं स्थान दिलें आहे. 'आकाशों मावळला उगवून शशी' असें आरंभींच्या रात्रिवर्णनांत आल्यामुळें या ग्रहणाचा लाक्षणिक अर्थच घेतला पाहिजे. रात्रीच्या अंधकाराचें सृष्टीला लागलेलें ग्रहण सुटल्याचें पाहून भारतमातेचें ग्रहण असेंच सुटेल अशा आशेनें हें गीत गाइलें आहे. काव्याचा अंतहि थोडा चटकदार झाला आहे.

कवि आणि काव्य याविषयीं येथपर्यंत केलेलें विवेचन वाचल्यावर वाचकाला दोघांविषयींहि बरोबर कल्पना येईल असा मला विश्वास वाटतो. देव आणि देश या दोनच वस्तू कवीला जीवनांत प्रिय आहेत आणि त्यांनाच त्यानें काव्यांत गाइलें आहे. तथापि या बाबतींत कवीची एक विशिष्ट बैठक असल्यामुळें इतर कवींशीं त्याची तुलना करण्यांत अर्थ नाहीं. देवभक्तीच्या उमाळ्यांतूनच देशभक्ति प्रकटली असल्यामुळें त्यांच्या देशभक्तीचें स्वरूप इतर किरकोळ कवींच्या देशभक्तीच्या लिखाणाहून स्वतंत्र आणि विशिष्ट झालें आहे. देशभक्तीची पूर्तता देवभक्तींत होत असल्यामुळें केवळ जुन्या वळणाच्या लेखकांशीहि त्यांची तुलना होत नाहीं. आजच्या काळाला आवश्यक अशा सर्व संस्कारांचा त्यांच्या जीवनांत समावेश झाला असल्यामुळें त्यांचें वाङ्मय व्यापक, शुद्ध आणि जिवंत बनलें आहे. त्यांच्या सांनिध्यांत राहून त्यांचें भाव–पूर्ण मन मी प्रत्यक्ष पाहिलें तेव्हांच मला वाटलें कीं रामकृष्ण परमहंसांच्या जातींतील हे गृहस्थ आहेत. आपल्या आयुष्यांत रामकृष्णांची भक्ति आणि महात्माजींची सेवा अत्यन्त अल्प प्रमाणांत तरी उतरावी आणि रवीन्द्रांच्या काव्य–गायना-प्रमाणें आपणहि जीवनाचीं शुद्धगीतें थोडीं फार गावीं हा त्यांच्या जीवनाचा आदर्श आहे. या आदर्शानुसार त्यांची धडपड चालू आहे आणि अल्प प्रमाणांत का होईना पण त्यांना त्यांत यश येत आहे असें म्हणावयास मला संकोच वाटत नाहीं.

या काव्यसंग्रहाचें केवळ कला म्हणून फारसें परीक्षण आतांपर्यंत आलें

नाहीं. कारण कलेचें बाह्य तत्त्व हें आंतील तत्त्वापासून निराळें आहे असें मी मानीत नाहीं. शब्द आणि अर्थ मिळून एकच वस्तु मी समजतों. कला जेव्हां उत्पन्न होते तेव्हां ती आपल्या तन्त्रासह प्रकट होते असेंच दिसतें. केवळ तन्त्राचा अभ्यास करून नियम काढतां येतील पण त्या नियमांच्या अभ्यासानें कला निर्माण करितां येणार नाहीं. यामुळें जेथें उत्तम कला आहे तेथें तन्त्र शुद्ध असतेंच. आणि जेथें तन्त्र बिघडल्यासारखें वाटतें तेथें कलाच प्रतिबद्ध झालेली आढळते. तन्त्रशुद्ध रचनेला कला म्हणण्याचा प्रकार अलीकडे ऐकूं येऊं लागला आहे.पण माझी त्याविषयीं निराळी भावना आहे. अशा कृत्रिम कारागिरीला मी कला म्हणणार नाहीं. जीवनाचा ताजेपणा ज्यांत नाहीं अशा कलेला कला हें नांव मी देणार नाहीं. अनेक कारणां-मुळें, जीवनाशीं सत्यनिष्ठ राहणें समाजांत अवघड होत चाललें आहे. आणि त्यामुळें साहित्याचा संसाराशीं असणारा संबंध नाहींसा होत चालला आहे. निव्वळ बुद्धिप्रधान रचना म्हणजे जसें वाङमय नव्हे, त्यांत अनुभवाचा–जीवनाचा ओलावा हवा; त्याचप्रमाणें निव्वळ काल्पनिक रचना म्हणजे कला नव्हे, तिच्यांतून जीवनाच्या सत्यस्फूर्ती उमटावयास हव्यात. तंत्रदृष्टचा श्री. साने यांच्या कवितांत पुष्कळ वाचकांना दोष आढळतील. मी त्या दोषांना गुणरूप मानतों असा कोणी गैरसमज करून घेऊं नये. परंतु त्यांच्या त्या दोषाचें कारण केवळ तन्त्रज्ञानाचा अभाव असें मी म्हणणार नाहीं. तो त्यांच्या जीवनांतीलच अपूर्णतेचा दोष आहे. या दोषामुळें ती रचना नीरस वाटते. त्यांची बहुतेक रचना सहज-स्फूर्त असते. ज्या वेळीं ती स्फूर्ति शुद्ध आणि जिवंत असते त्या वेळीं त्यांचे लेखणींतून अत्यंत सरस अशी रचना बाहेर पडते. शब्द आणि अर्थ यांचें तेथें अगदीं मीलन झालेलें आढळतें. प्रमाणशुद्धता राखलेली सांपडते. सूचकता भरून राहिलेली असते. यांचे नमुने या संग्रहांत पुष्कळ सांपडतील. उलट जीवनाचा स्पर्श ओसरून गेला तरीही शब्दांमागून शब्द येत राहतात आणि अर्थ अदृश्य झाला तरी रचनेचें जाळें पसरतच राहतें. हे खोटे शब्द आहेत. ही निरर्थ रचना आहे. कितीही तंत्रशुद्धि केली तरी त्या वेळीं खरें वाङमय निर्माण होणार नाहीं. मनुष्याच्या इंद्रियांचा हा धर्म आहे कीं त्यांना एकदां एखादा आंतर अनुभव आला कीं तीं त्याच्या मागें धांवत राहतात.

इंद्रियावाटे आलेला हा अनुभव वस्तुत: अतींद्रिय असतो. तो इंद्रियांच्या विशिष्ट कसरतीनें कसा निर्माण होऊं शकेल? तो येतो तेव्हां त्याला आवश्यक अशी इंद्रियांची योजना तो करून घेतो. अनुकरणानें तो पुन्हां उत्पन्न होत नाहीं. धार्मिक–आध्यात्मिक अनुभवांत तर हें विशेषच आढळतें. यामुळेंच धर्मांत विशिष्ट रूढींना चिकटून राहण्याची मनुष्यांत प्रवृत्ति आढळते. या रूढींना जपल्यामुळें त्यांतून धर्मवृत्ति उत्पन्न होतील ही वेडी आशा, हा खोटा आग्रह, त्याचे मुळाशीं आढळून येतो. अनुकरणानें अनुभव उत्पन्न होत नाहीं. त्या अनुभवाच्या निर्मितीसाठीं जीवनाच्या त्या अवस्थेवर जांतून गेलें पाहिजे. तथापि प्रत्येक वेळीं अनुभव थोडा भिन्न असणार आणि त्याचें आविष्करणहि नित्य नूतनच भासणार. म्हणून कलेमध्यें जो कंटाळवाणेपणा येतो तो जीवनाच्या अपूर्णतेमुळें वा अभावामुळें आलेला असतो आणि ती अपूर्णता अशुद्ध तन्त्राचे रूपानेंहि पहावयास सांपडते. श्री. साने हे साधक आहेत. त्यांना नित्यानित्य विवेक करण्याची संवय आहे. त्यांनीं अधिक अंतर्मुख होऊन अंतर्निरीक्षण केलें तर त्यांना खरें काव्य आणि कृत्रिम रचना यांतील भेद कळेल. ते प्रामाणिक आहेत. अगदीं लहानपणापासून त्यांना कवित्वशक्ति आहे. वाचावें आणि लिहावें हा त्यांचा बाळपणापासूनचा क्रम आहे. संतांच्या चरित्राच्या पोथ्या वाचाव्या आणि त्याच सोप्या धांवत्या वृत्तांत रचून म्हणाव्या असा त्यांचा क्रम असे. पुढें मोरोपंतादि पंडिती कवींचा व्यासंग केल्यावर त्यांना मोरोपंतासारखी यमकबद्धरचना येऊं लागली. आला विचार पद्यनिविष्ट करावा अशी त्यांची संवय झाली. पुढें त्यांनीं इंग्रजी काव्य वाचलें आणि या सर्व रचनेंत कांहीं अर्थ नाहीं म्हणून तें फाडून टाकलें. हीच वृत्ति त्यांनीं सदैव जागृत ठेवावी. ते कवि आहेत. पण त्यांच्याजवळ पद्यकारहि लपून बसलेला आहे. कवीच्या काव्यामागोमाग हा पद्यकार आपली टांकसाळ चालू करितो आणि अस्सल काव्यांतच आपलाहि पोथा दडपून देतो. श्री. साने भाविक आहेत आणि त्यांच्या भाविकपणामुळें त्यांच्या बुद्धीला फसविणें या पद्यकाराला सोपें जातें. या पद्यकाराला त्यांनीं आपल्या जीवनांतून निर्वासित करून टाकला पाहिजे. काव्यांत कवि आपलें जीवन ओतीत असतो. पद्यांत पद्यकार पदार्थांचें वर्णन देत राहतो. दृश्य वस्तूंचें कंठाळीवजा वर्णन सांगतांना

आपण आपला अनुभव सांगत आहों असें म्हणण्यांत अर्थ नाहीं. कवीनें ही वंचना करून घेऊं नये. वर्णनात्मक बहुतेक कवितांत हा कृत्रिमतेचा दोष असल्यामुळें त्या पाल्हाळिक आणि परिणामशून्य झाल्या आहेत. कथात्मक वाङमयांतहि कवि आपण पाहिलेली कथा आपल्या जीवनांतून काढून इतरांना देतो. केवळ बाह्य घटनांचें शब्दग्रथन करीत नाहीं. जीवन हा स्वतःच कलाकार आहे. तो विश्वाशीं वागतांना निवड करितो, प्रमाण राखतो, आणि म्हणून जीवनानें मिळविलेली संपत्ति सगळी कलात्मकच असते. ती जितकी उत्कट असेल त्या मानानें त्या जीवनांतून ती संपत्ति बाह्य विश्वांत पुन्हां कलारूपांत फेंकली जाते. प्रत्येक मनुष्य कलाकारच आहे. कारण प्रत्येकाला कला बाह्य स्वरूपांत निर्मितां आली नाहीं तरी निर्माण झालेली कला तो थोडी फार जाणूं शकतो. ही रसिकता म्हणून म्हटली जाणारी शक्ति मूक कलाच आहे. वर्णनात्मक वाङमयाची जी गोष्ट तीच उपदेशात्मक वाङमयाची. श्री. साने यांच्या लिहिण्यांत सूचकतेची मर्यादा सुटन उपदेशाचा वर्षाव सुरू होतो. जीवनाचा नियम शोधून तो प्रकट करावयाचा हें कवीचें कार्य आहे. तथापि उपदेश कवीनें प्रत्यक्ष करावयाचा नाहीं. जीवनाचें चित्र निर्मिल्यानंतर त्यांतून उपदेश आपोआपच पाझरूं लागतो. तो उपदेश रसिकांनीं आपापल्या भूमिकेप्रमाणें घ्यावयाचा असतो. स्पष्ट शब्दांत उपदेश मांडल्यानें त्याची व्यापकता कमी होते. आणि त्याला जड स्वरूप आल्यामुळें तो जीवनाला भारभूत होऊं लागतो. हे दोष आहेत. पण यांचे शुद्धीचा प्रयत्न तंत्राचे ठिकाणीं करावयाचा नसून जीवनांतच करावयास हवा. श्री. साने यांच्या जीवन–विकासांत याहि गोष्टी घडून येतील अशी आशा करण्यास हरकत नाहीं.

आजच्या मराठी वाङमयांत जीवनाचा स्पर्श अदृश्य होत चालल्यामुळें विविधता कमी होत चालली आहे. प्रणयालाच निरतिशय महत्त्व येण्याचें हें एक प्रभावी कारण आहे. श्री. साने यांच्या प्रचंड लेखनांत प्रणयाचा कोठेंच विलास दिसत नाहीं. त्यांचें मन ईश्वराचे चरणीं रुंजी घालीत असलें तरी गृहस्थाश्रमी स्त्रीपुरुषांच्या पवित्र जीवनाबद्दल त्यांना प्रेम वाटत नाहीं असें नाहीं. पण जीवनांतील उदात्त पुरुषार्थाशीं फारकत करून केवळ

प्रणयाच्या उन्मादांत बेहोष होणें त्यांच्या सात्त्विक मनाला भयकारक वाटतें. प्रेम हें पराक्रमाला प्रेरक झालें पाहिजे. तें भावनाशुद्धीला कारण झालें पाहिजे. आपल्या सुखाच्या मागें लागतांना इतरांच्या जीवनाचा आपण किती नाश करितों याची जाणीव मनुष्याला नसेल तर तो सुखोपभोग स्वत:लाहि नाशकारक झाल्याशिवाय राहणार नाहीं. जीवितांत अत्यंत मोठे प्रश्न उपस्थित होत आहेत. त्यांचीं उत्तरें शोधून काढल्याशिवाय जीवन अशक्य आहे, असें दिसत असतांहि दौर्बल्यामुळें जे जीविताला नाकारून सुखोपभोगाकडे वळतील त्यांचे हातून उदात्त वाङमय निर्माण होणेंच शक्य नाहीं. जीवनाचे क्षेत्रांत पराभूत झालेले नामर्द वाङमयाचे क्षेत्रांत गर्दी करीत असले आणि स्वत:च्या प्रतिष्ठेसाठीं खोटींच मूल्यमानें निर्माण करूं लागले तरी त्यांचा हा प्रयत्न कधींच यशस्वी होणार नाहीं. शुद्धता, सत्य-प्रियता हा जीवनाचा पहिला कायदा आहे. यांत जो टिकेल तोच जगेल. यांत पराजित होणाऱ्याचें मरण अवश्यभावी आहे. तें कधीं टळणार नाहीं.

श्री. साने यांच्या लिहिण्यांत कांहीं दोष असले तरी एकंदरींत त्यांचें लिहिणें ओजस्वी आहे. जीवनाचे समरभूमीवर ' यतस्तुकक्षस्तत एव वन्हि: ' या न्यायानें पाय रोवून ते उभे आहेत आणि यामुळें यांच्या काव्य—संगतींत घालविलेला काळ मनाला आल्हादकारक आणि जीवनाला सामर्थ्यदायक वाटल्याशिवाय राहणार नाहीं. संसारांतील सात्त्विक सुखांसाठींच आज मोठा पराक्रम करण्याचा काळ आला आहे. या पराक्रमाची उमेद बाळ-गण्याची स्फूर्ति या काव्य—संग्रहांत खचित आहे.

या काव्यसंग्रहांतील अत्यंत मोठा विशेष म्हणजे कवीची जीवनाच्या मांगल्यावरील अढळ श्रद्धा. यामुळें सर्वत्र आशावाद खेळत राहिला आहे. भावनांची उत्कटता इतकी आहे कीं कवि वर्ण्य विषयाशीं अगदीं तद्रूप होतो व वाचकांनाहि तद्रूप करितो. हें काव्य कवीचा केवळ कलाविलास नसून त्याच्या आत्मविकासाचें साधन असल्यानें जीवनाच्या शुद्धतेचा हव्यास पानोपानीं प्रगट झाला असून वाचकाला तो शुद्ध वातावरणांत नेल्या-खेरीज राहात नाहीं. भक्तिरसाइतकाच वीर आणि करुण या रसांचा आविष्कार जागोजाग साधला आहे. शुद्ध परंपरेंतून कवीचें जीवन गेल्यामुळें भावनांत, आकांक्षांत आणि प्रत्यक्ष वर्णनांत कृत्रिमता कोठेंच आढळत

नाहीं. संस्कृतीच्या कल्पनेंत इतकी सात्त्विक आणि नाजुक वृत्ति आहे कीं कोठेंहि मनाला शीण अथवा संताप येत नाहीं. सर्वत्र व्यापक सहानुभूति पाहावयास मिळते आणि वाचकाला जखडून गेल्यासारखें होत नाहीं. भाषाप्रभुत्व वाखाणण्यासारखें आहे. प्रवाहाचा अस्खलितपणा तर कित्येक वेळां आश्चर्यचकित करितो. घरगुती वातावरण उत्पन्न करण्याचें सामर्थ्य हि असेंच अलौकिक आहे. श्लोकरचना इतकी प्रसादपूर्ण आहे की अर्थ-बोध कोठेंच अडून राहात नाहीं. बंगाली चाली, स्त्रीगीतें आणि इतर जुनीं पदें यांच्या प्रमाणांत संस्कृत प्रहर्षिणी, वियोगिनी, प्रमाणिका, अनुष्टुभ्, वसंततिलका, इत्यादि वृत्तें आणि विविध जाति यामुळें वृत्तवैचित्र्य आणि वृत्तमाधुर्यहि खूप साधलें आहे. आवेश आणि नाजुकपणा या दोन्ही विरुद्ध गुणांचा सारखाच परिपोष आढळतो. सृष्टिवर्णनेंहि मोहक आणि विशिष्ट ठसा उमटविणारीं झालीं आहेत. अन्तर्मुखता हा कवीचा विशेष असल्यामुळें जिवंतपणा स्वभावतःच आढळून येतो. पाल्हाळ, नीरसता, रचनेचा अगर प्रमाणशीरतेचा अभाव इत्यादि दोषहि कांहीं ठिकाणीं आढळतात. तथापि एकंदरींत आनंद आणि आशावाद यांचेंच प्रभुत्व आढळत असल्यामुळें हा काव्यसंग्रह रसिक मनाला मोहनी घालण्यास पूर्ण समर्थ आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.

अमळनेरच्या कांहीं विद्यार्थ्यांचा तरुण सेवकसंघ 'पत्री' प्रसिद्ध करीत आहे. श्री. साने यांचें इतर वाङमयहि यथाक्रम प्रसिद्ध करण्याचा संघाचा संकल्प आहे. हा संकल्प शुभ आहे. संघाचें या कार्याबद्दल कौतुक करावेंसें वाटतें. महाराष्ट्रांतील जनतेनें मनांत आणलें तर हा संकल्प सिद्धीस जाण्यास मुळींच हरकत नाहीं.

राष्ट्रीय आठवडा १९३५
२८१ शनिवार, पुणें नं. २.

स. ज. भागवत.

---

# विनंति

मात्रा, उकार, ऋकार वगैरे बरेच ठिकाणीं उडाले आहेत. कांहीं प्रतींत ते उडाले आहेत, कांहींत नाहींत. प्रेमाचें प्रम, मुलाचें मल, स्मृतींचें स्मती, धांवुनचें धावन असे प्रकार यामुळें झाले आहेत. त्यांचें शुद्धिपत्र दिलेलें नाहीं. परंतु जे शब्द मुळांतच चुकीचे पडले आहेत त्यांचें शुद्धिपत्र पान ७९ वर दिलें आहे. तरी त्याप्रमाणें दुरुस्ती करून मग पुस्तक वाचावें. वाचकांनीं या चुकांबद्दल उदार मनानें क्षमा करावी, दुसरें काय सांगणार?

पां. स. साने

सं. ... नं. ...
ठाणे.

# पत्री-समर्पण.

श्रीराम

अनंत आई झगडे मनांत
उसंत ना संतत चालतात
किती निराशा किति थोर आशा
किती मनीं चालतसे तमाशा ॥

कसें तुला दावुं समस्त माते
अशक्य तें या दुबळ्या मुलातें
परी कळावी तुज मन्मनाची
स्थिती, अशी आस तुझ्या मुलाची; ॥

म्हणून जो हा हृदयांत सिंधु
उचंबळे, त्यांतिल एक बिंदु
समर्पितों ठेवुन नाम पत्री
तुझ्या महोदार पदीं पवित्रीं ॥

पुणें, २८।२।२५. पां. स. साने

७२०२

मराठी ग्रंथ संग्रहालय

# पत्री

## १ हृदय मदीय तव सिंहासन होवो

हृदय मदीय तव सिंहासन होवो ॥
अभिनवतम रमणीया गुणनिधान
मूर्ति तुझी विलसत राहो ॥ हृदय० ॥

दंभ दर्प काम क्रोध
बहु करिती विरोध
उपजे न ज्ञान–बोध
तिमिर सकल जावो ॥ हृदय० ॥

भक्तिभाव–गंधाची
सद्विचार–सुमनांची
मंगलमय–गानांची
पूजा तुज पावो ॥ हृदय० ॥

—अमळनेर, १९२६.

मराठी ग्रंथ संग्रहालय

---

## २ मजवर कृपा करावी

प्रभुवर मजवर कृपा करावी
मतिमलिनता हरावी माझी ॥ मजवर० ॥

भरो प्रेम अंतरंगीं
जडो जीव संतसंगीं
मम अहंता गळावी सारी ॥ मजवर० ॥

नुरो तम अतां समीप
जळो हृदयिं ज्ञानदीप
मति तव पदीं जडावी माझी ॥ मजवर० ॥

—धुळें तुरुंग, मे १९३४.

---

## ३ एक किरण

एक किरण मज देई
केवळ एक किरण मज देई ॥
कोटी रवि–शशि
तूं पेटविशी
विश्वमंदिरीं पाही
परि मम हृदयीं
तिमिर सदाही
श्रमुन जीव मम जाई ॥ एक० ॥
किति कृमि–कीटक
रोगोत्पादक
बुजबुजाट जणुं होई
दे सौभाग्या
दे आरोग्या
तम मम विलया नेई ॥ एक० ॥
मी धडपडतों
मी आरडतों
कोणि न धांवे भाई
आस तुझी मम
हरि झडकरि तम
मुळि न सुचे मज कांहीं ॥ एक० ॥

एक किरण ना
मार्गे फार
एक किरण शुभ
देउन तार
प्रणति तुझ्या शुभ पायीं
तेजःसिंधो !
प्रकाशबिंदु
दे, होइन उतराई ॥ एक० ॥

—पुणें, सप्टेंबर १९३४.

---

## ४ माझी बुडत आज होडी

माझी बुडत आज होडी
मज कर धरून काढी ॥ माझी० ॥
तुफान झाला सागर सारा
मज सभोंति वेढी ॥ माझी० ॥
लोटितील मज भीषण लाटा
खचित मृत्यु–तोंडीं ॥ माझी० ॥
शांत करी रे तुफान दर्या
काळमुखिं न धाडी ॥ माझी० ॥
अपराध तुझे रचिले कोटी
परि धरी न आढी ॥ माझी० ॥
पुनरपि माते राहुन जपुनी
करिन कधिं न खोडी ॥ माझी० ॥
रागावलि जरि माय मुलावर
संकटीं न सोडी ॥ माझी० ॥

ये करुणाकर ये मुरलीधर
हात धरुनि ओढी ।। माझी० ।।

किति झालें तरि मल तुझें मी
प्रेम कधिं न तोडी ।। माझी० ।।

इतर कुणी ते धांवुन येतिल
आस अशि न थोडी ।। माझी० ।।

बाळ तुझा हा होउन हतमद
हांक तुजसि फोडी ।। माझी० ।।

आजपासुनी तव करिं राया
सोंपवीन होडी ।। माझी० ।।

मुरली वाजव सागर शांतव
वादळास मोडी ।। माझी० ।।

मुरली वाजव, वादळ लाजव
दाव गीतगोडी ।। माझी० ।।

जीवन तव पदिं वाहुन बालक
हात तात ! जोडी ।। माझी० ।।

—पुणें, आक्टोबर १९३४.

---

## ५ अति आनंद हृदयिं भरला

अति आनंद हृदयिं भरला
प्रियकर प्रभु मम हृदयीं आला
शोक पळाला
खेद गळाला
पापताप दुरि झाला ।। अति० ।।

मम तनमनधन
मम हें जीवन
अर्पिन पद—कमला ॥ अति० ॥

चिंता सरली
भीती नुरली
त्रास सकळ सरला ॥ अति० ॥

प्रेमरज्जुनें
प्रभुला धरणें
जाइल मग कुठला ॥ अति ० ॥

—धुळें तुरुंग, मे १९३२.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्वतंत्र प्रत
सं. [illegible] नं. ११११
ता. ५-१-३५
ठाणे.

## ६ . मम जीवन हरिमय होऊं दे

मम जीवन हरिमय होऊं दे
हरिमय होवो
प्रभुमय होवो
हरिशिं मिळुन मज जाऊं दे ॥ मम० ॥

रुसेन हरिशीं
हंसेन हरिशीं
हरिभजनीं मज रंगूं दे ॥ मम० ॥

गाइन हरिला
ध्याइन हरिला
भवसागर मज लंघूं दे ॥ मम० ॥

हरिनामाचा
पावक साचा
अघवनघन मम जाळूं दे ॥ मम० ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय
५८९

हेत हरीचे
बेत हरीचे
सकल कृतींतुन दावूं दे ॥ मम० ॥

वेड सुखाचें
लागो हरिचें
हरिशिं मिळुन मज जाऊं दे ॥ मम० ॥

—धुळें तुरुंग, जून १९३४.

---

## ७ मजला तुझ्यावीण जगिं नाहिं कोणी

मजला तुझ्यावीण जगिं नाहिं कोणी ॥
अगतीक निशिदीन
मजलागिं वाटे
सदा दीन या लोचनीं येइ पाणी ॥ मजला० ॥

मम कार्य जगिं काय
न कळे मला हाय
स्थिति तात ही होत केवीलवाणी ॥ मजला० ॥

असलें जिणें भार
वाटे मला फार
जणुं देइ पाठीवरी कोणि गोणी ॥ मजला० ॥

देवा दयाळा
हतदीन बाळा
घेऊन जा ठेवि निज पूज्य चरणीं ॥ मजला० ॥

—पुणें, आक्टोबर १९३४.

---

## ८ तव अल्प हातून होई न सेवा

तव अल्प हातून होई न सेवा
मम कंठ दाटे
किति खंत वाटे
हुरहूर वाटे अहोरात्र जीवा ॥ तव० ॥

सेवा करावी
सेवा वरावी
मनिं नित्य बोलें असें फक्त देवा ॥ तव० ॥

किति दुःख लोकीं
किति लोक शोकीं
परि कांहि ये ना करायास देवा ॥ तव० ॥

दिसती समोर
किति सानथोर
झटती, मला वाटतो नित्य हेवा ॥ तव० ॥

हृदयांत सेवा
वदनांत सेवा
उतरे न हातांत करुं काय देवा ॥ तव ॥

स्वार्थीपणें झोंप
मज वाटतें पाप
वाटे सदा तात ! कीं जीव द्यावा ॥ तव० ॥

—पुणें आक्टोबर १९३४.

## ९ सदयहृदय तूं प्रभु मम माता

सदय–हृदय तूं प्रभु मम माता
घेइ कडेवर हांसव आतां ॥ सदय० ॥
अगतिक बालक
कुणि ना पालक
त्रिभुवनचालक तूं दे हाता ॥ सदय० ॥
कांहिं कराया
येइ न राया
लाजविती मज मारिति लाथा ॥ सदय०।
धांवत येउन
जा घरिं घेउन
वांचव मज तूं नाथ अनाथा ॥ सदय० ॥

—धुळें तुरुंग, मे १९३२.

---

## १० दिसतात सुखि तात ! सारेच लोक

दिसतात सुखि तात ! सारेच लोक
हंसतात जगिं तात ! सारेच लोक ॥
मम अंतरंगांत
परि ही निराशा
भरतात डोळे जळें, जाळि शोक ॥ दिसतात० ॥
खाणें पिणें गान
जग सर्व बेभान
असे फक्त माझ्याच हृदयांत दुःख ॥ दिसतात० ॥
फुलतात पुष्पें
गातात पक्षी
रडे एक मच्चित्त हें नित्य देख ॥ दिसतात० ॥

जनमोददुग्धीं
मिठाचा खडा मी
कशाला ? तुझें जाइ घेऊन तोक ॥ दिसतात० ॥

—पुणें, आक्टोबर १९३४.

---

## ११ देवा! धांव धांव धांव

देवा ! धांव धांव धांव
या कठिणसमयिं पाव ॥ देवा० ॥

अगणित रस्ते दिसती येथें
पंथ मजसि दाव ॥ देवा० ॥

अपार गोंधळ बघुनी विकळ
देइ चरणिं ठाव ॥ देवा० ॥

हा मज ओढी तो मज ओढी
करिति कावकाव ॥ देवा० ॥

कुणि मज रडवी कुणि मज चढवी
म्हणुं कुणास साव ॥ देवा० ॥

घेउन जा मज प्रभु चरणीं निज
नुरलि कसलि हांव ॥ देवा० ॥

—पुणें, आक्टोबर १९३४.

---

## १२ दुखः मला जें मला ठावें

दुःख मला जें मला ठावें
मदश्रुचा ना
अर्थ कळे त्यां
आंत जळुन मी सदा जावें ॥ दुःख० ।

" असे भुकेला
हा कीर्तीला "
ऐकुन, भरुनी मला यावें ॥ दुःख० ॥

" एकांति बसे
अभिमान असे "
वदति असें तें मला चावे ॥ दुःख० ॥

"या घरच्यांची
चिंता साची"
ऐकुन, खेद न मनीं मावे ॥ दुःख० ॥

नाना तर्क
काढित लोक
नयनिं सदा या झरा धांवे ॥ दुःख० ॥

तूं एक मला
आधार मुला
बसुन तुझ्याशीं विलापावें ॥ दुःख० ॥

—नाशिक तुरुंग, आक्टोबर १९३२.

## १३ नयनीं मुळिं नीरच नाहीं

नयनीं मुळिं नीरच नाहीं
करपुन किति मम अंतर जाई ॥ नयनीं० ॥
रडुनी रडुनी सरलें पाणी
वदुनी वदुनी शिणली वाणी
आंत जळत परि निशिदिन पाही ॥ नयनीं० ॥
रडतां मी ना आलां दिसतों
लोक सकळही परि हा फसतो
अश्रुविणें रडणें अति दाही ॥ नयनीं० ॥
खाइ किडा तो आंत कळीस
भ्रमर आंत पोखरि काष्ठास
शोक तसा हृदयास सदाही ॥ नयनीं० ॥
अमृतधारा ये घेउन तव
शोकानळ हा प्रभु क्षणिं विझव
आस उरे तव केवळ आई ॥ नयनीं० ॥

—पुणें, आक्टोबर १९३४.

## १४ वेल

मी प्रभुराया ! त्वदंगणांतिल वेल
काळजी कां न घेशील ॥
मी एका या बाजुस पडलों आहें
वाट त्वत्कृपेची पाहें
त्वत्करुणेचें जल थोडें तरि मिळुं दे
मज येथें जीव धरूं दे
तूं लक्ष जरा मधुनमधुन तरि देई

येईल धीर मम हृदयीं
मज अंकुर मग फुटतील
मज पल्लव शुभ येतील
मम जीवन हें हांसेल
ती येऊं दे मम भाग्याची वेळ
काळजी कां न घेशील ॥ मी० ॥

हें बघ किति रे ! माझ्याभंवतीं गवत
तें मजसि वाढुं ना देत
मज झांकोळी गुदमरवी तें सतत
शिर वरि मुळिं करुं ना देत
हें खाउनियां मारुन टाकिल मातें
उपटशिल जरी ना हातें
हें उपट विषारी गवत
जें मदंकुरा अडवीत
दे मला विकासा पंथ
ये सखया तूं, मरण जरि न येशील
काळजी कां न घेशील ॥ मी० ॥

मज घालावें निज हातांनीं पुरण
मग भरभर मी वाढेन
कधिं खत घाली थोडें तरि तूं राया
येईल भराउन काया
कुणि काळजि ना आजवरी मम केली
म्हणुन ही विकलता आली
परि पोशिल जरि कुणि मजला
प्रकटेल कला मम विमला
प्रकटेल दिव्यता सकला
मी त्वदंगणीं म्हणुनिच झालों वेल
काळजी कां न घेशील ॥ मी० ॥

मग फुटतिल रे दिव्य धुमारे मातें
    मांडवीं चढव निज हातें
दे छोटासा मंडप मज घालून
    त्यावर प्रभुजि ! पसरेन
कधिं येतिल तीं फुलें फळें मधु मजला
    लागेल ध्यास मन्मतिला
        होईन अतिच उत्कंठ
        कळि हळुच होइल प्रकट
        तूं होशिल बघुनी हृष्ट
मग सुंदरशीं कितिक फुलें फुलतील
    काळजी कां न घेशील ॥ मी० ॥

जरि सकळ फुलें सखया ! ना फळतील
    झडतील कांहिं गळतील
तीं कांहिं तशीं वांझ प्रभु! निघतील
    कितिकांस किडी खातील
कितिकांस फळें धरतिल परि सडतील
    वाढ ना नीट होईल
        परि एक दोन तरि दिव्य
        रसभरित मधुर तुज सेव्य
        येतील फळें प्रभु भव्य
तव पद–पूजा–कामीं तीं येतील
    काळजी कां न घेशील ॥ मी० ॥

यापरि देवा ! त्वदंगणीं विकसूं दे
    बहरुं दे, मुदें पसरूं दे
मजमाजी जें आहे तें वाढवुन
    त्वच्चरणकमळिं वाहीन
परि वाढाया आहें करुणा–शरण
    वाढेन सदय जरि चरण

मद्विकास त्वत्पूजार्थ
ना इतर हेतु हृदयांत
हा एकच सखया हेत
फलपुष्पीं हा वेल तवार्चन करिल
काळजी कां न घेशील ॥ मी० ॥

—नाशिक तुरुंग, सप्टेंबर १९३३.

---

## १५ जीवनतरु

प्रभु! जन्म सफल हा व्हावा
मम जीवनतरु फुलवावा ॥ प्रभु० ॥
सत्संगतिसलिला देई
सद्विचार–रविकर देई
वैराग्य–बंधना लावी
हें रोप वाढिला लावा ॥ मम० ॥
तूं विकार–वादळि पाळी
मोहाचे कृमि तूं जाळी
श्रद्धेचें खत तूं घाली
टवटवित हरित शोभावा ॥ मम० ॥
धैर्याचा गाभा भरुं दे
प्रेमाचे पल्लव फुटुं दे
सत्कर्मसुमांनीं नटुं दे
सच्छील–सुरभि पसरावा ॥ मम० ॥
गुंगोत भक्तिचे भृंग
नांदोत ज्ञान–विहंग
कूजना करुत नवरंग
शांतिच्या फळीं बहरावा ॥ मम० ॥

बंधूंस साउली देवो
बंधूंस सौख्यरस देवो
सेवेंत सुकोनी जावो
हा हेतु विमल पुरवावा ॥ मम० ॥

—धुळें तुरुंग, मे १९३२.

---

## १६ मज माहेराला नेई

यइ ग आई
मज माहेराला नेई ॥
तगमग करितो माझा जीव
तडफड करितो माझा जीव
जेंवि जळाविण तें राजीव
सुकुनी जाई ॥ मज० ॥

वृक्ष जसा तो मूळावीण
फूल जसें तें वृंतावीण
मीन जसा तो नीरावीण
तसें मज होई ॥ मज० ॥

सदैव येते तव आठवण
भरून येती दोन्ही नयन
तगमग करितें अंतःकरण
सुचेना कांहीं ॥ मज० ॥

शतजन्मांचा मी उपवासी
एक कणहि ना माझ्यापाशीं
त तर औदार्याची राशी
कृपेनें पाही ॥ मज० ॥

तुझ्याजवळ मी सदा बसावें
त्वन्मुखकमला सदा बघावें
भक्तिप्रेमें उचंबळावें
हेतु हा राही ॥ मज० ॥

वात्सल्यानें मज कवटाळ
तप्त असें मम चुंबी भाळ
प्रेमसुधा सुकल्या मुखिं घाल
जवळी घेई ॥ मज० ॥

—धुळें तुरुंग, मे १९३४.

---

## १७ येतो का तो दुरून

येतो का तो दुरून
बघा तरि, येतो का तो दुरून ॥
येतो का मम जीवनराजा
येतो का मम अंतरराजा
कंठ येइ गहिंवरून ॥ बघा तरि० ॥

केवळ त्याच्यासाठीं जगलों
केवळ त्याच्यासाठीं उरलों
हृदय येतसे भरून ॥ बघा तरि० ॥

वाट बघोनी त्याची संतत
रडुनी रडुनी निशिदिन अविरत
डोळे गेले सुजून ॥ बघा तरि ० ॥

येइल केव्हां माझा जिवलग
मम हृदयाची होई तगमग
जीव जातसे झुरून ॥ बघा तरि० ॥

येतांची मम जीवन–राणा
ओंवाळुन मी पंच प्राणां
   टाकिन त्याचेवरुन ।। बघा तरि० ।।

जीवनवल्लभ पडतां दृष्टी
धांवत जाउन घालिन दृढ मिठी
   जाइन तत्पादिं मरून ।। बघा तरि०।।

––धुळें तुरुंग, एप्रिल १९३२.

---

## १८ पूजा मी करुं रे कैशी ?

पूजा मी करुं रे कैशी ?
   येशी परि, पूजा मी करुं रे कैशी ? ।।

पडकें हें घर माझें
   कैसा बोलावूं ? हृषिकेशी ! ।। पूजा० ।।

अश्रूंचा माझ्या हार
   घालूं का तो तव कंठासी ? ।। पूजा० ।।

सुटतात जे सुसकारे
   तेंची संगीत, देवा ! तुजसी ।। पूजा० ।।

जमलें अपयश माझें
   त्याच्या दाविन नैवेद्यासी ।। पूजा० ।।

द्याया तुजलागिं योग्य
   नाहीं कांहिंच माझ्यापाशीं ।। पूजा० ।।

गोळा मी केल्या चिंध्या
   कैशा दावूं त्या मी तुजसी ! ।। पूजा० ।।

मोतीं फेंकुन, देवा !
    जमवित बसलों मी मातीसी ॥ पूजा० ॥
त्वत्स्पर्श परि दिव्य होतां
    मृत्कण होतिल माणिक-राशी ॥ पूजा० ॥

—धुळें तुरुंग, मे १९३२.

---

## १९ कर्ममय पूजा

पूजा करितें तव हें, प्रभुवर !
    अखिल चराचर, कर्म करोनी ॥ पूजा० ॥
रवि, शशि, तारे,
संतत अंबरिं तळपून
    तिमिर समस्त हरोनी ॥ पूजा० ॥
सागर उसळति,
धांवति द्रुत-गति तटिनी,
    ध्येय उदात्त धरोनी ॥ पूजा० ॥
वारे वाहति,
डोलति तरुतति कितितरि,
    फलपुष्पांनि भरोनी ॥ पूजा० ॥
जीवन हें मम
तेंवि स्वकर्मि रमोनी
    जाउ झिजून झिजूनी ॥ पूजा० ॥

—धुळें तुरुंग, मे १९३२.

११५ आम्य मजूर

## २० मजूर

आम्ही देवाचे मजूर
आम्ही देशाचे मजूर
कष्ट करूं भरपूर ।। आम्ही० ।।

बाहेरिल ही शेती करुन
धनधान्यानें तिला नटवुन
फुलांफळांनीं तिला हंसवुन
दुष्काळा करूं दूर ।। आम्ही० ।।

हृदयांतिलही शेती करुन
स्नेहदयेचे मळे पिकवुन
समानता स्नेहाला निर्मुन
सौख्या आणूं पूर ।।आम्ही० ।।

रोगराइला करुनी दूर
घाण सकळही करुनी दूर
स्वर्ग निर्मुं तो या पृथ्वीवर
बदलूं सारा नूर ।। आम्ही ० ।।

दिवसभर असे कष्ट करून
जाऊं घामाघूम होउन
रात्रीं भजनीं जाऊं रमुन
भक्तीचा धरूं सूर ।। आम्ही० ।।

कर्मामध्यें दिव्यानंद
सेवेमध्यें दिव्यानंद
नाहीं अन्य फळांचा छंद
नाहीं कांहि जरूर ।। आम्ही० ।।

—धुळें तुरुंग, मे १९३२.

## २१ श्रमाची महती

जरि वाटे भेटावें
प्रभुला डोळ्यांनीं देखावें ॥ जरि० ॥

श्रम निशिदिन तरि बापा !
सत्कर्मी अनलस रंगावें ॥ जरि० ॥

प्रभु रात्रंदिन श्रमतो
विश्रांती–सुख त्या नच ठावें ॥ जरि० ॥

प्रभुला श्रम आवडतो
जरि तूं श्रमशिल तरि तो पावे ॥ जरि० ॥

पळहि न दवडी व्यर्थ
क्षण सोन्याचा कण समजावें ॥ जरि० ॥

सत्कर्मांचीं सुमनें
जमवुन प्रभु–पद तूं पूजावें ॥ जरि० ॥

रवि, शशि, तारे, वारे,
सागर, सरिता, श्रमति, बघावें ॥ जरि० ॥

सेवेची महती जाणी
कष्टांची महती जाणी
कष्टुनियां प्रभुपद गांठावें ॥ जरि० ॥

—धुळें तुरुंग, मे १९३२.

## २२ मन माझें सुंदर होवो

मन माझें सुंदर होवो
वरी जावो
हरी गावो
प्रभुपदकमलीं रत राहो ॥ मन० ॥

द्वेषमत्सरा न मिळो अवसर
कामक्रोधा न मिळो अवसर
निष्पाप होउनी जावो ॥ मन० ॥

प्रेमपूर हृदयांत भरूं दे
भूतदया हृदयांत भरूं दे
शम–समता–सरिता वाहो ॥ मन० ॥

पावित्र्याचें वातावरण
चित्ताभोंवतिं राहो भरुन
कुविचार–धूलि ना येवो ॥ मन० ॥

आपपर असा न उरो भाव
रंक असो अथवा तो राव
परमात्मा सकळीं पाहो ॥ मन० ॥

धैर्य धरूं दे, त्यागा वरुं दे
कष्टसंकटां मिठी मारुं दे
आलस्य लयाला जावो ॥ मन० ॥

आशेचा शुभ दीप जळूं दे
नैराश्याचें घन तम पळुं दे
मनिं श्रद्धा अविचल राहो ॥ मन० ॥

सत्याची मज सेवा करुं दे
सत्यास्तव मज केवळ जगुं दे
सत्यांत स्वर्ग मम राहो ॥ मन० ॥

करुनि अहर्निश आटाआटी
ध्येय–देव गांठायासाठीं
हे प्राण धांवुनी जावो ॥ मन० ॥

—धुळें तुरुंग, जून १९३२.

---

## २३ मी केवळ मरुनी जावें

काय करावें ?
मी केवळ मरुनी जावें
सदैव चाले ओढाताण
हृदयावरतीं पडतो ताण
उरलें अल्पहि न मला त्राण
कुणा सांगावें ॥ मी० ॥

क्षणभर निर्मळ गगनीं उडतों
दुसऱ्याच क्षणि दरींत पडतो
खालींवर करुनी मी रडतों
कितिक रडावें ॥ मी० ॥

सद्भाव मनीं क्षण डोकावति
धरुं जावें तों अदृश्य होती
केवळ हातीं येते माती
मृण्मय व्हावें ॥ मी० ॥

कोणावरतीं विश्वासावें
कोणाला मी शरण रिघावें
कोणा हातीं जीवन द्यावें
कुणाला ध्यावें ॥ मी० ॥

देवाचा ना मज आधार
दवाचा ना मज आधार
कोण पुशिल मल्लोचन–धार
तिनें वाळावें ॥ मी० ॥

मम जीवनिं मज न दिसे राम
जगुनि न आतां कांहीं काम
अविलंबें मी मदीय नाम
पुसुन टाकावें ॥ मी० ॥

—धुळें तुरुंग, जून १९३२.

---

## २४ असो तुला देवा! माझा सदा नमस्कार

असो तुला देवा ! माझा सदा नमस्कार
तुझ्या दयादातृत्वाला अंत नाहि पार ॥ असो० ॥

तुझ्या कृपेनें रे होतिल फुलें फत्तराचीं
तुझ्या कृपेनें रे होतिल मोतिं मृत्तिकेचीं
तुझ्या कृपेनें रे होतिल सर्प रम्य हार
असो तुला देवा! माझा सदा नमस्कार ॥

तुझ्या कृपेनें रे होइल उषा त्या निशेची
तुझ्या कृपेनें रे होइल सुधा त्या विषाची
तुझ्या कृपेनें रे होइल पंगु सिंधुपार
असो तुला देवा! मा ा सदा नमस्कार ! ॥

तुझ्या कृपांतधूमधला बिंदु जरि मिळेल
तरि प्रभो! शतजन्मांची मत्तृषा शमेल

तुझें म्हणुनि आलों राया ! बघत बघत दार
असो तुला देवा ! माझा सदा नमस्कार ॥

—धुळें तुरुंग, मे १९३४.

---

## २५ प्रभो काय सांगूं तुला मी वदोनी

प्रभो ! काय सांगूं तुला मी वदोनी ॥ ध्रु०
तुझी गोड येतां स्मृती, आंसवानीं
पहा नेत्र यतात दोन्ही भरोनी ॥ प्रभो० ॥
कृपेची तुझ्या कल्पना चित्ति येतांच
पाषाण जातील रे पाझरोनी ॥ प्रभो० ॥
अनंता ! तुझ्या वैभवाला विलोकून
जाई अहंभाव सारा गळोनी ॥ प्रभो०॥
उदारा ! दयाळा ! तुझ्या देणग्यांचा
सदा दिव्य वर्षाव होई वरूनी ॥ प्रभो०॥
कृपेचा तुझ्या गोड मेवा मिळाया
सुखें जन्म घेईन मी फिर्फिरोनी ॥ प्रभो०॥
जसें नीर मीनास तेवीं तुझी रे
स्मृति जीवनाधार राहो बनोनी ॥ प्रभो०॥
जसा श्वास प्राणास तेवीं तुझी रे
स्मृति जीवनाधार राहो बनोनी ॥ प्रभो० ॥
तुझें प्रेम राया ! तुझी भक्ति राया !
सदा रोमरोमांत राहो भरोनी ॥ भो० ॥
तुझें गीत ओठीं तुझें प्रेम पोटीं
तुला एक जोडीन जगिं या जगोनी ॥ प्रभो०

—धुळें तुरुंग, मे १९३४.

---

## २६ वेणु

हृदयंगम वाजत वेणू
स्वैर न विचरति इंद्रिय–धेनू ॥ हृदयं० ॥

जीवन–गोकुळिं ये वनमाळी
अमित सुखाची सृष्टी भरली
शिरिं धरिन तदीय पदांबुज–रेणू ॥ हृदयं० ॥

प्रेमळ गोपी या मम वृत्ती
वेडावुन प्रभुरूपीं जाती
प्रभुविण वर्तति कीं कांहिंच नेणू ॥ हृदयं० ॥

——नाशिक तुरुंग, (गोकुळअष्टमी) २४।८।३२.

---

## २७ मनमोहना

मन–मोहना ! भव–मोचना !
भूक लागली
तव चरणांची
किति तरि साची
मम लोचनां ॥ मन० ॥

सकलाकारीं
तुजला बघुं दे
तन्मय होउं दे
प्रिय–दर्शना ॥ मन० ॥

शतजन्मावधि
मूर्ति न दिसली
मज अंतरली
अतर–रमणा ॥ मन० ॥

सोडि कठोरा !
निष्ठुरता तव
धीर न मज लव
मम जीवना ! ॥ मन० ॥

—नाशिक तुरुंग, सप्टेंबर १९३२.

---

## २८ मनो-मंदिर-राम

बाल्यापासुन
हृदयांत वसुन
गोष्टि सांगे गोड
पुरवि माझें कोड
सोडुन गेला परि तो आज माझें धाम
कोठें गेला सांगा रुसुन माझा श्याम
कोठें गेला माझा मनो-मंदिर-राम
हाय मी काय करूं ॥

सुख ओसरे
हास्य दूर सरे
खेळ संपले
बोल थांबले
माझ्या घरामधले दिवे मालवून
माझी होती नव्हती दौलत चोरून
गेला कैसा केव्हां हुल्थोर पळून
हाय मी काय करूं ॥

आतां उंदिर घुशी
येथें दिवानिशी

करितिल खडबड
करितिल गडबड
पोखरून टाकितील माझें हृदय–राउळ
कामक्रोधा आयतें मिळेल वारुळ
आंत चितेचें शिरेल वट्वाघुळ
हाय मी काय करूं ॥

—त्रिचनापल्ली तुरुंग, नोव्हेंबर १९३०.

---

## २९ हृद्याकाशीं मेघराशी

हृदयाकाशीं मेघराशी
आल्या कां जमून
हृदयाकाश त्यांच्या भारें
सारें गेलें नमून ॥

येणार आहे स्वामि माझा
येणार आहे राजा माझा
त्याच्यासाठीं म्हणून
मनोमंदिर धुवून टाकिन
निर्मळ ठेविन करून ॥ हृदया० ॥

कामक्रोधांच्या वटवाघळांनीं
नाना वासनांच्या उंदिरघुशींनीं
घाण ठेवली करून
धुवायाला मेघ–धारा
आल्या भरभरून ॥ हृदया० ॥

अंतर्बाह्य होवो वृष्टी
भरो हृदय भरो दृष्टी

मळ जावो झडून
कानें कोंपरे शुद्ध होवो
मळ न राहो दडून ॥ हृदया० ॥

हृदय निर्मळ शरीर निर्मळ
बुद्धि निर्मळ दृष्टि निर्मळ
जीवन निर्मळ बघून
प्रसन्न होइल प्राण–सखा
हृदयीं ठेविल धरून ॥ हृदया० ॥

––धुळें तुरुंग, जून १९३२.

---

## ३० देवा! झुरतो तव हा दास

देवा! झुरतो तव हा दास
करितो जरि सायास ॥ देवा० ॥

वापीजवळी बाळ जाउन
आंत पाहतो डोकावून
माता येई हळूच मागुन
प्रेमें उचली त्यास ॥ देवा० ॥

मोहाजवळी देवा ! जातां
कां न पकडशी माझ्या हाता
असुनी सकल जगाची माता
कां मजशींच उदास ॥ देवा० ॥

धी–बल–वैभव मातें नलगे
जन–गौरव–यश मातें नलगे
एक मागणें तुजला मागें
दे निर्मळ हृदयास ॥ देवा० ॥

लहानसा दंवबिंदु सांठवी
विमल निजांतरिं तेजोमय रवि
तेंवि तुला मी निर्मल हृदयीं
ऐशी मजला आस ॥ देवा० ॥

—धुळें तुरुंग, मे १९३४.

११९

---

## ३१ प्रभु सतत मदंतर हांसूं दे

प्रभु सतत मदंतर हांसूं दे ॥
तुझ्या कृपेचा वसंत—वारा
जीवन—वनिं मम नाचूं दे ॥ प्रभु० ॥

विश्वग्रंथीं पानीं पानीं
दृष्टि तुजचि मम वाचूं दे ॥ प्रभु० ॥

ठायीं ठायीं तुजला पाहुन
उचंबळुन मन जाऊं दे ॥ प्रभु० ॥

—धुळें तुरुंग, मे १९३२.

---

## ३२ जागृत हो माझ्या रामा

जागृत हो माझ्या रामा !
हे हृदयस्था ! सुख—धामा ! जागृ० ॥

तूं भक्तजनां आधार
तूं ब्रह्मांडा आधार
हरि सकल मोह—अंधार
जलदश्यामा ! ॥ जागृत० ॥

करि मन्मति निर्मळ पूत
भरि भक्ती ओतप्रोत
त्वद्‌ध्यान लागु दिनरात्र
सद्विश्रामा ! ॥ जागृत० ॥

लाविले तुजकडे डोळे
शतवार जाहले ओले
हें हृदय किती गहिंवरलें
घेतां नामा ॥ जागृत० ॥

मज नको माल धन कीर्ती
मज लौकिकाचि ना प्रीती
निज दास्य मंगल मूर्ती
पुरवी कामा ॥ जागृत० ॥

—त्रिचनापल्ली तुरुंग, सप्टेंबर १९३०.

---

## ३२ हे नाथ! येईन तव नित्य कामीं

हे नाथ ! येईन तव नित्य कामीं ॥
भवदीय इच्छा
प्रकटीन कर्मी
अश्रांत अत्यंत करिन श्रमा मी ॥ हे० ॥

सुखवीन हे लोक
हरुनी मनःशोक
झिजवीन काया प्रमोदें सदा मी ॥ हे० ॥

अश्रू पुसावे
जन हांसवावे
याहून नाहीं जगीं कांहि नामी ॥ हे० ॥

वितळून जाईन
जशि मेणबत्ती
देईन अल्प प्रकाशा तरी मी ॥ हे० ॥
चित्ता शिवो स्वार्थ
न कधींहि देवा
न जडो कधीं जीव मणि–भूमि–हेमीं ॥हे०॥
स्मरुनी सदा मी
तुजा चित्तिं वागेन
तुजवीण नाहीं कुणी अन्य स्वामी ॥ हे० ॥
निरपेक्ष सेवा
खरि तीच पूजा
अर्पीन ती त्वत्पदाला सदा मी ॥ हे नाथ० ॥
इच्छा असे हीच
पुरवून ती तूंच
ने दास अंतीं तुझ्या दिव्य धामीं ॥ हे नाथ० ॥

—त्रिचनापल्ली तुरुंग, जानेवारी १९३१.

## ३४ हे तात! दे हात करुणासमुद्रा

हे तात ! दे हात करुणासमुद्रा ॥
निज मग्न कर्मांत
जग सर्व हें नित्य
पाहील कुणि ना मम म्लान मुद्रा ॥ हे तात० ॥
होई सुधा–सिंधु
होई दया–इंदु
होई मला गोड माहेर रुद्रा ! ॥ हे तात० ॥

शिवो ना अमांगल्य
मजला शिवेशा !
अभद्रा धरो जीव हा ना, सु–भद्रा ! ॥ हे तात० ॥
प्रभु ! जे खरे थोर
देती सदा धीर
सांभाळिती ते हता दीनक्षुद्रा ॥ हे तात० ॥

––पुणें, सप्टेंबर १९३४.

---

## ३५ तुजवीण आधार मज कोणि नाहीं

तुजवीण आधार मज कोणि नाहीं ॥
पथ कोण दावील
कर कोण घेईल
नेईल सांभाळुनी कोण, आई ! ॥ तुजवीण० ॥
बघतों तुझी वाट
नयनांतुनी पाट
गळा दाटतो सांगु तुजलागि कायी ॥ तुजवीण० ॥
हंसतात सारे
न दया कुणा रे
दिशा शून्य राया ! तुझ्यावीण दाही ॥ तुजवीण० ॥
पथिं मी उभा रे
हंसतात सारे
मला लोटिती, मी रडें धायिधायी ॥ तुजवीण० ॥
जग मत्त हें जात
नत मी उभा तात !
ये हात धरुनी मला नीट नेई ॥ तुजवीण० ॥

कधिही तुझ्यावीण
पद मी न टाकीन
जावो जरी जन्म हा सर्व जाई ॥ तुजवीण० ॥

—पुणें, सप्टेंबर १९३४.

---

## ३६ कांहीं कळेना, कांहीं वळेना

कांहीं कळेना, कांहीं वळेना ॥
निरभ्रशा आकाशांत
कुठूनशीं अभ्रें येत
क्षणीं सूर्य झांकोळीत
तेज तें पडेना ॥ कांहीं० ॥

जरा वरी येई मोड
कुठूनशी तों ये कीड
खाइ अंकुराला गोड
वाढ ती घडेना ॥ कांहीं० ।

पतंग जों वरतीं जाई
तोंच उलट वारा येई
क्षणामध्यें गोता खाई
तो वरी चढेना ॥ कांहीं० ॥

मला गमे तोची आला
उठें मिठी मारायाला
परी भास सारा ठरला
तो कधीं मिळेना ॥ कांहीं० ॥

अशी निराशा ही फार
जीव होइ हा बेजार
लोचनींचि अश्रूधार
ही कधीं सुकेना ॥ कांहीं० ॥

—धुळें तुरुंग, एप्रिल १९३४.

---

## ३७ आईचा मार

आई ! आई ! तूं मज मार मार ॥
मारुन मारुन मजला रडवी
चाबुक उडवुन रक्ता उडवी
लावी मन्मथनांस धार ॥ आई० ॥

लाल तुझ्या परि दृष्टीखालीं
प्रेमसुधेची गंगा भरली
दिसते गे अपरंपार ॥ आई० ॥

मारुन मारुन तूंची रडशिल
जवळी ओढुन मजला घेशिल
तुज दुःख होईल फार ॥ आई० ।

मांडीवरतीं मज बसवशिल
हनुवट धरुनी मज हंसवशिल
घेशिल मुके वारंवार ॥ आई० ।

प्रेमें तुजला मी बिलगेन
तव अश्रूंचें मजला स्नान
हरपेल मम दुःखभार ॥आई० ॥

आह ! तुझा मज रुचतो मार
त्याहुन नाहिं दुजें मज प्यार
मारुन मारुन तार
मारुन करि उद्धार ।। आई० ।।

—धूळें तुरुंग, मे १९३२.

---

## ३८ दिव्य आनंद

दिव्य आनंद
मन्मना एक गोविंद ।।
विषयवासना मम मावळली
सकल अहंता माझी गळली
वृत्ति प्रभुरूपोन्मुख वळली
न दुजा छंद ।। मन्मना०।।

खऱ्या सुखाचा झरा मिळाला
भेदभाव तो सकल निमाला
आज तपस्या येइ फळाला
तुटले बंध ।। मन्मना० ।।

भावभक्तिची गंगा भरली
ज्ञानपंकजें सुंदर फुललीं
अपार शांती हृदयीं जमली
सुटला गंध ।। मन्मना० ।।

सम मम आतां डोळे उभय
सम मम आतां प्रेमळ हृदय
परम सुखाचा झाला उदय
मी निष्पंद ।। मन्मना० ।।

शांत समीरण, शांत अंबर
शांत धरित्री, शांत मदंतर
रहावया थेतसे निरंतर
गोड मकुंद ।। मन्मना० ।।

अतां जगाची सेवा करित
दीनदुःखितां हृदयीं धरित
नेइन जीवन हें उर्वरित
मी स्वच्छंद ।। मन्मना० ।।

अशांत अस्थिर लोकां पाहुन
तळमळती हे माझे प्राण
त्यांना आतां नेउन देइन
सच्चित्कंद ।। मन्मना० ।।

--त्रिचनापल्ली तुरुंग, गोकुळअष्टमी
१६ आगष्ट १९३०.

---

## ३९ कैसें लावियलें मी दार

पडला हा अंधार
कैसें लावियलें मी दार
सौंदर्यानें सृष्टी सजली
संगीतानें सृष्टी भरली
दृष्टि परी मी माझी मिटिली
दिसलें मज ना सार ।। कैसें० ।।

तरु डोलती वेल नाचती
उत्साहाच्या अखंड मूर्ती
आनंदाची जगीं निर्मिती
संतत हो करणार ।। कैसें० ।।

निर्मल सुंदर पुष्पें फुलती
परिमल देती लघु जरि दिसती
प्रकाश धरणीवरी उधळिती
सदैव तीं हंसणार ॥ कैसें ० ॥

पहा पाखरें मूर्तानंद
किति त्यांचे ते सुंदर रंग
किलबिल ऐकुन किती तरंग
सहृदय–मनिं उठणार ॥ कैसें ० ॥

नभीं तारका सदा चमकती
सागरावरी लहरी हंसती
डोळे अमुचे जरि हे बघती
वृत्ति उचंबळणार ॥ कसें० ॥

सुंदर साधें चिमणें गवत
वसुंधरेला तें नटवीत
दृष्टि जगाची तें निववीत
हिरवें हिरवें गार ॥ कैसें० ॥

विश्वामधला प्रत्येक कण
जगांत फेंकी प्रकाशकिरण
प्रकाश–मोदें कोंदे त्रिभुवन
घेइ न तोचि भिकार ॥ कैसें० ॥

कृतज्ञतेचा सद्‌भावाचा
स्नेहाचा निःस्वार्थ प्रीतिचा
भक्तीचा निष्पाप अश्रुचा
प्रकाश अपरंपार ॥ कैसें० ॥

जगांत भरलें रमणीयत्व
जगांत भरलें असे शिवत्व
जगांत भरलेंसे सत्यत्व
कोण परी बघणार ॥ कैसें ० ॥

मनुज—मानसीं डोकावून
खोल असे जो सदंश बघुन
झालों केव्हांहि न तल्लीन
केला मी धिक्कार ॥ कैसें०

वृत्ति करोनी निज अनुदार
रागावोनी सकळ जगावर
काय साधलें अहा खरोखर
झालों मी भूभार ॥ कैसें० ॥

पायांपाशीं माणिकमोतीं
प्रकाशसिंधू सदा सभोंतीं
भिकार तिमिरीं केली वस्ती
आणि अतां रडणार ॥ कैसें०

अश्रूंचे बांधिले बंगले
तिमिराचे गालिचे पसरिले
नैराश्याचें गाणें रचिलें
केला हाहाःकार ॥ कैसें० ॥

जगापासुनी गेलों दूर
मोदा सोडुन गेलों दूर
प्रकाश सोडुन गेलों दूर
आणि पुन्हां झरणार ॥ कैसें०

शोकें आतां भरतो ऊर
जिवास आतां सदैव हुरहुर
कशास आतां करूं मी कुरकुर
झालें जें होणार ॥ कैसें० ॥

—त्रिचनापल्ली तुरुंग, आक्टोबर १९३०.

## ४० हंस रे माझ्या मुला

वारा वदे
कानामधें
गीत गाइन तुला
ताप हरिन
शांति देइन
हंस रे माझ्या मला ॥

चिमणी येऊन
नाचून बागडून
काय म्हणे मला
चिवचिव करिन
चिंता हरिन
हंस रे माझ्या मुला ॥

हिरवें हिरवें
डोले बरवें
झाड बोले मला
छाया देइन
फळफूल देइन
हंस रे माझ्या मुला ॥

सुमन वदे
मोठ्या मोदें
प्रेम देइन तुला
गंध देइन
रंग दाविन
हस रे माझ्या मुला ॥

रवी शशी
ताराराशी

दिव्य दाविन तुला
देईन प्रकाश
बोले आकाश
हंस रे माझ्या तुला ।

पाऊस पडेल
पृथ्वि फुलेल
मेघ म्हणे मला
नद्यानाले
वघशील भरले
हंस रे माझ्या मुला ।।

हिरवें हिरवें
कोमल रवें
तृण म्हणे मला
माझ्यावरी
शयन करी
हंस रे माझ्या मुला ।।

जेथें जाइन
जेथें पाहिन
ऐकुं ये मला
रडूं नको
रुसूं नको
हंस रे माझ्या मुला ।।

पदोपदीं
अश्रु काढी
कुणि न बोलला
सृष्टि सारी
मंत्र उच्चारी
हंस रे माझ्या मुला ।।

माझ्या अश्रुंनो
माझ्या मित्रांनो
खोलिमध्यें चला
दार घेऊं लावुन
या तुम्हि धांवुन
तुम्हिच हंसवाल मला ॥

—त्रिचनापल्ली तुरुंग, मार्च १९३१.

---

## ४१ झुरतों मी रात्रंदिवस

होतों मी कासावीस । झुरतों मी रात्रंदिवस ॥
श्रद्धेच्या दुबळ्या हातीं । त्वत्प्रकाश धरण्या बघतों
बाळ जसा भूमीवरुनी । चंद्राला धरण्या धजतो
अंधारामधुनी देवा । त्वन्निकट यावया झटतों
मूल मी कळेना कांहीं
कावराबावरा होई
डोळ्यांना पाणी येई
अंतरीं तुझा मज ध्यास ॥ झुरतों० ॥
त्वत्प्रसाद मज लाभेल । होती मम हृदयीं आशा
तूं प्रेम मला देशील । होती मम हृदयीं आशा
तूं पोटाशीं धरिशील । होती मम हृदयीं आशा
परि माय माउली रुसली
या बाळावर रागवली
ती येईना मुळिं जवळी
ये माझ्याजवळी बैस ॥ झुरतों० ॥
रात्रींच्या समयीं शांत । सळसळती तरुचीं पानें
मी खिडकीपाशीं जात । सोत्कंठ बघे नयनानें

प्रभु माझा बहुधा येतो । घेतली धांव का त्यानें
बाहेर खिडकिच्या हात
धरण्याला त्याचा हात
मी काढितसें सोत्कंठ
ठरला परि केवळ भास ॥ झुरतों० ॥

आकाशीं बघुनी तारे । गहिंवरतें माझें हृदय
हे थोर थोर पुण्यात्मे । कां करिति प्रभुस न सदय
दिसती न तयांना काय । अश्रु मन्नेत्रिं जे उभय
हे मंगल निर्मळ तारे
कथितिल का प्रभुला सारें
हृदयांतिल माझें वारें
बाळगितों ही मनिं आस ॥ झुरतों० ॥

प्रभु आला ऐसें वाटे । तों दिसे निबिड अंधार
हृदयांत जरा आनंद । तोंच येइ शोका पूर
सुमनांचा वाटे हार । तों करित भुजग फूत्कार
रडकुंडिस येई जीव
कोमेजे हृद्राजीव
करितो न प्रभुजी कींव
प्राशावें वाटे वीष ॥ झुरतों० ॥

पंकांतुन यावें वरतीं । रमणीय सुगंधी कमळें
भूमींतुन यावें वरतीं । अंकुरें मृदुल तेजाळें
दुःखनिराशेंतुन तेवीं । उघडी मम आशा डोळे
परि हिमें कमळ नासावें
अंकुरा किडीनें खावें
आशेनें अस्ता जावें
दुःखाची देउन रास ॥ झुरतों० ॥

आसानिराशेचा खेळ । खेळुनी खेळुनी दमलों
वंचना पाहुनी माझी । संतत मी प्रभुजी श्रमलों

हुंदके देउनी देवा। ढसढसा कितिकदां रडलों
तुज पाझर देवा फुटूं दे
त्वन्मूर्ति मजसि भेटूं दे
त्वच्चरण मजसि भिजवूं दे
हंसवी हा रडका दास ॥ झुरतों ०॥

—त्रिचनापल्ली तुरुंग, सप्टेंबर १९३०.

---

## ४२ काय सांगूं देवा कोण सांगूं

काय सांगूं देवा कोणा सांगूं ॥

माझ्या चित्ता आतां नाहीं मुळीं धीर
रात्रंदिन वाहे डोळयांतून नीर
तुजला वाटे काय माझी चीरचीर ॥ काय० ॥

धूळीमध्यें गेलें तनमन मळून
तूझ्या अमृतहातें टाकी रे धूवून
तूझ्या पायाजवळी ठेवी मग निजवून ॥ काय० ॥

कुविकारांची थंडी टाकी गारठवून
नाहीं नाहीं कांहीं मजला संरक्षण
तूझा शेला देवा घाली पांघरूण ॥ काय० ॥

मेघावीण कैसा नाचेल रे मोर
चंद्रावीण कैसा हांसेल चकोर
आईवीण सांग कोठें जाइल पोर ॥ काय० ॥

तूझा एक देवा! अनाथा आधार
भक्तांचा तूं संतत चालवितोसि भार
म्हणुनी आलों तूझें शोधित शोधित दार ॥ काय० ॥

माते ! मंगलमूर्ते ! उघडी आतां दार
माझ्या शोका नाहीं, आई! अंत पार
तुझ्या बाळा आतां तार किंवा मार ॥ काय० ॥

—धुळें तुरुंग, मे १९३२.

---

## ४३ नमस्कार

असो तुला देवा माझा सदा नमस्कार
कसा होउं उतराई मी काय बोलुं फार ॥ असो० ॥
दिलें निळें आकाश तसे चंद्र सूर्य तारे
दिले जीवनाधार असे दिवारात्र वारे
सरःसरित्सागर दिधले कितिक तूं उदार ॥ असो० ॥
वसुंधरा सुंदर दिधली क्षमामूर्ति माय
हिरवि हिरवि सृष्टी दिधली दृष्टि तृप्त होय
फुलें फळें धान्यें देउन चालवीशि भार ॥ असो० ॥
माय बाप बंधू भगिनी आप्त सखे स्नेही
दिलें प्रेम त्यांचें म्हणुनी सकळ सह्य होई
कृतज्ञता मैत्री प्रीती तूं दिलीस थोर ॥ असो० ॥
तसा देह अव्यंग दिला हृदयही दिलेंस
बुद्धिची दिली देणगि रे केविं वर्णुं तीस
अशा साधनांनीं तरि तें दिसो तुझें दार ॥ असो० ॥

—धुळें तुरुंग, मे १९३२.

---

## ४४ गाडी धीरे धीरे हांक

गाडी धीरे धीरे हांक। बाबा धीरे धीरे हांक
धीरे धीरे हांक। गाडी धीरे धीरे हांक ॥

बैलांना तूं फार न मारी
प्रेमें त्यांना तूं चुचकारी
प्रेमाची जी बळकट दोरी
तीनें त्यांना राख ॥ गाडी० ॥

हातीं परि तद्गती असावी
म्हणुनी वेसण ती घालावी
त्यांना परि ती कळूं न द्यावी
टोंचावें हळु नाक ॥ गाडी० ॥

ठेवी अपुले प्रसन्न बैल
घाली पाठीवरतीं झूल
केवळ सोडी परी न सैल
वाटूं दे तव धाक ॥ गाडी० ॥

गाडी बाबा मजबुत ठेवी
उत्साहाचें ओंगण देई
मार्गी ती ना मोडुन जावी
धैर्ये पुढती ठाक ॥ गाडी०॥

सावध राहुन पंथा पाही
असतिल खळगे ठायींठायीं
गाडी जाइल खालीं पाहीं
करि ना डोळे झांक ॥ गाडी० ॥

अंधारीं ना मार्ग दिसेल
गाडी पुढती तुझी घुसेल
असेल दलदल तिथें फसेल
रुतेल बाबा चाक ॥ गाडी० ॥

चाक रुते तरि खांदा देई
निराश मुळि ना चित्तीं होई
हृदयीं भगवंताला ध्याई
करुणा त्याची भाक ॥ गाडी० ॥

चोरहि येतिल व्याघ्रहि येतिल
बैल बुजोनी तूंही भीशिल
भिऊं नको तो स्वामी येइल
मारी त्याला हांक ॥ गाडी० ॥

पांथ कंटाळा जरि कधिं येई
गोड प्रभुचीं गाणीं गाई
भूक लागली तरि तूं खाई
भक्तीचा मधु पाक ॥ गाडी० ॥

संतजनांच्या उपदेशाचा
भगवंताच्या मधु नामाचा
चारा बैलां देई साचा
दिसतिल तेजें झाक ॥ गाडी० ॥

मार्ग क्रमितां ऐसा बापा
पावशील ना पापातापा
प्रवास सुखकर होइल सोपा
चिंता सारी टाक ॥ गाडी० ॥

इष्टस्थाना मग तूं जाशिल
प्राप्तव्य तुझें तुला मिळेल
सौख्यानें मन वोसंडेल
दिव्यानंदा चाख ॥ गाडी० ॥

—त्रिचनापल्ली तुरुंग, सप्टेंबर १९३०.

## ४५ आशानिराशा

( बंगाली चाल )

पतीत खिन्न अति दुःखी उदासीन
तळमळे जीव जैसा जळावीण मीन ।।
कोठें जाऊं कोणा पाहूं निराधार बाळ
अश्रूनीं ओले झाले माझे दोन्ही गाल

मदीय हृदयांत निराशेचा सूर
अंधार सभोंवतीं भरलासे भेसूर
मनोरथमुकुलांचा माझ्या झाला नाश
तिळभर उरलि नाहीं मला मुळिं आस

आकांक्षा स्वप्नें जणुं माझीं स्वार्थमूल
म्हणून काय आज पडलीं खात धूळ
भिकारि जरि केली इतकी मी वणवण
रिकामि झोळी माझी जवळ नाहीं कण

लाजेनें मरतों मी दावुं कुणा मुख
या जन्मि नाहि जणुं मजलागिं सुख
कशाला मी राहुं जगिं फेकुं दे हे प्राण
मनीं म्हणें असें तोंचि ऐकुं येइ गान

अनंत सिंधुमध्यें मिळावा फलक
अपार अंधारांत दिसावी झळक
तान्हेल्याला लाभावी पाण्याची चुळुक
घामाघूम झालेल्याला वाऱ्याची झुळुक

तसा मला ऐकुं आला शब्द मोठा गोड
दाखवुं लागला मला माझ्या सौभाग्याचा मोड[१]
"विकारांची वासनांची तुझ्या झाली राख
आकांक्षा मनोरथ जे जे झाले खाक

टीप—१ अंकुर

त्यांतून तो बघ दिसतो येत आहे वर
आशेचा प्रकाशाचा अंकुर सुंदर
भविष्य बघ तुझा सुंदर उज्वल
निराश नको होऊं सोस थोडी कळ

प्रेमाचे पावित्र्याचे पल्लव फुटतील
सेवेचीं त्यागाचीं फुलें फुलतील
प्रशांत शांतिचीं फळें लागतील
तुझ्या मनोवृत्ति मुला मोदें डोलतील

पूस पूस अश्रु सारे हांस रे बाळा हांस
तुझ्या भविष्याचा बघ येतो गोड वास "
कुणि तरि हृदयांत बोले असा सूर
" हुरहुर नको करुं बाळा ! जाइल दैन्य दूर "

निराशेंतून असे येति आशेचे किरण
आशा जाउन पुन्हां घेरि निराशा भीषण
आशानिराशांच्या अशा लाटांवर मीन
खालीं वर होइ तुझा, देवा ! दास दीन ॥ पतीत०

—त्रिचनापल्ली तुरुंग, मार्च १९३१.

---

## ४६ ये रे मला तार

ध्येयहीन
कर्म–हीन
शक्तिहीन दीन
धृतिहीन
मतिहीन
पदोपदिं शीण ॥

मतिमंद
निरानंद
हृदयिं दुर्गंध
नाना बंध
नाना छंद
नाहीं सुखकंद ॥

नाहीं मान
नाहीं स्थान
मनावर ताण
मनीं घाण
जाई प्राण
होइ ओढाताण ॥

निराधार
हृतसार
झालों भूमिभार
डोळ्यां धार
अनिवार
ये रे मला तार ॥

—त्रिचनापल्ली तुरुंग, मार्च १९३१.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
नं. नं.
ता.
ठाणे.

## ४७ निराधार

फुलापरी
दंवापरी
हळु मदीय मन
विजेपरी
विषापरी
कठोर सारे जन ॥

तृषा मला
क्षुधा मला
मदीय कंठिं प्राण
कण न मिळे
जळ न मिळे
मजसि मारित बाण ॥

नयन झरे
हृदय भरे
कुणाचें पाहुं दार
दार लाविती
हांकलुन देती
कुणि न मज आधार ॥

अंधार पडे
गगन रडे
वणवण मी करित बाळ
तुझ्या दारीं
आलों तारी
करि तूं तरि सांभाळ ॥

अंगावरून
हात फिरवून

घे मला जवळ
डोळे पुशी
बोले मशीं
प्रेमें दे कवळ ॥

अंकि निजव
गीतें रिझव
ताप मम सरो
तूंहि निष्ठुर
होशि जरि दूर
तरि हा दारीं मरो ॥

—त्रिचनापल्ली तुरुंग, मार्च १९३१.

---

## ४८ दाखव मज अपुले चरण

हे शरणागतजन–करुण । दाखव मज अपुले चरण ॥

मी पतंग सूत्रावीण
मी पांखरुं पंखावीण
मी मीन जीवनावीण
मज फारच होई शीण ॥ दाखव० ॥

हे प्रबळ वासना–वारे
खेळणें करिति मज वा रे
उडविती भ्रमविती जोरें
सांभाळिल तुजविण कोण ॥ दाखव० ॥

मी पापपंकरत कीट
दुर्गंधि मनीं ये वीट
होईल हृदय कधिं नीट
मज बरवें वाटे मरण ॥ दाखव० ॥

वेढितो घोर अंधार
मजसि ना दिसतसे पार
कोण रे असे आधार
कासाविस होती प्राण ।। दाखव० ।।

मी तुझी बघतसें वाट
डोळ्यांत अश्रुचे लोट
हृदयांत शोक घनदाट
तूं माय बाप गुरु जाण ।। दाखव० ।।

ये करें मला कुरवाळी
मी मूल मला प्रतिपाळी
मी फूल होइ तूं माळी
ये येइ करी उद्धरण ।। दाखव० ।।

घे मांडीवर निज बाळ
प्रेमानें चुंबी गाल
ही इडापिडा तूं टाळ
तूं मंगल तूं अघहरण ।। दाखव० ।।

हें जीवन होवो सफळ
करि पूर्ण हेतु मम विमल
मम निश्चय राहो अचळ
आदर्श असो आचरण ।। दाखव० ।।

—त्रिचनापल्ली तुरुंग, ऑगस्ट १९३०.

## ४९ येवो वसंतवारा

नवजीवन–प्रदाता । चैतन्य ओतणारा
सुकल्यास हांसवीता । आला वसंत वारा

आला वसंत–वारा । वनदैन्य हारणारा
सुटला सुगंध गोड । भरला दिगंत सारा

रानींवनीं बहार । आला फुलांफळांस
समृद्धि पाहुनीयां । आनंद पांखरांस

वेली तरू रसानें । जातात भर्‌भरोनी
डुलतात नाचतात । नवतेज संचरोनी

फुटतो मुक्या पिकाला । तो कंठ गोड गोड
सजतें सुपल्लवांनीं । तें शुष्क वृक्ष–खोड

सोत्कंठ गायनानें । पिक नौदवीत रान
परिसून तें सहृदय । विसरून जाइ भान

सृष्टींत सर्व येतो । जणुं जोम तो नवीन
जें जें वठून गेलें । तें तें उठे नटून

सृष्टींत मोद नांदे । सृष्टींत हास्य नांदे
संगीत गोड गोड । सृष्टींत सर्व कोंदे

सृष्टींत ये वसंत । परि मन्मनीं शिशीर
मम जीवनीं वसंत । येण्यास कां उशीर

कां अंतरीं अजून । नैराश्य घोर राहे
कां लोचनांमधून । ही अश्रुधार वाहे

अंधार अंतरंगीं । भरला असे अलोट
कांहीं सुचे रुचे ना । डोळ्यांत अश्रु–लोट

उत्साह लेश नाहीं । उल्हास अल्प नाहीं
इवलीहि ना उमेद । झालों हताश पाहीं

सत्स्फूर्तिचा स्फुलिंग । ना एक जीवनांत
मेल्यापरी पडें मी । रडतों सदा मनांत

हतशुष्क जीवनाचा । निस्सार जीवनाचा
जरि वीट येइ, तरिही । न सुटेच मोह त्याचा

ओसाड जीवनाची । भूमी सदा बघून
वणवेच पेटतात । मीनं, जात मी जळून

ओसाड जीवनाचें । पाहून वाळवंट
करपून जीव जाई । येई भरून कंठ

पाहून जीवनाचा । सारा उजाड भाग
मज येइ भड्भडोनी । मज ये मदीय राग

कर्मे अनंत पडलीं । दिसतात लोचनांतें
परि एकही कराया । राया ! न शक्ति मातें

संसार मायभूचा । सारा धुळींत आज
कांहीं करावयाला । येई मला न काज

हृदयीं मदीय भरते । देवा अपार लाज
कांहींच हातुनीयां । होई न मातृ–काज

असुनी जिवंत मेला । जो कर्महीन दीन
मनबुद्धि देह त्याचीं । तीं व्यर्थ, फक्त शीण

या मातृ–सेवनांत । या मातृ–काम–काजीं
वाटे मनांत, काया । झिजुंदे सदैव माझी

परि जोर ना जराही । संकल्प–शक्ति नाहीं
मीनंचे मनीं तरंग । जाती जिरून पाही

मम जीवनांत देवा । येवो वसंत–वारा
गळुं देत जीर्ण पर्णे । फुटुं दे नवा धुमारा

शिरुं दे मनांत जोम । शिरुं दे मतींत तेज
करण्यास मातृ–सेवा । उठुं देच जींव वीज

खेळो वसंत–वात । मज्जीवनीं अखंड
करुंदेच मातृ–सेवा । अश्रांत ती उदंड
असुं दे सदा मदीय । मुखपुष्प टवटवीत
असुं दे सदा मदीय । हृत्कंज घवघवीत ।

तोंडावरील तेज । आतां कधीं न लोपो
आपत्ति आदळोत । अथवा कृतांत कोपो
दृष्टीमध्यें असूं दे । नव दिव्य ब्रह्मतेज
वाणींतही वसूं दे । माझ्या अमोघ ओज

पायांमध्यें असूं दे । बळ अद्रि वांकवाया
हातामध्यें असूं दे । बळ वज्र तें धराया

हंसु दे विशंक जीव । पाहून संकटांना
निश्चित जाउं दे रे । तुडवीत कंटकांना
निर्जीव मी मढें रे । पडलों असे हताश
चढुं दे कळा मुखाला । करुं दे कृती करांस
हातून अल्प तरि ती । सेवा शुभा घडूं दे
न मढ्यापरी पडूं दे । चंडोलसा उडूं दे

चैतन्य–सिंधु तूं रे । दे दिव्य जीवनास
जरि मृत्यु तो समोर । विलसो मुखीं सुहास्य
संजीवनांबुधी तूं । संजीवनास देई
दे स्फूर्ति जळजळीत । नैराश्य दूर नेई
तूं एक शक्ति माझी । तूं एक तारणारा
जे दीन हीन त्यांची । तूं हांक ऐकणारा

हत–जीव–जीवनांच्या । रोपांस कोण पाळी
तूं एक वाढवीता । तूंचि प्रबुद्ध माळी
हृदयीं बसून माझ्या । फुलवी मदीय बाग
मातापिता सखा तूं । गुरु तूंच सानुराग

फुलतील वाळवंटें । हंसतील शुष्क रानें
नटतील भू उजाड । गातील पक्षि गाणें,
जरि त्वत्कृपा–वसंत । येईल जीवनांत
चंडोलसा उडेन । संस्फूर्त गात गात.
त्वत्स्पर्श अमृताचा । मजला मृता मिळूं दे
मम रोमरोमिं रामा । चैतन्य संचरूं दे
आतां सदा दयेचा । सुटुं दे वसंत–वारा
फुलुं देच जीवनाचा । जगदीश भाग सारा

—धुळें तुरुंग, मे १९३४.

---

## ५० माझें ध्येय

करीन सेवा तव मोलवान । असो अहंकार असा मला न
मदीय आहे बळ अल्प देवा । बळानुरूपा मम घेइ सेवा ।।
कधीं कुणाचे मजला पुसूं दे । जलार्द्र डोळे मग तो हंसूं दे
अनाथदीनाजवळी वदेन । सुखामृताचे प्रभु शब्द दोन ।।
कधीं करावा पथ साफ छान । कधीं हरावी मळ–मूत्र–घाण
बघून रोगार्त करीन घाई । बनेन त्याची निरपेक्ष आई ।।
जया न कोणि प्रभु मी तयाचा । तदर्थ हे हात तदर्थ वाचा
तदर्थ हे प्रेमळ नेत्र–दीप । सदैव जागा मम तत्समीप ।।
कधीं कधीं मंगल मी लिहीन । कथा नवी वा कविता नवीन
लिहीन मी नाटक वा निबंध । करीन भाषान्तर वा सबंध।।
जगांत जे जे सुविचारवारे । मदीय भाषेंत भरोत सारे
असें सदा वाटतसे मनांत । तदर्थ माझे शिणतील हात ।।
करीन ज्या ज्या लघुशा कृतीस । तिच्यांत ओतीन मदंतरास
समस्तकर्मीं हृदयारविंद । फुलेल, पूजीन तयें मुकुंद ।।

असे प्रभूची कृतिरूप पूजा । असें सदा भाविल जीव माझा
मदंतरींची मिसळून भक्ती । मदीय कर्मीं, मिळवीन मुक्ति ।।

कुठेंहि सांदींत जरी पडेन । तिथें फुलाचेपरि मी हंसेन
मला समाधान असो तयांत । असो तुझें चिंतन तें मनांत ।।

असो तुझें नाम मदीय वक्त्रीं । असो तुझें रूप मदीय नेत्रीं
असो तुझें प्रेम मदंतरांत । भरून राही मम जीवनांत ।।

—नाशिक तुरुंग, जानेवारी १९३३.

---

## ५१ तुझ्या हातांतला

खरोखरी मी न असें कुणी रे । चराचराचा प्रभु तूं धनी रे
हले तुझ्यावीण न एक पान । उठे तुझ्यावीण न एक तान ।।

त्वदंगणांतील लतेवरील । लहान मी क्षुद्र दरिद्र फूल
तुझ्या कृपेनें रस गंध दावो । तुझ्याच सेवेंत सुकोन जावो ।।

मदीय हा जीवनकुंभ देवा । रसें, उदारा! मधुरें भरावा
करून त्वत्कर्म रिता बनावा । तुझ्याच पायीं फुटुनी पडावा ।।

फुटे जरी नीट तुम्ही करावा । रिता तरी तो फिरुनी भरावा
रसा समर्पून पुन्हां फुटेल । फुटून जातां चरणीं पडेल ।।

फुटे करा नीट रिता भरावा । असाच हा खेळ सुरू रहावा
तुझ्या न सेवेंत कधीं दमूं दे । अनंत खेळांत सदा रमूं दे ।।

जणूं तुझ्या मी मुरली मुखांत । तुझेंच गीत प्रकटो जगांत
बनेन वेणू तव मी मुखींची । असे असोशी प्रभु एक हीची ।।

तुझ्या करांतील बनून पांवा । कृतार्थ हा जन्म मदीय व्हावा
करावया मूर्त शुभ स्व-हेतू । करी मला साधन आपुलें तूं ।।

—नाशिक तुरुंग, जानेवारी १९३३.

---

## ५२ रडण्याचें ध्येय

केव्हां मी कृतिवीर होइन, न तें कांहींच मातें कळे
डोळ्यांतून मदीय नित्य विपुला ही अश्रुधारा गळे
स्वप्नें खेळवितों किती निजमन:सृष्टींत रात्रंदिन
ना येती परि मूर्तिमंत करण्या नाहीं मला तो गुण ॥

या माझ्या हृदया बघा उघडुनी मी ध्येयवादी असें
ध्येयालाच अहर्निश स्मरतसें चित्तीं दुजें ना वसे
ध्येयें मात्र मदंतरीं विलसती, ध्येयेंच तीं राहती
माझे लोचन अश्रुपूर्ण म्हणुनी खालीं सदा पाहती ॥

इच्छाशक्ति जया नसे प्रबळ ती जी पर्वतां वांकवी
यच्चित्ता लघुही विरोध रडवी नैराश्य ज्या कांपवी
त्याला ध्येय असून काय? रडतों निर्विण्ण रात्रंदिन
वाटे ध्येयविहीन कीट असणें, तेंही बरें याहुन ॥

ध्येयें जीं धरिलीं उरीं न मम का तीं ? चित्त त्यां कां भुले ?
देवा! ध्येय मदीय नित्य रडणें हें का असे निर्मिलें ? ॥

—अमळनेर १९२७.

---

## ५३ द्विविध अनुभव

भरला हा अंधार । सारा भरला हा अंधार ॥
क्रूर पशू हे हिंसक भेसुर
गदारोळ करितात भयंकर
थरथरतें भीतिनें मदंतर
निरखुनि हें कांतार ॥ सारा० ॥
वाघ गुरगुरे अंगावरतीं
भुजंग फूत्कारातें करिती

विंचू करिती नांगी वरतीं
नाहिं कुणी आधार ॥ सारा० ॥

डोळे जैसे खदिरांगार
जिव्हा पसरुन भेसुर फार
धांवुन येई हा अंगावर
पिशाच्चगण अनिवार ॥ सारा० ॥

कांटे रुतती टुपती दगड
भुजंग विंचू दिसती रगड
मरून जाइन राहिन ना धड
डोळ्यां लागे धार ॥ सारा० ॥

भयभीतीनें मी गांगरत
शतदां मार्गी मी अडखळत
जखमा होती वाहे रक्त
केला हाहाःकार ॥ सारा० ॥

पाहुनि दुःखाचा बाजार
माझें झालें मन बेजार
अंगीं उरला अल्प न जोर
पडलीं गात्रें गार ॥ सारा० ॥

तीक्ष्ण नखांनीं फाडफाडुन
दांतांनीं चावुन कडकडुन
टाकितील मजला खाऊन
करितिल वाटे ठार ॥ सारा० ॥

झंजावातें जैसें पान
कांपे, तेवीं मी बलहीन
प्रभुजी, कोणा जाऊं शरण
वदवे ना मज फार ॥ सारा० ॥

हे विश्वंभर करुणासागर
हे परमेश्वर परमोदार
शोधित आहें तुझेंच दार
तार मला रे तार ॥ सारा० ॥

*          *          *          *

सरला घन अंधार । आला प्रकाश अपरंपार ॥

प्रभुची मुरली हळुच वाजली
क्षणांत सारी सृष्टि बदलली
सुमनें पायांखालीं फुललीं
हरला माझा भार ॥ आला० ॥

गदारोळ तो सकळ निमाला
प्रकाश आला सत्पथ दिसला
करुणासागर तो गहिंवरला
जाइन आतां पार ॥ आला० ॥

अभ्रें येती विलया जाती
फिरुन तारकातती चमकती
तैशी झाली मदंतरस्थिति
उदया ये सुविचार ॥ आला० ॥

विवेकदंडा करीं घेउन
वैराग्याची वहाण घालुन
धैर्यें पुढती पाउल टाकिन
खाइन मी ना हार ॥ आला० ॥

डसावया ना धजती सर्प
व्याघ्रवृकांचा हरला दर्प
भीति न उरली मजला अल्प
विलया जात विकार ॥ आला० ॥

हलकें झालें माझें हृदय
मोह पावले समूळ विलय
सद्भावाचा झाला उदय
केला जयजयकार ॥ आला० ॥

मदंतरंगीं मंजळवाणी
वाणी तुमची शुभ कल्याणी
प्रभु ! येऊं दे ऐकूं निशिदिनीं
विनवित वारंवार ॥ आला० ॥

—त्रिचनापल्ली तुरुंग, जानेवारी १९३१.

---

## ५४ हे सुंदरा अनंता !

हे सुंदरा अनंता! । लावण्य–केलि–सदना !
कधि भेटशील मजला । कंदर्प–कोटि–वदना!

सकलांहि या जिवांच्या । प्रेमार्थ तूं भुकेला
चित्तें हरावयाला । रचितोसि रंगलीला

संध्या समीप येतां । भरिशी नभांत रंग
तव हृत्स्थ प्रेमसिंधु । त्याचेच ते तरंग

सांजावतां नभांत । उधळीत रंग येशी
रमवीशि या जिवांना । कर लेशही न घेशी

रमवावयास जीवां । सुखवावयास, राया!
निज दिव्य चित्रशाळा । करिशी खुली बघाया

हंसवावयास जीवां । शिकवावयास राया!
निज भव्य चित्रशाळा । करिशी खुली बघाया

पिवळे निळे गुलाबी । नारिंगि गौर लाल
संमिश्रणें सुरम्य । करितात जीव लोल

काळे कभिन्न मेघ । करितोस ते सु-वर्ण
त्वत्स्पर्श दिव्य होतां । राहील काय दैन्य

घालूनियां किरीट । कान्हाच का उभा तो
ऐसा कधीं कधीं तो । आभास गोड होतो

रक्तोत्पलें सुरम्य । फुललीं अनंत गमती
ते हंस कांचनाचे । गमतात तेथ रमती

करिती प्रसन्न चित्त । करिती गभीर धीर
चित्रें विचित्र बघुनी । हृदयांत भाव-पूर

शोभा नभांत भव्य । शोभा नभांत नव्य
बघुनी अपार भरती । हृदयांत भाव दिव्य

करितोस रंगबदल । राया क्षणाक्षणाला
इकडेहि रंग विविध । चढतात मन्मनाला

करितोसि रंग-फेर । देशी नवा मुलामा
तूं दावितोस गोड । जादू मुलांस आम्हां

मोडूनियां क्षणांत । रचिशी नवाकृतीस
बघुनी तुझी चलाखी । किति मोद मन्मतीस

गंभीर होइ चित्त । दुसऱ्या क्षणींच हंसतें
हंसलें न जों पुरेसें । तिसऱ्या क्षणींच रडतें

येती मनीं विचार । ते मृत्यु-जीवनाचे
जणुं जीव त्या घडीला । डोल्यावरीच नाचे

होतांच वासरांत । होतांच भास्करांत
जणुं पूर वैभवाला । चढतो वरी नभांत

येतां समीप अंत । जीवासही अनंत
ऐसें मिळेल भाग्य । करुं मी किमर्थ खंत ?

जणुं मृत्यु रम्य दार । त्या जीवना अनंत
सौभाग्य-हेतु अस्त । करुं मी किमर्थ खंत ?

ने मृत्यु त्या अमर्त्यीं । ने अंत त्या अनंतीं
दैवी दिसेल भाग्य । करुं मी किमर्थ खंती ?
श्रीमंत त्या प्रभूचा । मी पुत्र भाग्यवंत
होऊं सचिंत कां मी । करुं मी किमर्थ खंत ?
ऐसा विचार माझ्या । हृदयांत गोड येई
माझी महा–निराशा । प्रभुजी पळून जाई
जे रंजले प्रपंचीं । जे गांजले जगांत
रिझवावयास त्यांना । नटतोसि तूं नभांत
दारिद्रय दुःख दैन्य । निंदापमान सर्व
सायंनभा बघोनी । विसरून जाइ जीव
रंगच्छटा अनंत । आकार ते अनंत
करुं वर्णना कसा मी । बसतों मुका निवांत
बघतों अनंत शोभा । हृदयीं उचंबळोनी
मिटितों मधेंच डोळे । येतात ते भरोनी
गालांवरून अश्रू । येतात घळघळोनी
सायंतनीन अर्घ्य । देतों तुला भरोनी
नटतोसि रंगरंगीं । तूं दिव्य–रूप–सिंधु
तूं तात मात गुरु तूं । प्रिय तूं सखा सुबंधु
राहून गुप्त मागें । करितोसि जादुगारी
रचितोसि रंगसृष्टि । प्रभु तूं महान् चितारी
किति पाहुं पाहुं पाहूं । तृप्ती न रे बघून
शतभावनांनि हृदय । येई उचंबळून
भवदीय दिव्य मूर्ति । केव्हां दिसेल नयनां
भिजवीन आंसवांनीं । केव्हां त्वदीय चरणां
हे सुंदरा अनंता । लावण्य–केलि–सदना
कधि भेटशील मातें । कंदर्प–कोटि–वदना !

—नाशिक तुरुंग, ऑगस्ट १९३२.

## ५५ रडायाचा लागलासे देवा एक छंद

( बंगाली चाल )

अनंत दिधली ही वसुंधरा घर
विशाल अंबराचें वितान सुंदर
चंद्रसूर्य तारे दिले दिवारात्र दीप
वारा दिला प्राणसखा सदैव समीप
निर्झरांचें सागराचें दिलेंस संगीत
कितितरी देवा तुझी अम्हांवर प्रीत
हिरव्या हिरव्या तृणाचे दिले गालिचे
सौंदर्यानें भरलेले जणुं मखमालीचे
हिरव्या गर्द तरुवेली यांचीं मंदिरें
दिलीं मनोहर ज्यांत कुणीहि शिरे
पाण्यानें भरलेले दिलेस सागर
सरित्सरोवर, वापी, झरे मनोहर
फुलें, फुलपांखरें दिलीं खेळायास
जिकडे तिकडे लाविलींस चित्रें बघायास
भव्य असे उभे केलेस डोंगर, पहाड
किति तरी पुरविशी बापा आमचे लाड
माता, पिता, बहिण, भाऊ, सखे, यांचें प्रेम
दिलेंस, देवा ! चालविशी नित्य योगक्षेम
देह बुद्धि इंद्रियें हें हृदय देऊन
जगांत खेळायाला दिलेंस धाडून
आनंदानें ओतप्रोत भरून दिलेंस जग
परि माझ्या हृदयाची सदैव तगमग
तुझ्या सृष्टीमध्यें कोंदे आनंद भरपूर
परि माझ्या अंतरंगीं भरे शोकपूर

सृष्टीमध्यें तुझ्या देवा भरलें रे संगीत
परि मा या अंतरंगीं सदा शोकगीत
देवा ! दिलें खरें तूं परि कर्म–हीन
मतिमंद भाग्यहीन तव दास दीन
देशी परि घेतां ये ना करुं काय सांग
शोकांबुधिमधि गेलों बुडुन रे अथांग
हंसुन खेळुन जीवन न्यावें जगिं या मुद्दें
कला मला साधेना ती, जीव हा स्फुंदे
घेतां ये ना आनंदाचा आस्वाद मी मंद
रडायाचा लागलासे मला एक छंद ॥

—त्रिचनापल्ली तुरुंग, मार्च १९३१.

---

## ५६ रामवेडा

मला हंसता का ? हंसा हंसा सारे । चित्त माझें परि रडे शोकभारें
मनामधिल खुडूं केविं मोह–मोडा । मला सांगा, मी असें रामवेडा ॥
मला झडकर कुणि राम दाखवा रे । तयावीण मला शून्य गमे सारें
कोण उकलिल त्यावीण मोह–वेढा । मला सांगा, मी असें रामवेडा ॥
मला पत्ता सांगाल काय कोणी । राम राहे तो कोणत्या ठिकाणीं
रामसीतेचा कुठें असे जोडा । मला सांगा, मी असें रामवेडा ॥
द्याल कोणी का मला वदा राम । द्याल कोणी तो का मुनिजन–विश्राम
कुणी माझ्या पुरवील काय कोडा । मला सांगा, मी असें रामवेडा ॥
उठा सत्वर मज राममूर्ति दावा । जया ध्यावें जो अहोरात्र गावा
मला धरवेना धीर अतां थोडा । मला सांगा, मी असें रामवेडा ॥

राम कोठें ? तव अंतरंगि आहे । राम कोठें ? सर्वत्र शोभताहे
नयन वेड्या! उघडून बघे नीट । धीट होउन घे, ऊठ, रामभेट ॥

—त्रिचनापल्ली तुरुंग, सप्टेंबर १९३०.

---

## ५७ आई, दार उघड

किती धडपडलों किती भागलों मी । किती श्रमलों यावया तुझ्या धार्मी
किती रडलों मी सतत धायिधायी । दार उघड अतां, आइ! जीव जाई ॥

तुझ्या पायांशीं देइ आसऱ्याला । नको दूर करूं आइ बांसराला
तुझ्या पायांविण कांहिं नको पाही । दार उघड अतां, आइ! जीव जाई ॥

मला भिवविति हे वृक व्याघ्र घोर । मला घाबरविति उग्र दुष्ट चोर
खाउंखाऊं करितात धीर नाहीं । दार उघड अतां, आइ! जीव जाई ॥

थंडिवाऱ्याचा बाळ उभा दारीं । सकळ थरथरतें अंग बघे भारी
घेइ पोटाशीं ऊब मला देई । दार उघड अतां, आइ! जीव जाई ॥

ठेव मजला तूं निजवुनी कुशींत । मला अंगाई गाइ गोड गीत
कितिक जन्मावधि झोंप मला नाहीं । दार उघड अतां, आइ! जीव जाई ॥

अमित जन्मांची लागली तहान । कसे तडफडती प्राण हीन दीन
तव प्रेम–पयोधार गोड देई । दार उघड अतां, आइ ! जीव जाई ॥

तुला करुणेचा ब्धोलतात सिंधु । मला कां देशी एकही न बिंदु
मीच नावडतें पोर सांग कायी । दार उघड अतां, आइ! जीव जाई ॥

अनेकांना तूं सतत पावलीस । परी मजवरतीं कां ग कावलीस
तुझ्यावीणें आधार अन्य नाहीं । दार उघड अतां, आइ ! जीव जाई ॥

अनेकांना तूं देशि साउलीस । कां ग माउलि! मजवरी रूसलीस
तुझ्यावीण मला ओस दिशा दाही । दार उघड अतां, आइ ! जीव जाई ॥

बाळ दारीं रडतसे दीनवाणा । तुला ये ना कां आज प्रेमपान्हा
कसें आईचें हृदय कठिण होई । दार उघड अतां, आइ! जीव जाई ॥

चकोरातें तो, आइ! जसा इंदु । चातकाला तो जेंवि नीर–बिंदु
तुझें दर्शन मज तसें प्राण–दायी । दार उघड अतां, आइ! जीव जाई ॥
बोल माझ्याशीं, आइ! एक बोल । तुझा बोल सुधा–सागरकल्लोल
तुझा शब्द मला नवप्राणदायी । दार उघड अतां, आइ! जीव जाई ॥
आइ! गेले हे खोल किती डोळे । तुझ्यासाटीं मत्प्राण हे भुकेले
अहर्निश त्वद्विरहाग्नि फार दाही । दार उघड अतां, आइ! जीव जाई ॥
पिकें पाण्याविण जाति गे सुकून । मुलें मातेविण जाति गे झुरून
तुझ्याविण माझा जीव सुकुन जाई । दार उघड अतां आइ! जीव जाई ॥
कामधेनु होईल का कठोर । ताप देइल का कधीं चंद्रकोर
कशी गंगा होईल तापदायी । दार उघड अतां, आइ! जीव जाई ॥
मातमहिमा ना आज मालवावा । मातृगरिमा ना आइ! घालवावा
ब्रीद सांभाळी तें न लया नेई । दार उघड अतां, आइ! जीव जाई ॥
आइ! माझी ही शेवटील हांक । आइ! बाहेरी येउनियां टाक
अजुन बाहेरी तूं जरी न येशी । तुझ्या पोराचें प्रेत तं पहाशी ॥

—नाशिक तुरुंग, मे १९३३.

---

## ५८ देवाजवळ

तुझ्याविणें कोणि न माते वत्सले मला गे
तुझा ध्यास आतां आई सर्वदैव लागे
अनाथास नाथ न कोणी ना कुणीहि पाता
तूंच तात माझा, प्रेमस्निग्ध तूंचि माता ॥
पाप अंतरंगीं आहे संचलें अनंत
सुचे रुचे कांहि न वाटे दिवारात्र खंत
पापपंकमग्न मला तूं काय ठेविशील
नसे असें आई! तव गे क्रूर दुष्ट शील ॥

परम सदय कोमल माते ! तें त्वदंतरंग
त्वत्कृपांबुधीचे येवो मजवरी तरंग
मलिन मानसीं मम जें जें सकल तें धुवावें
विमल पुण्यपावन आई ! लेंकरूं करावें ॥

नको गर्व हेवा दावा लोभ तो नसावा
विषयवासनाकंद मुळासकट तो खणावा
नको मान उच्च स्थान प्रभु ! नकोच कीर्ती
मनीं वसो एक सदा ती तुझी मधुर मूर्ति ॥

करूं काय ? संतापविती वासनाविकार
हीन दीन दुबळा मी तों क्षीण होइ फार
विषयडोहिं डुंबे सोदें मन्मनोमतंग
कधीं आइ! या वृत्तींचा करिशि सांग भंग ॥

मदिंद्रियां सकळां करितों मी तुझ्या अधीन
तूंच त्यांस आंवर मी तों त्वत्पदीं सुलीन
तुझ्यावरी घालुन आतां सर्व दुःखभार
विसंबून राहिन देवा! तार किंवा मार ॥

मला देवदेवा! वाटे सांगण्यास लाज
मान घालुनीयां खालीं असें उभा आज
जगीं घालवोनी देवा! वत्सरांस तीस
काय मेळवीलें ? कांहीं नाहिं ! धिक् कृतीस ॥

कोप अल्प झाला न कमी, कामवासना ती
अहोरात्र गांजित, चित्तीं अल्प नाहीं शांति
लोभ लुप्त झाला नाहीं, व्यर्थ सर्व कांहीं
फुकट फुकट सारा गेला जन्म हाय पाहीं ॥

क्षुद्र–वस्तु–लोभीं गेलों गुंतुनी कितीदां
क्षुद्र वस्तु हृदयीं धरुनी मानिलें प्रमोदा
कला नाहिं, विद्या नाहीं, शील तेंहि नाहीं
हाय हाय देवा! स्थिति ही मन्मनास दाही ॥

अतां तरी देवा! ठेवा हृत्स्थ मोह दूर
अतां तरी होवो मन हें विमल धीर वीर
सद्‌गुणांचि सत्कृत्याचीं मौक्तिकें अमोल
जीवनांबुधींत बनूं दे रुचिर गोल गोल ॥

नसो व्यर्थ, सार्थक होवो, प्रभो! जीवनाचें
फुलो फूल जीवनमय हें अतां एकदांचें
दिसो रंग रमणीय असे वास दरवळूं दे
तुझी कृपा झाली आहे हें मला कळूं दे ॥

सदाचरण होवो धुतल्या तांदळासमान
पुढें पुढें पाउल पडुं दे जाउं दे चढून
तुझी कृपा होई तरि हें सर्व शक्य वाटे
नको अंत पाहूं आतां, लाव बाळ वाटे ॥

स्नेहमयी माउलि तूं गे साउली जिवाची
तूंच एक आधार मला आस तूं नताची
नको उपेक्षूं तूं, माते! अश्रु हे पुसावे
मला नीट मार्गावरतीं आणण्यास धांवे ॥

तिमिर घोर नैराश्याचा मानसास घेरी
मला येइ मदधःपाता बघुन घोर घेरी
कृपाकौमुदीचे आतां किरण येउं देत
उदासीनता चित्ताची सकळ संहरोत ॥

किती मनोरथ मी देवा मनीं मांडियेले
भव्य किति ध्येयांना मी मनीं खेळवीलें
दिसे मला जें जें मोठें तेंच तेंच व्हावें
असें मनीं वाटे, हातीं कांहिही न व्हावें ॥

जसें मल यात्रेमध्यें खेळणीं विलोकी
फुगा घेउं किंवा चिमणी खळखुळाच तो कीं
असें त्यास होई, कोपे तो पिता तयाचा
कांहिही न घेउन देई, बाळ रडत त्याचा ॥

तसें जगीं, बाप्पा देवा ! जाहलें मदीय
करूं हें करूं कीं तें हा निश्चयो न होय
मदुत्साह सतरा कामीं विभागून जाई
म्हणुन, देवराया ! हातीं कांहिही न येई ॥

ग्रंथकार प्रतिभावान् वा सत्कवि प्रभावी
राष्ट्रवृत्त–संशोधक–सत्कृति करीं करावी
दयावंत व्हावें संत प्रभुपदाब्जरक्त
करुन लोकसेवा किंवा आटवूं स्वरक्त ॥

अशीं किती ध्येयें रात्रंदिन मला दिसावीं
कांहिही न करितां वर्षें व्यर्थ सर्व जावीं
उभा रिक्त हस्तें त्वत्सिंहासनासमोर
प्रलज्जित, प्रभुजी ! ठरलों मी दिवाळखोर ॥

दिली बुद्धि, शक्तिहि, दिधलीं इंद्रियें समर्थ
दिला देह अव्यंग असा व्हावया कृतार्थ
अल्प सार्थकहि ना केलें, मनोबुद्धिदेह
भ्रष्ट विकल सारीं केलीं, नाशिलें स्वगेह ॥

वास घेतला रे माझा नित्य वासनांनीं
कशी तुझी पूजा करुं मी वासल्या फुलांनीं
अतां तुझ्या ओतिन पायीं कढत अश्रु माझे
प्रभो! असें वदतांना हें किति मदंत भाजे ॥

दिलें भांडवल तूं देवा ! सत्कृपासमुद्रा !
कांहि मी न केलें झाली म्लान दीन मुद्रा
पोटिं होइ अनुताप परी टिकत अल्प काळ
मोह–मधर–रूपें फसतो फिरुन फिरुन बाळ ।

पुन्हां पुन्हां पापें रचितों येति अश्रु डोळां
नाहिं त्यांस किंमत, तं न प्रभुजि! मूढ भोळा
खरे अश्रु अनुतापाचे येति एकदांच
म्हणुन अश्रु माझे हे तों नसति खास साच ॥

प्रभो! तुला सारें कळतें तुजसि सांगुं काय
तार तार तार मदीया तूंच थोर माय
नाहिं काय माया ? ये ना कळवळा तुला गे
तुझा बाळ भागे, घेई लोभुनि वा रागें ।।

कधीं कधीं, आई ! वाटे जाउं कीं मरून
नाहिं कांहि उपयोग जगीं हें जिणें जगून
भूमिभार केवळ झालों कर्महीन कीट
न लागेल आतां माझ्या मना वळण नीट ।।

पदोपदीं घसरत जातों मोहमार्गगामी
कामना अनंता धरितों मी मनांत कामी
या न जन्मि मज लाभेल प्रभा पुण्यतेची
अहा अहोरात्र मनाला गोष्ट हीच जाची ।।

अहोरात्र झगडत आहें अंतरांत, आई !
समर हें न संपेल असें वाटतें कदाही
रिपूंजवळ झुंजत आहें एकला सदैव
अतां धीर नाहीं आई ! मद्विरुद्ध सर्व ।।

नको नको जीवन, देवा! नको अतां आय
ज्योत जीवनाची विझवी सरो प्राणवायु
जगा प्रभो! उपयोग असे तरि नरें जगावें
भूमिभार जो कुणि त्यानें शीघ्रची मरावें ।।

भलें जगाचें मी देवा अल्पही न केलें
पुण्यवंतजननयनीं मी अश्रु आणियेले
परस्वांत निष्ठुरतेनें नित्य पोळियेलें
अन्यजीवनांस कितीदां दुःखदग्ध केलें ।।

मनीं नित्य पापविचारा हंसत खेळवीलें
कुकर्मांत जीवन सारें अहोरात्र नेलें
विंचु अंतरंगीं डसती शेंकडों सदैव
म्हणुन मरण आतां हेतू मनीं एकमेव ।।

पापविस्मृती ना देवा जीवनीं पडेल
स्मृतिपिशाच्चगण मानेला सर्वदा धरील
मरुन जाउं दे रे आतां दे भला मृतीस
मरण देइ, करितों चरणा साश्रु मी नतीस ।=

होय, येति विमलहि माझ्या अंतरीं विचार
अल्प काळ टिकुन परी ते फिरुन जात दूर
जशी वीज लवुनी जाई ध्वांत फिरुन राही
तशी होइ मच्चित्ताची गति सदैव पाही ।।

सद्विचार धरण्या जावें तोंच जाति दूर
हर्षफुल्ल मद्वदनींचा जाइ गळुन नूर
खिन्नता अपारा पसरे अति निराश वाटे
येति अश्रु नयनीं किति हें अंतरंग फाटे ।।

त्वत्कृपा न, म्हणुनि न राहे सद्विचार चित्तीं
दुःखदैन्यनैराश्यांची घेरिते विपत्ती
पदोपदीं होणारे हे बघुन मदन्याय
सांग तूंच जीवन मग हें मज रुचेल काय ।।

अतां तरी, देवा ! ऐक प्रार्थना विनम्र
हृदय समुन्नत हें होवो विमल शांत शभ्र
तुझी मूर्ति मधुरा राहो मनिं, घडो विकास
पुरव पुरव देवा! माझी एक हीच आस ।।

नयन येति भरुनी वदतों तुजसि कळवळोनी
आंत जात आहें, आई! बघ किती जळोनी
नको अंत आतां पाहूं धांव धांव धांव
सत्पथीं मला संतत तूं हात धरुन लाव ।।

अजन पाप करण्यांतचि ना वाटतें कृतार्थ
पाप जाहल्यावरि तरि ते नयन आर्द्र होत
अजुन नाश नाहीं झाला सर्व तोंच येई
असे अजुन आशा म्हणुनी शीघ्र येइ आई! ।।

तुझ्या करीं देतों माझी मंद रुग्ण नाडी
असे अजुन धुगधुगि तोंची औषधास काढी
रसायना दिव्या देई बाळ हांसवावा
निज प्रभो! करुणामहिमा आज दाखवावा ॥

--त्रिचनापल्ली तुरुंग, सप्टेंबर १९३०.

## ५९ जीवननाथ

तृणास देखून हंसे कुरंग । मरंदपानें करि गान भृंग
जलांतरंगीं करि मीन नाच । तवानुरागीं प्रभु मी तसाच ॥

दयासुधासिंधु तुम्ही अपार । सुखामृताचे तुम्हि डोह थोर
लहानसा तेथ बनून मीन । विजेपरी चम्चम् मी करीन ॥

मदीय तूं जीवननाथ देवा । मला स्वपायांजवळीच ठेवा
तव स्मृति श्वाससमान जीवा । मदीय संजीवन तूंच देवा ॥

मदीय तूं नाथ मदीय कांत । मदीय तूं प्राण मदीय स्वांत
मदीय तूं सृष्टि मदीय दृष्टि । मदीय तूं तुष्टि मदीय पुष्टि ।
जिथें तिथें मी तुजला बघेन । कुदेन नाचेन मुदें उडेन
तुलाच गातील मदीय ओठ । तुझेच ते, ना इतरा वरोत ॥

कधीं कधीं तूं लपशी गुलामा । परी तुला मी हुडकीन रामा
तुला लपंडाव रुचे सदैव । गड्या परी तूं मम जीवं जीव ॥

कधीं न जाई बघ दूर आतां । तुझ्या वियोगें मज मत्यु नाथा
प्रिया ! तुझे पाय मदीय डोई । बसूं असे संतत एक ठायीं ॥

--नाशिक तुरुंग, डिसेंबर १९३२.

## ६० सुखामृताची मग नित्य धार

कळ्या जळावीण कशा फुलाव्या । दिशा उषेवीण कशा खुलाव्या
उचंबळे इंदुविना न सिंधु । तसाच मी त्वद्विण दीनबंधु ॥
कशास चिंता परि ही उगीच । जिथें तिथें माय असे उभीच
जिवा कशाला करितोस खंत । जिथें तिथें हा भरला अनंत ॥
अनंत नेत्रीं तुज माय पाहे । अनंत हातीं तुज वेढिताहे
जरा तुझे तूं उघडी स्वनेत्र । दिसेल सर्वत्र पिता पवित्र ॥
जरा जरी तें उघडाल दार । प्रकाश तेथें भरतो अपार
हवा शिरे निर्मळ आंत खूप । तसेंच आहे प्रभुचें स्वरूप ॥
करी न तूं बंद निजांतरंग । शिरेल तो अंतरिं विश्वरंग
सताड ठेवी उघडून दार । सुखामृताची मग नित्य धार ॥

—नाशिक तुरुंग, जानेवारी १९३३.

---

## ६१ तुला देतों मी जमिन ही लिहून

जीवनाच्या ओसाड वाळवंटीं । कधीं करिशिल कारुण्यमेघवृष्टि
कधीं झिमझिम पाऊस पाडिशील । वाळवंटांचे मळे शोभतील ॥
जीवनाची मम पडित ही जमीन । लागवडिला आणील सांग कोण
मला शक्ति नसे कुशलताहि नाहीं । जगीं कोणाचें साह्य तेंहि नाहीं ॥
मशागत कर तूं पडित वावराची । मला कांहि नको सर्व घेइ तूंची
तुला जें जें प्रभु मनीं आवडेल । पडित भूमित या सकळ तें पिकेल ॥
मला मोबदला नको एक दाणा । लागवडिला ही पडित भूमि आणा
तुला देतों ही जमिन मी लिहून । मला कांहि नको दावि पीकवून ॥
मळे होतिल ओसाड वावराचे । पाहुनीयां सुखतील नेत्र साचे
जमिन माझी ही फुकट न रे जावी   तुला करुणा एवढी आज यावी ।

—नाशिक तुरुंग, मे १९३३ .

---

## ६२ आशा

संपोनीयां निशा । उजळते प्रभा
दिनमणी उभा । राहे नभीं

लाखों मुग्धा कळ्या । त्या तदा हांसती
झुलती डुलती । आनंदानें

ऊर्ध्वमुख होती । देव त्या पाहती
गंध– धूपारती । ओंवाळिती

तैसें माझें मन । येतांच प्रकाश
पावेल विकास । अभिनव

तोंवरी तोंवरी । अंधारीं राहिन
दिन हे नेईन । आयुष्याचे

फुलेल जीवन–। कळी केव्हां तरी
आशा ही अंतरीं । बाळगीतों

—अमळनेर १९२८.

---

## ६३ सोन्याचा दिवस

जन्ममरणांचीं । पाउलें टाकीत
येतों मी धांवत । भेटावया

पापांचे पर्वत । टाकूनियां दूर
येतों तुझें दार । गांठावया

दिवसेंदिवस । होउनी निर्मळ
चरणकमळ । पाहिन तूझें

पाहून पायांस । निवतील डोळे
सुखाचे सोहळे । लाभतील

कधीं तो सोन्याचा । येईल दिवस
पुरेल ही आस । अंतरींची

—नाशिक तुरुंग, ऑगस्ट १९३२.

---

## ६४ प्रेम कां करावें

उदास झालों त्या दिवशीं । निराश वाटे फार मशीं
कष्टी झालों मनांत मी । बुडतों वाटे घोर तमीं
सभोंवतिं भरे अंधार । दिसे न कोठें आधार
भोजनावरी नसे मन । दुसऱ्यांस्तव परि जाऊन
दोन घांस ते कसे तरी । खाउन गेलों बाहेरी
होतें रडवेलें वदन । होते पाणरले नयन
सायंवेळा ती झाली । प्रभा न धरणीवर उरली
प्रभा न उरली हृदयांत । शिरते हृदयीं घन रात्र
मदीय मदु हळु हृदयांत । वाटे कुणि मज न जगांत
प्रेम जयांचेवरि केलें । डोळ्यांपुढतीं ते आले
डोळ्यांपुढतीं त्या मूर्ती । क्षणांत सुंदर अवतरती
तनमनधन मी ज्यां दिधलें । समोर सगळे ते आले
यदर्थ डोळे मम रडले । यदर्थ देवा आळविलें
ज्यांच्या हितमंगलास्तव । प्रेमें रडला मम जीव
मदीय सुंदर जें कांहीं । जयांस दिधलें सदैवही
स्मृती तयांची मदंतरीं । आली एकाएकिं खरी
असेल का मत्स्मृति त्यांना । येइल जल का तन्नयनां
दिसेल का मन्मूर्ति तयां । गहिंवर येइल का हृदया
विसरलेच ते असतील । उठे असा मत्प्राण बोल
मदर्थ ना कुणि रडतील । मदर्थ ना कुणि झुरतील
मला न कोणी स्मरतील । मला न कोणी लिहितील

कशास लिहितिल मी कोण । कोण्या झाडाचें पान
असे जवळ तरि तें काय । केवळ आहे हें हृदय
विशाल बुद्धि न मज कांहीं । स्वयंप्रज्ञता ती नाहीं
विद्या नाहीं कला नसे । अभिमानी जग मला हंसे
कशांत नाहीं पारीण । जगांत दिसतों मी दीन
धैर्य धडाडी ती नाहीं । सदैव मागें मी राही
शरीर–सौष्ठव तें नाहीं । घरदार मला तें नाहीं
पैसा अडका ना एक । जगांत केवळ कफल्लक
भव्य भडक जें लखलखित । झगमगीत जें दिपवीत
असें न मजपाशीं कांहीं । मत्स्मृति कोणा कशि राही
कुणी स्मरावें कां मजला । कुठल्या झाडाचा पाला
परी मी तरी करुं काय । आहे केवळ हें हृदय
प्रेम त्यांत जें मला मिळे । सदा जगाला तें दिधलें
असेच जें ना मजजवळी । द्याया ये ना कधिकाळीं
प्रेम अंतरींचें दिधलें । तुच्छ जगा परि तें दिसलें
असेल दोषी मत्प्रेम । असेन किंवा मी अधम
प्रेम–पूर जे मी दिधले । असेल विष तें त्यां गमलें
जगांत मी तर कमनशिबी । धिक्कारी मज सृष्टि उभी
प्रेम तरी मी कां केलें । स्वार्थें होतें का भरलें ?
प्रेमाचा तो मोबदला । हवा कशाला तरी मला
प्रेम जगाला दिल्याविना । जगीं रहाया मज ये ना
हृदय प्रेमें भरलेलें । कळा लागती जरि न दिलें
देउ एकदां मी लागें । कांहि न ठेवीं मग मागें
सर्वस्वा मी अर्पितसें । कोण परी हें जाणतसें
मना ! जगाचे पासून । व्यर्थ काय इच्छा करुन
प्रेमाचा तो मोबदला । हवा कशाला बरें तुला
देत सदा रे तूं राही । हृदय रिकामें जों होई
विचार ऐसे हळुवार । मनांत उडवित कल्लोळ

विचार कोमल मनिं भरले । माझें मानस गजबजलें
तुडुंब भरला हृदंबुधि । अगतिक वाटे मनामधीं
पाझरलें हो मदंतर । डोळ्यां लागे जलधार
माझें भरलेलें हृदय । भरलेले डोळे उभय
भावनोत्कटा मद्वृत्ती । गात्रें सगळीं थरथरती
होतों मार्गानें जात । "कुणी न मजला" हें गात
तोंचि पाहिलीं समोर मी । फुलें मनोहर अति नामी
कांहिं रुपेरी सोनेरी । विमल पांकळ्या एकेरी
परागपुंजासभोंवतीं । सकळ पाकळ्या जपताती
पुंज मधोमध काळासा । नयनामध्यें बुबुळ जसा
जपति पापण्या बुबुळाला । तेविं पाकळ्या पुंजाला
फुलें न, प्रेमें भरलेले । मजला गमले ते डोळे
प्रेमानें ओथंबलेली । दृष्टि तयांची ती दिसली
सत्प्रेमाचे भरुन घडे । डोळे लावुन जगाकडे
होतिं उभि तीं गोड फुलें । लक्ष जगाचें ना गेलें
वाट पाहुनी दिवसभरी । निराश झालीं निजांतरीं
दृष्टि जराशी लवलेली । मला फुलांची ती दिसली
उघडे अद्यापी नयन । होते त्यांचे रसपूर्ण
उभा राहिलों तिथें क्षण । हृदय येउनी गहिंवरुन
प्रेम द्यावया जगाप्रती । होतीं उत्सुक फुलें किती
प्रेमें भरलेली दृष्टी । करिती मजवर तीं वृष्टी
प्रेमें भरलीं मनोहर । प्रेमें न्हाणिति मदंतर
दिवसभर कुणी ना भेटे । आले गेले किति वाटे
मला थांबतां पाहून । त्यांचें आलें मन भरुन
डोलुं लागलीं मोदानें । बोलुं लागलीं प्रेमानें
होतीं तोंवर फुलें मुकीं । वदती परि होऊन सुखी
सहानुभूतीचा स्पर्श । उघडी त्यांच्या हृदयांस
बोलुं लागलीं मजप्रती । गोड तरी ती गिरा किती

" दिलें आमुचें प्रेम तुला । प्रेमतृषार्ता भल्या मुला!
प्रेम द्यावया अम्हि जगतों । देउन आनंदें मरतों
फार अम्हां जरि न सुगंध । आहे त्यांतच आनंद
सदा मानिलों, जें असतें । जवळ, देतसों जगता तें
देण्यासाठीं समुत्सुक । देण्यामध्यें खरें सुख
कुणि न भेटलें आम्हांला । खंत वाटली चित्ताला
दिवस संपुनी अंधार । पडूं लागला बाहेर
भरलेले प्रीतिचे घडे । रिते न झाले कुणापुढें
भरलेले प्रीतिचे घडे । तसेच पडलेत बापुडे
तशांत तूं रे आलास । प्रकाश जैसा अंधास
तसें वाटलें आम्हांला । मोद मनाला बहु झाला
येउन येथें रमलास । प्रेमें बघुनी आम्हांस
घे तर सारें प्रेम तुला । प्रेमतृषार्ता भल्या मुला
घे सारें हें प्रेम तुला । प्रेम हवें ना तुला मुला "
असें बोलुनी मज बघती । गोड मनोहर तीं हंसती
अमृतवृष्टिच जणुं करिती । सुकलेल्या हृदयावरतीं
सुकून गेल्या शेतास । जसा मिळावा पाऊस
तसें जाहलें मदंतरा । विसरुन गेलों जगा जरा
डोलुं लागलीं फुलें मुदें । वाऱ्यावरतीं आनंदें
येइ मदंतरही भरुन । पुढें ओढवुन मम वदन
तयांस धरिलें मी भालीं । करीं तयांना कुरवाळीं
धरिलें प्रेमें हृदयाशीं । प्रेमसिंधु त्या सुमनांसीं
पुन्हां बघतसें पुन्हां करीं । हृदयीं त्यांना घट्ट धरीं
अपार भरला आनंद । सकळ पळाला मत्खेद
दाउं कुणा हें रमणीय । दृश्य मनोहर कमनीय
प्रसंग मोठा स्मरणीय । हृदयाल्हादक कवनीय
तयां फुलांना मी म्हटलें । " तुम्हि मज किति तरि सुखवीलें
विसांवा तुम्ही मज दिधला । शोक तुम्ही मम घालविला

मदीय डोळे हांसविले । ओले होते जे झाले
मदीय हृदया फुलवीलें । होतें कोमेजुन गेलें
धरितों तुम्हां हृदयाशीं । कृतज्ञता मी दावुं कशी
तुम्हांस काव्यीं गुंफीन । कृतज्ञता मी दावीन
वदुनी धरिलें हृदयाशीं । जाणारे बघती मजसी
मज वेड्याला ते हंसले । लज्जेनें क्षण मन भरलें
फिरुन फुलांना पाहून । फिरुन एकदां हुंगून
फिरुन तयां कुरवाळून । फिरुन हृदयाशीं धरुन
निघून गेलों तेथून । प्रेमानें ओथंबून
विचार आला मदंतरीं । सृष्टि प्रेम सदा वितरी
मनुज देतसे प्रेमकण । परमेश्वर दे कोटिगुण
सुमन–तारका–तरु–वारि– । प्रकाश–रूपें प्रकट हरी
प्रेम देतसे सर्वांतें । कळे न वेड्या जीवातें
प्रकाशकिरण प्रेमाचे । भरलेले कर देवाचे
कवटाळाया येतात । मोदप्रेमा देतात
या वाऱ्याच्या पानें । प्रभुच येतसे प्रेमानें
अंगा प्रेमें स्पर्श करी । गुणगुण गाणें उच्चारी
नद्या वाहती ज्या भव्य । प्रभुची करुणा ती दिव्य
जिकडे तिकडे प्रेमाचा । पाउस पाडी प्रभु साचा
अनंत देतो प्रेमास । कळे न वेड्या जीवास
प्रभुचें प्रेम न बोलतसे । मुकें राहुनी वर्षतसे
प्रेम करो वा न करोत । अनंत हस्तें भगवंत
प्रेम देतसे सकळांला । विचार हृदयीं मम आला
मला वाटली मग लाज । चित्तामाजी ती सहज
प्रेम अगोदर देवानें । दिलें, तयास्तव मनुजानें
कृतज्ञ राहुन आजन्म । द्यावें निरपेक्ष प्रेम
भगवंताची ही पूजा । सदा जिवा रे करि माझ्या
यांतच सार्थक खरोखर । पुन्हां न मळवी निजांतर

पुन्हां न केव्हां रड आतां । प्रेम सर्वदा दे जगता
प्रेम सदा तूं देत रहा । प्रेमसिंधु तूं होइ पहा
प्रेमसागर प्रभुराज । प्रेम द्यावया ना लाज
जगास द्यावें स्वप्रेम । हाच करी तूं निजनेम
जगास निरपेक्ष प्रेम । देणें हा करि निजधर्म
सरोत दुसरे ते धर्म । प्रेमदान हें त्वत्कर्म.

—त्रिचनापल्ली तुरुंग, जानेवारी १९३१.

---

## ६५ प्रार्थना

माझ्या ओंठावरि थरथरे प्राथना एक हीच
व्हावें माझ्या कांधि न भगवन् हातुनी कर्म नीच
श्रद्धा राहो हृदयिं असुं दे त्वत्स्मृती देवराज!
चिंतेचें ना किमपि मग तें नाथ ! केव्हांहि काज

—त्रिचनापल्ली तुरुंग, जानेवारी १९३१.

---

## ६६ प्रसन्नता

पुशी अहंता निज पापमूळ । खराखुरा होउन राहि मूल
जिथें अहंकार जिथें घमेंड । प्रसन्नता तेथ न दावि तोंड ।।
समस्तपापस्मृति जैं जळेल । गळां पिशाच्चापरी ना बसेल
जणूं पुनर्जन्मच मानसाचा । तदा घडे लाभ प्रसन्नतेचा ।।
प्रसन्नता स्वस्त न वस्तु बापा । प्रसन्नता मुक्तिच मूर्तरूपा
प्रसन्नता वस्तु न मर्त्यभूची । प्रसन्नता सुंदरता प्रभूची ।।
प्रसन्नता बाळ मनोजयाचें । प्रसन्नता बाळ तपोबळाचें
प्रसन्नता संयमन–प्रसूती । प्रसन्नता मंगल–पुण्य–मूर्ति ।।

सदैव सेवारत शांत दांत । त्वदिंद्रियें पाहुन विश्वकांत
तदंगि लोभें फिरवी करातें । प्रसन्नता तैं वरिते तयांतें ॥

सुधारसाचा प्रभुच्या कराचा । जया शुभ स्पर्श घडेल साचा
तदीय तें जीवन होइ नव्य । प्रसन्नता–लाभ तयास दिव्य ॥

वसुंधरेच्या हृदयामधून । जसा झरा येत उचंबळून
तसा मनोमोद अनंत आंत । प्रसन्नतारूप धरून येत ॥

असेल ज्याच्या हृदयीं अथांगा । मनोहरा मंगल–भाव–गंगा
तदार्द्रता जी झिरपे कृतींत । प्रसन्नतानाम तिलाच देत ॥

अनंत जन्म प्रथम श्रमावें । अनंत जन्मावधि संतपावें
अनंत वेळां पडुनी चढावें । प्रसन्नतेनें मग रे नटावें ॥

—नाशिक तुरुंग, मे १९३३.

---

## ६७ प्रकाश केव्हां भवनीं भरेल ?

मदीय या मानस–मंदिरांत । तमोमयी संतत घोर रात्र
कुठें असे दीप? कसा मिळेल? । प्रकाश केव्हां भवनीं भरेल ? ॥

जशी विजेची कळ दाबतांच । प्रकाश सर्वत्र करीत नाच
कुठें असे ती कळ मंदिराची । सदैव हे धुंडित हात साची ॥

मदीय हे हात दमून गेले । मदीय डोळे बनतात ओले
कधींच का ना कळ सांपडेल । असाच का दास सदा रडेल ?

तुझा सदा मी करितों पुकारा । पुन्हां पुन्हां दावितसां नकारा
असें प्रभो कोठवरी टिकेल । प्रकाश केव्हां भवनीं भरेल ?

रवी शशी अंबरिं लाविलेस । निज प्रकाशें भरलेंस विश्व
मदंतरीं ज्योति न लावितोस । दिसे स्मशानासम गेह ओस ॥

क्षणीं परी येइ मनीं विचार । उचंबळे तत्क्षणीं मोद–पूर
मना मुक्यानें प्रभुपाय चेप । प्रकाश येईल पहा अपाप ॥

असे विजेची कळ तत्पदांत। पदां धरी तेज भरे घरांत
सदैव जो दाबिल पाय त्याचे। घरांत नाचे बिजली तयाचे॥
अहा मला त्वत्कळ रे मिळाली। मदीय चिंता सगळी पळाली
अतां न सोडीन कधींच पाय। चिर–प्रकाशें तम दूर जाय॥
प्रकाश येतां मम मंदिरांत। बसेन मी नाचत गीत गात
तव प्रभु! प्रेमसुधा पिऊन। खराखुरा पागल मी बनेन॥
नुरेल माझें मज देह–भान। न भूक लागेल न वा तहान
सुखाश्रु नेत्रांतुन चालतील। तनूवरी रोम उभारतील॥
प्रकाश नाचेल अनंतरंग। सुदास नाचेल डुलेल दंग
बनेल वेडाच बनेल मत्त। तुझ्यांत जाईल मिळून भक्त॥
प्रकाश येतां तम त्यांत जाई। नदी समुद्रांत मिळून राही
प्रभा रवीपासुन ना विभक्त। तुझ्यांत जाईल मिळून भक्त॥
जलांत जाती मिळुनी तरंग। सदैव एकत्रच अंग[१] रंग
धरून राही सुम नित्य वृंत। तुझ्यांत जाईल मिळून भक्त॥
प्रकाश येवो सदनांत थोर। हरो समस्त प्रभु चित्तघोर
सदा प्रकाशास्तव मी भुकेला। प्रकाश द्यावा प्रणती पदाला॥

—नाशिक तुरंग, एप्रिल १९३३.

---

टीप:– १ आकार आणि रूप हीं एकत्र असतात.

## ६८ हृदयाचे बोल

मला तुझ्यावीण कुणी कुणी न । खरोखरी मी तुजवीण दीन
नसेच आधार मला कुणाचा । मला विसांवा पद-सारसाचा ॥

सख्या जिवाचा मम आसरा तूं । उदार माता मज वांसरा तूं
गड्या दिलाचा मम दिल्‌रुबा तूं । म्हणेन मी संतत एक तूं तूं ॥

मदीय तूं बोध मदीय मोद । मदीय चित्ता प्रभु ! तूं विनोद
मदीय संगीत मदीय गान । त्वमेक रे जीवन मामकीन ॥

मदीय तूं खान मदीय पान । मदीय तूं स्थान मदीय मान
मदीय तूं सौख्य मदीय ठेवा । तुझ्याविणें कांहि न देवदेवा ॥

तुझाच आधार तुझा विसांवा । तुझाच हे तात ! करीन धांवा
तुलाच मारीन सदैव हांका । कृपांबरानें निज बाळ झांका ॥

तुझ्यावरी सर्व मदीय भार । तुझ्यावरी सर्व सख्या मदार
तुझेंच मातें जरि बंद दार । मदीय दुःखारा न अंत पार ॥

तुझ्यावरी सर्व उड्या मदीय । सख्या जरि प्रेम नुरे त्वदीय
तरी न सत्कर्म घडेल हातीं । समस्त हें जीवन होइ माती ॥

न जीव पंखाविण पांखरास । न आस गायीविण वासरास
पतंग सूत्राविण ना तरंगे । तुझ्याविणें दास तुझा न रंगे ॥

न मूल हांसे जरि अंबिका न । चकोर दुःखी जरि चंद्रिका न
वनें वसंताविण हांसती न । तुझ्याविणें दास तुझा सुदीन ॥

सुचे वसंताविण ना पिकाला । सुके जरी पाउस ना पिकाला
जळाविणें जाइ जळून मीन । सुके तसा दास भवद्विहीन ॥

अनाथनाथा ! उघडा जगांत । दरिद्र दुःखी पडलों पथांत
मदीय तूं लाज न राखशील । तरी निज ब्रीद गमावशील ॥

सख्या अनंता करुणावसंता । तुझ्याविणें कोण कलंकहंता
मदीय मालिन्य धुवावयातें । तुझ्याविणें कोण समर्थ मातें ॥

करी तुझें मूल धुवून नीट । करी मुलाला शिकवून धीट
तदीय घे हात तुझ्या करांत । पडेल ना तो न घडेल घात ॥
असो तुझा हात मदीय माथां । न दूर लोटी मज दीन-नाथा
मदंतरंगीं करुनी निवास । सुवास द्यावा मम जीवनास ॥

* * *

दिला कशाला नरजन्म मातें । जरी न तत्सार्थक होइ हातें
दिली कशाला तनु मानवाची । जरी असे वृत्ति सदा पशूची ॥
अमोल मोतीं मजला दिलेंस । धुळींत मी मेळविलें तयास
अयोग्य हातीं बहुमोल ठेवा । दिला किमर्थ प्रभु देवदेवा ॥
अमोल लाभे नरजन्म देवा । परी घडेना तव अल्प सेवा
कशी तुला ही नरजन्ममाती । पहावते ? सांग, जयास गाती ॥
मलाच ठावी मम वेदना रे । न कल्पना येइल ती परा रे
किमर्थ मी ढाळित आंसवांतें । तुलाहि माहीत नसेल का तें ? ॥
अनाथ दोषी दुबळा गरीब । सदैव त्याचें रडणें नशीब
न देव ना मानव त्या न कोणी । सदा रडावें तिमिरीं बसोनी ॥
सकाळ होवो अथवा दुपार । प्रभात किंवा रजनी गभीर
मला असे एकच काम साचें । अखंडनेत्राश्रुविमोचनाचें ॥
रडून रात्रंदिन दोन्हि डोळे । फुटून जावोत बनोत गोळे
तुला नसे भाग्य बघावयाचें । नुरे तरी कामच लोचनांचें ॥
परोपरी मी तुज आळवीन । सदैव गीतें रचुनी नवीन
तुझी घडो भेट न वा घडो रे । मुखीं तुझे गीत तरी असो रे ॥
मुखीं असो नाम तरी निदान । तयास मी मानिन सन्निधान
न आठवी माय जरी मलास । न बाळ केव्हां विसरेल तीस ॥
कितीहि झालें जरि खोडसाळ । तरी उराशीं धरि माय बाळ
मदीय माता परि फार मानी । न पुत्रहांका परिसे हि कानीं ॥
सदैव माता जपती मुलांना । सदैव माद्या जपती पिलांना
जगांत माता विसरेल बाळ । तरी जगाचा जवळीच काळ ॥

मला न पोटीं धरिशील आई । मला न नेत्रीं बघशील आई
कशास हा जन्म तरी दिलास । मला अहोरात्र रडावयास ।।

न आत्महत्या कर यास धीर । जरी बघाया तुजला अधीर
न रोगही मित्र बनेल पाही । न देव त्याला जगिं कोणि नाहीं ।।

रडे रडे संतत तूं रडे रे । न जोंवरी त्वत्तनु ही पडे रे
रडावयाचाचि तुझा स्वधर्म । रडावयाचें करि नित्य कर्म ।।

निराश होतों बनतों भ्रमिष्ट । विनिंदितों व्यक्ति जगद्–गरिष्ठ
समस्त मातें हंसतात लोक । कुणा कळे आंतर आइ ! शोक ।।

असाच हा चंचल दुर्विचार । वदून ते हांसती सान–थोर
तुझ्या मुलाची करिती टवाळी । मुका बिचारा परि अश्रु ढाळी ।।

* * *

अनंत आनंद तुझ्या जगांत । न मी रडावें कधिंही मनांत
सदैव देवा मजला हंसू दे । कधीं उदासीन न रे बसूं दे ।।

हंसें सदा मद्वदनीं असावें । मदास्य हें खिन्न कधीं नसावें
असें जरी वाटतसे मनांत । सदा उभे अश्रुच लोचनांत ।।

भरून येती मम नेत्र देवा । मला कळेना मम पापठेवा
मला न तत्कारण तें कळेना । मदश्रुधारा कधिंही सरेना ।।

वसंत येई पिक गोड गाई । वनस्थली रम्य सजून राही
फुलाफळांना प्रभु ये बहार । मदीय नेत्रीं परि अश्रुधार ।।

शरद् ऋतू ये सुखद प्रसन्न । धरा सधान्या सरिता प्रसन्न
प्रसन्न आकाश प्रसन्न तारे । मदीय नेत्रीं परि अश्रु वा रे ।।

विषाद जाऊन विकास येवो । अकर्मता जाउन कर्म येवो
निशा सरोनी हंसु दे उषेला । वरो सदा मन्मन जागृतीला ।

सरोनी अंधार उजेड येवो । निबद्ध माझी मति मुक्त होवो
स्वतंत्रतेच्या गगनीं उडूं दे । विचारनक्षत्रफुलें खुडूं दे ।।

कधीं न आतां प्रभु मी रडावें । विशंक उत्साहभरें उडावें
स्वपंख आनंदुन फडफडावे । वरीवरी संतत मी चढावें ।।

सदैव उत्साह असो मनांत । सदैव सेवा असुं दे करांत
असो सदा शांति मदंतरांत । भरून राही मम जीवनांत ॥

* * *

अखंड आकर्षुनियां ग्रहांस । सभोंवतीं नाचवि त्यां दिनेश
पदांबुजाभोंवतीं इंद्रियांस । धरूनियां लावि फिरावयास ॥
प्रदक्षिणा तीं तुजला करोत । तव प्रकाशें विमलें नटोत
हरेल अंधार सरेल रात्र । तुझ्या प्रसादा धनतील पात्र ॥
सुचो रुचो ना तुजवीण कांहीं । जडो सदा जीव तुझ्याच पायीं
तुझाच लागो मज एक छंद । मुखांत गोविंद हरे मुकुंद ॥
तुझाच लागो मज एक नाद । सरोत सारेच वितंड–वाद
तुझा असो प्रेमळ एक बंध । मुखांत गोविंद हरे मुकुंद ॥
अनंत हें अंबर नीलनील । उभें न मार्गे जरि का असेल
तरी न ताराद्युति ती खुलेल । सुपार्श्वभूमी चढवीत मोल ॥
समस्त मार्गे कृतिच्या मदीय । असो भवन्मूर्ति विलोभनीय
समस्त करों पदकासमान । तुझ्या शुभांगीं झळकोत छान ॥
शुभ–कृतींची मम वजयंती । गळां तुझ्या घालिन भूषयन्ती
उरीं तुझ्या सुंदर ती रुळेल । बघून स्वन्नेत्रनदी निघेल ॥
मनोज्ञपुष्पासम गंधवंत । पवित्र तारांपरि दीप्तिमंत
सुरम्य मोत्यांपरि पाणिदार । असा कधीं अर्पिन कर्म–हार ॥
नसे मला ज्ञान खरी न भक्ति । नसे मला योग न ती विरक्ति
नसे तपस्या पदरांत जाड । तरी तुझी मी करितोंच चाड ॥
कधीं मदश्रु प्रभुजी पुसाल । कधीं निजांकीं निजबाळ घ्याल
तुम्हांला मी मानित मायबाप । कधीं बरें दूर कराल ताप ॥
जगी मुलाला उकलाल आज । जरी न राखाल तदीय लाज
जरी न पाजाल अनंत पान्हा । जगेल ना तो तरि दीन तान्हा ॥

—नाशिक तुरुंग, मे १९३३.

## ६९ जीवनार्पण

जीवन-सुमना मदीय देवा ! त्वच्चरणीं वाहिन
दुसरी आणिक इच्छाच न
मरंद तूं घे तूंच गंध घे सुंदरता तूं बघ
तव सेवेंतचि सुकुंदे शुभ
आहे गंध काय तो परी
आहे सुंदरता का तरी
आहे रस तरि का तिळभरी
असो कसेंही तुला आवडो, गोड करुन घेउन
सुखवी प्रभुवर माझें मन ॥

* * * *

जरी भिकारी जीवन माझें तरि तुज तें अर्पिन
हृदयीं धरिशिल तें तोषुन
रित्या जीवना तव हस्ताचा स्पर्श सुधामय घडे
तरि परिपूर्णतेस तें चढे
त्वत्स्मित-किरण जीवनांवरीं
पडतिल दोनचार ते जरी
तरि तें होइल रे भरजरी
स्वतांच तें मग निजांगावरी बसशिल तूं घालुन
जाइन देवा मी लाजुन

* * * *

ध्रुवबाळाच्या मुक्या कपोला शंख लाविला हरी
वेदोच्चारण मग तो करी
मदीय जीवन अरसिक रिक्त प्रभु तूं भरिशिल रसें
जरि तुज देइन तें सौरसें
ये, ये, जीवन घे तूं मम
मत्करधर्ता ना त्वत्सम
प्रकाश दे यज घेउनि तम

रिता घडा मी तुला देउनी क्षीरांबुधि मिळविन
मज मौक्तिक परि तुज मृत्कण ॥

*      *      *      *

सख्या अनंता मनोवसंता घे मम जीवन–वन
आहे निष्फळ हें भीषण
विचारतरु तूं फुलवी फळवी लाव भावनालता
स्फूर्ति–समीरें आंदोलिता
सद्‍गानांचे कूजनि पिक
सत्कर्माचे हांसवि शुक
येवो भावभक्तिला पिक
जरीं न अन्या फुलवाया ये हें हृन्नंदनवन
फुलवी तूंच जगन्मोहन ॥

*      *      *      *

प्रभु तव चरणीं जीवनयमुना माझी ही ओतिन
तव शुभ चरण प्रक्षाळिन
त्वत्पद–धूलि स्पर्शायाला यमुना कशि तडफडे
वरवर धडपडुनी ती चढे
वसुदेवाच्या हातांतला
पद लांबवुनि तुवां लाविला
आत्मा यमुनेचा तोषला
तुझ्या पदाच्या स्पर्शासाठीं देवा मज्जीवन–
यमुना तडफडते निशिदिन ॥

*      *      *      *

तनमन माझें तुला वाढलें जीवनपर्णावरी
यावें प्रभुजि अतां लौकरी
पांचाळीच्या पानास्तव त्या अधीर झालां कसे
या हृया दीनास्तवही तसे
पांचाळीच्या पानीं चव

सम तनमनाहि ती ना लव
तरि करि बाळाचें गौरव
किति विनवूं मी किति आळवुं मी कंठ येइ दाटुन
यावें धांवुन मनमोहन ॥

* * * *

आला आला कृष्णकन्हैय्या राधाधर-लोलुप
प्रिय ज्या भावभक्तिचें तुप
आला आला शबरीचीं तीं खाणारा बोरकें
आला तोषणार गोरसें
जीवनपात्र तयाच्या पुढें
केलें तनमन वाढुन मुदें
माझी दृष्टि तत्पदीं जडे
जीवनयमुना गेली तत्पदगंगेमधिं मिसळुन
गेला जीव शिवचि होउन ॥

—नाशिक तुरुंग, मार्च १९३३.

## ७० जीवनांत माझ्या सदा राम गुंफिन

जीवनांत माझ्या सदा राम गुंफिन
सकळ इंद्रियांनीं माझ्या राम चुंफिन ॥ जीव० ॥

सत्य-शिवं-सुंदराचें
पूजन मी करिन साचें
ह्यास्तव मी या जिवाचें
मोल अर्पिन
राम गुंफिन ॥ जीव० ॥

विमलभाव सरल भाव
मधुर भाव प्रेम भाव
सेवा-निःस्वार्थ-भाव

त्यांत ओतिन
रामगुंफिन ॥ जीव० ॥
ज्ञान, भक्ति, कर्म, तीन
पदर असे दृढ धरून
श्रद्धेनें पीळ भरुन
मोक्ष मिळविन
राम गुंफिन ॥ जीव० ॥

—धुळें तुरुंग, मे १९३२.

---

## ७१ तुजसाठिं जीव हा उरला

कारुण्यवसंता रामा । तुजसाठिं जीव हा उरला ॥
या जगांत तुजविण कोणी । नाहींच खरोखर रामा
तूं हृदयीं असुनी देवा । कां चित्त भुलतसे कामा
तुज सदैव हृदयीं धरुनी । तव गोड गाउं दे नामा
तुज सदैव मी आळविन
तुज सदैव मी आठविन
तूं जीवन मी तर मीन
तुजवीण जीव घाबरला ॥ तुजसाठिं० ॥
हृदयांत जरी तूं नसशी । मी अनंत मोहीं पडतों
तुजलागीं विसरुन रामा । शतवार पडुन मी रडतों
तूं नको कधींही जाऊं । हृदयांतुन तुज विनवीतों
जरि मूल चुकुन दुर जाई
वापींत पडाया पाही
धरि धांवत येउन आई
रघुवीर तेविं धरि मजला ॥ तुजसाठिं० ॥
जरि इतर वस्तु हृदयाशीं । निशिदिन मी प्रभवर धरितों
हृदयाच्या आंतिल भागीं । तुजशींच हितगुजा करितों

एकांतीं बसुनी रामा । तुजला मी स्मरुनी रडतों
तव चरण मनिं येवोनी
तव मूर्ति मनीं येवोनी
येतात नेत्र हे भरुनी
किलिकदां कंठ गहिंवरला ॥ तुजसाठिं० ॥

बसुनियां रघुवरा दोघे । करुं गोष्टी एके ठायीं
ठेवीन भाळ मम देवा । रमणीय तुझ्या रे पायीं
प्रेमांबुधि गंभिर तेव्हां । हेलावुन येइल हृदयीं
मन तुझ्याच पायीं जडुं दे
तनु तुझ्याच पायीं पडुं दे
मति तुझ्याच ठायीं बुडुं दे
तुजवीण गति दुजी न मला ॥ तुजसाठिं० ॥

एकची आस मम रामा । तूं ठेव शिरीं मम हात
होईन पावनांतर मी । मंगला तूंच मम तात
त्वत्स्पर्श सुधामय होतां । संपेल मोहमय रात्र
क्रोध मोह न मग शिवतील
पापादि दूर पळतील
भेदादि भाव गळतील
सेवीन सदा पदकमला ॥ तुजसाठिं० ॥

जें आवडतें तुज देवा । तें करोत माझे हात
जे आवडती तुज देवा । ते शब्द ओठ बोलोत
जे आवडती तुज देवा । ते विचार मनिं नांदोत
तनमनमति तुज अर्पीन
सेवेंत सतत राबेन
जाईन त्वत्पदीं मिळुन
ही इच्छा पुरवी विमला ॥ तुजसाठिं० ॥

—नाशिक तुरुंग, एप्रिल १९३३.

## ७२ करुणाष्टक

अहा चित्त जाई सदा हें जळून । मला दुःख भारी, श्रमें मी रडून
पुशी कोण नेत्रांतली अश्रु–धार । प्रभो दीन दासा तुझ्या तार तार ।।
वनीं निर्जनीं दीप जेवीं दिसावा । दिसोनी क्षणीं तोहि वातें विझावा
तसा येउनी जातसे सद्विचार । प्रभो दीन दासा तुझ्या तार तार ।।
मला षड्रिपू भाजिती गांजिताती । मला वासना सर्वदा नागवीती
तुझ्या भक्तिची वाजं दे एकतार । प्रभो दीन दासा तुझ्या तार तार ।।
मदीयांतरीं दिव्य पावित्र्य साजो । तया पाहुनी सर्वही पाप लाजो
असो मन्मती सन्मतीचें अगार । प्रभो दीन दासा तुझ्या तार तार ।।
असज्जीवनें मी अहोरात्र खिन्न । न ये नीज मातें, रुचे तें न अन्न
मदीयांतरंगावरी घोर भार । प्रभो दीन दासा तुझ्या तार तार ।।
तुझा एक आधार ना अन्य मातें । तुझा बाळ सांभाळ हे विश्वमाते
मला कष्टवीतात नाना विकार । प्रभो दीन दासा तुझ्या तार तार ।।
तुझा एक विश्वास विश्वा समस्त । असत्कल्पनांचा करी शीघ्र अस्त
कृपेनें मनींचा हरी अंधकार । प्रभो दीन दासा तुझ्या तार तार ।।
दिसो प्रेमळा निर्मळा दृष्टि नेत्रीं । वसो पुण्यता माझिया नित्य वक्त्रीं
मनीं नित्य नांदोत ते सद्विचार । प्रभो दीन दासा तुझ्या तार तार ।।
तुझें फूल मी होउं दे सद्विकास । तुझें मूल मातें तुझी एक आस
किती प्रार्थुं मी सांगुं मी काय फार । प्रभो दीन दासा तुझ्या तार तार ।।

—धुळें तुरुंग, १९३०.

## ७२ जीवनबाग

( नाचत म्हणावयाचें गान )

प्रभु माझी जीवन-बाग सजव ॥

कुशल तूं माळी
बाग सांभाळी
स्वर्गीय सौंदर्यें ती रे खुलव ॥ प्रभु० ॥

गत काळांतिल
सगळा खळमळ
भरपूर येथें खताला सडव ॥ प्रभु० ॥

द्वेष मत्सर
हेची फत्तर
फोडुन, प्रेमाचे वृक्ष फुलव ॥ प्रभु० ॥

मोह विकार
बाग खाणार
वैराग्य-दंडानें त्यांना घालव ॥ प्रभु० ॥

तव करुणेचा
मंगलतेचा
शिवतम वसंतवारा वाहव ॥ प्रभु० ॥

दृढ श्रद्धेचे
सद्-भक्तीचे
सुंदर मांदार येथें डुलव ॥प्रभु० ॥

उत्साहाचीं
आनंदाचीं
थुइथुई कारंजीं येथें उडव ॥ प्रभु० ॥

धृतिचे अभिनव
घालुन मांडव
त्यावर शांतीचे वेल चढव ॥ प्रभु० ॥

स्थल १११४ सं. काव्य

चारित्र्याचे
पावित्र्याचे
शीतल शांतसे कुंज घडव ॥ प्रभु० ॥
सत्प्रतिभेचे
सत्-ज्ञानाचे
गुंगुंगुंगू मिलिंद गुंगव ॥ प्रभु० ॥
सहजपणाचे
सत्-स्फूर्तीचे
करुं देत विहंगम गोड रव ॥ प्रभु० ॥
परमैक्याचा
झोला साचा
बांधुन त्यावर जीव झुलव ॥ प्रभु० ॥
फुलवुन जीवन
तेथें निवसुन
मग गोड गोड तूं वेणू वाजव ॥ प्रभु० ॥

—धुळें तुरुंग, मे १९३४.

---

## ७४ भाग्याचे अश्रु

अनुताप–आसवांनीं । कासार मानसाचें
भरतें तुडुंब तेव्हां । ती भक्ति–वेल नाचे
त्या भक्तिवेलिवरतीं । चित्पद्म तें फुलेल
येऊनियां मुकुंद । मग त्यांत तो बसेल
रड तूं सदैव बाळा । भरुं दे तुडुंब हृदय
येईल भक्ति मग ती । होईल सच्चिदुदय
ते भाग्यवंत अश्रु । जवळी तुझ्या विपूल
हंसशील लौकरीच । जरि आज तूं मलूल

—धुळें तुरुंग, मार्च १९३२.

---

## ७५ तळमळतो रे तुझा तान्हा

तळमळतो रे तुझा तान्हा ।।
कामधेनु तूं माझी देवा
चोरुं नको रे अतां पान्हा ।। तळमळतो० ।।

धन कृपणाला जल मीनाला
तेंवि मला तूं सख्या कान्हचा ।। तळमळतो० ।।

गोकुळिं गोरस सकळां दिधला
प्रभुजि अजी तें मनीं आणा ।। तळमळतो०।।

अजुन दया जरि तूं ना करिशिल
ठेवुं कशाला तरि प्राणा ।। तळमळतो० ।।

—नाशिक तुरुंग, ऑगस्ट १९३२.

---

## ७६ निर्वाणीचें सांगणें

नाशी मोह प्रभुजि अथवा प्राण घेऊन जाई
नेई देह त्वरित अथवा ही अहंता हरावी
माझें चित्त स्थिर करि न वा थांबव श्वास देवा
पाशां तोडी सकळ, धरवे धीर ना, मृत्यु दे वा ।।

आनंदानें हृदयिं धरुं का बुद्बुदांचे पसारे ?
मृत्पुंजा का परम–रतिनें पूजुं सोडून तारे ?
पीयूषाची प्रभुजि मजला लागलीसे पिपासा
कांजी लावूं कशि मग मुखा ? सिद्ध मी सर्वनाशा ।।

माते प्रेमामृतजलनिधे मंगले हे उदारे
दृश्यादृश्या सृजिशि सगळे हे तुझे खेळ सारे
मच्चित्तांतर्गत तम हरी, दे प्रकाशांश एक
आहें मी क्षुद्रिकल बहुतां जन्मिचा कांहि फेंक ।।

मच्चित्तीं जीं सतत उठती वादळें शांत व्हावीं
विध्वंसावीं मम मदगृहें सर्व आसक्ति जावी
येवो चित्तीं स्मरण न कधीं कामिनीकांचनांचें
माते! हें दे मजसि, अथवा प्राण फेंकीन साचे ।।

त्वत्कारुण्यांबुधिमधिल ना बिंदु लाभे जरासा
माते ! मातें जरि, तरि गळ्यालागिं लावीन फांसा
आई होशी कृपण कशि तूं बाळ जाई सुकून
त्वत्कारुण्यें जलद भरले पाठवी बिंदु दोन ।।

विश्वाधारे ! अगतिक तुला बाळ हा हांक मारी
दारीं आला सदयहृदये ! तारि वा त्यास मारी
हे प्रेमाब्धे ! परमकरुणालंकृते ! हे अनंते !
दे आधारा मज न रडवी वत्सले ! स्नेहमूर्ते ! ।।

—त्रिचनापल्ली तुरुंग, फेब्रुवारी १९३१

---

## ७७ कधिं येशिल हृदयिं रघुराया

कधिं येशिल हृदयिं रघुराया
कधिं करुणेची करिसिल छाया । हृदयिं० ।।

मोह न मजला मुळिं आवरती
अगतिक मी अति
पडतों पायां ।। हृदयिं० ।।

बहु मोलाचें हें मम जीवन
हे करुणाघन
जाई वायां ।। हृदयिं० ।।

होइल सदया जरि न दया तव
ठेवुं कशास्तव
तरि मम काया ॥ हृदयिं० ॥

—नाशिक तुरुंग, सप्टेंबर १९३२.

---

## ७८ कां मजला देतां प्रेम

मम हातांनीं कांहिं न होइल काम
कां मजला देतां प्रेम
मी वांझ असें, करलि न राखा आस
ती आशा होइल खाक
जगिं दुःख नसे आशा-भंगासारें
तें प्रेम म्हणुनि ना द्या रे
प्रेमाला लायक नाहीं
करुणेला लायक नाहीं
साहाय्या लायक नाहीं
तुम्हि सोडुन द्या माझे सकळहि नाद
कां बसता घालित वाद ॥

*　　*　　*

तो प्रेमाचा पाउस मजवर होई
परि दुःख हेंच मज दाही
त्या प्रेमाला लायक मुळि नसतांना
कां देती मजसि कळेना
ते जों जों हें दाखवितात प्रेम
हृदयांत भरत किति शरम
मी काय तयांना देऊं
मी काय तयांना दावूं

मी काय तत्पर्‍ीं वाहूं
मद्दुन्यानें डोळे ओले माझे
हृदयावर दुर्धर ओझें ॥

*   *   *

मज्जीवन हें निष्फळ दीन दरिद्र
गतसार अतीव क्षुद्र
किति सांगु तुम्हां अश्रु न दिसती काय
ती ऐकुं न ये का हाय
मम सुसकारे कानिं न का ते पडले
दिसति न का डोळे भरले
जा सकळ तुम्ही माघारे
मजकडे न कुणिहि बघा रे
तुम्हि थोर कर्मकर सारे
परि मी न असें, मी न करितसें कांहीं
मरतों ना म्हणुनी राहीं ॥

*   *   *

त्या दगडाला काय घालुनी पाणी
येईल कधीं ना फुलुनी
त्या मेलेल्या खोडा घालुन पाणी
येईल काय भरभरुनी
मृत देहाला अर्पुन वस्त्रें अन्नें
तो उठेल का चैतन्यें
हे व्यर्थ सर्व सायास
हा अनाठायिं हो त्रास
येतील कधिं न कामास
तो धंधूंनो विकाससंभव जेथें
अर्पिजे सकलही तेथें ॥

*   *   *

मी जगतीं या कर्म-शून्य हत जीव
कां करितां माझी कींव
ना कधि काळीं अंकुर मज फुटतील
ना फुलेंफळें धरतील
ना छायाही देइल जीवन माझें
त्रदतांना मन्मन भाजे
कां उगाच देतां प्रेम
मी निराश निष्क्रिय अधम
मी मत हत निपतित परम
कां लाजवितां प्रेम समर्पुन मातें
हें प्रेम जाळि हृदयातें ॥

*　*　*　*

ते प्रेमाचे तुमचे सदलंकार
परि मजला ते अंगार
ते प्रेमाचे सहृदय तुमचे बोल
परि मजला मारक गरल
ती प्रेमानें अर्पितसां जी मदत
मज सदैव ती रडवीत
मी प्रेम कशाला घेऊं
जगतास काय मी देऊं
मी मदत कशाला घेऊं
मी घेत असें देऊं न शकें कांहीं
हा विचार हृदया दाही ॥

*　*　*　*

मी तुम्हांला काय देउं परतून
मी काय देउं हो खूण
मी जगताच्या पासुन घेतों भारी
परि अजुनी रडत भिकारी

प्रा. क्र. ५३७३

मज घालाया येईना हो भर ती
म्हणुनी हे लोचन रडती
मज किती मरावें वाटे
तें भवत्प्रेम मज कांटे
मति दाटे अंतर फाटे
हा पोळितसे विचार माझ्या हृदया
म्हणुनि ना प्रेम द्या न दया ॥

*    *    *    *

मजपासोनी अपेक्षा तुम्हां असती
प्रेमाची म्हणुनी वृष्टि
हा उपयोगा येइल तुम्हां वाटे
प्रेमाचें म्हणुनी नातें
मज निर्लोभी पवित्र पावन गणुनी
देतसां प्रेम आणोनी
परि तुम्हां सांगतों सत्य
करुं नका अपेक्षा व्यर्थ
मी हताश दुर्बळ पतित
हा उपयोगी नाहीं, येइल दिसुनी
मग जाल सकलही फसुनी ॥

*    *    *    *

ते पुत्राला मायबाप वाढविती
करितात किती ते प्रीती
मनिं आशा कीं होइल मोठा पुत्र
वार्धक्यीं देइल हात
हा येइल कीं पुत्र आमुच्या कामा
मनिं इच्छुन देती प्रेमा
जरि उनाड मुलगा झाला
किति दुःख आइबापांला

केवढा ढका आशेला
त्या हृदयींच्या खळविलेल्या आशा
जातात सर्वही नाशा ॥

* * * *

तुम्हि कांहिंच का अपेक्षा न ठेवून
देतसां प्रेम आणून
तुम्हि कांहिंच का आशा ना राखून
देतसां प्रेम वाढून
मजवरि तुमचें प्रेम सदा जें दिसतें
निरपेक्ष काय तें असतें
प्रमास न का फल—वास
प्रेमा न कसलि का आस
जें देत असा तुम्हि ह्यास
तें निरपेक्ष प्रेम असे जरि जवळ
मज त्याचा द्यावा कवळ ॥

* * *

मज गंध नसे रंग नसे ना शुभता
पावित्र्य नसे ना मधुता
मी दुर्गंधें भरलेलें हो फूल
तें विषमय फळ लागेल
या सगळ्याला असाल जरि का सिद्ध
तरि करा प्रीतिनें बद्ध
होवो न निराशा तुमची
मागून थोर हृदयाची
म्हणुन ही कथा मम साची
मी सांगतसें तुमच्या चरणांपाशीं
आणून अश्रु नयनांसी ॥

* * *

जो पाण्याला हृदयापाशीं धरिल
प्रेमानें त्या न्हाणील
ज्यापासोनी इवलिहि नाहीं आस
जो त्यासहि दे प्रेमास
तें प्रेम असे दुर्मिळ दुर्मिळ जगतीं
या भुवनिं नमे तत्प्राप्ति
प्रेमाच्या पाठीमागें
आशांचे असती लागे
तें प्रेम हेतुनें जागें
मन रडती कीं प्रेम व्यर्थची केलें
तें सारें मातित गेलें ॥

*       *       *

कधि केलेलें प्रेम न जाई व्यर्थ
ज्याला ही श्रद्धा सत्य
तो पडलेला पर्जन्याचा थेंब
कधि तरि वरि आणिल कोंब
तो टांकीचा पडलेला जो घाव
दगडास करीलचि देव
ही आशा जरि हो अमरा
तें प्रेम तरिच तुम्हि वितरा
ना सोडा कधिंही धीरा
मम जीवन हें फुलेल शतजन्मांनीं
हें ठेवुनि मनिं द्या पाणी ॥

—पुणें, जानेवारी १९३५.

## ७९ अश्रु

नको माझे अश्रू कधीं नेऊं देवा
हाचि थोर ठेवा माझा एक
बाकी सारें नेई धन–सुख–मान
परी हे लोचन राखी ओले
माझें रूप मज अश्रू दावितात
हेचि तातमात प्राणदाते
अश्रू माझे थोर ज्ञानदाते गुरु
अश्रू कल्पतरू माझे खरे
अश्रू माझे मला गोड हांसवतिल
अश्रू भेटवतिल माझें ध्येय
अश्रु माझा जीव अश्रु माझा प्राण
देवा त्याच्याविण न जगेन
अश्रू वांचवीती अश्रू हांसवीती
माझा फुलवीती जीवनतरु
अश्रूच्या बिंदूत माझा सुखसिंधु
नको नो गोविंदु नेऊं कधीं
सगळें हें जग तिरस्कार करी
सखा माझा परी अश्रु एक
अश्रूस पूजीन अश्रूस ठेवीन
मनीं सांठवून अहोरात्र

*   *   *

इवलासा अश्रु पर्वत बुडवी
जीवाला चढवी मोक्षपदीं
इवलासा अश्रु परी वज्रा चुरी
पाषाणाचें करी नवनीत
इवलासा अश्रु आरट आंपट

निर्मीत अवीट सुधासिंधु
इवलासा अश्रु ओलावा तो किती
अमित पिकती माझे मळे
इवलासा अश्रु परी त्याच्या पोटीं
कोटयवधि गोष्टी सांठलेल्या
इवलासा अश्रु परी बोले किती
देवी सरस्वती तेथें मूक

* * *

इवलासा अश्रु नका मानूं तुच्छ
संसारीं महोच्च स्थान त्याचें
इवलासा तारा दिसतो दुरुन
परी तो मोजून कोण येई ?
बाळकृष्णाचें तें इवलेंसें तोंड
यशोदा ब्रह्मांड देखे त्यांत
इवलीशी मूर्ति बटु वामनाची
परी त्रैलोक्याची केली मिती
इवलेसें पान पांचाळी अर्पित
स्वामी तृप्त होत ब्रह्मांडाचा
इवलेंसें पान रुक्मिणी ठेवीत
लीलेनें तुळीत विश्वंभरा
इवलासा अश्रु तसा माझा आहे
सारें त्यांत राहे भाग्य माझें

* * *

इवलासा अश्रु अपूर्णाला पूर्ण
करे तसे तूर्ण सांगूं काय
इवलासा अश्रु पूर्ण विरामाला
जीवनग्रंथाला गोड देई
इवलासा अश्रु माझा मज असो

वियोग तो नसो त्याचा कधीं
इवलासा अश्रु जों माझ्याजवळ
तोंवरी सकळ भाग्य माझें

* * *

अश्रु माझी आशा अश्रु माझें बळ
अश्रु हा निर्मळ जवळ असो
अश्रु हा लहान अश्रु हा महान
अश्रु नारायण आहे माझा
पोटांत ठेवीन डोळ्यांत ठेवीन
मी ना विसंबेन त्याला कधीं

—नाशिक तुरुंग, मार्च १९३३.

---

## ८० माझा देव

"जग हें मंगल जग हें सुंदर"
म्हणे मदंतर आशेमाजी
"देव तो दयाळ देव परोदार"
म्हणे मदंतर आशेमाजी
येतांच निराशा जरा जीवनांत
चित्त हें अशांत परी होई
जरा येतां चिंता जरा होतां त्रास
अशांत मानस माझें होई
"लहरी हा देव कठोर निष्ठुर
जीवन भेसूर" म्हणूं लागें
"जग हें वाईट अमांगल्य-खनी"
असें म्हणें मनीं संतापोनी
श्रद्धा जी ठेविली होती अंतरांत

क्षणांत ती जात मरोनियां
निराशेंत आहे सद्गुण–कसोटी
निराशा ही लोटी दुर्मार्गांत
श्रद्धेचा चंद्रमा निराशानिशांत
हृदयाकाशांत शोभे ज्याच्या;
दुःख–संकटांत घोर विपत्तींत
गोड जो हांसत तोची धन्य;
ईश्वराची कृपा पाही जो सर्वत्र
जीवन पवित्र त्याचें धन्य;
सदा श्रद्धावंत सदा आशावंत
सदा सेवारत धन्य तोची
मंगलाच्यावर सदा ठेवी दृष्टी
सुखाची ही सृष्टी करूं पाहे;
अवघाची संसार सुखाचा करीन
मनीं हें ठवून झटे सदा;
तोची माझा देव त्याला मी पूजीन
हृदयीं ठेवीन भक्ति–प्रेमें

—अमळनेर, ऑगस्ट १९३४.

---

## ८१ प्रभु मम हृदयिं आज येणार

प्रभु मम हृदयिं आज येणार ।
मम जीवन–मरुभूमींत अतां शत पाझर फुटणार
परम शांतिचे परम सुखाचे अमित मळे पिकणार ॥ प्रभु ॥
मुक्या बिचाऱ्या जीवपिकाला कंठ आज फुटणार
हृदयमंदिरीं नवगीतांचा मधुरध्वनि उठणार ॥ प्रभु० ॥
प्रभु–करुणेचा वसंतवारा जीवनवनिं सुटणार
वठलेल्या मत्सद्वृत्तींना नव अंकुर फुटणार ॥ प्रभु० ॥

मालिन्याचीं कार्पण्याचीं मम वस्त्रें गळणार
पोषाख मला नवतेजाचा नवरंगी मिळणार ॥ प्रभु० ॥
भ्रम मम जातिल संशय शंका आज सकल फिटणार
शतजन्मांची चिरचिर माझी कायमची मिटणार ॥ प्रभु० ॥
सकल बंधनें आज तटातट तुटुन धुळित पडणार
मन्नयनांतुन भावभक्तिची गंगा घळघळणार ॥ प्रभु० ॥
म्लान असा मद्वदनचंद्रमा स-कल आज खुलणार
सुकलेले मम बागबगीचे सहज सरस फुलणार ॥ प्रभु० ॥
कुविचारांचें धुकें सकल तें आज उडुन जाणार
हृदयमंदिरीं चित्सूर्य अतां चिर मंगल जळणार ॥ प्रभु० ॥
जीवात्म्याचें शतजन्माचें ग्रहण आज सुटणार
चिदंबरीं मज उंच उडाया पंख दिव्य फुटणार ॥ प्रभु० ॥
दैन्य दुराशा दुरित निराशा सकल आज हटणार
अभिनव-मंगल-मधुर-मनोहर तेजें मी नटणार ॥ प्रभु० ॥
अमित युगांची येरझार मम आज सकल खुटणार
परमैक्याच्या परमानंदा अगणित मी लुटणार ॥ प्रभु० ॥
परमैक्याच्या झोल्यावरतीं प्रभुसह मी झुलणार
प्रेमसमाधी लागुन माझी परममुदें डुलणार ॥ प्रभु० ॥
शब्द अंबरीं तडित् अंबुदीं प्रभा रवित शिरणार ॥
तरंग अंभोधींत तसा मज्जीव शिवीं मिळणार ॥ प्रभु० ॥

—नाशिक तुरंग, ऑक्टोबर १९३२.

स्थान नं
क्र.


## ८२ फुलाची आत्मकथा

फुलापरी या जगांत सुंदर एक हांसरें फूल
दुसरें सज्जनमन कोमल
फुलापरी साजिरे गोजिरे तिसरे तारक वरी
चौथें स्मित सतिवदनावरी
इतुकी पवित्रता कोठली
इतुकी सुंदरता कोठली
इतुकी परिमलता कोठली
निष्पाप अशीं फुलें शोभती पवित्र आत्म्यापरी
पसरिति मोद धरित्रीवरी ॥

फुला पाहुनी सदैव माझें जळतें पापी मन
भरती पाण्याने लोचन
स्पर्श कराया धैर्य नसे मज थरथरती भत्कर
लज्जित मेल्यापरि अंतर
माझा स्पर्श विषारी असे
माझी दृष्टि विषारी असे
लावूं हात फुलाला कसे
मलिन होउनी जाइल जळुनी हात लागला जरी
ऐसें वाटे मज अंतरीं ॥

एके दिवशीं प्रातःकाळीं माझ्या मार्गावर
फुललें होतें सुम सुंदर
दंवबिंदूंनीं न्हालें होतें मधुर गंध दरवळे
रविनें शतकिरणीं चुंबिलें
माझी दृष्टि तयावर बसे
वाटे पुढें न जावें असें
पाहुन मज सुम जणु तें हंसे
गंगायमुना मन्नयनांतुन आल्या गालांवरी
लज्जा भरली माझ्या उरीं ॥

फुला पाहुनी मदीय हृदयीं विचार शत उसळती
थरथर मद्‌गात्रें कांपती
मज्जीवन मज दिसे दिसे तें फूलहि दृष्टीपुढें
भेसुर वि ोध आणी रडें
मत्कर सुमना मी जोडिले
खालीं निज शिर मीं नमविलें
भक्तिप्रेमें मग विनविलें
" सुंदर सुमना ! सखा, सद्‌गुरू, परब्रह्म, तूं मम
माझा दूर करी हृत्तम ॥

तुला कशानें अशी लाभली सुंदर जीवनकळा
सांगे मजला तूं निर्मळा
लहानशा या तुझ्या जीवनीं इतुकी निर्दोषता
आली कोठुन वद तत्त्वतां
आचरलासी तप कोणतें
केले अखंड जप कोणते
सांग स्वकीय जीवनकथे
त्वदीय जीवनरहस्य मजला कळेल बापा जरी
जाइन मीहि तरोनी तरी " ॥

बहुत दिसांनीं मूल आइला पाडस वा गायिला
भेटे, तैसे होई फुला
पुलकित झालें, डोलुं लागलें, प्रेमें वदले मला
" ये ये जवळी माझ्या मुला !
माझा हृदयसिंधु हा अतां
करितो तुझ्यापुढें मी रिता
परिसावी मज्जीवन–कथा "
तद्वच ऐकुन कर जोडुन मी स्थिर झालों अंतरीं
बोले सुमन दांभरीपरी ॥

'होतों प्रभुच्या पायांपाशीं सदैव मी अंबरीं
त्याची कृपा सदा मजवरी
सूर्याच्या सोनेरि करांवर बसुनी एके दिनीं
आलों प्रभुपद मी सोडुनी
पृथ्वी पाहूं आहे कशी
ऐसा मोह धरुन मानसीं
सोडुन आलों मी स्वामिसी
झरझर सरसर नाचत नाचत रविकिरणांचेवरी
उतरूं लाग धरणीवरी ॥

खालीं खालीं जों जों बाळा ! येऊं मी लागलों
तो तों अंध होउं लागलों
विकास गेला, सुगंध सरला, सुंदरता संपली
शंपाहतशी तनु कपली
तारा अस्मानांतुन तुटे
त्याचें तेज उरत का कुठें ?
माझा थोर सकळही सुटे
दयासुंदरा वसुंधरेनें निजकर केले वरी
झेलुन ठेवी पण तिरीं ॥

अंध जाहलों, बंधीं पडलों, अंधार सभोंवतीं
न कळे काय असे मद्गती
हाय ! हाय ! मज मोह कशाला शिवला बोलुन असें
रात्रंदिन मी कितिं रडतसें
बोले मनांत मज कुणितरी,
'आतां रडून काय रे परी
तप तूं थोर अतां आचरी
प्रभुचरणच्युत फुला ! विकासास्तव तप तूं आचरी
त्याविण गति ना या भूवरी' ॥

अश्रु पुसुन मग गंभीर असा निश्चय केला मनीं
झालों ध्यानस्थ जसा मुनी
दिव्य असे प्रभुचरण अंतरीं दृष्टिपुढें आणुन
गेलों ध्यानमग्न होउन
सगळी बाह्य सृष्टि विसरत
केवळ चिंतनांत रंगत
जणुं मी प्रभुसिंधुंत डुंबत
अशा प्रकारें मुला ! तपस्यासमारंभ मी करीं
करुनी रडगाणें निज दुरी ॥

कधीं कधीं मज किरणीं भास्कर भाजुन हो काढित;
कधि ती थंडी गारठवित;
मारुन मारुन गाल कोंवळे लाल करित मारुत;
पाउस कधि भिजवुन रडवित;
दुःखें हींची हांसवतिल
रविकर हेची रंगवतिल
वारे हेची डोलवतिल
प्रभुप्रसादें थबथबलेलें दुःख दुःख तें वरी
धरिला धीर असा अंतरीं ॥

जशी तपस्या वाढु लागली विकासही वाढला
तप सद्विकासजननी, मुला !
मंद मधुरसा गंध मदंगीं लागे रे यावया
लागे लावण्य फुलावया
वारे देती कधि बातमी
'संतत बसशिल न असा तमीं
वेळ तुझा तूं मोदें क्रमीं'
तिकडे माझें लक्षच नव्हतें, ध्यास एक अंतरीं
होवो स्वीय तपस्या पुरी

किति दन रात्री एशा नेल्या ध्यानरसीं रंगुन
मजला काळाचें भान न
तपस्या करी, आपोआप प्रकटेल विकास तो;
फसतो, जो ना विश्वासतो
श्रद्धा अमर असावी मनीं
आशा अमर असावी मनीं
श्रद्धा जीवन-संजीविनी
श्रद्धा, बाळा! जिवा नाचवी चमत्कारसागरीं
देई मौक्तिक अंतीं करीं ॥

घाली प्रिय भूमाय सदोदित माझ्या वदनीं रस
मज मत्तपस्येंत सौरस
सुंदर मज निज पर्णांचा ती आश्रम दे बांधुन
गेलों ध्यानीं मी रंगुन
माझी तहानभूकच हरे
माझें मानच मजला नुरे
चिंतन एक मात्र तें उरे
सौंदर्याच्या महान् सागरीं तन्मय झालों जणूं
माझा अहं न उरला अणु ॥

सुगंध मग तो भरुन राहिला साऱ्या मज्जीवनीं
पाहे प्रकटायालागुनी
सुंदरता रंगली अंतरीं आंत कळा लागती
प्रभुची सृष्टि पहायाप्रति
तरि मी आवरीत मानसा
उल्लू होउन जाइन कसा
होता प्रभुवर मम भरंवसा
अधीर होतां कार्य बिघडतें, अधीर होणें अघ
न कधीं अधीर होई बघ ॥

अधीर होउन अंडें फोडी विनता, मग पांगळा
लाभे अरुण तिला तो लुळा
सहस्त्र वर्षें वाट बघोनी दुसरें फोडी मग
प्रकटे गरुत्मान् तदा बघ
कर्मीं रंगावें माणसें
फळ तें चिंतुं नये मानसें
लाभेल परी भरलें रसें
कष्ट संकटें सोसुन संतत सेवाकर्मीं रमा
येइल चरण चुराया रमा ॥
बाळ घालितो रुजत बी, बघे उकरुनियां सत्वर;
येइल कैसा वरि अंकुर ?
जरा जाहली नाहीं तुमची थोडी जों चळवळ
लोंची मूर्ख विचारिति फळ
घालित जावें बाजा जळ
सेवेमध्यें न पडो खळ
सुंदर डोलेल वरी फळ
अधीर म्हणुनी मी ना झालों फुलविल परमेश्वर
होतें सश्रद्ध मदंतर ॥
रविकर आतां प्रेमें स्नेहें मजलागीं चुंबिती
वारे प्रदक्षिणा घालिती
अधीर जणुं मज बघावयाला झाल्या दाही दिशा
सरली जणुं मज्जीवन–निशा
तरिही शांत राहिलों मनीं
अधिकचि तपस्येंत रंगुनी
बाळा ! तत्चि सुखाची खनी
तपस्येंतची आनंद खरा तत्त्व धरावें उरीं
फळ तें वांछुं नये लौकरी ॥

एके दिवशीं सायंकाळीं किरण वदति कोमळ
' उदयिक विकास तव होइल '
ऐसें सांगुन, मोदें चुंबुन, गेले निघुनी कर
उत्सुक पवन करी भिरभिर

हळुहळु उषा जवळ येतसे
माझी पाकळी ती खुलतसे
दुसरी फुलते, तिसरी हंसे
निशा संपली, अमृतत्वाची उषा झळकली वरी
अमृतसिंचन मजवर करी ।।

उषा देविनें मला चुंबिलें धरणीमांडीवरी
भास्कर माझें जातक करी
आनंदानें कृतज्ञतेनें मुखें मदीयांतर
विश्वीं देखे विश्वंभर

करुणा सकळ त्याची असे
सुगंध त्याचा रंगहि तसे
मी तर निमित्त केवळ असें
प्रभु मद्रूपें दावि जगा निज पवित्रता माधुरी
माझा हक्क नसे त्यावरी ।।

सुगंध माझा सुंदरता मम त्याची ही देणगी
म्हणुनी ठेवित उघडी अंगीं
मला कशाला संचय-मति ती ? माझें कांहिच नसे
प्रभुचें प्रभुस समर्पीतसें

मज्ञें लुटोत सारे धन
हेंची वांछी माझें मन
त्यागें परमेश्वर पूजिन
सेवा करुनी सुकुनी जाइन, जाइन प्रभुच्या पदीं
मग ती पतनभीति ना कधीं ।।

अशी मुला ही ऐकिलीस का माझी जीवनकथा
रुचेल तरि आदर मत्पथा
कल्याण तुझें होवो बाळा! अश्रु आपुले पुस
बेटा रडत असा ना बस
करि तूं मुका राहुन श्रम
साहुन दुःखें संकट तम
न शिवो मना निराशा भ्रम
पुरी तपस्या होतां ठेवी प्रभु फळ हातावरी
न कधीं अधीर हो अंतरीं" ॥

पवित्र सुमना नमना करुनी, सद्गद साश्रू असा
होतों कांपत मी वेलसा
सतेज-सुंदर-गंभीर-मंगल-विमल-भावनांबुधि
हेलावे मम हृदयामधीं
"हीं मम शेवटचीं आसवें
आतां रमेन कर्मासवें
लागे विवाह श्रद्धेसवें
कर्म करावें सदा तपावें" निश्चय धरिला उरीं
"आहे जगदंबा मग वरी" ॥

—नाशिक तुरुंग, नोव्हेंबर १९३२.

## ८३ मयसभा राहिली भरुन

मम दृष्टीला भेसुर दिसतें भुवन
मयसभा राहिली भरुन ।।

जें दिसत असे रूप वस्तुचें वरुन
तें आंत न येतें दिसुन
मम डोळे हे निशिदिन जाती फसुन
त्यामुळें जात मी खचुन
जें वाटतसे जाउं उराशीं लावूं
तें बघे प्राण मम घेऊं
दंभ ह्या जगाचा धर्म
उलटेंच जगाचें कर्म
मग मिळेल केवीं शर्म
मन्मन होई खिन्न वर्म हें बघुन
मयसभा राहिली भरुन ।।

* * *

मज ओलावा वरुन मनोहर दिसला
जातांच जीव परि फसला
मद्दग्ध जणुं प्राण तिथें मी नेले
येईल टवटवी गमलें
मज्जीवन जें म्लान फुलापरि होतें
तें तेथें नेलें हातें
तों आग अधिकची उठली
जीवाची तगमग झाली
वंचना स्वतांची कळली
जें आर्द्र दिसे, टाकि तेंच करपवुन
मयसभा राहिली भरुन ।।

* * *

कुणि मज दिसला दिव्यज्ञानांभोधी
वाटलें करिल निर्मळ धी
मज मोक्षाचा दाविल वाटे पंथ
वाटलें हरिल हा खंत
नव चक्षु मला देइल हा गुरु गमलें
जाऊन चरण मी धरिले
तो गुलामगिरिगुरु ठरला
मज अंधचि करिता झाला
अघपंथ दाविता झाला
मम आशेचे अंकुर गेले जळुन
मयसभा राहिली भरुन ॥

*        *        *

जे सुधारले ऐसें वाटत होतें
जे भाग्यगिरीवर रमते
जे निजतेजें दिपवित होते डोळे
अभिनव-नव-संस्कृतिवाले
जे कैवारी स्वातंत्र्याचे दिसती
जे समत्वगीतें गाती
परि जवळ तयांच्या गेलों
तों दचकुन मागें सरलों
वृक व्याघ्र बरे मी वदलों
ते करिति सदा समतावादींचा खून
मयसभा राहिली भरुन ॥

*        *        *

ते शांतीचीं सूक्तें गाती ओठीं
परि काळकूट तें पोटीं
ते एकिकडे तोफा ओतित नविन
परि वरुन शांतिचें गान

ते एकिकडे दास्यीं दुनिया नेती
स्वातंत्र्यभक्त म्हणवीती
चरचरा चिरुन इतरगळे
ते स्वतंत्रतेचे पुतळे
उभविती कसे मज न कळे
हा दंभ कसा प्रभुवर करितो सहन
मयसभा राहिली भरुन ॥

* * *

जे पावन, ते जगतीं ठरती पतित
परि पतित, पूतसे गणित
यत्स्पर्शानें श्रीशिव होइल पूत
अस्पृश्य ते जगीं ठरत
जे आलस्यें दंभें दर्पें भरले
ते स्पृश्य पूज्य परि झाले
दुनियेचा उलटा गाडा
जें सत्य म्हणति तें गाडा
जें थोर म्हणति तें पाडा
हे दंभाला पूजिति धर्मच म्हणुन
मयसभा राहिली भरुन ।६

* * *

मज दीप गमे आहे तेथें भव्य
दावील पंथ मज दिव्य
त्या दीपाचा पंथ सरळ लक्षून
चाललों धीट होऊन
मज दीप अतां दिसेल सुंदर छान
पडतील पदें ना चुकून
परि तिथें भयद अंधार
ना अंत नसे तो पार
ना पंथ नसे आधार

या अंधारा भजति दीप मानून
मयसभा राहिली भरुन ।।

*    *    *

मृदु शीतलसे सुंदर दिसले हार
सर्प ते प्राण घेणार
किति सुंदरशी सुखसरिता ती दिसत
परि आंत भोंवरे भ्रमत
जें अमृत मला जीवनदायी दिसलें
तें गरल मृतिप्रद ठरलें
मृगजळें सकळ संसारीं
होतसे निराशा भारी
ही किमर्थ धडपड सारी
तें कांचन ना कांत दिसे जें वरुन
मयसभा राहिली भरुन ।।

*    *    *

जे जगताला जीवन अंबुद देती
त्यांमाजि विजा लखलखती
या जगांत जणूं जीवनगर्भीं मरण
परि देइ जीवना मरण
ज्या मखमाली त्यांतच कंटक रुतती
परि कंटक कोमल फुलती
हें कसें सकल निवडावें
परमहंस केवीं व्हावें
जलरहित पय कसें प्यावें
हें कोण मला देइल समजावून
मयसभा राहिली भरुन ।।

—नाशिक तुरुंग, फेब्रुवारी १९३३.

## ८४ खरा धर्म

खरा तो एकची धर्म । जगाला प्रेम अर्पावें ।।

जगीं जे हीन अति पतित
जगीं जे दीन पद–दलित
तयां जाऊन उठवावें ।। जगाला० ।।

जयांना कोणि ना जगतीं
सदा जे अंतरीं रडती
तयां जाऊन सुखवावें ।। जगाला० ।।

समस्तां धीर तो द्यावा
सुखाचा शब्द बोलावा
अनाथां साह्य तें द्यावें ।। जगाला० ।।

सदा जे आर्त अति विकळ
जयांना गांजिती सकळ
तयां जाऊन हंसवावें ।। जगाला०।।

कुणा ना व्यर्थ शिणवावें
कुणा ना व्यर्थ हिणवावें
समस्तां बंधु मानावें ।। जगाला० ।।

प्रभूचीं लेंकरें सारीं
तयाला सर्वही प्यारीं
कुणा ना तुच्छ लेखावें ।। जगाला० ।।

जिथें अंधार औदास्य
जिथें नैराश्य आलस्य
प्रकाशा तेथ नव न्यावें ।। जगाला० ।।

असे जें आपणांपाशीं
असे जें वित्त वा विद्या
सदा तें देतची जावें ।। जगाला० ।।

भरावा मोद विश्वांत
असावें सौख्य जगतांत
सदा हें ध्येय पूजावें ॥ जगाला० ॥

असे हें सार धर्माचें
असे हें सार सत्याचें
परार्थ प्राणही द्यावे ॥ जगाला० ॥

जयाला धर्म तो प्यारा
जयाला देव तो प्यारा !
तयानें प्रेममय व्हावें ॥ जगाला० ॥
खरा तो एकची धर्म । जगाला प्रेम अर्पावें ॥

—धुळें तुरुंग, मे १९३४.

---

## ८५ कशासाठीं जगावें ?

( अशा अर्थाची इंग्रजी कविता मी वाचिली होती )

असे का जीवनीं अर्थ ?
असे रे, जों जगीं चिंता
असे, जों आपदा व्याधी
असे, जों दुर्दशाभूतां ॥

असे, जों गोरगरिबांच्या
न गेलें ज्ञान झोंपडित
असे, जों गोरगरिबांचीं
मुलें थंडींत कुडकुडत ॥

असे, अज्ञान जों जगतीं
असे, जों अश्रु या जगतीं
असे,जों बंधु लाखों हे
उपाशी नित्य रे मरती ॥

असे, जों त्रास मत्तांचा
असे, जों राजकी जुलुम
असे, जों दीन दुबळ्यांचा
जगीं उच्छेद रे परम ॥

असे, जों दुःख या जगतीं
असे, जों खिन्नसें वदन
समीप प्रीतिनें जातां
हंसे जें जेंवि तें सुमन ॥

असे, जों जाणण्या कांहीं
असे, जों कार्य करण्याला
असे, स्वातंत्र्य जों जगतीं
कृतीला आणि रे मतिला ॥

असे, जों दुष्ट त्या रूढी
असे, जों जाच धर्माचा
असे, जों घाण सर्वत्र
असे, जों सूर शोकाचा ॥

असा हा जीवनीं अर्थ
असा हा जीवनीं हेतू
विपद्दुःखाब्धि–तरणाला
जगाला होइ तूं सेतू ॥

—अमळनेर, छात्रालय १९२७

## ८६ जीवनांतील दिव्यता

आयुष्याच्या पथावर । सुखा न तोटा खरोखर
दृष्टि असावी मात्र भली । तरिच सांपडे सुखस्थली
सुंदर दृष्टी ती ज्याला । जिकडे तिकडे सुख त्याला
आशा ज्याच्या मनामध्यें । श्रद्धाही मंगल नांदे
सदैव सुंदरता त्याला । फुलेंच दिसतिल दृष्टीला

*　　*　　*

प्रचंड वादळ उठे जरी । गगन भरे जरि मेघभरीं
तरी न आशा त्यागावी । दृष्टी वर निज लावावी
वारे शमतिल, घन वितळे । नभ मग डोकावेल निळें
निशेविना ना येत उषा । असो भरंवसा हा खासा
दयासागर प्रभुराजा । सकलहि जीवांच्या काजा
आयुष्याच्या पथावरी । रत्नांची राशी पसरी
दृष्टि असावी परि विमला । फुलेंच दिसतील दृष्टीला

*　　*　　*

माणिकमोतीं अमोलिक । होतों आपण परि विमुख
संसाराच्या पथावरी । माणिकमोतीं प्रभु विखरी
मुलावरिल तें प्रेम किती । मातेचें त्या नसे मिती
मायलेकरांचें प्रेम । बहीणभावांचें प्रेम
मित्रामित्रांचें प्रेम । पतिपत्नीचें तें प्रेम
गुरुशिष्यांचें तें प्रेम । स्वामिसेवकांचें प्रेम
माणिकमोतीं हींच खरीं । डोळे उघडुन पहा तरी

*　　*　　*

तृषार्तास जरि दिलें जल । शीतल पेलाभर विमल
क्षुधार्तास जरि दिला कण । हृदयीं प्रेमें विरघळून
ज्ञान असे अपणांजवळ । दिलें कुणा जरि तें सढळ
कृतज्ञता त्या सकळांचे । वदनीं सुंदर किति नाचे

कृतज्ञतेचें वच वदती । तेंच खरें माणिकमोतीं
कृतज्ञतेसम सुंदरसें । जगांत दुसरें कांहिं नसे
रत्नें अशि हीं अमोलिक । मागत आपण परि भीक
आयुष्याचें हें स्थान । माणिकमोत्यांची खाण
रत्नजडित मुकुटाहून । त्रिभुवनसंपत्तीहून
अधिक मोलवान् हा खजिना । रिता कधिंहि तो होईना
कुणास चोराया ये ना । कुणास पळवाया ये ना
माणिकमोतीं हीं जमवा । जीवन सुंदर हें सजवा
प्रभु-हेतुस पुरवा जगतीं । करीं करोनी शुभा कृती
सत्य मंगला पाहून । संसार करूं सुखखाण
हृदय ठेवुं या सुविचारी । विश्व भरूं या सुखपूरीं
कांट्यावरि ना दृष्टि वळो । कांटे पाहुन मन न जळो
आशा अपुली कधिं न ढळो । फुलावरिच ती दृष्टि खिळो
सोडून हा मंगल मार्ग । उगीच पेटविती आग
चिंध्या पाहुन ओरडती । आंतिल रत्ना ना बघती
उगीच रडती धडपडती । बोटें मोडिति कडकड तीं
रागें खाती दांत किती । डोळे फाडुन किति बघती
जीवनपट विसकटवून । सुंदर तंतू तोडून
कशास चिंध्या या म्हणती । खोटी दुनिया ते वदती
असें नसे परि जीवन हें । सुखसरिता मधुरा वाहे
सुखास नाहीं मुळि तोटा । संसार नसे हा खोटा
दृष्टि करावी निज पूत । निराळेंच मग जग दिसत
दिसतिल मग माणिकमोतीं । मिळेल सकळां श्रीमंती
ही श्रीमंती सर्वांना । सदैव देतो प्रभुराणा
तत्त्व असें हें मनिं आणा । नांदा मोदें गा गाना ।।

—अमळनेर छात्रालय, १९२८

## ८७ मित्रांसाठीं प्रार्थना

" विशुद्ध मत्स्वांत सदैव राहो । विचार चित्तांत पवित्र येवो
न पापसंपर्क मना असावा । न लोभलेश प्रभुजी ! दिसावा ॥

करीं सदा सत्कृति तीच व्हावी । अशी मला उत्सुकता असावी
नको मला मत्स्तुतिलालसा ती । घडो जनांचें हित नित्य हातीं ;"
असें प्रभो प्रार्थियलें अनंत । विलोकिसी काय मदीय अंत
न चित्त होई विमल प्रशांत । अघीं रमे संतत विश्वकांत ॥

न ऐकशी हांक मदीय काय । दयार्द्र तूं कोमल देवराय
विमार्गगामी मज बाळकातें । न सत्पथीं आणिशि काय हातें ?॥

जरी अधःपात मदीय व्हावा । सदैव पंकांतच हा रुतावा
अशी त्वदिच्छा जरि ती असेल । कसा तरी बाळ वरी चढेल ? ॥
तुझ्या मतीच्या नच मी विरुद्ध । सहावया सर्व सदैव सिद्ध
मदर्थ आतां न कधीं वदेन । बुडेन किंवा प्रभुजी ! तरेन ॥

मदुद्धृतीचें मज नाहिं कांहीं । अतां न प्रार्थीन मदर्थ पाही
परी सखे जे मम स्नेहपूर्ण । तदर्थ रात्रंदिन आळवीन ॥
जयांवरी प्रेम अपार केलें । यदर्थ अश्रू नयनांत ठेले
दिलें जयांतें सगळें मदीय । असे सखे जे मम लोभनीय ॥

जयांविना ना मजला विसांवा । मनांत ज्यांचा जप म्यां करावा
झुरे अहोरात्र यदर्थ जीव । जयांवरी जीव जडे मदीय
जयांविणें शून्य उदास वाटे । जयांविणें मानस फार दाटे
जयांवरी जीव मदीय लोल । हिरेच माझे जणुं जे अमोल ॥

मदीय जे देव धरेवरील । यदीय पूजा मन हें करील
यदीय सौख्यीं मम सौख्य नांदे । यदीय दुःखें मम जीव फुंदे ॥

जयांस आनंद अपार द्यावा । विचार रात्रंदिन हा करावा
यदर्थ हें जीवन अर्पण्याला । कितीकदां हा प्रभु सिद्ध झाला ॥

मलाच येवो दुखणें तयांचें । यदर्थ वाटे मज हेंच साचें
मला जयांची प्रभुराज सेवा । गमे सुधेचा स्पहणीय ठेवा ॥

प्रसन्नता यत्प्रियदर्शनानें । मनास वाटे न तशी कशानें
बघून ज्यां दृष्टि मदीय तप्त । निवे सुखावे मम जीव तप्त ।।
बहिश्चर प्राण जणूं मदीय । सखे असे जे मम आंतरीय
तयां तरी सत्पथि देव ठेवी । अधोगतीला न कधींहि नेई ।।
तदुन्नती संतत होत राहो । उदार तच्चित्त पवित्र होवो
कृतार्थ होवोत असोत धन्य । न कोणताही मज काम अन्य ।।
अनन्यभावें करितों प्रणाम । प्रभो! करा हा मम पूर्ण काम
मदीय जे मित्र तयां सदैव । करा कृती मागत एकमेव ।।
तयां दयाळा निज देइ हाता । निवारि आघात बनून माता
तदीय चारित्र्यकळी फुलूं दे । तदीय कीर्ति त्रिजगीं भरूं दे ।।
असोत अंतर्बहि रम्यरूप । सखे प्रभो ! ठेवि सुखीं अमूप
सदा पवित्रा कृति तत्करांनीं । घडो, न जावोत कधींहि रानीं ।।
त्वदीय कारुण्यवसंत–वात । सुटो सुहृज्जीवनकाननांत
फुलो डुलो, हा मम एक काम । पुरा करावा, रघुवीर राम! ।।
जनांत होवोत पवित्रनाम । पुरा करा हा जगदीश! काम
नसे मला रे मम जीवनाशा । तयार मी तों मम सर्व–नाशा ।।
मदर्थ मी प्रार्थिन तें न आतां । मदर्थ ना मी नमवीन माथा
मदर्थ ना प्रार्थिन मी कधींही । परी सख्यांच्यास्तव याचना ही ।।
प्रभो! सखे जे प्रिय प्रेमधाम । तदर्थ चिंता मज हेंच काम
सुखांत ठेवी प्रभु ते सदैव । पुनःपुन्हां मागत एकमेव ।।
मदर्थ ना हे रडतील डोळे । तदर्थ होतील सदैव ओले
न जीवनाची मम आस मातें । सदैव जावोत सखे सुपंथें ।।

—त्रिचनापल्ली, सप्टेंबर १९३०

## ८८ संत

भरो विश्वांत आनंद । शांती नांदो चराचरीं
म्हणून जळती संत । महात्मे भास्करापरी ।।
असो विकास सर्वांचा । हरो दैन्य सरो तम
म्हणन जळती नित्य । महात्मे भास्करासम ।।
नसे सौख्य विलासांत । त्यांत ना राम वाटत
हरावया जगत्ताप । तपती संत संतत ।।
फळें लागोत मोदाचीं । लोकांच्या जीवनावरी
म्हणून जळती नित्य । महात्मे भास्करापरी ।।
सुखासीन विलासांत । पाही मरण तन्मन
मरण्यांत तयां मौज । जळण्यांतच जीवन ।।
पेटलेलें होमकुंड । संताचें तेंवि जीवन
परचिंता सदा त्यांना । करिती प्राण अर्पण ।।
राम ना ऐष आरामीं । राम ना लोळण्यामध्यें
राम तो एक गोष्टींत । परार्थ जळण्यामध्यें ।।
परार्थ जळती तारे । रविचंद्रहि तापती
परार्थ पळती वारे । नावेक न विसांवती ।।
परार्थ जगती मेघ । परार्थ तरु तिष्ठती
परार्थ पर्वत उभे । कदा काळीं न बैसती ।।
परार्थ सरितासंघ । परार्थ सुमनें तृणें
परार्थ फळधान्यादी । परार्थ भवनें वनें ।।
तसेच हे महा संत । परार्थ जळती सदा
तोच त्यांना सदानंद । प्रणाम शत तत्पदां ।।

—नाशिक तुरुंग, नोव्हेंबर १९३२

## ८९ मेघासारखें जीवन

काय करावें
मी मेघासम विचरावें ॥

तनुवर दुःखाचें कांबळें
चिंता–चपला हृदयीं जळे
शांति क्षणभर मज ना मिळे ॥ काय० ॥

कधिं सन्मित्रसंगतीमधें
घटकाघटका रमतों मुदें
कधिं मी फटिंग कोठें उडें ॥ काय० ॥

कधिं मी शुभ्र रुप्याच्या परी
कधिं सोनेरी वेषा करीं
परि ना ओलावा अंतरीं ॥ काय० ॥

कधिं मी जनमतवाऱ्यासवें
जाऊं देतों मजला जवें
होतों सुज्ञ परी अनुभवें ॥ काय० ॥

कधिं किति अधोगती[१] पावतों
थोराथोरांशिहि झगडतों
टपटप अश्रू मग ढाळितों ॥ काय० ॥

कधिं मी वरवर किति जातसें
मन हें चिदंबरीं रमतसे
इवलेंही मालिन्य न दिसे ॥ काय० ॥

---

टीपः–१ मेघ खालीं येतात व उंच पर्वतांना टकरा देतात, परंतु शेवटीं तेच रडतात; तसेंच माझें होतें.

कधिं मी होतों मुनि जणुं मुका
बघतों प्रसन्न प्रभुच्या मुखा
लुटितों अनंत आंतर सुखा ॥ काय० ॥

कधिं मी जगा सु—पथ दावितों
मोठ्या मोठ्यानें गरजतों
ह्मांका मारुन मी शिकवितों ॥ काय० ॥

येतें कधिं मन वोसंडुन
येतों प्रेमें ओथंबुन
तप्तां शांततवितों वर्षुन ॥ काय० ॥

कधिं गगनाहुन गुरु होतसें
कधिं बिंदुकलें मी बनतसें
ब्रह्मस्वरूप अनुभवितसें ॥ काय० ॥

कधिं मी हंसतों रडतों कधीं
कधिं मी पडतों चढतों कधीं
कधिं कुमती मी परि कधिं सुधी ॥ काय० ॥

कधिं वाक्पटु केवळ कोरडा
कधिं मी भरलेला हो घडा
कधिं जनसंगत कधिं मीं सडा ॥ काय० ॥

ऐशा अनंत करितों कृति
अनुभवितों मी विविध स्थिति
अंतीं मिळविन परि सद्गति ॥ काय० ॥

जीवन यापरि मी नेइन
दिन मी ऐसे मम कंठिन
मजला आणिक ते मार्ग न ॥ काय० ॥

कधिं तरि पूर्णत्वा पाहिन
रसमय अंतर्बहि होइन
सेवा करुनी मग राहिन ॥ काय० ॥

गळेल शिणलेली तनु यदा
सिंधुंत बुडेल हा बुडबुडा
मिळविन मंगल सच्चित्पदा ।। काय० ।।

—अमळनेर, छात्रालय. १९२६.

---

## ९० वंदन

मी वंदितों पदरजें विनयें तयांचीं
ज्यांचीं मनें विमल सुंदर सोनियाचीं
जे संकटांस न भिती न जयांस पाश
आशा सदैव अमरा न कधीं उदास ।।

कार्यें करून, वदती न कधीं मुखानें
उत्साहमूर्ति मति सांद्र दयारसानें
जे ठेविती निजसुखावरतीं निखारा
त्या वंदितों नरवरां विमलां उदारां ।।

स्वार्थीं खरोखर तिलांजलि देउनीयां
संतोषवीत पर कष्टहि सोसुनीयां
श्रद्धा जयां अविचला रघुनाथपायीं
माझी नमून मति जात तदीय ठायीं ।।

ज्यां मोह ना पडतसे पदवीधनांचा
ज्यां धाक ना कधिं असे रिपुच्या बळाचा
अन्याय ना कधिं बसून विलोकतील
ते वंदितों नरमणी गुणि पुण्यशील ।।

ना पाहतील नयनीं कधिं सत्यखून
ना दीनभंजन तसे बघती दुरून
जाळावयास उठती सगळा जुलूम
ऐशां नरांस करितों शतशः प्रणाम ।।

त्यांच्यापरी मति मदीय विशुद्ध राहो
त्यांच्यापरी हृदय कष्टदशांस साहो
त्यांच्यापरी परहितास्तव मी झिजावें
त्यांच्यापरी जगिं जगून मरून जावें ॥

—अमळनेर, छात्रालय. १९२७.

---

## ९१ मदीय त्या नमस्कृति

विशुद्ध भाव अंतरीं
कृती उदार यत्करीं
सदैव जो असे व्रती
मदीय त्या नमस्कृती ॥

न पाप यन्मना शिवे
शिवे तरी झुरे जिवें
करी सदा निजोन्नती
मदीय त्या नमस्कृती ॥

परोपकार आवडे
स्तुती जयास नावडे
सुनिर्मळा सदा मती
मदीय त्या नमस्कृती ॥

सदैव ईश्वरस्मृती
स्वदेशकारणीं रती
तयास वर्णुं मी किती
सदैव त्या नमस्कृती ॥

—अमळनेर, छात्रालय. १९२८.

# ९२ नवीन संन्यास

उत्साह–सिंधु थोर । चित्तांत वाहवील
संन्यास हा नवीन । राष्ट्रास हालवील
मालिन्य संहरून । स्फूर्तीस पेटवील
संन्यास हा नवीन । राष्ट्रास चेतवील
कर्मांत रंगुनीयां । लोकांस रंगवील
संन्यास हा नवीन । आलस्य घालवील
सेवेंत राबुनीयां । लोकांस राबवील
संन्यास हा नवीन । राष्ट्रास शोभवील
सेवेंत रंगुनीयां । वस्त्रें न रंगवील
संन्यास हा नवीन । राष्ट्रास जागवील
दास्यास दूर करुन । चैतन्य खेळवील
संन्यास हा नवीन । मोक्षास पाववील
राष्ट्रास उद्धरील । दैन्यास भंगवील
संन्यास हा नवीन । राष्ट्रास हांसवील
क्षण एक ना बसेल । बंधूंस जीववील
संन्यास हा नवीन । देशास भूषवील
बांधील कारखाने । शाळा उभारवील
संन्यास हा नवीन । राष्ट्रास वांचवील
रस्ते करील नीट । संडास साफ करिल
संन्यास हा नवीन । घाणीस संहरील
अस्पृश्य बाळकांना । जाऊन तो धुवील
संन्यास हा नवीन । भेदास घालवील
सर्वत्र आत्मतत्त्व । आचारिं दाखवील
संन्यास हा नवीन । न वदेल फक्त बोल
गायींस पोषुनियां । भरपूर दूध करिल
संन्यास हा नवीन । आरोग्य वाढवील
ऐक्यास निर्मुनीयां । सत्प्रेम दाखवील

संन्यास हा नवीन । सत्पंथ शीकवील
राष्ट्रास भूषवील । विश्वास तोषवील
संन्यास हा नवीन । सन्मुक्ति चाखवील
संन्यास हा नवीन । सूत्रांस हालवील
संन्यास हा नवीन । संसार चालवील
राहूनियां अ–सक्त । सेवा सदा करील
संन्यास हा नवीन । सत्पंथ हा वरील

— नाशिक तुरुंग, नोव्हेंबर १९३२.

---

## ९३ विपत्ति दे तीहि हवी विकासा

करून माता अनुराग राग । विकासवी बाळ–मनो–विभाग
फुले तरू सेवुन उष्णशीत । जगीं असे हीच विकासरीत ।।

पिका हवें ऊन तसेंच पाणी । तरीच तें येइल भर्‌भरोनी
प्रभो ! न संपत्ति सदैव मागें । विपत्तिही दे मज सानुरागें ।।

कभिन्न काळे घनमेघ येती । परी जगा जीवनधार देती
विपत्ति येतील अनेक घोर । परंतु देतील विकास थोर ।।

विपत्ति ही चित्त–विकास–माता । दुजा नसे सद्‌गुरु बोध–दाता
विपत्ति मानीन सदा पवित्र । विपत्ति माझें घडवी चरित्र ।।

विपत्ति मानीन मनीं अमोल । विपत्ति माझें बनवील शील
विपत्ति आकार मनास देई । विपत्ति खोटे भ्रम दूर नेई ।।

विपत्ति आणील जळास डोळां । मिळेल पाणी तरि जीवनाला
विपत्ति डोकें जरि तापवील । स्वजीवना ऊबच ती मिळेल ।।

विपत्ति मांगल्यखनी खरीच । विपत्तिरूपें मिळतो हरीच
उराशि मी लाविन ती विपत्ति । कधीं न जाईन जळून चित्तीं ।।

विपत्तिमाजीच विकासबीज । घनांतरीं वास करीत वीज
विपत्तितून प्रकटेल तेज । विपत्तिपंकीं शुभचित्सरोज ॥

कधीं न लागे झळ ज्या नराला । न आंच लागे कधि यन्मनाला
तया न पूर्णत्व कधीं मिळेल । गभीर त्या जीवन ना कळेल

विपत्ति ही जीवनवीट भाजी । विपत्ति संजीवनधार पाजी
विपत्ति आणी रुचि जीवनाला । विपत्ति दे स्फूर्ति सदा मनाला ॥

प्रकाश अंधार, तरीच वाढ । सदा न मारा न सदैव लाड
विपत्ति द्या, द्या मधुन प्रकाश । प्रभो! असें मागतसें पदांस ॥

विपत्ति दे तीहि हवी विकासा । सदैव देशील करील नाशा
सदैव थंडी, तरि गारठेल । कळी, न ती सुंदरशी फुलेल ॥

सदैव दुःखें तरि ये निराशा । दिसे न मांगल्य दिसे न आशा
मनीं शिरे द्वेष तशीच चीड । भरे तिरस्कार मनीं उदंड ॥

म्हणून देवा! प्रणती पदांस । विपत्ति ना संतत दे कुणास
करून कारुण्य करून कोप । विकासवी जीवन–रम्य–रोप ॥

प्रभो! विनम्र प्रणती पदांस । विपत्ति दे तीहि करी विकास
परी कृपाळा! न सदैव ती दे । तरीच मांगल्य मनांत नांदे ॥

—धुळें तुरुंग, मे १९३४.

---

## ९४ दुःख आनंदरूप

कर्तव्याला करित असतां दुःख आनंदरूप
व्हावें मातें, मजसि भरुं दे अंतरंगीं हुरूप
जावें दुःखें खचुन न, वरी सर्वदा म्यां चढावें
व्हावें क्लेशें विगलित न मी, धीर गंभीर व्हावें ॥

दुःखें व्हावें जळुन सगळें चित्तमालिन्य खाक
सद्भावांची शुभ झळकुं दे तेथ लावण्यझाक

दुःखें व्हावें विमलतर मन्मानसांबु प्रसन्न
दुःखें व्हावें स्थिरमति अति स्वांतरंगांत धन्य ।।

दुःखें येतां, हृदयिं भरुं दे शाश्वताचा विचार
दुःखें येतां, उठुन पुसं दे दीननेत्रांबुधार
दुःखें येतां सहज मम हा जीव चंडोल व्हावा
जावा ध्यानांबरिं उडुनियां दिव्य गानीं रमावा ।।

दुःखावीणें जगिंत न असे जीवना पूर्णता ती
दुःखें होतें हृदय सरस, प्राणि ते धन्य होती
दुःखें उल्लू मतिस करिती खोल गंभीर धीर
दुःखें दृष्टी विमल करिती नेत्रिं आणून नीर ।।

आपत्तीला सतत समजा दूत हा ईश्वराचा
व्हावें ना हो विमुख, करणें नित्य सत्कार तीचा
आशीर्वाद प्रभुजि वितरी देउनी दुःख-वेष
सत्कारावा मुदित हृदयें, क्लेश मानून तोष ।।

—त्रिचनापल्ली, फेब्रुवारी १९३१.

---

## ९५ प्रेमधर्म

(एक खरा प्रसंग)

हिंदू आणिक मुसलमान ते भांडत होते तदा
राष्ट्रावरतीं महदापदा
जिकडेतिकडे हाणामारी दंगेधोपे सुरू
माझा जीव करी हुरहुरु
परस्परांच्या खुपशित होते पोटामध्यें सुरे
ऐकुन माझें अंतर झुरे
गेले बंधभाव विसरुन

गेले माणुसकी विसरुन
गेले पशुत्र अंध होउन
अविवेकानें परस्परांचे कापित होते गळे
माझ्या डोळ्यांतुन जळ गळे ॥
* * * *
खिन्न होउनी, उदास होउनि निराश होउन मनीं .
बसलों होतों मी त्या दिनीं.
एकाएकीं अन्यत्र मला आलें बोलावणें
नव्हतें शक्यच तें टाळणें
सायंकाळीं गाडी होती तिकिट तिचें काढुन
बसलों गाडित मी जाउन
नव्हतें लक्षच कोणीकडे
येई पुनः पुन्हां मज रडें
भारीत माझ्या कां कलिकिडे
विचार नाना काहुर उडवित मानस शोकें जळे
प्रभु दे सुमति कधीं ना कळे ॥
* * * *
देव मावळे पश्चिमभागीं लाल लाल तें दिसे
रक्तच का तें तेथें असे
काय तिथेंही खून चालले? रवि का कुणि मारिला ?
कुणि तत्कंठ काय कापिला ?
भेसुर ऐसा विचार घेउन मनिं गेलों दचकुन
पाहूं लागों टक लावुन
विरलें लाल लाल तें परी
तारक चमकूं लागत वरी
शांती पसरे धरणीवरी
लाल लाल रुधिरानंतर का शांति जगाला मिळे
कांहिच मन्मतिला ना कळे ॥
* * * *

गाडीमध्यें दिवे लागले, तारक वरि चमकले
तिमिरीं प्रकाश जगता मिळे
भारतीय–जनता–हृदयांबरिं प्रेमतारकाततती
केव्हां चमकुं बरें लागती ?
प्रेमदीप कधिं भारतीय–हृन्मंदिरिं पाजळतिल ?
केव्हां द्वेष सकल शमतिल ?
वरतीं ताऱ्यांना पाहुन
ऐसे विचार करि मन्मन
मधुनी पाझरती लोचन
खिडकीच्या बाहेरच मन्मुख जें अश्रूंनीं मळे
डोळे प्रभुचरणीं लाविले ।।

*        *        *        *

गाडीमध्यें नानापरिचे होते तेथें जन
तिकडे नव्हतें माझें मन
एकाएकीं खिडकींतुन परि आंत वळविलें मुख
विद्युद्दीप करित लखलख
गोड गोड मी शब्द ऐकिले भरलेले प्रीतिनें
गेलों मोहुन त्या वाणिनें
होती एक मुसलमानिण
होती गरीब ती मजुरिण
दिसली पोक्त मला पावन
आवडता तत्सुत बाहेरी पुनःपुन्हां पाहत
होती त्याला समजावित ।।

*        *        *        *

गरीब होती बाई म्हणुनी नव्हता बुरखा तिला
होता व्यवहार तिचा खुला
प्रभुच्या सृष्टीमधें उघड ती वागतसे निर्भय
सदय प्रभुवर ना निर्दय

खानदानिच्या नबाबांस तीं आवरणें बंधनें
गरिबा विशंक तें हिंडणें
होती तेजस्वी ती सती
दिसली प्रेमळ परि ती किती
बोले मधुर निज मुलाप्रती
मायलेंकरांचा प्रेमाचा संवाद मनोहर
त्याहुन काय जगीं सुंदर ? ॥

* * * *

"नको काढुं रे बाळा ! डोकें बाहेरी सारखें"
बोले माता ती कौतुकें
"किति सांगावें फार खोडकर पुन्हां न आणिन तुला"
ऐसें बोले प्रेमें मुला
"ये मजजवळी मांडीवर या ठेवुन डोकें निज
बेटा! नको सतावूं मज
झाली भाकर ना खाउन
जाई आतां तरि झोंपुन
डोळ्यांमध्यें जाइल कण"
असें बोलुन प्रेमें घेई बाळ जवळ ओढुन
ठेवी मांडीवर निजवुन ॥

* * * *

पांच सहा वरुषांचा होता अल्लड तो बाळक
माता करिते तत्कौतुक
क्षणभर त्यानें शांत ठेविलें डोकें मांडीवरी
चुळबुळ मधुन मधुन तो करी
पुनरपि उठला, गोड हांसला, मातेसहि हांसवी
जाया संमति जणुं त्या हवी
कां रे उठसि लबाडा अतां
डोळे मिटुनी झोंपे अतां
ऐसें अम्मा ती बोलतां

फिरुन तिच्या त्या मांडीवरतीं बाळ गोड झोंपला
त्याचा मका तिनें घेतला ।।

*　*　*　*

मुसलमानबाईशेजारीं होति एक कुणबिण
होतें करुण तिचें आनन
लहान अर्भक बसली होती मांडीवर घेउन
पाणरलेले तल्लोचन
एकाएकीं मल रडाया मोठ्यानें लागलें
पाजायास तिनें घेतलें
घाली पदर तन्मुखावरी
लावी स्तनास तन्मुख करीं
अर्भक आक्रंदे तें परी
पुनःपुन्हां ती स्तनास लावी अर्भकमुख माउली
परि तें तोंड लाविना मुळीं ।।

*　*　*

"पी रे बाळा ! पी वेल्हाळा ! नको रडूं रे असा
रडुनी बसला बघ रे घसा
किति तरि रडशिल उगी उगी रे काय तुला जाहलें
गेलें सुकुन किती सोनुलें
उगी उगी रे पहा पहा हे दिवे लागले वरी"
राहे बाळ उगा ना परी
त्याला पायांवर घालुन
हलवी आई हेलावुन
बघते अंगाई गाउन
रडें तयाचें कमि न होइ परि अधिकच रडं लागला
वाटे मरण बरें जननिला ।।

*　*　*　*

चहा चिरुट चिवडा भजिं यांचे भक्त तदा कोपले
मातेवरि गुरगुरुं लागले

"किति रडविशि गे त्या पोराला ट्यांहा ट्यांहा करी
होतो त्रास इथें किति तरी
दांडक थोपट टाक निजवनी घंटाभर रडतसे
लाजच बायांना या नसे"
ऐकुन निर्दय तें बोलणें
बाळक आपटिलें जननिनें
बांकावरतीं निष्ठुरपणें
"तूंहि कारट्या आईला या आलास छळावया"
बोले माया विसरूनियां ।।

*   *   *   *

पुन्हां उचलिलें तिनें तान्हुलें प्रेम न रागावतें
क्षणभर जणुं तें भांबावतें
" उगी उगी रे तुला नाहिं हो बाळा ! मी बोलल्यें
दैवच फिरलें रे आपुलें
पी रे राजा, पी हो थोडें, वाटेल तुला बरें"
ऐसें बोले ती गहिंवरें
बाळ स्तना न लावी मुख
माता खाऊं पाहे विख
करुनी पायांचा पालख
बसली हलवित फिरुनी त्याला अगतिक भरल्या मनें
वदवे कांहि न तिज वाणिनें ।।

*   *   *   *

केविलवाणी हताश होउनि बसली ती माउली
रडतें बाळक मांडीवरी
मनांत म्हटलें मी देवाला " बाळ करी रे उगी "
परि मद्वाणी ती वाउगी
प्रेमें हृदयीं वोसंडोनी स्वपर सकल विसरुनी
हातीं बाळक तें घेउनी

असतें जरि मी समजाविलें
असतें किति सुंदर जाहलें
नव्हतें भाग्य परी तेउलें
मदहंकारें दूर राहुनी आळविला मी प्रभु
दंभचि परि तो जाणे विभु ॥

*  *  *  *

मसलमान बाइचें त्या असे हृदय खरें आइचें
गेलें कळवळुनी मन तिचें
पुत्रप्रेमाचा तिज होता पावन तो अनुभव
सुमधुर मंगल सुंदर शिव
मांडीवरतीं डोकें ठेवुन बाळ तिचा झोंपला
होता, हळुच तिनें उचलिला
तेथें चिरगुट मग पसरुन
त्यावर निज बाळक निजवुन
उठली बाइ मुसलमानिण
हिंदु बाइच्या जवळी गेली बोले मधुर स्वरें
कुणबिण फारच तें गहिंवरे

*  *  *

" द्या मजजवळी, द्याच जरासा, घेतें त्याला जरा "
ऐसें बोलुन पसरी करा
" फारच आहे रडत सारखा दृष्ट काय लागली
घामाघूम तनू जाहली
रडुनी रडुनी दमला तरिही रडणें ना थांबवी
दूधहि अंगावर ना पिई
द्या मजजवळ जरा लेंकरा
संकोच न तो इवला करा
घेउन बघतें मी त्या जरा "

प्रेमाचे अनकंपेचे ते गोड शब्द बोलुन
घेई बाळक ती ओढन ॥

*          *          *

गोड बोलते मुलाजवळ ती "रडूं नको रे असा
रडुनी रडविसि आइस कसा"
टिचक्या वाजवि, दिवे दाखवी, हातांनीं नाचवी
त्याचे हातपाय खाजवी
कानीं त्याच्या कुर करितसे भांडें ती वाजवी
अम्मा अर्भक तें खेळवी
तेव्हां चांद उगवला नभीं
फुलवी बालकवदनच्छबि
'रो मत् उगि हां बेटा अबी'
प्रेमें बोलुन, बाळ डोलवी वात्सल्यें खेळवी
त्याचें रडणें ती थांबवी ॥

*          *          *

चमत्कार जाहला खरोखर बाळ-रडें थांबलें
हांसूं खेळूं तें लागलें
अम्मा त्याला वरतीं उडवी घेइ करीं झेलुन
बाळक हंसतें तें खेळुन
गोड गोड तें हास्य तयाचें डब्यांत पसरत असे
इतरांनाही सुखवीतसे
येती चंद्रकिरण गाडित
अर्भक गोड तसें हांसत
माझें मानस मोहावत
कृतकृत्य तया अम्मेलागीं मनांत जणुं वाटलें
अमित प्रेम मनीं दाटलें ॥

*          *          *

" उगा राहिला, खेळुं लागला, पाजा त्याला अतां
झोंपेल क्षण ना लागतां "
असें बोलुनी अम्मा देई अर्भक जननीकरीं
घेई माता मांडीवरी
पाजायाला मूल घेतलें स्तनास लावी मुख
बाळ प्राशी होई सुख
भरले मातेचे लोचन
भरले मातेचे ते स्तन
भरलें गहिंवरुनी तन्मन
बाळराज तो राजस होता पीत पोटभर पय
झालें मातृहृदय सुखमय ॥

*　　*　　*

पुनःपुन्हां ती त्या बाळाला घट्ट आंवळुन धरी
माता सुखावली अंतरीं
बाळानें हे रिते करावे भरलेले स्वस्तन
ऐसें वांछी किति तन्मन
पोटभरी तो प्याला धाला पदर दूर सारित
बालक निज–मुख–शशि दावित
हंसणें मधुर किति मनोहर
काळेभोर नयन सुंदर
मुख मोहाचें माहेरघर
अमित सुखाचें भरतें आलें घेइ मके किति तरी
माता, तृप्त न परि अंतरीं ॥

*　　*　　*

" काय लबाडा ! झालें होतें, रडावयाला मघां
आतां गुलाम हंसतो बघा
मघां कोणतें आलें होतें भूत गुलामा तुला
चावट कुठला वेडा खुळा

पहा पहा हो किति तरि हंसतो, तुम्हि याला हंसविलें
अमृत त्याच्यावर शिंपिलें
ओळख पूर्वजन्मिची जणुं
संशय मज न वाटतो अणु
ऐसें बोलुन हलवुन हनु
मुका तयाचा घेई आई बाळक तें हांसलें
पोटीं प्रेमानें घेतलें ॥

*　*　*

कृतज्ञतेनें कुणबिण किति ती हृदयीं भरली असे
गहिंवर पोटीं मावत नसे
हांसत खेळत बाळक निजला क्षणांत मांडीवर
आइस आंवरे न गहिंवर
अम्मेचें मुख कृतज्ञतेनें भरल्या नेत्रीं बघे
शब्द न बाहेरी परि निघे
" तुम्हि हांसविला मद्वाळक "—,
परि तिज वदवेना आणिक
पाहे भरल्या नेत्रीं मुख
अम्मेचा ती हात आपुल्या हातीं प्रेमें धरी
त्यावरि गळति अश्रुच्या सरी ॥

*　*　*

भरलेल्या अंतरांतुन त्या वच बाहेर न फुटे
नयनीं प्रेमझरा परि सुटे
हृदयामधला भाव सकल तो विमलाश्रू दाविती
तेथें शब्द सकळ खुंटती
मुकेपणा तो बोलुन दावी अनंत हृदयांतलें
अन्योन्यांसचि सगळें कळे

थोडी ओसरली भावना
झाला अवसर संभाषणा
पुशिति पदरानें लोचनां
दोन अशा त्या माता दिसल्या गंगायमुनांपरी
नति मी केली दुरुनी करीं ॥

*                    *                    *

कुणबिण मग ती हळुच सोडिते पदराच्या गांठिस
काढी त्यांतून सुपारिस
अम्मेला द्यावयास जवळी दुसरें कांहिंच नसे
कुणबिण दीन दरिद्री असे
कृतज्ञतेला प्रकट कराया उत्सुकता मानवा
त्याविण समाधान ना जिवा
करण्या कृतज्ञता प्रकट ती
पुरते पोह्यांची मूठ ती
असुं दे वस्तु कशी वा किती
कृतज्ञतेचा सिंधु मावतो बाह्य–चिन्ह–बिंदूंत
जैसा विश्वंभर मूर्तित ॥

*                    *                    *

सुपारिचें तें खांड काढिलें अम्मेला तें दिलें
भरलें कृतज्ञतेनें भलें
साधें नव्हतें खांड, अमोलिक मंतरलेलें असे
जिविचा भाव त्यांत तो वसे
माणिकमोत्यांच्या राशीहुन त्रिभुवनलक्ष्मीहुन
अधिकचि कृतज्ञतेची खुण
होती कठिण सुपारी जरी
प्रेमें भिजलेली ती परी
अम्मेच्या ती देई करीं

देउन पाही पुन्हां तन्मुखा भरलेल्या लोचनीं
अम्मा विरघळली ती मनीं ।।

*　　*　　*

होतें मांडीवरतीं निजलें मूल गोड गोजिरें
साजिरें दमलें रडुनी खरें
रडावयाचें कसें थांबलें? काय जादु जाहली
माझी वृत्तिच ती गुंगली
क्षणांत पडला प्रकाश माझ्या हृदयीं सुंदर परी
कळली गोष्ट मला अंतरीं
नवपिढिचा तो बालारुण
होता करित अमित रोदन
होता भुका, न परि घे स्तन
भेदातीत प्रेम पिउन तो बालप्रभु[१] तोषला
खुलला फुलला मग हांसला ।।

*　　*　　*

मुसलमान मी, मी हिंदू, हें माता त्या विसरल्या
प्रेमसमुद्रीं त्या डुंबल्या
माता तेथुन एकच, त्यांचा धर्म एकची असे
एकच वत्सलता ती असे
हास्य, अश्रु ते एकच असती सगळ्यांना समजती
हृदयें हृदयाला जोडिती
एक प्रमधर्म तो खरा
कळतो सकळांच्या अंतरा
परि ना रुचतो अजुनी नरा

---

टीप--तो बालरूपी देव भेदातीत प्रेमाच्या दुधासाठीं भुकेलेला होता. तो बाळ म्हणजे देवच. लहान मुलांना आपण देवच मानतों.

हृदयांतिल या सद्धर्माला दडपुन पायांतळीं
जगिं या माजविती हे कली ।।

*                *                *

परस्परांचीं वैरें विसरा विरोध ते मालवा
प्रेमें जीवन निज रंगवा
परस्परांचीं उणीं न काढा परगुणगौरव करा
कर धरुनी सहकार्या करा
परस्परांच्या संस्कृतिमधलें हितकर मंगल बघा
बघुं दे दृष्टि सुंदरा शुभा
होऊं प्रभुचे यात्रेकरू
सगळे सुपंथ आपण धरूं
जग हें आनंदानें भरूं
कधीं परी हें होइल ? कधि का होईना, मी तरी
पूजिन प्रेमधर्म अंतरीं ।।

*                *                *

मोठे मोठे आग लावणें हाच धर्म मानिती
प्रेतें उकरुन तीं काढिती
इतिहासांतिल जनांपुढें हे भुतावळिच मांडिती
मंगल शिव ना ते दाविती
विझवतील ना वणवे कोणी तेलच ते ओतिती
सार्थक ह्यांतच ते मानिती
खोट्या स्वाभिमान–कल्पना
खोट्या धर्माच्या कल्पना
करिती स्मशान नंदनवना
न अहंतेचे महंत व्हावें धर्म अहंता नसे
धर्म प्रेमीं नांदत असे ।।

*                *                *

धर्माचें सत्प्रेम हेंचि हो सुंदर सिंहासन
दिसतो धर्म तिथें शोभुन
द्वेषमत्सरांचें तें आहे धर्माला वावडें
धर्मा प्रेम एक आवडे
प्रेमरूप तो परमेश्वरही प्रेमें त्याला पहा
पूजा प्रेमाची त्या वहा
सकळहि देवाचीं लेंकरें
कोठें भेद तरी तो उरे
झालें पाप अतां तें पुरे
जीवनपंथा उजळो आतां प्रेमदीप शाश्वत
पावूं मंगल मग निश्चित ॥

—नाशिक तुरुंग, नोव्हेंबर १९३२.

---

## ९६ परी बाळाला सकळ तीं समान

तीन वर्षांचा बाळ गोड आला । नसे सीमा जणुं त्याचिया सुखाला
हास्य त्याच्या मुखिं गोड किती साजे । मूर्ति गोंडस ती गोजिरी विराजे ॥

अधर मधुर तसे गोड गाल डोळे । सुखानंदानें भरुन जणूं गेले
काय झालें सुख एवढें अपूर्व । तया बाळा, ज्यापुढें तुच्छ सर्व ॥

"काय सांपडलें ? हंससि कां असा रे । लबाडा मजला सांग सांग सारें"
प्रश्न ऐकुन लागला हंसायाला । अधिक निज मोदा दाखविता झाला ॥

खिशामाजी तो बाळ बघूं लागे । "काय आहे रे त्यांत मला सांगे"
फिरुन हंसला मत्प्रश्न ऐकुनी तो । कौतुकानें परि पुन्हां तो पहातो ॥

हास्य ओंठांतुन दाबल्या निघालें । बाळकानें मग फूल काढियेलें
खिशांतूनी तें गोड गुलाबाचें । दिव्य सुंदर सद्धाम सुगंधाचें ॥

काढि बाळक तें प्रथम फल एक । दुजें काढी मग त्याहुनी सुरेख
आणि तिसरें तें कण्हेरिचें लाल । सकल संपत्ति प्रकट करी बाळ ॥

परी राहे सुम अजुन एक आंत । खिशामाजि पुन्हां घालि बाळ हात
फूल चौथें बाहेर काढियेलें । सर्व सुकलेलें वाळुन जें गेलें ।।
चार पुष्पें मज दाखवून हांसे । चार पुष्पें मज दाखवून नाचे
पुन्हां चारीही ठेवि तीं खिशांत । हंसुन बाळक तो दूर निघुन जात ।।
तीन पुष्पें रमणीय गोड छान । परी चवथें तें गलित शुष्क दीन
तुम्ही म्हटलें असतेंच तया घाण । परी बाळाला सकळ तीं समान ।।

—अमळनेर छात्रालय, १९२९.

---

## ९७ ग्रंथमहिमा

दुःखाला जे विसरवुनियां दिव्य आनंद देती
एकांतीं जे परम निकट स्नेहि सप्रेम होती
चित्तीं ज्यांच्या मुळि न शिवतो भेद हा साव चोर
सर्वांनांही सुखवित सदा ग्रंथ हे संत थोर ।।

कोणी येवो पुरुष वनिता बालिका बाल वृद्ध
सर्वां देती सुरस, करिती बुद्धितें जे समृद्ध
गांभीर्यातें किति तरि पहा जीवनीं आणितात
आपन्मग्ना हत–जन–मना ग्रंथ हे तातमात ।।

तुम्हां द्याया सतत असती ग्रंथराजे तयार
पावित्र्याची परम विमला ज्ञान–पीयूष–धार
जीं संसारीं तृषित हृदयें ग्रंथ हे ज्ञान –सिंधु
त्यांना होती मधुर, निवती सेवितां एक बिंदु ।।

झाले गेले कितिक परि ते ग्रंथ आहेत नित्य
आनंदाला वितरुन जगा दाविताती सुपंथ
सेवा धामीं विपिनिं करिती ग्रंथ तैशीच कारीं
नाहीं साऱ्या भुवनिं असले मित्र नित्योपकारी ।।

रात्रीं प्रातःसमयिं उघडा ग्रंथ केव्हांहि वाचा
युष्मत्सेवा विपुल करणें हाच आनंद त्यांचा
हिंडायाची अविचल–मनें काळ–सिंधूवरून
ज्याला इच्छा, फिरविति तया ग्रंथ हाता धरून ।

नानालापें रमविति मना ग्रंथ ही गोड वेणू
जें जें वांछी मन वितरिती ग्रंथ ही काम–धेनू
मातीलाही कनक करिती लाजवीती परीस
नाहीं मोठा हितकर सखा अन्य ग्रंथापरीस ।।

आयुष्याची हितकर दिशा ग्रंथ हे दाखवीती
जीवित्वाची शिकविति कला नूतना दृष्टि देती
उन्मत्तांना नमविति विपद्–ग्रस्त त्यां हांसवीती
प्रज्ञावंत स्थिर करुनियां मूर्ख त्यां लाजवीती ।।

संबोधूनी करिति जगदुत्कर्ष हे ग्रंथ साधे
ग्रंथालोकें मनुज–मतिला कार्य–कौशल्य लाधे
निःस्वार्थी हे अखिल–भुवनाचार्य सद्ग्रंथ दिव्य
मानव्याला उचलिति वरी पंथ दावीत भव्य ।।

माता भ्राता प्रिय–सख गुरू तात वा रम्य कांता
नानारूपें रमविति पहा ग्रंथ हे मानवांता
जे ना कोणाप्रतिहि कथिले ग्रंथकारें विचार
ते या ग्रंथीं प्रकट, उघडें अंतरांतील सार ।।

सांगे ना जी प्रियतमजनापाशिही ग्रंथकार
ओती ती हो खळबळ इथें, विवृत स्वांत–दार
पापुद्रे ते सकळ दिसती चित्त–कंदावरील
येई सारें हृदय कळुनी गूढ गंभीर खोल ।।

ग्रंथाकारें विमल अमरा दिव्यरंगा समाधी
लावण्याची परम मधुरा लेखक स्वीय बांधी
कैसे तेथें झळकति हिऱ्यांसारखे सद्विचार
जैसे नानाविध मणि तसे भावनांचे प्रकार ।।

ग्रंथामाजी अमर असती दिव्य चैतन्यरूप
कर्ते, विश्वा सुखविति सदा मोद देती अमूप
केव्हांही ना मृति शिवतसे थोर सद्ग्रंथकारा
लोकोद्धारा निशिदिन उभा द्यावया ज्ञान–धारा ॥

त्रैलोक्यीं या फिरविति तुम्हां ग्रंथ देऊन पंख
तत्त्वज्ञानी कवि मुनि तसे भेटती राव रंक
अंतर्यामीं उसळविति ते गोड आनंद–पूर
केव्हां केव्हां रडविति किती गाउनी दुःखसूर ॥

संसाराचें त्रिविध मनुजा दाविती ग्रंथ रूप
नाना–रूपें मनुज–हृदया ज्ञान देती अमूप
छेडोनीयां तरल हृदयीं सूक्ष्म तारा अनंत
जीवात्म्याला परिसविति तें दिव्य संगीत ग्रंथ ॥

जें जें कांहीं घडत असतें मानवी जीवनांत
अंतर्बाह्यच प्रकट करिती ग्रंथ सामर्थ्यवंत
अंतःसृष्टी गुरु किति तरी बाह्यसृष्टीपरीस
तें सद्ग्रंथांवरुन कळतें होइ अंतर्विकास ॥

केव्हांही दुर्मुख न दिसती ग्रंथ नित्य प्रसन्न
ना कोणाला कथितिल कधीं गोष्टि त्या भिन्न भिन्न
ग्रंथांऐसें परमसुख ना देखिलें या जगांत
ग्रंथीं होतां निरत मज तो होउं दे मृत्यु प्राप्त ॥

आदर्शाला, शुभ अशभ वा स्वीय रूपा बघाया
देती ग्रंथ स्वकरिं मनुजा, या मिषें उद्धराया
" सत्याचा तो विजय ठरला, सत्य पूजा सदैव "
सद्ग्रंथीं हें सतत असतें सूत्र हो एकमेव ॥

मातें ना तें विभव रुचतें राजवाडे नको ते
नातें गोतें मजसि नलगे मान मोठे नको ते
वस्त्रांची ती तलम न रुची ना अलंकार–काम
व्हावे माझ्या निकट परि हे ग्रंथ कैवल्य–धाम ॥

रात्रीं माझ्या निकट असुं दे तैलसंपूर्ण दीप
इच्छा नाहीं इतर असुं दे ग्रंथराजे समीप
कोठें रानीं मग शर्दांनि वा अन्य देशीं तुरुंगीं
आनंदानें परिहरिन मी काळ सद्ग्रंथ–संगीं ॥

—त्रिचनापल्ली तुरुंग, जानेवारी १९३१.

---

## ९८ गुढीपाडवा

नूतन संवत्सर आला । मोद मनाला बहु झाला
घालुन सुंदर सडे पथीं । शोभा करिती लोक किती
उंच गुढी ही उभारली । चमके तेजें नभःस्थळीं
संदर पट सुंदर माळा । गुढी सजविली सुमंगला
मंद वायुनें कशी डुले । जनमतिकलिका मुदें खुले
विसरा मागिल शुभाशुभ । नूतन करणें आरंभ
विसरा मागिल कलहांना । विसरा मागिल अपमाना
विसरा दुष्कृति मागील । टाका पुढतीं पाऊल
मागिल मंगल घेऊन । पुढेंच जाऊं चालून
निर्मा उज्वल आकांक्षा । निर्मा हृदयीं शुभ वांछा
नूतन जीवन सजवावें । आशेनें पुढती जावें
दुःख–दैन्य–नैराश्य–कथा । हरूं संहरूं जगद्–व्यथा
आनंद–रसा निर्मूं या । विपुल समस्तां देऊं या
आनंदाचें साम्राज्य । स्वातंत्र्याचें साम्राज्य
मांगल्याचें साम्राज्य । भूवर निर्मूं या आज
चला सकल संवगडे तुम्ही । आपणांस ना कांहिं कमी
स्वर्ग धरित्रीवर आणूं । पृथ्वी मोदानें न्हाणूं
विजयध्वज उभवं दिव्य । स्वातंत्र्याचे ते भव्य
चला उभारा गुढि उंच । कुणी न राहो जगिं नीच

करूं वर अपुल्या या माना । घेऊं सन्मानस्थाना
गुढी नाचते गगनांत । श्रद्धा नाचे हृदयांत
सदैव आशा वाळगुन । सदैव विजयी होऊन
गुढीपाडवा शुभंकर । करूं साजरा खरोखर ।।

—अमळनेर, छात्रालय. १९२९.

---

## ९९ नागपंचमी

अजि नागपंचमीचा । आला पवित्र वार
निज अंतरांग आज । राखा मुळीं न वैर
हृदयांत प्रेमपूर । भरपूर आज वाहो
आनंद सर्व जीवां । जगतांत आज राहो
हा नाग–पंचमीचा । दिन थोर थोर साचा
जो सर्प मूर्त मत्यु । त्यालाहि पूजण्याचा
मृत्यूहि गोड माना । सर्पाहि पूज्य माना
जो दुष्ट घेइ चावा । त्यालाहि देव माना
सर्वांतरीं सदंश । सर्वांत सच्चिदंश
आहे शिकावयाचें । हें नागपंचमीस
प्रेमा सदैव देऊं । अवघ्या चराचरास
आहे शिकावयाचें । हें नागपंचमीस
नागाहि पूज्य मानू । त्या प्रेम गोड देऊं
मग बंधबंधु आम्ही । किति गोड रीति राहूं
हा थोर थोर दिवस । दिधला तुम्हां अम्हांस
घालून पूर्वजांनीं । प्रेमा शिकावयास
वर्षांत एक दिवस । ना लुष्ट दुष्ट पाहूं
दिनीं ह्या तरी निदान । सर्वांस प्रेम देऊं
अद्वैत तत्त्व थोर । कर्मांत आणण्यास
आहे शिकावयाचें । या नागपंचमीस

ती संस्कृती उदात्त । अपुली शुभा अनंत
जणुं सांठवीत एका । ऋषि नागपंचमींत
त्या थोर पूर्वजांची । पाहून थोर दृष्टी
मज येतसे भरून । ही होइ अश्रु-वृष्टि
डोळ्यांमधून आज । वाहोत प्रेम-गंगा
सौख्यांबुधींत सारे । या रे विशंक डुंबा
वाणीमधून आज । माधर्य तें स्रवूं दे
करणीमधून सर्व । स्नेहामृता झरूं दे
वेलीवरील फूल । तेंही न आज तोडा
हिरव्या तणांकुराला । त्याही न आज तोडा
काडी न आज मोडा । लावा कुणा ढका न
प्रमांत आज राहो । सृष्टी उभी बुडून
घ्या पावडें न कुदळ । असतील जीवजंत
दुखवा न त्यांस आज । आणा न त्यांस अंत
भूमाय ही क्षमेची । मूर्ती तिला न दुखवा
न खणा मुळींच आज । गाऊन गीत सुखवा
जगतांत आज कोणा । भयभीति ती नसूं दे
आजी परस्परांत । विश्वास तो वसूं दे
लघु जीव कीड मुंगी । तृणपर्ण मृत्कणाही
दुखवी न आज बंधो । सर्वत्र देव पाही
सर्वत्र देव पाही । सर्वत्र पाहि जीव
सर्वत्र आत्मतत्त्व । समदृष्टि थोर ठेव
सकलांहि त्या सणांत । ह्या नागपंचमीस
आहे महत्त्व फार । वाटे मदंतरास

—अमळनेर, छात्रालय. १९२८.

## १०० दसरा

आला दसरा
रमणीय सुखाचा हंसरा ॥ आला० ॥

माझें मम ही सीमा लंघा
शमवा अंतःकलिचा दंगा
परोपकारामाजी रंगा
दुःखा विसरा ॥ रमणीय० ॥

अज्ञानाची संपो रात्री
लावा ज्ञानाच्या त्या ज्योती
भू-मातेची मंगल कीर्ती
भुवनीं पसरा ॥ रमणीय० ॥

सद्गुण-सोनें आज लुटूं या
दुर्गुण सारे दुरि घालवुं या
निज-चित्तावर मिळवूं विजया
हें ना विसरा ॥ रमणीय० ॥

मनावर जरी विजय मिळेल
स्वातंत्र्यादिक सहज येतिल
भाग्यश्री ती धांवत येइल
शंका न धरा ॥ रमणीय० ॥

—अमळनेर, छात्रालय. १९२७.

# १०१ संक्रांत

मकर—संक्रांत आली शुभ वेळा
सुखाच्या सुकाळा चला करूं
चला हलवा करूं मोठ्या आनंदानें
या रे सारीं जणें श्रमान्या
कलह—मत्सर कोळसे जमवा
शेगडी पेटवा हृदयाची
कळकळ तळमळ पितळी सुंदर
शेगडीच्यावर द्या ठेवून
स्नेहाचे घ्या तिळ निर्मळ साजिरे
भक्तीच्या शर्करे पाक करा
औत्सुक्याच्या हातें हळूच हालवा
सुंदर हलवा होऊं लागे
प्रेमाचे रोमांच कांटा हाच खुले
पितळी ती फुले हलव्यानें
दयेचा श्रद्धेचा सहानभूतीचा
रंग केशराचा हाच शोभे
दिव्य हा हलवा मनें मोहणारा
मनें जोडणारा अभिनव
चला एकांमेकां देऊं घेऊं खाऊं
गोडीनें या राहूं संसारांत

—अमळनेर, छात्रालय. १९२७.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्पष्ट प्रत
क्रं. ......... नं. .........
ता. .............
दा क्रं.

## १०२ लहान मित्राबद्दल

असे माझा तो मित्र हो लहान । तद्गुणांचें परि सकल करिति गान
ऐकुनीयां किति सौख्य होइ मातें । असे ठावें तें फक्त मन्मनातें ।।

दृष्टि निर्मळ मुख–मंडल प्रसन्न । दिसे न कधीं तो कुणालाहि खिन्न
दुःख निज लपवी, अन्य–दुःख जाई । हरायातें तो सदोदीत पाहीं ।।

वाणिमाजी वाहते प्रेम–गंगा । करि न कोणाच्या कधीं मनो–भंगा
हृदय हळु त्याचें फुलापरी रम्य । कार्य–शक्ति परी तदीया अदम्य ।।

शील त्याचें सर्वांशि निष्कलंक । करी जवळ सदा थोरगरिबरंक
गर्व चित्ताला नसेच तो ठावा । जगन्मित्र जणूं कुणाशीं न दावा ।।

अंतरंगीं खेळवी सद्विचार । घडे हातुन सर्वदा सदाचार
जरी घडली हातून अल्प चूक । अश्रु आणिल लोचनीं करिल शोक ।।

निज स्वल्पहि अपराध घोर मानी । परी दुसऱ्याचा चित्तिं कधीं नाणी
जरी दुसऱ्याचा अल्प गण दिसेल । स्तवन त्याचें करुनियां मनिं सुखेल ।।

देश–भक्तीचा तदंतरीं पूर । देश–सेवेचा हृदयिं उठे सूर
वस्तु परदेशी सदा ठेवि दूर । तया स्वातंत्र्याचीच हूरहूर ।।

स्वतां वापरुनी शुद्ध साधि खादी । वळवि परमनही गोड वचें बोधी
कार्य करुनी जो ना कधीं वदेल । निज स्तुति ऐकुन लाजुन जाईल ।।

कार्य दुसऱ्याचें सतत ये कराया । स्वयंसेवक तो सर्वदा सहाया
असा नाहीं पाहिला युवा अन्य । बघुनि त्याला वाटतें धन्य धन्य ।।

मुखीं त्याच्या तें हास्य सदा गोड । शब्द अमृतासम नाहिं तया जोड
प्रेम–पूर्ण किती सरळ मधुर डोळे । दिव्य सुंदर तें तेज भाळिं खेळे

दंत निर्मळ ते जणूं मोतियांचे । अधर पातळ जणूं वेल पोंवळ्यांचे
नाक सरळ परी जरा बांकदार । दिसे मुद्रा दिलदार ती उदार ।।

सदा गांठाया ध्येय उच्च पाही । सदा दिनदिन जो वरति वरति जाई
थोर त्याचें तें जीवन मज वाटे । तया पाहुन गहिंवरें हृदय दाटे ।।

असे त्याला शुभ नाम नामदेव । करो नामासम वर्तना सदैव
नाम अन्वर्थक देवराय होवो । तुझी त्याच्यावर सर्वदा दया हो ।।
प्रभो ! तुमच्या मी लागतसें पायां । तयावर ठेवा सदा दया–छाया
मनोरथ त्याचे पूर्ण करा देवा । तच्छिरावरतीं वरदहस्त ठेवा ।।
मदायुष्यहि हें तयालागिं द्यावें । असे जें जें मत्सत् तयास द्यावें
प्रभो ! सांभाळी त्यास तूं कृपेनें । सकल संकट मोहादि लयातें ने ।।
दयासिंधो हे दीनबंधु देवा । असे माझी प्रार्थना एकमेवा
मित्र माझा मत्प्राण जणूं अन्य । कृतार्थ करा तज्जीवनास धन्य ।।

—अमळनेर छात्रालय, १९२७.

---

## ६०३ लहानपणची आठवण

होतों मी लहान खेळत अंगणीं
आनंदोनी मनीं नाचतसें
नाचतां नाचतां हरपलें भान
क्रीडा–रस–पान करीतसें
टप्कन आवाज अंगणांत झाला
जीव माझा भ्याला एकाएकीं
भानावरी आलों पाहूं मी लागलों
अंगणीं हिंडलों चहूंकडे
देखिलें मी दृश्य अत्यंत करुण
माझे तें लोचन ओलावले
झाडावरूनीयां पिलूं पांखराचें
पडलेसें साचें विव्हळत
लोळा गोळा त्याचे पंख ना खंबीर
मन्मना गहिंवर आवरेना
आसन्नमरण पिला उचलोनी

घरांत घेवोनी शीघ्र आलों
मऊ कापसाची गादी छान केली
झारी आणीयेली पाणियाची
चिमुकली चोंच उघडून बिंदु
घातले, हृत्सिंधु हेलावत
मधून तें पाहे उघडोनी डोळे
हृदय कोंवळें माझें भरे
बारीक धान्याचे कण मी आणिले
चोंचींत घातले हळू हळू
मज त्या वेळेला कांहींही सुचेना
खेळ तो रुचेना खाणेंपिणें
पिलाच्या समीप बसून राहिलों
कोठेंही न गेलों सोडूनीयां
फिरवीत डोळे दुर्बळ पांखरूं
जीव हुरुहुरु करी माझा
हात लावतांच चीं चीं चीं चीं करी
हृदय विदारी त्याचा शब्द
त्याच्या मऊ अंगा हात माझा खुपे
कापूसही टुपे जणूं वाटे
होतें हबकलें उंचावरून फार
वेदना अपार होती त्यास
"कैसें याचें दुःख अजाण मी हरूं
काय मी रे करूं देवराया"
देवा आळविलें "वांचव पांखरा
दयेच्या माहेरा विश्वंभरा"
पांखराजवळ होतों मी बोलत
त्याला समजावित गोड शब्दीं
"खाई दाणा पाणी पी रे माझ्या राजा

काय तुज माझा राग येतो
नको रागावूं हो मीही रे लहान
वांचवाया प्राण झटें तुझे
होई बरा नीट होई जरा धीट
मग जा तूं थेट आईकडे
आठवण तुज येते का आईची
कुशीच्या उबेची गोड गोड
येईल स्मृती हें खरें जरी आहे
जरा होई पाहे चांगला तूं
येथें उणें तुज पडूं ना देईन
करांत घेईन कुरवाळोनी
गादी मऊमऊ तुला मी घालीन
त्यावर निजवीन थोपटून
माझें न ऐकशी कां रे गोड बोल
तोंड हें मलूल कां रे केलें
आई, बघ कसें करीत पांखरूं
कसें काय करूं सांग मज
आई बघ याला होतें काय तरी
कांहीं तरी करी उपाय तूं"
उपाय थकले झाला लोळा गोळा
मिटीत तें डोळा क्षणामाजी
मृदुल ती मान टाकून पडलें
हृदय रडलें माझें किती
पांखरा राजसा गेलास सोडून
मजसी तोडून क्षणामध्यें
मी ना कोणी तुझा वाटे तुला जरी
आई आहे परी घरीं तुझी

धाय मोकलील टाहो रे फोडील
प्राण ती सोडील तुझ्यासाठीं
चोंचीमध्यें दाणा येईल घेऊन
तुला न बघून रडेल ती
रडेल ती शोकें वेडी ती होईल
घिरट्या घालील भिरीभिरी
तुझ्या आईसाठीं तिच्या प्रेमासाठीं
नको ताटातुटी करूं राजा
मऊ मऊ तुला घातला बिछाना
टाकून तूं प्राणा जाशी परी
संबोधिलें ऐसें पांखरास किती
पावलें तें मृती हाय गेलें
मी माझ्या लहान बोललों भावास
" मूठमाती यास चल देऊं "
आईजवळून रेशमाचें वस्त्र
घेतलें पवित्र गुंडाळाया
सोंवळ्याची होती जुनी एक चोळी
फाडून घेतली धांदोटी मी
रेशमाच्या वस्त्रीं पिलाचा त्या देह
गुंडाळून, गेह सोडियेलें
बागेमध्यें गेलों मोगरे शेवंती
जेथें त्या फुलती तेथें गेलों
मोगऱ्याजवळ जागा नीट केली
रडत खणली खळगी एक
आंसवांच्या जळें भूमी ती शिंपिली
पवित्र ती केली जणूं आम्हीं
बगडाधोंड्यास बाजूस करोनी
देह उचलोनी ठेवियेला

फुलें ठेवीयेलीं शेजारीं तयाचे
अश्रू ते नेत्रींचे थांबती ना
शेवटलें स्नान घातलें अश्रूंचें
पिलाला प्रेमाचें दुःखाचें तें
डोळ्यांतील धारा स्नान त्या घालिती
लोटिली ती माती मोठ्या कष्टें

मऊ मेणाहून मऊ लोण्याहून
त्यावर लोटून दिली माती
डोक्यावर तेव्हां पक्षी आरडला
शोकानें भरलेला त्याचा शब्द
पिलाची ती आई पहावया आली
वर घिरट्या घाली केविलवाणी
" तुझें बाळ गेलें गेलें हो पक्षिणी
नको आरडोनी फोडी टाहो
त्याला नाहीं कांहीं पडूं दिलें उणें
मातृप्रेमाविणें सारें दिलें
दिलें त्याला पाणी दिला त्याला घास
दिलें बिछान्यास मऊ मऊ

नको ग आरडूं माउली तूं अशी
माझी कासाविशी होई फार "
... बैसली पक्षिणी वरी डहाळीवर
करी आर्त–स्वर आरडून
उरलेली माती लोटिली मी हातें
माता ती पहाते भरल्या नेत्रीं
कठोर वाटलें कर्तव्य तें मोठें
डोळ्यांतून लोटे अश्रुपूर
माती लोटुनियां झालों आम्ही दूर
माता येई तीर तैशी खालीं

हुंगीतसे माती
प्रेमळ पक्षिणी
डोळ्यांतून पाणी
माझ्या आलें
प्रदक्षिणा घाली
पिलास पक्षिणी
मातींत खुपसूनी
चोंच राही
शेवटला घांस
पिला जणूं दिला
शेवटल्या बोला
बोले जणूं
गेली ती माउली
पुन्हां डहाळीवर
माझा शोकें ऊर
फुटूं पाहे
गेली ती पक्षीण
उडूनियां दूर
करित आर्त–स्वर
गेली गेली
बळें शोकपूर
आम्ही आवरून
आलों हो निघून
घराप्रती
आईस म्हणालों
" शिवूं नको मज
माझें गेलें आज
पांखरूं तें
दहा दिन त्याचें
सुतक धरीन
आंसवीं भिजवीन
जागा त्याची
मोगऱ्याजवळ
रोज मी जाईन
तेथें मी रडेन
दोन्ही वेळां "
आई म्हणे, "वेड्या
सुतक कसलें
कर्तव्य तूं केलें
ये घरांत
पांखराला रोग
नव्हता कसला झाला
सुतक कशाला
तरी त्याचें
मोगऱ्याला तुझ्या
फुलें जीं येतील
त्यांत तें बसेल
येऊनीयां
तुम्हांला बघेल
प्रेमाला देईल
सुगंध अर्पील
गोड गोड
जा ये हातपाय
धुवून ते नीट
नको करूं कष्ट
आतां मनीं

जेवायाचें झालें घेई घांस चार
श्रमलासी फार पंढरी तूं "
आईचें बोलणें तें तदा ऐकिलें
माझे मी धुतले हातपाय
हातपाय माझे धुवुन मी आलों
जेवाया बैसलों खिन्न मनीं
पोटामध्यें एक घांसही न जाई
भरोनीयां येई अंतरंग
घांस नेतां वर तोंडाच्या जवळ
वरून तें जळ घळघळे
खाऊन बळेंच थोडेंसें मी गेलों
सद्‍गदीत झालों पुनः पुन्हां
कांहीं दिन चैन पडेना जीवास
पुढें पुढें त्रास ओसरला
शोक–पूर गेला आठवण गेली
खेळांत बुडाली वृत्ती पुन्हां
संसारसागरीं संस्मृती विस्मृती
करी चमत्कृती अभिनव
आज तो प्रसंग पुन्हां आठवला
लिहून काढला भरल्या मनें
लहानपणींचें प्रेमळ मन्मन
आहे का अजून जैसें तैसें ?
का झालें पाषाण भावनाविहीन
जगीं वावरून इतुकीं वर्षें ?
सोनियाचा घडा मानवी जीवन
ठेवावा भरून सत्–स्मृतींनीं
सत्स्मृतींची सुधा भरून ठेवावी
प्राशावी पाजावी स्नेहृयांसख्यां

गोड आठवणी ! लहानपणींचा
आज नाहीं साचा राहिलों मी
करी माझें मन पुन्हां आज ओलें
प्रेमानें भरलेलें करी पुन्हां
जीवनांत माझ्या पुन्हां प्रेमकळा
आणावी निर्मळा, आठवणी !
प्रेम मानवांना प्रेम पांखरांना
प्रेम सर्व प्राण्यां देऊं दे गे
प्रेम देऊं दे गे झाडा माडा तृणा
पाषाणा मृत्कणां देऊं दे गे
सर्वत्र पाहूं दे मला माझा आत्मा
वर्षु दे सत्प्रेमा निरंतर

—अमळनेर छात्रालय, १९२६

---

## १०४ मृत्युमित्र

( कोलेरिज कवीनें एका अर्भकाच्या मृत्युप्रसंगीं चारच ओळींचा एक श्लोक लिहिला, त्याचा अनुवाद.)

अद्याप पातकानें । नाहींच स्पर्शिलेली
अद्याप दुःखदैन्यें । नाहींच भाजिलेली
तों येइ मत्युमित्र । कळि गोड ही खुडीत
फुलली न पूर्ण तोंची । देवासमीप नेत
" देवासमीप आतां । कलिके फुले सुखानें
येथें किडी न खाती " । मृत्यू वदे सुखानें

— अमळनेर, १९२८.

---

## १०५ शांति कोण आणतें?

(जगांत मोठ्यामोठ्या लढाया होतात. शेवटीं तह होतात. शांति येते. परंतु हे तह, ही शांति कोण घडवून आणतें? सतीचे अश्रू व संताची प्रार्थना. एका इंग्रजी कवितेच्या आधारें)

शस्त्रास्त्रांनीं सुटति न कधीं प्रश्न ते जीवनाचे
ना केव्हांही मिटतिल लढे संगरानें रणाचे
शांती येते भुवनिं न कधीं बॉंबतोफादिकांनीं
अर्की निर्मी अमृतरस हें ऐकिलें काय कोणी ? ॥

युद्धीं जाई पति मरुनियां होइ पत्नी अनाथा
बाळा घेई जवळि रडते फोडुनी स्वीय माथा
शोकावेगें अगतिक अशी सोडिते अश्रु-धार
त्या अश्रूंनीं सकल जगतीं शांतिचा येइ पूर ॥

"येवो देवा! सकळ भुवनीं प्रेम, दावी सुपंथ
मद्बंधना, सतत चुकती, तूं क्षमा मूर्तिमंत"
ऐशी अंतःकरणिं करि जी प्रार्थना नित्य संत
आणी तीच प्रशमुनि रणें शांततेचा वसंत ॥

जे कारुण्यें कढत कढत श्वास तो संत सोडी
त्यांच्यामध्यें अभिनव असे तेज त्याला न जोडी;
धर्मग्रंथांमधिल सगळें सार तें मूर्तिमंत
सत्यश्रू[१] तो; उभय[२] मिळुनी होतसे आपदंत ॥

—त्रिचनापल्ली तुरुंग, फेब्रुवारी १९३१.

---

१ सती+अश्रु=सतीचा अश्रू. २ सतीचा अश्रु व संताचे सुसकारे.

# १०६ गायीची करुण कहाणी

(अमळनेरच्या स्टेशनाजवळ घडलेला प्रसंग)

रवि मावळला, निशा पातली, शांत दिसे हें जग
संपुन कामाची भगभग
तमें हळुहळू पहा पसरिलें पट काळें सावळें
त्यांत त्रिभुवन गुरफटविलें
गगनीं लुकलुकती तारका
अवलोकनास सुखकारका
न परी अंधकार-हारिका
चांदोबा बालकानंदकर आज दिसेना वरी
प्रभु तव कठोर करणी खरी ॥

* * *

" वियेल आजी गाय आपुली, बाबा! सोडूं नका
कोणी लाविल तिजला ढका
भरलेले गोजिचे दिवस तिज पाडस होइल नवें
आम्ही खेळूं मग त्यासवें
गोजी दूध बहुत देइल
खर्वस, आई ! तूं करिशिल
आम्हां नाहीं ना म्हणशिल
गंमत होइल मोठीच करूं मजा अतां लौकरी "
प्रभु तव कठोर करणी खरी ॥

* * *

बाप म्हणे निज मुलांस " मजला विचार करणें पडे
गोजिस उपवास घरीं घडे
दोन चार दिन जातिल अजुनी चिंता कांहि न करा
देवा हृदयामाजी स्मरा

जाइल जर गाय फिरावया
तृण तिज मिळेल तें खावया
काडी एक न घरिं द्यावया"
ऐसें बोलुन विचारपूर्वक दावें करि तो दुरी
प्रभु तव कठोर करणी खरी ॥

* * *

मंद मंद पाउलें टाकिते धेनु सुखानें चरे
पोटीं गर्भ वाटलें फिरे
प्रसवसमय ये जवळ तिचा मग तृण खाणें संपलें
पोटीं कळा, अंग कंपलें
पुढती तद्गति ती खुंटली
तेथें गरिब गाय थबकली
पथ गाडिचा असे पदतळीं
विचार तो न, प्रसववेदना तिजला कष्टी करी
प्रभु तव कठोर करणी खरी ॥

* * *

दहा वाजुनी गेले होते रात्रीचा समय तो
अधिकचि अंधकार दाटतो
त्या मार्गानें गाडी जाई वेळ तिची ती असे.
परि तें धेनुमानसीं नसे
पुढचें कोणाला कळतसे
मी मी म्हणणारा चुकतसे
ही तर गाय बिचारी असे
या मार्गानें जाइल गाडी विचार न तदंतरीं
प्रभु तव कठोर करणी खरी ॥

* * *

रागानें फणफणे भगभगे गाडी येई जवें
येणें जाहिर करि निजरवें

उशीर झाला जणुं जायाला बेफामपणा दिसे
स्वैरिणि धांवपळ करीतसे
" मार्गांतून दूर हो सरा
जरि परिसाल न होइल चुरा
जावें लागे मग यमपुरा "
प्रचंड ऐसा घोष करित ये, घसा न बसतो परी
प्रभु तव कठोर करणी खरी ॥

*   *   *

हांकेवरतीं गाडी आली शब्द तिचा ऐकला
धेनुस टाकवे न पाउला
सर्व गर्भ बाहेर न आला प्रसवसमयवेदना
होत्या होत तिला दारुणा
जों जों निकट गाडि येतसे
तों तों चित्त तिचें उलतसे
बळ हलण्यास जागचें नसे
मरणाचा अति दुःखद आला विचार धेन्वंतरीं
प्रभु तव कठोर करणी खरी ॥

*   *   *

मृत्युभयानें धेनु दचकली, खचली, थरके मन
मानस मृदुल निघे पोळून
बहुतेक तिचा गर्भ येत जों बाहेरी भीतिनें
तों तिज गांठिलेंच गाडिनें
विलंब पळभर तेथें नसे
करुणा दया न कांहीं वसे
झरझर गाडी ती जातसे
जसा विजेचा लोळ कोसळे गदारोळ ती करी
प्रभु तव कठोर करणी खरी ॥

*   *   *

दीन गायिनें मरणकाळचा हंबरडा फोडिला
गगनीं विलयाला पावला
जवळ न कोणी करुणासागर म्हणती परमेश्वर
परि तें कठिण तदीयांतर
अंग च्छिन्नभिन्न जाहलें
चेंदुन जाइ वत्स कोवळें
तेथें रक्त–तळें तुंबलें
क्रूर गाडिनें बळी घेतला धेइ असे किततरी
प्रभु तव कठोर करणी खरी ।।

* * *

वज्रालाही पत्थरासही पाझर फुटते तदा
पाहुन धेनूची आपदा
प्रातःकाळीं करुण दृश्य तें पाहुन पुलकित जन
भरती पाण्यानें लोचन
हळहळताती नारीनर
करिती गमन मग घरोघर
वदती किति एक परस्पर
सुखदुःखांच्या द्वंद्वामधुनी सुटली ही लौकरी
प्रभु तव कठोर करणी खरी ।।

* * *

केविलवाणी करुण कहाणी धन्यास जेव्हां कळे
मानस त्याचें शोकें जळे
म्हणे मनीं "निज बाळांचें नच हितवच मी ऐकिलें
कटु हें फळ मज देवें दिलें"
येती अश्रू डोळयांतुन
स्फुंदस्फुंदत बाळकगण
घरांत रडती नारीजन

असे कोण तारिता, मारणें त्याच्या चित्तीं जरी
प्रभु तव कठोर करणी खरी ।।

—अमळनेर, १९२६.

---

## १०७ जीवनमित्रास

(मरण ज्याच्या जवळ आलें आहे, परंतु जो जगूं इच्छित आहे असा एक तरुण आपल्या जीवनास उद्देशून म्हणतो. इंग्रजींत अशी एक लहान कविता मी वाचिली होती. ती कल्पना मनांत येऊन ही मी मराठींत लिहिली आहे.)

"चिरमित्र सखा सहोदर
मम तूं मित्र उदार सुंदर
सहसा निघतोस सोडुनी
मम माया सगळीच तोडुनी ।।

वदुं काय कसें कळेच ना
वच कंठातुन तें निघेच ना
सगळें स्वचरित्र आठवे
हृदयीं शोक अपार सांठवे ।।

सदया सखया ! मनोहरा !
वद केवीं उघडूं मदंतरा
मज सोडुन ना गड्या निघे
मम आशा मम हेतु तूं बघे ।।

किति येत विचार मोहना !
प्रिय मित्रा मम गोड जीवना
सखया ! मज एक ठाउक
घडली भेट तुझी, न आणिक ।।

जमली तव नित्य संगती
परि केव्हां कोंधि वा किमर्थ ती
न कळे न वळे मला लव
सगळें त्या प्रभुचेंच लाघव ॥

भरली तव फार आवडी
किति माझी जमली तुझी गडी
दिनरात्र सदैव सन्निधीं
तुझि माझी नव्हती तुटी कधीं ॥

हंसलों रडलों कितीकदां
परि देशी मज धीर तूं सदा
सुखदुःखरसीं सखा खरा
मज देशी न कधींहि अंतरा ॥

रडवीत अनंत आपदा
परि तूं मन्निकटीं उभा सदा
पुशिशी स्वकरें मदश्रुतें
प्रियबंधो किति केंवि वर्णं तें ॥

सखया ! सकला मदंतर–
स्थिति तूं जाणिशि जेंवि ईश्वर
सदसत् मम जें तुजप्रती
कळलेलें तुज सांगुं मी किती ॥

विहरून अभिन्न आपण
भुवनीं जो मिळला कधीं कण
कटु गोड तसाच चाखिला
न दुजा भाव मनांत राखिला ॥

बघतां तरि तूं अमूर्तसा
हृदयीं राहुन निर्मिशी रसा
तव रूप न देखिलें जरी
तव तो वास सदा मदंतरीं ।

नयनें नयनास पाहणें
तुज बाहेर तसें विलोकणें
वरिशी मशिं एकरूपता
असशी व्यापुन पूर्ण हृत्‌–स्थिता ॥

कधिं शुभ्र सुरेख चांगले
कधिं काळे तुज रंग मी दिले
सजवीत तुला जसें सुचे
नटशी तूंही तसा, तुला रुचे ॥

न कधीं तुज रुष्ट देखिलें
किति तूं प्रेम मला सदा दिलें
चढशी पडशी बरोबर
बसशी वा पळशी भराभर ॥

प्रगती अथवा अधोगती
त्यजिली तूं न मदीय संगती
गगनीं चढवूनियां वरी
तुज मी दाखविली पुन्हां दरी ॥

कधिं वैभवता तुला दिली
कधिं कष्टस्थिति तीहि दाविली
तुज ना कुरकूर माहिती
तव निष्ठा तरि वर्णुं मी किती ॥

कधिं रम्य विलास मांडिले
झणि सारे परि ते झुगारिले
वदशी परि एक शब्द ना
करुं मित्रा तव केंवि वर्णना ॥

मम बाल्य तसेंच यौवन
बघुनी जाशिल काय सोडुन ॥

न मदीय विकास जोंवरी
सखया तूं न वियोग आदरी ॥
मज सोडुन घोर या तमीं
नच जाई, वरतीं चढेन मी
तुजला नटवीन मी बघ
पसरीन त्रिजगांत सौरभ ॥
घसरेन न मी अतःपर
मम कर्तृत्व दिसेल सुंदर
धवलोज्वल कांति देइन
तुजला जाउं नकोच सोडुन ॥
पुरवीन गड्या तुझे लळे
पिकवीतों बघ मुक्तिचे मळे
बघ हे दिसती मुके कळे
न फुलावे वद का ? तुला कळे ॥
कसुनी खपुनी किती बरें
बघ केली मृदु शुद्ध भूमि रे
झणि येइल खास पाउस
सखया जाइ न तूं, न रे रुस ॥
जरि मी फिरलों इतस्तता
क्षण मी ना दवडीन रे अतां
घडलीं जरि हातुनी अघें
मज कंटाळुन जाइ ना, बघे ॥
करितों अघ–मार्जनाप्रती
सखया ! नित्य करीन सत्कृती
अजिपासुन नूतना दिशा
मज लागे, मग सोडिशी कसा ? ॥
अपुले रमणीय गोड ते
स्मरणीय स्मर तूं प्रसंग ते

भरसागरिं तूं न सोडिलें
दिसतें तीर न सोड, ना भलें ॥
किति रे अनुरक्त आपण
कधिं झालों न वियुक्त रे क्षण
अशनीं शयनीं जिथें तिथें
अविभक्त, स्मर, अंतरिंग तें ॥

जरि वृंत गळून जातसे
जगतीं या जगणें फुलें कसें ?
जरि नीर समग्र आटलें
तरि तें नीरज केविं रे फुले ? ॥
रुसुनी जरि जाइ अंबर
च्युत नक्षत्रततीहि सुंदर
तरुला जरि मळ ना धरी
तरि कैसें फळफूल तें वरी ? ॥
खुडितां स्पृहणीय अंकुरा
मिळतें तें न कणीस ना तुरा
जरि निर्झर बंद होइल
तरि वापी सुकुनीच जाईल ॥
करितां दुरि जीवनाश्रया
मग पावे अणि वस्तु ती लया
न तुझ्यावर का विसंबून ?
करि, मित्रा ! न कठोर रे मन ।
तुज निष्ठुरता न शोभते
तवठायीं मम दृष्टि लोभते
तुजवीण जगीं न मी उरें
मज आधार तुझाच एक रे ॥
जांग होइन नीट चांगला
मग सारे म्हणतील हा भला

जगतास सुखास देइन
न जगाला मुळि भार होइन ॥
मम गोड फुलेल जीवन
मग तद्गंध सुटेल पावन
जगता वितरीन मी रस
जगता या नटवीन नीरस ॥

फुलवी सुमनांस भास्कर
नटवी जीववि सृष्टि सुंदर
फुलवीन तशीं जनांतरें
मनि माझ्या किति ये असें बरें ॥
किति खेळवितों मनीं अशा
मधु आशा, परि मारिशी कशा ?
मम हेतु अपूर्ण राहती
किति वाटे मनि खेद ना मिति ॥

न तुला दिसली सरस्वती
मम संगें, न तशी रमा सती
दिसली न उमाहि चिन्मया
म्हणुनी काय अधीर जावया ? ॥
मजला जगिं मित्र ना कुणी
मज गेले सगळेच सोडुनी
मजला तव आस होति रे
परि तूंहि त्यजिशी कसा बरें ? ॥
गळले सगळे मनोरथ
मम आशा सगळ्या पदच्युत
पुरवी न जगांत एकही
मम सद्धेतु कठोर देवही ॥

सगळा मम धीर मावळे
किति नेत्रांतुन नीर हें गळे
दिधलें मम सर्व मी तुला
परि जाशी अजि सोडनी मला।

जगिं जन्म मदीय जाहला
तव मी स्नेह तदैव जोडला
तुज मी दिनरात्र पूजिलें
परि मातें अजि तूंच टाकिलें ।।

रडण्यास्तव मात्र जन्मलों
जगता केवळ भार जाहलों
मज सोडुन जाशि, जीवना !
किति जाळी, बध, शोक मन्मना ।।

मज सोडुं नयेच तं, असें
जरि वाटे बहु, तें घडे कसें ?
मजपासुन जाशि जें दुरी
पहुडेन क्षितिला हतापरी ।।

जगतास समीप ओढलें
परि मातें जगतेंच सोडिलें
अपवाद तुझा तरी कसा ?
नशिबाचा मम खेळ हा असा।

करुं मी तरि काय हाय रे !
मम उध्वस्त समस्त हाय रे
पुरला मम हेतु एक ना
मज जाशी रडवून, जीवना ! ।।

किति रे हुरहूर मानसीं
हृदयीं क्रंदन घोर ना मशीं

मम स्वप्न समस्त संपलें
जणुं शंपाहत चित्त कंपलें" ॥

विनवून सुदीन जाहलों
सखयाच्या किति कंठि झोंबलों
करुणा नुपजे मनामधीं
मम हेलावुन ये हृदंबुधी ॥

फिरुनी वदलों सगद्गद
" मम मित्रा ! धरितों तुझें पद"
परि तो न बघेहि निष्ठुर
अति झाला गमनार्थ आतुर

वच ऐक सख्या मदंतिम
परम प्रेम तुझ्यावरी मम
न मज त्यज, मत्सवें रहा
बघशी मन्मुखही न रे अहा ॥

सकल प्रियबंध लोपले
तव माझ्यावर नेत्र कोपले
तुटतें अजि भावबंधन
गळतें मद्हृदयावलंबन ॥

सखया ! जरि जाशि जा परी
वदतों एकच, ठेव अंतरीं
तुजला पकडीन मी पुन्हां
करुनी जाशि मदीय तूं गुन्हा ॥

किति देख अनंत काळ हा
तुजला ओढिन मी पहा पहा
जगता वितरीन मी सुख
मग माझें करिशील कौतुक ॥

करुनी जगदापदा दुरी
भरुं सारी धरणी सुख-स्वरीं
वितरून मुदा शुभा जनीं
कलहद्वेष समूळ मारुनी,

जगतांत समस्त बंधुसे
बघ, नांदूं अम्हि सर्व सौरसें
सकळां समता स्वतंत्रता
करुं भूमीवर स्वर्ग नांदता ॥

करुनी निज-कार्य-पूर्णता
तुजलाही वितरीन धन्यता
तरि जाइ, विलंब ना करीं
स्थिर मी शांत विकंप अंतरीं

मज सोडिशि तूं, न मी तुला
जननी सोडुन जातसे मुला
न फिकीर, पुनःपुन्हां परी
तुज भेटेन रवींदु जों वरी ॥

शतवारहि जन्म घेउन
मम हेतूंप्रति पूर्ण पाहिन
तुज खेंचिन मी पुनः पुन्हां
दमवी कोण बघूंच ये कुणा ॥

तरि ये, मम रामराम घे
हृदयीं स्नेह धरून तूं निघे
परतून तुला विलोकिन
अविलंबें, हृदयासि लाविन

जरि जाशि विशंक जा परी
विलरी हा मज आशि अंतरीं
तुज शेवटचेंच मागणें
करि तें पूर्ण गड्या न ना म्हणे ॥

" धृतिचा न झरा सुको, झरो;
मरतांही तम ना मनिं शिरो "
मज दे सखया असा वर
मग जाई तुज जायचें जर ॥

—त्रिचनापल्ली तुरुंग, जानेवारी १९३१.

## १०८ कसें तरी मग जग दिसतें ?

नसतीं जगिं या जरी मुलें
नसतीं जगिं या जरी फुलें
नसते अंबरिं वरि तारे
नसते गाणारे वारे
कसें तरी मग जग दिसतें । हें मन्मतिला ना कळतें ॥

जरि जगतीं या जल नसतें
रविचें तेज जरी नसतें
नसते जरि ते तरुवेल
नसते दिनरजनी—खेळ
कसें तरी मग जग दिसतें । हें मन्मतिला ना कळतें ॥

नसती जरि ही वसुंधरा
धनधान्यवती मनोहरा
विहंगम जरी हे नसते
गाय बैल हे जरि नसते
कसें तरी मग जग दिसतें । हें मन्मतिला ना कळतें ॥

नसत्या प्रेमळ जरि माता
प्रेमसुधेच्या ज्या सरिता
परोपकारी जन नसते
परदुःखें यन्मन जळतें
कसें तरी मग जग दिसतें । हें मन्मतिला ना कळतें ॥

ग्रंथ संग्रहालय स्थळ ... नं. ता. ... ग्रा. ... (stamp)

कृतज्ञता जरि ती नसती
प्रेम बंधुता जरि नसती
अश्रु जगीं या जरि नसते
हास्य जगीं या जरि नसतें
कसें तरी मग जग दिसतें । हें मन्मतिला ना कळतें ॥
सुंदर सकळहि या वस्तु
मधुर मनोहर या वस्तु
जगणें म्हणुनी धरेवर
सह्य होतसे खरोखर
हें वैभव हें सुख नसतें । कसें तरी मग जग दिसतें ॥
—अमळनेर, १९२७.

---

## १०९ प्रेमाचें गाणें

( भूतकाळ भविष्यकाळाला गाणें म्हणतो )
बा नीज, सख्या! नीज गड्या लडिवाळा!
राजसा परम वेल्हाळा ॥
या सकळ जगीं उठले विषमय वारे
द्वेषाचे उडत फवारे
ही अखिल मही सूडबुद्धिनें भरली
हृदयेंच जणुं कुणा नुरलीं
जगिं झाला रे सुळसुळाट कामाचा
क्रोधाचा मात्सर्याचा
परि भिऊं नको तूं, बाळ!
धरि प्रेमवृत्ति तूं अढळ
प्रेम हेंच तव दिव्य बळ
या प्रेमाच्या सामर्थ्यें जगताला
देशील वळण नव, बाळा ॥ बा नीज० ॥

* * *

सत्प्रेमाची आहे अद्‌भुत शक्ती
प्रेम हीच खरि चिच्छक्ती
या प्रेमाचें वर्णन कोण करील
तोकडे शब्द पडतील
तूं प्रेमाचा सागर हृदयीं जमवी
सुकलेलें जग हें फुलवी

शमवाया विश्वद्वेष
ये घेउन तूं प्रेमास
भरपूर वांटि जगतास
तूं देशील प्रेम जरी जगताला
बदलशिल आजच्या काळा ॥ बा नीज० ॥

* *

ना जगांत कधीं प्रेम दिल्यानें सरतें
हें प्रेम कधीं ना मरतें
तें दिधल्यानें वाढतसे, जागवितें
परहृदयिं सुप्त जें असतें
परहृदयाचा विकास करितें प्रेम
प्रेम एक जगदभिराम

बाळ तूं निजोनी आज
प्रेमानें हृदयीं साज
हो सज्ज पुढें किति काज
तूं नीज अतां येइल तव कृति-वेला
करि तेव्हां प्रेम-सुकाळा ॥ बा नीज० ३।

—त्रिचनापल्ली तुरुंग, डिसेंबर १९३०.

## ११० आत्मा ओत रे ओत

आत्मा ओत रे ओत
निर्मावा दिव्य तेजाचा स्रोत ॥ आत्मा० ॥

फुलवी रे फुलवी
सु–कला फुलवी
हंसवी रे हंसवी
विद्या हंसवी
राष्ट्रांत पेटव निर्मळ ज्योत ॥ आत्मा० ॥

होऊं दे होऊं दे
राष्ट्र–विकास
होऊं दे होऊं दे
शास्त्र –विकास
वाहूं दे शतमुख संस्कृति–स्त्रोत ॥ आत्मा० ॥

प्रकट करी रे
अंतरींचा देव
प्रकट करी रे
अंतरिचा भाव
असशी तूं दिव्य रे वतनाचा खोत ॥ आत्मा० ॥

परमात्म्याचा
पुत्र तूं अभिनव
बळवंताचा
पुत्र तूं अभिनव
निर्भय असशी तूं केसरि–पोत ॥ आत्मा०॥

स्वातंत्र्याचें
मंदिर सुंदर
शास्त्रकलांचे

कळस मनोहर
दैदीप्यमान त्याला झळकोत ॥ आत्मा० ॥

—नाशिक तुरुंग, फेब्रुवारी.

---

## १११ निरोप[१]

निरोप धाडूं काय तुला मी बंधो गुण–सुंदरा
त्वत्स्थिति रडवी मम अंतरा

असहाय तुझी दशा बघोनी मन्मन हें गहिंवरे
सुटती नयनांतुन शत झरे

बघतो सत्त्व तुझें ईश्वर
त्याचा असशी तूं प्रियकर
म्हणुनी येई आपद्‌भर

कृपा प्रभूची होइ जयावर जगिं सुख ना त्या नरा
घण हाणुन तो बघती हिरा

* * *

जसें जसें हें दूर करितसे धिक्कारुनि जग कुणा
घडि घडि करुनि मान–खंडना
जसे जसे जगदाघात शिरीं बसती निशिदिन मुला
भाजिति अंगार जसे फुला

होउनि निरहंकृति तसतसा
बनतो निर्मळ जणुं आरसा
पाहिल तो प्रभु–पद–सारसा

भाग्य मिळे त्या भेटायाचें जगदीशा सुंदरा
होइल मुक्त निरंजन खरा

* * *

---

१ घरीं फार बिकट परिस्थितींत असलेल्या माझ्या उत्तम पाटील नांवाच्या मित्रास धाडलेला निरोप.

नको घाबरूं नको बावरूं अभंग धीरा धरी
करुणा वितरिल तो श्रीहरी
जगांत त्याच्याविण कोणाचा खरा आसरा नसे
बाकी फोल सोलपट जसें

दे तूं सुकाणु त्याच्या करीं
तोची विपत्समुद्रीं तरी
नेइल सांभाळुन बंदरीं
सूत्र प्रभु-करिं देइल धरुनी श्रद्धा अचलाऽमरा
नाहीं नाश कधीं त्या नरा ॥

* * *

श्रद्धा जिकी श्रद्धा वितळवि संकट्मय पर्वता
श्रद्धा अमृतधारा मृता
विपत्तिमिर संहरी चंद्रमा श्रद्धेचा सोज्वळ
श्रद्धा दुर्बल जीवा बळ

श्रद्धा असेल यन्मानसीं
तो जगिं होइल ना अपयशी
संजीवनीच श्रद्धा जशी
श्रद्धा धरुनी गडबडलेल्या मतिला करि तूं स्थिर
होइल विपद्दशेचा चुर ॥

* * *

कर्तव्याचा पंथ बिकट हा उत्साहा वाढवो
निश्चय तिळभर ना हालवो
जशीं संकटें येतील तशी त्वदीय चमको प्रभा
येइल मंगल वेळा शुभा

तुज मी सहाय्य करुं काय रे
पामर निर्धन मी दीन रे

झरती माझे लोचन–झरे
त्वदर्थ निशिदिन आळवीन परि सखया जगदीश्वरा
जो जोडितसे उभयांतरा ॥

—नाशिक तुरुंग, मे १९३३.

---

## ११२ भारतमाता

हे भारतमाते मधुरे !
गाइन संतत तव गान ॥
त्याग–तपस्या–यज्ञ–भूमि तव जिकडे तिकडे जाण
कर्मवीर किति धर्मवीर किति झाले तद्गणना न ॥ गाइन० ॥
दिव्य असें तव माते करितां इतिहासामृत–पान
तन्मय होतों मी गहिंवरतों हरपुन जातें भान ॥ गाइन० ॥
देउन देउन दीन जाहलिस तरिही देशी दान
परजीवन सांभाळिशि संतत अर्पुन अपुली मान ॥ गाइन० ॥
सत्त्वाचा सत्याचा जगतीं तूंचि राखिशी मान
तुझ्या कथा ऐकाया उत्सुक भगवंताचे कान ॥ गाइन ०॥
एक मुखानें किति वर्णुं मी आई तव महिमान
थकेल शेषहि, थकेल ईशहि; अतुल तुला तुलना न ॥ गाइन० ॥
धूळीकण, फळ, फूल, खडा, वा असो तरूचें पान
तुझेंच अनुपम दाखविती मज पवित्र तें लावण्य ॥ गाइन० ॥
मांगल्याची माधुर्याची पावित्र्याची खाण
परमेशाच्या कृपाप्रसादें नुरेल तुजला वाण ॥ गाइन० ॥
समरसता पावणें तुझ्याशीं मदानंद हा जाण
यशःपान तव सदैव करितों करितों मी त्वद्ध्यान ॥ गाइन० ॥
बहुभाग्यानें बहुपुण्यानें झालों तव संतान
तव सेवा मम हातुन होतां हरपो माझा प्राण ॥ गाइन० ॥

—त्रिचनापल्ली तुरुंग, जानेवारी १९३१.

## ११३ मनमोहन मूर्ति तुझी माते

मनमोहन मूर्ति तुझी माते ॥
सकल जगाची माय माउली
गोड असे किति नातें ॥ मनमोहन० ॥
कुरवाळिशि तूं सकल जगाला
निववशि अमृत–हातें ॥ मनमोहन० ॥
स्नेहदयेचे मळे पिकविशी
देशी प्रेमरसातें ॥ मनमोहन०॥
सकळ धर्म हे बाळ तुझे गे
सांभाळिशि त्यांतें ॥ मनमोहन० ॥
भेदभाव तो तुजजवळ नसे
सुखविशि तूं सकळांतें ॥ मनमोहन० ॥
श्रद्धा देशी ज्ञाना देशी
सारिशि दूर तमातें ॥ मनमोहन० ॥
थोर ऋषी तव थोर संत तव
शिकविति शुभ धर्मातें ॥ मनमोहन० ॥
सरिता सागर सृष्टि चराचर
गाति तुझ्याच यशातें ॥ मनमोहन० ॥
तव शुभ पावन नाम सनातन
उचंबळवि हृदयातें ॥ मनमोहन० ॥
त्वत्स्मरणानें त्वद्गुण–गानें
भरुनि मदंतर जातें ॥ मनमोहन० ॥
तव सेवा मम हातुन होतां
मरण सुधारस वाटे ॥ मनमोहन० ॥

—त्रिचनापल्ली तुरुंग, जानेवारी १९३१.

## ११४ माझी एकच इच्छा

एक मात्र चिंतन आतां एकची विचार
भाग्यपूर्ण होईल कधीं हिंदभूमि थोर
दुःख दैन्य जाउन विलया होउं दे स्वतंत्र
जन्मभूमि माझी, ध्यानीं मनीं हाच मंत्र ॥

देशदेवसेवेसाठीं सर्वही करीन
चित्त वित्त जीवन माझें सर्व हारवीन
प्राणपुष्प माझें माझ्या मातृभूमिकामीं
जरी येइ उपयोगाला कितिक होइ नामी ॥

मेघ जेविं जीवन सारें देइ या धरेला
जीवना समर्पुन जाई लो परी लयाला
परार्थर्थ जीवन त्याचें, तेविं हो मदीय
मायभूमिसाठीं माझें सर्व कांहि होय ॥

कदा तुला पाहिन आई ! वैभवीं अपार
पारतंत्र्यपंकांतुन तूं होशिल कधिं पार
चैन ना मुळीं मज पडतें, घोर हाच भातें
त्वदुद्धारकार्यीं केव्हां कृति करीन हातें ॥

थोडि फार सेवा होवो या मदीय हातीं
घडे जरी, होइल मजला सौख्य जीवनांतीं
याच जन्मि याची डोळां मी तुला स्वतंत्र
बघेन का ? न कळे कैसें असे दैव–तंत्र ॥

तुझें भाग्य पाहिन डोळां मायभूमि काय ?
मम प्राणज्योती आधीं मालवेल काय ?
असो कांहि होवो घेइन फिरुन अन्य जन्म
तुझी करुन सेवा जाइन होउनी सु–धन्य ॥

जरी देह पडला माझा तरिहि मी फिरुन
इथें जन्म घेइन आई निश्चयें करून

पुनःपुन्हां त्वत्सेवेचा सदानंद–मेवा
मला मिळो, माते ! पुरवा हेतु देव–देवा ! ॥
पुष्प, पर्ण, तरु, वेली वा शिलाखंड हीन
पशु, प्राणि, पक्षी कोणी, सर्प, मुंगि, मीन
कोणताहि येवो मजला जन्म कर्म–योगें
दुःख नाहि त्याचें, परि तें दुःख त्वद्वियोगें ॥
तुझ्या धलिमाजी वाटे लोळणें सुखाचें
इथें पाय पावन फिरले रामजानकीचे
इथें नामघोषें फिरले संत ते अनंत
तुझ्या धुळीमधला झालों कीट तरि पसंत ॥
तुझी धूळ आई प्रेमें लावितों स्व–भाळीं
इथें जन्मलों मी म्हणुनी प्रेम–नीर ढाळीं
कितीकदां जातों आई हृदयि गहिंवरून
राहतों धुळींत पडूनी साश्रु सद्गदून ॥
तुझ्या धुळीपुढती मजला मोक्ष तुच्छ वाटे
तुझ्या धुळीमध्यें मजला मोक्ष नित्य भेटे
तुझी धूळ म्हणजे आई सर्व भाग्य माझें
तुझ्या धुळीसाठीं आई झुगारीन राज्यें ॥
तुझा आइ ! न वियोग मला जन्मजन्मीं व्हावा
कोणताहि जन्म मला यो तो इथेंच यावा
सदा तुझ्या चरणांपाशीं आइ ! मी असेन
स्वर्ग मोक्ष त्यापुढतीं मी तुच्छ ते गणीन ॥
तुझे पवन पावन, आई ! तुझें पुण्य पाणी
तुझें निळें आकाश किति स्वच्छ रत्न–खाणी
तुझे चंद्र तारे दिसती किति सुरम्य गोड
तुला नसे साऱ्या भुवनीं खचित आइ ! जोड ॥
तुझे पाय सागर माते अहर्निश क्षाळी
तुझ्या शिरीं शुभ कर ठेवी शंभु चंद्रमौळी

तुझ्या रूपलावण्याला ना तुला जगांत
तुझें चराचर हें अवघें स्तोत्र नित्य गात ॥

तुझा थोर महिमा, माते! मंगले! उदारे!
तुझी कीर्ति वर्णुन धाले थोर थोर सारे
ऋषी वदे 'दुर्लभ आहे जन्म भारतांत'
देव तेहि जन्मुन येथें आइ ! धन्य होत ॥

तुझें भाग्य न दिसे म्हणुनी विश्व खिन्न होई
तुझें भाग्य गेलें म्हणुनी सृष्टि खिन्न होई
तुझीं मुलें परि कां अजुनी उदासीन, आई !
त्वदुद्धारकार्यासाठीं उठति कां न भाई ? ॥

उठा सकळ बंधूंनो ! या करुंच मुक्त माय
रिपुभुजंगपाशांत तिचे ते पवित्र पाय
पक्षिराज गरुड बनूं या मुक्त ही स्वमाता
झणीं करूं, न विलंबाची वेळ आज आतां ॥

विलंबास जरि का क्षणही बंधुनो कराल
माय ही मरेल अहा हा! तुम्हिहि रे मराल
उठा, झोंप सोडा, तळपा सूर्यसे प्रभावें
करा कार्य नेटें दास्या झुगारून द्यावें ॥

चला, उठा, मी तरि आतां चाललों पुढारा
मातृलोचनींच्या मजला बघवती न धारा
तुझे अश्रु आई ! माझ्या मी करीं पुशीन
प्रतिज्ञेस करितों तुजला मुक्त मी करीन ॥

आइ ! धायिधायी रडतों त्वद्विपत् बघून
पुनः पुन्हां कार्याला मी लागतों उठून
बुद्धि हृदय गात्रें माझीं चंदनासमान
झिजोत गे द्याया तुजला जगीं श्रेष्ठ स्थान ॥

दिगंतांत वृद्धिगत मी कीर्ति तव करीन
तुझी मूर्ति मधुरा दिव्या अंतरीं धरीन
तुझें नाम संतत ओठीं गान गोड कंठीं
तुझी प्रीति अतुला अचला सांठवीन पोटीं ॥

—त्रिचनापल्ली तुरुंग, सप्टेंबर १९३०.

---

## ११५ प्रभु! भारतिचें वैभव कोठें गेलें

प्रभु! भारतिचें वैभव कोठें गेलें
राष्ट्र हें दिसे मेलेलें

तो भाग्याचा भास्कर अस्ता गेला
अंधार भरोनी उरला

ती सद्विद्या सकल कला मालवली
दैन्याची पाळी आली

गोकुळें येथलीं गेलीं
विपुलता येथली गेली
अन्नान्नदशा ही आली

हे कठिण कसे दिवस असे रे आले
कोणतें पाप तें झालें ॥ प्रभु० ॥

* * *

श्रीरामांनीं भूषविली ही भूमी
सत्त्वाढ्य हरिश्चंद्रांनीं

शिबि, मांधाता, राजे येथें झाले
परि दुर्दिन आजी आले

श्रीशिव, बाजी गाजी, रणशार्दूल
येथेंच खेळले खेळ

ती राजर्षींची भूमी
ती ऋषीश्वरांची भूमी
ती वीरांची ही भूमी
निःसत्त्व अजी कांहि नसे उरलेलें
दुःखाचें भांडें भरलें ।। प्रभु० ।।

* * *

जरि जगिं झालों अस्पृश्य अम्ही सगळे
तरि कांहिच चित्ता न कळे
निजबंधूंना दूर लोटितों अजुनी
ठेवितों पशुच त्यां करुनी
जरि जग थुंके तरिही श्रेष्ठाश्रेष्ठ
मांडिती बंड हे दुष्ट
उपनिषदें जेथें झालीं
तेथेंच विषमता भरली
सद्धर्मा ग्लानी आली
हे सनातनी अनृतदेव जणुं झाले
माणुसकी विसरुन मेले ।। प्रभु० ।।

* * *

या भूमिमध्यें मरणाचा डर भरला
बाजार किडयांचा झाला
ती मृति म्हणजे वस्त्र फेंकणें दूर
करि गीता जगजाहीर
परि मरणाला भिणार आम्हांवाणी
जगतांत कुणी ना प्राणी
जन्मलें जिथें अद्वैत
मरणाला तेथें भीत

मेदांना तेथें ऊत
ते मोठाले शब्दच ओठीं उरले
भयभेद अंतरीं भरले ॥ प्रभु० ॥

* * *

बहुभाग्यानें नायक गांधी मिळती
परि डरती घरिं हे बसती
तो राष्ट्राचा ओढि एकला गाडा
झिजवीत अहर्निश हाडां
तो मूर्त महान् यज्ञ, मूर्त तो धर्म
मोक्षाचें दावी वर्म
परि वावदूक हे भितरे
हे भुंकत बसती कुतरे
कुणि कर्मक्षेत्रि न उतरे
हे शब्दांचे पूजक हरहर झाले
दुर्दैव घोर ओढवलें ॥ प्रभु० ॥

* * *

प्रभ ! गर्जू दे भीषण तुमची भेरी
हलुं देत मढीं हीं सारीं
निजकर्तव्या करावयाला उठुं दे
मरणास मिठी मारुं दे
निज बंधूंना अस्पृश्य न लेखोत
रूढींस दुष्ट जाळोत
तत्त्वांस कृतित आणोत
ओठिचें करुन दावोत
सद्धर्म खरा आचरत
तें रूढींचें राज्य पुरेसें झालें
प्रेमानें होवो ओलें ॥ प्रभु० ॥

प्रभु! गर्जू दे भीषण भेरी तुमची
मति जागृत होवो अमुची
प्रभु! येऊं दे गुलामगिरिचा वीट
होउं दे समस्तां धीट
ते हिंदु तसे शीख मुसल्मानादी
होउं दे बंधुसे आधीं
विसरुं दे क्षुद्रता सारे
विसरोत मागचें सारें
ऐक्याचें खेळो वारें
किति लागे तो त्याग करा रे सगळे
परि ऐक्य पाहिजे पहिलें ॥ प्रभु० ॥

* * *

प्रभु! गर्जू दे भीषण भेरी आतां
करुं देत मुक्त निज माता
मन विमल असो, स्वार्थ दुरी राहूं दे
निजमाय-कार्य साधूं दे
ते होउनियां वेडे मातेसाठीं
उठुं देत बंधु हे कोटी
घेऊं दे उडी आगींत
घेउं दे उडी अब्धींत
ओतुं दे वीष तोंडांत
परि मातेचें वदन दिसो फुललेलें
मोक्षश्रीनें नटलेलें ॥ प्रभु० ॥

—अमळनेर, १९२८

## ११६ स्वातंत्र्याचे अम्ही शिपायी

स्वातंत्र्याचे अम्ही शिपायी । सुखवूं प्रियतम भारतमायी ॥
देशभक्तिचा सुदिव्य सोम
पिउन करूं प्राणांचा होम
कष्ट हाल हे अमुचे भाई ॥ स्वातं० ॥

धैर्याची ती अभंग ढाल
त्यागाचीं तीं वस्त्रें लाल
निश्चयदंडा करांत राही ॥ स्वातं० ॥

समानतेचीं स्वतंत्रतेचीं
पताकेवरी चिन्हें साचीं
दिव्य पताका फडकत जाई ॥ स्वातं० ॥

ऐक्याचा झडतसे नगारा
कृतिरणशिंगें भरिति अंबरा
चला यार हो करूं रणघाई ॥ स्वातं० ॥

कळिकाळाला धक्के देऊं
मरणालाही मारुन जाऊं
प्रताप अमुचा त्रिभुवन गाई ॥ स्वातं० ॥

विरोध आम्हां करील कोण
सूर्यहि आम्हांसमोर दीन
प्रतापें दिशा धवळूं दाही ॥ स्वातं० ॥

विरोध आम्हां करील कोण
करूं सर्वांची दाणादाण
जोर आमुचा कुणी न साही ॥ स्वातं० ॥

असत्य अन्यायांना तुडवूं
दुष्ट रूढिंना दूरी उडवूं
घाण अतां ठेवणार नाहीं ॥ स्वातं० ॥

जशी पेटलेली ती चूड
तसेच आम्ही भैरव चंड
औषधास दास्यता न राही ॥ स्वातं० ॥

परकी अथवा स्वकीय झाला
जुलूम आम्हां असह्य झाला
जुलूम जाळूं ठायीं ठायीं ॥ स्वातं० ॥

जाच काच गरिबांना नुरवूं
झोंपड्यांतुनी मोदा फुलवूं
भक्त तयांना करुं लवलाही ॥ स्वातं० ॥

श्रेष्ठकनिष्ठत्वाचें बंड
मोडूं करुन प्रयत्न चंड
अस्मद्‌गण या शपथे घेई ॥ स्वातं० ॥

देश आमुचा करूं स्वतंत्र
मनोबुद्धिला करूं स्वतंत्र
स्थापन करणार लोकशाही ॥ स्वातं० ॥

अनंत यत्नें अखंड कृतिनें
परमेशाच्या कृपाबलानें
सफल मनोरथ निश्चित होई ॥ स्वातं० ॥

—धळें तुरुंग, मे १९३०.

## ११७ आमचें कार्य

अम्ही मांडूं निर्भय ठाण । देउं हो प्राण
स्वातंत्र्य–सुधेचें निजजननीला घडवूं मंगलपान ॥ अम्हि० ॥
स्वार्थाची करुनी होळी
छातीवर झेलूं गोळी
करुं मृत्युंशि खेळीमेळी
मातृभमिच्यासाठीं मोदें करुं सारे बलिदान ॥ अम्हि० ॥

श्रीकृष्ण बोलुनी गेला
जय अखेर सत्पक्षाला
ना पराभूति सत्याला
जयजयकारा करुनी पुढती घुसुं होउन बेभान ॥ अम्हि० ॥

ही मंगल भारतभूमी
करुं स्वतंत्र निश्चित आम्ही
हा निश्चय अंतर्यामीं
मातृमोचना करुन जगीं तिज अर्पूं पहिलें स्थान ॥ अम्हि० ॥

येतील जगांतिल राष्ट्रें
वंदितील भारतमाते
करितिल स्पर्श चरणातें
धन्य असा सोन्याचा वासर दाविल तो भगवान् ॥ अम्हि० ॥

—अमळनेर, मार्च १९३०.

---

## ११८ देशभक्त किति ते मरती

धैर्यमूर्ति उज्वलकीर्ती । देशभक्त किति ते मरती
त्यागराशि मंगलमूर्ती । देशभक्त किति ते मरती ॥

मातभूमि हंसवायातें
मायभूमि सुखवायातें
निजबंधू उठवायातें
बलिदाना मोदें देती ॥ देश० ॥

निजमातृ—मोचनासाठीं
निज—बंधु—समुद्धृतिसाठीं
निज सकल सुखाचे वरतीं
ठेऊन निखारे हातीं ॥ देश० ॥

निज यौवन निजधनमान
निज आप्त सकल बंधु—गण

हें ज्ञात सकल विसरून
करतळीं प्राण निज घेती ॥ देश० ॥

करिं घेति सतीचें वाण
होऊन मनीं बेभान
घेतात उडी धांवून
मरण दिसे जरि तें पुढती ॥ देश० ॥

ना चैन पडे जीवास
देश दिसे रात्रंदिवस
त्यां देशभक्तिचा ध्यास
देशविचारानें जळती ॥ देश० ॥

सहन तो विलंब न होई
जीवाची तगमग होई
करपून तन्मती जाई
मरणाचा पथ मग धरिती ॥ देश० ॥

तेजाला कवटाळावें
हें ध्येय पतंगा ठावें
मरुनीही त्यांस्तव जावें
ही दिव्य वृत्ति तच्चित्तीं ॥ देश० ॥

अजगरसे पडले सुस्त
निजबंधु, बघन अस्वस्थ
त्यां जागति देण्या त्वरित
प्राणांचा बळि ते देती ॥ देश० ॥

चर्चेनें कांहि न लाभ
याचनेंत कांहि न लाभ
स्वावलंबनानें शोभ
घोषणा वीर ते करिती ॥ देश० ॥

अजुन तरी झांपड उडवा
स्वातंत्र्य–ध्वज फडफडवा
देशकार्य करण्या धांवा
झालां का केवळ माती ॥ देश० ॥

घ्या स्वदेशिच्या त्या आणा
मनिं धरा जरा अभिमाना
जगताला दावा बाणा
उद्धरा माय निज हातीं ॥ देश० ॥

सुखविलास सारा राहो
आलस्य लयाला जावो
कर्तव्य–जागृती येवो
संपुं दे निराशा–रात्री ॥ देश० ॥

आशेचा होवो उदय
कार्याचा आला समय
भय समूळ पावो विलय
निष्कंप करा निज छाती ॥ देश० ॥

वरुनियां पडो आकाश
वा होवो अशनि–निपात
कार्याला घाला हात
घ्या करून मोक्षप्राप्ति ॥ देश० ॥

देशभक्त किति ते मेले
चंदनापरी ते झिजले
तत्कार्य अजुन जें उरलें
तें पूर्ण करा निज हातीं ॥ देश० ॥

तडफडत वरी असतील
पाहून तुम्हां सुखलोल
त्यां शांति–लाभ होईल
जरि उठाल मातेसाठीं ॥ देश० ॥

ही वेळ नसे निजण्याची
ही वेळ नसे हंसण्याची
ही वेळ असे मरणाची
ना मोक्षाविण विश्रांती ॥ देश० ॥

जरि नसाल तुम्ही क्षुद्र
तरि उठाल जैसे रुद्र
ती चळवळ करणें उग्र
घ्या रक्तध्वज निज हातीं ॥ देश० ॥

आरती निजप्राणांची
ओंवाळा मंगल साची
ही पूजा निज मातेची
सत्प्रसाद मिळवा मुक्ति ॥ देश० ॥

—त्रिचनापल्ली तुरुंग, आक्टोबर १९३०.

---

## ११९ भारतसेवा

प्रिय—भारतभू—सेवा संतत करुन
जाईन सुखानें मरुन ॥

जरि मातेचें कार्य न करितिल हात
तरि क्षणीं झडुन जावोत
जरि मातेचे अश्रु न पुशितिल हात
तरि क्षणीं गळुन जावोत
प्रिय—बंधूंच्या उद्धृतिच्या कामांत
हे हात सदा राबोत
हातांस एक आनंद
हातांस एकची छंद
तोडणें आइचे बंध

हें ध्येय करीं करितां, तन झिजवीन
जाईन सुखानें मरुन ॥ प्रिय० ॥

* * *

जोंवरि बंधू पोटभरी ना खाती
ना वस्त्र तदंगावरतीं
जोंवरि त्यांना स्वपरमत्त रडवीती
शतमार्गांनीं नागविती
जोंवरि त्यांना ज्ञानकिरण ना मिळती
अंधारीं खितपत पडती
तोंवरि न झोंप घेईन
अंतरीं जळुन जाईन
सौख्यास दूर लोटीन
मी सुखवाया झटेन बांधव दीन
जाईन सुखानें मरुन ॥ प्रिय० ॥

* * *

या शरिराचे जोडे, भारत–माते !
घालीन त्वत्पदीं हातें
या बुद्धीला त्वदर्थ मी श्रमवीन
सेवेंत हृदय रमवीन
जरि देहाचें करुन, आइ ! बलिदान
स्वातंत्र्य येइ धांवून
तरि श्रुगारीन हा जीव
ही तुझीच, आई ! ठेव
तव फुलो वदन–राजीव
मी घेत असीं, आइ ! तुझिच गे आण
जाईन सुखानें मरुन ॥ प्रिय० ॥

* * *

मी प्राशिन गे मृत्युभयाचा घोट
होईन आइ ! मी धीट
मी खाइन गे भेद-भाव हे दुष्ट
होईन, आइ ! गे पुष्ट
मग करण्यातें, माते ! तुजला मुक्त
सांडिन मी माझें रक्त
त्वच्चिंतन निशिदिन करिन
त्वत्सेवन निशिदिन करिन
सुखगिरिवर तुज चढवीन
मग भाग्याचे अश्रु चार ढाळून
जाईन सुखानें मरुन ॥ प्रिय० ॥

—धुळें तुरुंग, जून १९३२

---

## १२० जारे पुढें व्हा रे पुढें

झोंपूं नको झणि ऊठ रे
पाहे सभोतीं जें घडे
घन-गर्जना उठते नभीं
जा रे पुढें व्हा रे पुढें ॥

रणभेरि शिंगें वाजती
ध्वनि काय ना कानीं पडे ?
पडलास मुर्दाडापरी
जा रे पुढें व्हा रे पुढें ॥

ललनाहि सजल्या संगरा
नर केंवि मागें तो दडे ?
चल, ऊठ, जागृत सिंहसा
जा रे पुढें व्हा रे पुढें ॥

ना मेष, तं तर मानुष
बें बें करोनी ना रडे
निजकर्मशक्तिस ओळख
जा रे पुढें व्हा रे पुढें ॥
बांधून, मर्दा ! कंबर
तूं अंबरीं वरतीं उडे
निजपंख–बल भुललास तूं
जा रे पुढें व्हा रे पुढें ॥
जावो खचोनी धीर ना
लंघावयाचे हे कडे
दे हात मर्दासी खुदा
जा रे पुढें व्हा रे पुढें ॥
हे दुर्ग दुर्गम दुष्पथ
तरि ते फिरोनी तं चढे
पडण्यांत ना अपमान रे
जा रे पुढें व्हा रे पुढें ॥
शतदां पडे तो रे चढे
बसुनी न कांहीं तें घडे
पशु तो, न जो यत्ना करी
जा रे पुढें व्हा रे पुढें ॥
पसरून आ येती जरी
पथि संकटें तरि ना अडे
बलभीम हो तूं मारुती
जा रे पुढें व्हा रे पुढें ॥
गिळि राक्षसी तरि ना डरे
ये पोट फाडुन ना रडे
मग हांक फोडी वीर तो
जा रे पुढें व्हा रे पुढें ॥

लाटा कितीही आदळो
शतचूर्ण त्या करितो कडे
गिरि ना खचे घन पाउसें
जा रे पुढें व्हा रे पुढें ॥
जरि कष्ट–वृष्टी होइल
डोकें करि मारापुढें
अभिमन्यु हो अभिराम तूं
जा रे पुढें व्हा रे पुढें ॥
चैतन्य खेळो जीवनीं
तूं ना पडे जेवीं मढें
हो स्फूर्ति मूर्त प्रज्वला
जा रे पुढें व्हा रे पुढें ॥
कृतिपंथ तूं अवलंबुनी
करि बंद हे वाक्बुड्बुडे
वाणी पुरे करणी करी
जा रे पुढें व्हा रे पुढें ॥
बाहु स्फुरो ना ओठ ते
तव पिळ्वटूं दे आंतडें
हा मत्यु, नाहीं गंमत
जा रे पुढें व्हा रे पुढें ॥
ओंठावरील प्रेम तें
ज्वाळेपरी ना धड्धडे
ना पेटवी तें अंतर
जा रे पुढें व्हा रे पुढें ॥
ती तोंडदेखी आरती
ओंवाळ ना तं यापुढें
स्व–प्राण करि पंचारती
जा रे पुढें व्हा रे पुढें ॥

लागे दिव्यानें रे दिवा
राखुंडि कामीं ना पडे
तो देत जीवन, जो जिता
जा रे पुढें व्हा रे पुढें ॥

मोक्षामृताचे मंगल
आणी भरोनी रे घडे
पाजी तृषार्ता आइला
जारे पुढें व्हा रे पुढें ॥

माते स्वहातें लेववी
स्वातंत्र्य–लक्ष्मीचे चुडे
सत्पुत्रधर्मा आचर
जा रे पुढें व्हा रे पुढें ॥

बघ मोक्षनगरद्वार हें
दिसतें पुढें उघडें फुडें
तो भीरु कातर जो नुठे
जा रे पुढें व्हा रे पुढें ॥

कर्मांबुधीमधिं घे बुडी
त्या मुक्तिमौक्तिक सांपडे
पापी करंटा जो नुठे
जा रे पुढें व्हा रे पुढें ॥

वरिते जयश्री त्या नरा
कर्मीं निरंतर जो बुडे
ना कर्महीना वैभव
जा रे पुढें व्हा रे पुढें ॥

नरवीर–वृंद उठावती
निज कर्मतेचे चौघडे
हे ऐक गंभिर वाजती
जा रे पुढें व्हा रे पुढें ॥

शिर धूस टिप्पर घाईंत
ना वांचवी निज कातडें
सेवेंत मरतो तो जगे
जा रे पुढें व्हा रे पुढें ॥

कुरवाळितो स्वप्राण जो
मेलाच तो जरि ना सडे
जो प्राण दे, तो ना मृत
जा रे पुढें व्हा रे पुढें ॥

काळा कुरोंडी ही तनू
जरि मातृकामीं ती पडे
सोनें तिचें होई तरी
जा रे पुढें व्हा रे पुढें ॥

ज्यां स्फूर्ति ना तिळ अंतरीं
तीं काय जाळावीं धुडें
जरि न स्फुलिंग, न जीवन
जा रे पुढें व्हा रे पुढें ॥

ठिणगी पडूं दे जीवनीं
वीरापरी व्हा रे खडे
रक्तध्वजा धरुनी करीं
जा रे पुढें व्हा रे पुढें ॥

जरि मूठभर तरि ना भय
व्हा छातिचे ना बापुडे
व्हा सिंह व्हा नरपुंगव
जा रे पुढें व्हा रे पुढें ॥

खाऊं न केव्हांही कच
माघार शब्द न सांपडे
कोशांत बोला आमुच्या
जा रे पुढें व्हा रे पुढें ॥

कर्मांत आत्मा रंगवा
आत्मा जरी कर्मी जडे
स्वातंत्र्य तरि तें लाभतें
जा रे पुढें व्हा रे पुढें ।।

सेवेंत आत्मा ओतणें
मांगल्य–मोक्ष–श्रीकडे
हा पंथ एकच जावया
जा रे पुढें व्हा रे पुढें ।।

स्वार्थी निखारा ठेवुनी
रमतो स्वकर्मीं जो मुदें
तो मुक्त होतो आयका
जा रे पुढें व्हा रे पुढें ।।

शिवते निराशा ज्यास ना
लोभांशि ज्याचें वांकडें
तो मुक्त होतो आयका
जा रे पुढें व्हा रे पुढें ।।

कर्मीं अहोरात्र श्रमे
परि मान कीर्ति न आवडे
तो मुक्त होतो आयका
जा रे पुढें व्हा रे पुढें ।।

प्रभु अंतरीं करणी करीं
आलस्य ज्याला सांकडें
तो मुक्त होतो आयका
जा रे पुढें व्हा रे पुढें ।।

न विलास घे, स्व–विकास घे
निद्रादिकें जो ना चिडे
तो मक्त होतो आयका
जा रे पुढें व्हा रे पुढें ।।

स. ग्रा. ग्रं. ९९१२
ता.
ग्रा. ग्रं.

जे अंबरांत उफाळती
ना लोळती शेणीं किडे
ते मुक्त होती आयका
जा रे पुढें व्हा रे पुढें ॥

सर्वत्र करि संचार जो
कोठेंच कांहीं ना नडे
तो मुक्त होतो आयका
जा रे पुढें व्हा रें पुढें ॥

करुनी महाकृतिही जया
अवडंबराचें वावडें
तो मुक्त होतो आयका
जा रे पुढें व्हा रे पुढें ॥

शिर घेउनी हातावरी
जो कर्मसमरीं या लढे
करि माय अमरा तो निज
जा रे पुढें व्हा रे पुढें ॥

जरि व्हाल योद्धे संयमी
तरी मोक्षफळ हाता चढे
फांकेल भुवनीं सु–प्रभा
जा रे पुढें व्हा रे पुढें ॥

नवमंत्र घ्या तेजें नटा
व्हा सिद्ध सारे सौंगडे
चढवा स्वमाता वैभवीं
जा रे पुढें व्हा रे पुढें ॥

—नाशिक तुरुंग, जानेवारी १९३३.

## १२१ बल-सागर भारत होवो

बल-सागर भारत होवो
विश्वांत शोभुनी राहो ॥ बल० ॥
हें कंकण करिं बांधियलें
जनसेवे जीवन दिधलें
देशार्थ प्राण हे उरले
मी सिद्ध मरायाला हो ॥ बल० ॥
वैभवीं देश चढवीन
स्वातंत्र्य त्यासि अर्पीन
हा तिमिर घोर संहरिन
या बंधु सहाय्याला हो ॥ बल० ॥
हातांत हात घेऊन
हृदयास हृदय जोडून
ऐक्याचा मंत्र जपून
या कार्य करायाला हो ॥ बल० ॥
करिं दिव्य पताका घेऊं
प्रियभारतगीतें गाऊं
विश्वास पराक्रम दाऊं
ही माय निजपदा लाहो ॥ बल० ॥
या उठा करूं हो शर्थ
संपादुं दिव्य पुरुषार्थ
हें जीवन ना तरि व्यर्थ
भाग्यसूर्य तळपत राहो ॥ बल० ॥
ही मक्त माय होईल
वैभवें दिव्य शोभेल
जगतास शांति देईल
तो सोन्याचा दिन येवो ॥ बल० ॥

# १२२ हा देश वैभवीं न्यावा

जगदीश दयाघन देवा
हा देश वैभवीं न्यावा ॥

तूं सुंदर मंगलमूर्ती
पुरवावि मनींची आर्ती
हे दीन धरावे हातीं
तं सकळ सिद्धिचा ठेवा ॥ हा देश० ॥

बलदाता तूं मतिदाता
तूं गणपति ऐक्य–विधाता
भय–हर्ता तूं सुख–कर्ता
आम्हांस समीपि या पावा ॥ हा देश० ॥

तूं कलह सकळ हे मिटवी
तूं प्रेम अम्हांला शिकवी
तूं त्याग तपस्या शिकवी
जनमनिं न तिमिर उरवावा ॥ हा देश० ॥

करुं देत माय निज मुक्त
उठुं देत सर्व सत्पुत्र
ते सकल निज समर्पोत
हा लोभ सकळ हटवावा ॥ हा देश० ॥

जरि होइल भारत मुक्त
तरि होइल जग सुखभरित
पावेल विषमता अस्त
आनंद जगीं पिकवावा ॥ हा देश० ॥

—अमळनेर, ऑगस्ट १९३१

## १२३ भूषण जगताला

भूषण जगताला
    होइल, भूषण जगताला
भारत मिळवुन श्रेष्ठ पदाला ॥ भूषण० ॥
विद्या येतिल कलाहि येतिल
    भारत जरि हा स्वतंत्र झाला ॥ भूषण० ॥
शिकविल समता–स्नेह–सुजनता
देइल जगता शांति–सुखाला ॥ भूषण० ॥
प्रेमाच्या स्वर्गास विनिर्मिल
    पूजिल मग शुभ प्रभुपद–कमला ॥ भूषण० ॥

—अमळनेर, आगस्ट १९३१.

---

## १२४ भारतजननी सुखखनि साजो

भारतजननी सुखखनि साजो
    तद्विभवानें स्वर्गहि लाजो ॥ भारत० ॥
स्वातंत्र्याची अमृत–धारा
    प्राशुन निशिदिन रुचिर विराजो ॥भारत०॥
विद्यावैभववाङ्मयशास्त्रें
    कलादिकांचा डंका वाजो ॥ भारत० ॥
पावन मोहन सुंदर शोभन
    नाम तिचें शुभ भुवनीं गाजो ॥ भारत० ॥
दिव्य शांतिची अमृत–सु–धारा
    संतप्त जगा संतत पाजो ॥ भारत० ॥

—अमळनेर, १९२९.

## १२५ हृदय जणुं तुम्हां तें नसे

हृदय जणुं तुम्हां तें नसे ॥
बंधु उपाशीं लाखों तरिही
सुचति विलास कसे ॥ हृदय० ॥
परदेशी किति वस्तू घेतां
बंधुस घास नसे ॥ हृदय० ॥
बाबू गेनू जरि ते मरती
तरिही सुस्त कसे ॥ हृदय० ॥
खादी साधी तीहि न घेतां
असुन सुशिक्षितसे ॥ हृदय० ॥
माणुसकी कशि तिळ ना उरली
बसतां स्वस्थ कसे ॥ हृदय० ॥
जगतामध्यें निज आईचें
हरहर होइ हंसें ॥ हृदय० ॥
कोटचवधी तुम्हि पुत्र असोनी
माता रडत बसे ॥ हृदय० ॥
देशभक्त ते हांका मारिति
त्यांचे बसत घसे ॥ हृदय० ॥
स्वदेशिचें तें साधें अजुनी
तत्त्व न चित्तिं ठसे ॥ हृदय० ॥
बंधु खरा जो बंधूसाठीं
प्राणहि फेंकितसे ॥ हृदय० ॥
पुत्र खरा जो मातेसाठीं
सर्वहि होमितसे ॥ हृदय० ॥
बंधू रडतां आई मरतां
कुणि का स्वस्थ बसे ॥ हृदय ॥

—अमळनेर, सप्टेंबर १९३१.

## १२६ माझा महाराष्ट्र भाग्यें सजो

माझ्या महाराष्ट्रभूमींत मोठे
प्रतापी पुन्हां वीर निर्मी विभो
शास्त्रज्ञ, यंत्रज्ञ, वागीश, शिल्पी,
कलाविद् खरे थोर निर्मी प्रभो
धी, नीति, संपत्ति, सद्बुद्धि, सहकार्य
आरोग्य, ऐक्यादि येथें रुजो
धांवो यशोगंध देवा ! दिगंतांत
माझा महाराष्ट्र भाग्यें सजो ॥

—अमळनेर, १९२९.

---

## १२७ भारतमाता माझी लावण्याची खाण

(नाचून म्हणावयाचें गान)

भारतमाता माझी लावण्याची खाण
गाइन तिचें गान
मी
गाइन तिचें गान
करिन तिचें ध्यान
मी
करिन तिचें ध्यान
भारतमाता माझी लावण्याची खाण
प्राणांचीही प्राण, माझ्या प्राणांचीही प्राण, माझ्या प्राणांचीही प्राण
भारतमाता माझी लावण्याची खाण ॥
मांडिन निर्भय ठाण
मी
मांडिन निर्भय ठाण
देइन माझे प्राण

मी

देइन माझे प्राण

हातांत घेतलें आहे सतिचें मी वाण ।। गाइन० ।।

जाळिन सारी घाण

मी

जाळिन सारी घाण

काटिन रूढिरान

मी

छाटिन रूढिरान

हंसवीन आइचें जें मुख झालें म्लान ।। गाइन ०।।

उडविन दाणादाण

मी

उडविन दाणादाण

करिन धूळधाण

मी

करिन धूळधाण

स्वातंत्र्य-विरोधकां देतों मी आव्हान ।। गाइन० ।।

विसरेन देहभान

मी

विसरेन देहभान

कापुन देइन मान

मी

कापुन देइन मान

मातेला जगामध्यें देइन पहिलें स्थान ।। गाइन० ।।

नुरविन कसली वाण

मी

नुरविन कसली वाण
काढिन रुतले बाण
मी
काढिन रुतले बाण
मातेला घालीन माझ्या हातांनीं मी स्नान ॥ गाइन० ॥
सर्वस्वाचें दान
करिन
सर्वस्वाचें दान
घेतों आज आण
मी
घेतों घोर आण
मातेला घडविन माझ्या मोक्षामृतपान ॥ गाइन० ॥

—धुळें तुरुंग, मे १९३२.

---

## १२८ मरणही ये तरी वरिन मोदें

मरणही ये तरी वरिन मोदें
जननिचें परि जगीं यश भरूं दे ॥ मरणहि० ॥
वीट वन्हित पडे
दृढ तरी ती घडे
तेज कष्टें चढे
हें कळूं दे ॥ मरणही ०॥
हाल होवोत ते
चित्त ना मुळि भितें
दास्य जें जाळतें
नष्ट करूं दे ॥ मरणही०

—अमळनेर, ऑगस्ट १९३१.

## १२९ दिव्य मी स्वर्ग निर्मीन

ध्येय देईन

दिव्य मी स्वर्ग निर्मीन

सचिंत सगळे दिसती लोक
जिकडे तिकडे भरला शोक
करुन तयांवर अमृत–सेक
तयां उठवीन ॥ दिव्य० ॥

मेल्यापरि हे दिसती बंधू
उरला न दिसे जीवनबिंदु
निर्मुन मी संजीवनसिंधु
तयां जिववीन ॥ दिव्य० ॥

गुलामवृत्ती जिकडे तिकडे
दुबळी वृत्ती जिकडे तिकडे
चैतन्याचे भरभरुन घडे
तयां पाजीन ॥ दिव्य० ॥

स्वातंत्र्याची लाविन ज्योत
स्फूर्तीचा मी निर्मिन स्रोत
तेजाचा मी सोडिन स्रोत
दैन्य दवडीन ॥ दिव्य० ॥

भेदभाव मी जाळिन सारे
ऐक्याचे मी सोडिन वारे
दिव्यबळाच्या जयजयकारें
राष्ट्र उठवीन ॥ दिव्य० ॥

करिन त्यागातें उद्युक्त
निर्भयतेचे शिकविन मंत्र
निःशस्त्राचें देइन शस्त्र
पंथ दावीन ॥ दिव्य०॥

आळस दवडुन सेवा देइन
विलास दवडुन विकास देइन
खेदा दवडुन बोधा देइन
भाग्य देईन ॥ दिव्य० ॥

कळकळ शिकविन तळमळ शिकविन
सद्‌गुण संघटना मी वितरिन
सत्याचा सत्त्वाचा शोभन
ध्वज उभवीन ॥ दिव्य० ॥

रूढी जाळुन विचार देइन
हृदयमतीला निर्मळ करिन
श्रद्धा सद्धर्माला देइन
मोक्ष देईन ॥ दिव्य० ॥

मंगल उज्वल तें देईन
पावन निर्मळ तें देईन
सुंदर सत्य शिवा देईन
देव देईन ॥ दिव्य० ॥

—धुळें तुरुंग, मे १९३२.

---

## १३० देशासाठीं मरूं

देश आमुचा वैभवशाली वाली सकलहि जगताचा
तद्‌ध्यानामधिं रंगुन जाऊं गाऊं त्याला निज वाचा
पराक्रमानें निजमातेला मिरवूं साऱ्या जगतांत
कीर्तिध्वज विश्वांत उभारूं निजतेजानें दुर्दांत
वीरापरि तरि उठा क्षणीं
दिगंत जिंकूं चला क्षणीं
निज मातेला स्मरुनि मनीं

मुकुंदपादांबुज वंदुनियां प्राणांवर हाणूं लाथ
कोण करी जगिं विरोध आतां करूं सर्वांचा निःपात ॥

धन्य मावळे पावन झाले देशासाठीं निज-मरणें
जगणें भूषण अम्हां कायसें भीति कशाला मनिं धरणें
दों दिवसांची तनु तर साची वांचवुनी तरि काय मिळे
देशासाठीं उदार होऊं मृत्यु कुणाला जगीं टळे
हंसूं यमाचा फांस जरी
हंसूं जगाचा जाच जरी
हंसूं सदोदित निजांतरीं
धैर्यें हांसत तेजें तळपत निजमातेचा सन्महिमा
त्रिभुवनिं अवघ्या पसरूं दावूं मातेचा वैभवगरिमा ॥

—अमळनेर, १९२७.

---

## १३१ तेव्हां घडे उन्नती

उत्साही मुखमंडलें भुजगसे दोर्दंड दिव्याकृती
नानापत्ति पथीं जरी दिसति ना लोपे यदीया धृती
मोठें कार्य करावयास बघते दिव्या सदा यन्मती
ऐसे पुत्र यदा इथें निपजती तेव्हां घडे उन्नती ॥

स्नेहानें भरले परस्पर सदा विश्वास जे दाविती
सर्वांची सहकार थोर करण्यासाठीं असे संमती
ऐक्याचें कळुनी महत्त्व न कधीं जे मत्सरें भांडती
ऐसे पुत्र यदा इथें निपजती तेव्हां घडे उन्नती ॥

ज्यांच्या निर्भय अंतरीं सतत तो सत्त्वाभिमान स्फुरे
ज्यांच्या दृष्टिसमोर जाच जुलमी दुष्टां जनांचा नुरे
भीती एक जगत्पतीस, न दुजा कोणाहि, जे सुव्रती
ऐसे पुत्र यदा इथें निपजती तेव्हां घडे उन्नती ॥

तेजाला कवटाळिती परि सदा जे शिस्त सांभाळिती
अन्याला सुखवावया स्वसुखही निःशंक जे होमिती
चित्तीं उज्वल भावना परि विचाराला न जे सोडिती
ऐसे पुत्र यदा इथें निपजती तेव्हां घडे उन्नती ।।

देशाची अतुला निरंतर वसे भक्ती यदीयांतरीं
देशाचें हित ज्यांत तींच करिती कार्यें सदा जे करीं
भूमातेस्तव जे सदा झिजविती वाणी, वपु, श्री, मती
ऐसे पुत्र यदा इथें निपजती, तेव्हां घडे उन्नती ।।

देशासाठिं सचिंत अन्य कसली चिंता न ज्यांना असे
देशासाठिं फकीर नित्य हृदयीं ती मातृमूर्ती वसे
सेवा नित्य रुचे, सुचे न दुसरें सेवेंत जे रंगती
ऐसे पुत्र यदा इथें निपजती तेव्हां घडे उन्नती ।।

जेव्हां ऐक्य सहानुभूति उदया येतील आम्हांमध्यें
त्यागी उद्यममग्न होतिल यदा, बंधुत्व चित्तीं जडे
जेव्हां स्वार्थ असेल दूर, हृदया वाटेल सत्यीं रती
जेव्हां निर्भयता दिसेल नयनीं, तेव्हांच राष्ट्रोन्नती ।।

—अमळनेर १९२६.

---

## १३२ तुफान झालों

नाहीं आतां क्षणहि जगणें भारतीं या गुलाम
मारूं सारें भय हृदयिचें निर्मूं स्वातंत्र्यधाम
नाहीं एक क्षणहि खपतें दास्य विश्वंभराला
स्वातंत्र्याला मिळवुन चला जाउं तत्पूजनाला ।।

जों या आहे क्षणिक शरिरीं अंतिम श्वास एक
भूमातेला सुखविन सुखें होउ मद्रक्तसेक
माता आतां क्षणभरिहि ना बंधनीं ह्या बसूं दे
जावो माझी तनु परि मम म्लान माता हंसूं दे ।।

कैसें साहूं ? सतत जरि ते आइला नागवीती
कैसें पाहूं ? सतत जरि ते बंधुंना गांजिताती
बैसावें का विलपत ? न का पौरुषाचा स्फुलिंग
न श्वानाचें वरुं हत जिण, होउं या धीरधिंग ॥

झालों का हो सकळ इतुके श्वान पस्तीस कोटी
कैसे दास्यीं सतत पिचतों नाहिं का त्वेष पोटीं
आहों का हो हृदयिं बघणें मेष मानूष वा तें
सारें तुम्हां जग भरडितें धान्य तें जेंवि जातें ॥

आतां ओठीं मधुरतम त्या गाउं या मातगीता
आतां सारे उठुन करुं या बंधमुक्त स्व–माता
ना लावावें क्षणहि पळहि भारतें मुक्त व्हावें
लोकीं आतां वर करुनियां मस्तकातें जगावें ॥

या रे सारे मिळून करुं या आधि ऐक्यावलंब
स्पृश्यास्पृश्यें सकळ उडवूं जाळुं हे भेददंभ
हालक्लेशां मुळिहि न भिणें स्वीय स्वातंत्र्य घेणें
तेजें पेटूं अनलसम ही वैभवीं माय नेणें ॥

या देहाचे करिल तुकडे राइराईसमान
कोणी क्रोधें तरि सतत मी उंच राखीन मान
ओठीं माझ्या प्रियजननिचें दिव्य नाचेल गान
माझ्या मातेस्तव करित हो मी मुदें देहदान ॥

मारी मातें कुणि जरि न ती मन्मनोमातृमूर्ती
कंठा कापी कुणि जननिची ती न कंठस्थकीर्ती
हालांची ना लवहि उरली आज आम्हां गुमान
आतां गेलों खवळून खरे आम्हि झालों तुफान ॥

केला विरोध जरि या सगळचा जगानें
ना गांगरून मुळि जाउं अतां भयानें

मोक्षार्थ जें ज्वलित राष्ट्र उभें असेल
त्याच्यापुढें न जगतीं कुणिही टिकेल ॥
या भारतास हंसवूं करुनि स्वतंत्र
ते देशभक्तिमय या म्हणुं दिव्यमंत्र
सर्वस्व-होम करणें सगळे उठा रे
वारे पहा प्रबळ, हे झडती नगारे ॥
ही वेळ बंधु न असे तुमच्या निजेची
ही वेळ बंधु न विलास-विनोदनाची
स्वातंत्र्य वेळ शुभ दिव्य अपूर्व आली
आतां उठा सकळही झणिं याच काळीं ॥
आली घडी पुनरपि परतोन ये ना
जो जातसे क्षण कधीं फिरुनी मिळेना
ना आळशी तुम्हि बना न बना उदास
या आइचे सकळही झणिं तोडुं पाश ॥
उत्साहसागर बना दृढ धैर्यमूर्ती
स्फूर्ति प्रचंड उसळो मिळवा सुकीर्ती
होईल माय अपुली शत-बंधमुक्त
तेजे उठाल सगळे जरि रे सुपुत्र ॥
हें राष्ट्रतेज सगळें भडके उफाळे
हे देशभक्तिस पहा शतपूर आले
हे ठेवुनी निज सुखावरतीं निखारे
दास्या पदीं तुडविण्या सुत सिद्ध सारे ॥
झालों तुफान सगळे न अतां गुमान
झालों तुफान सगळे नच देहभान
झालों तुफान करुं हांसत देहदान
स्वातंत्र्य आणुं अथवा मरुं हीच आण ॥

—त्रिचनापल्ली तुरुंग, फेब्रुवारी १९३१.

## १३३ प्रिय भारता सुंदरा !

प्रिय भारता सुंदरा ! ॥
ज्ञानविहारा ! परम उदारा
कुदशा जाइल तव कधि दूरा ? ॥ भारता० ॥
सत्त्व कुठें तव ? त्याग कुठें तव ?
तोडि कवण तव सुयशो-हारा ? ॥ भारता० ॥
पुत्र न दिसती, वैरी गमती
जे तुज लोटिति दुर्गति-दारा ॥ भारता० ॥
शोक न करि तूं प्रभुला प्रिय तूं
अवतरुन तुला तारिल, मधुरा ! भारता० ॥

—अमळनेर, ऑगस्ट १९३१.

---

## १३४ दुबळी मम भारतमाता

दुबळी मम भारतमाता
दीन विकल दिसते अनाथा ॥ दु० ॥
कोटयावधि हे पुत्र असोनी, येति न कोणी ते धांवोनी
आज तिला कुणि देइ न हाता ॥ दुबळी० ॥
ये करुणाकर ये मुरलीधर, भारतभूमी तुज ही प्रियकर
ये नतनाथ ! खरोखर आतां ॥ दुबळी० ॥

—अमळनेर, ऑगस्ट १९३१

---

## १३५ देशभक्ताची विनवणी

सन्मित्रांनो ! सुबांधवांनो ! परिसावी मद्गिरा
यथार्था परिसावी मद्गिरा
गारगोटिच्या परी न व्हावें, व्हावें सुंदर हिरा
धवळावें निज—यशःसुरंगें विश्व सकल सुंदर
उठा रे, विश्व सकल सुंदर
मुकुंद पूजुन निजान्तरंगीं करा यत्न दुर्धर
यत्नास यश प्रभु देई
श्रद्धेस यश प्रभु देई
आशेस फळ प्रभु देई
कर्तव्याचें कंकण बांधुन करीं, न उदरंभर
बनावें, केवळ उदरंभर
महायशातें बलविभवातें संपादा सत्वर ॥

ज्ञान नको, बळ नको, नको तें शील, नको तें धन
अम्हांला नको नको तें धन
निरस्तविक्रम होउन दुर्बल ऐसें म्हणती जन
खरें न हें वैराग्य, बंधुनो ! खरे तपस्वी बना
तुम्ही रे खरे तपस्वी बना
देण्यासाठीं मिळवा ज्ञाना मिळवा दौलत धना
भाग्यास जगीं मिरवावें
वैभवीं राष्ट्र चढवावें
कीर्तिनें विश्व वेधावें
स्वाभिमानधन अनंत संतत संचवून अंतरीं
सख्यांनो, संचवून अंतरीं
स्वर्गसुखातें संपादावें राहोनी भूवरी ॥

मेंढ्यापरि ना पडा बापुडे, मरण त्याहुनी बरें
खरोखर मरण त्याहुनी बरें

मेल्यापरि हें जीवन कंठुन कोण जगीं या तरे
लोखंडाची कांब त्यापरी देह करा कणखर
अगोदर देह करा कणखर
देहाहुन निज मन उत्साही करा धीर गंभिर
आकाश कोसळो वरी
पदतळीं भूमि हो दुरी
मज फिकीर नाहीं परी
ध्येयोन्मुख मी सदैव जाइन पतंग दीपावरी
जसा तो पतंग दीपावरी
ऐसा निश्चय करा, भस्म हो, जाउं न मागें परी ॥
स्वातंत्र्याच्या स्वर्गामध्यें जीवात्मा रंगवा
बंधुनो ! जीवात्मा रंगवा
पारतंत्र्यशृंखला कडाकड बलतेजें भंगवा
निजांतरंगीं अखंड आशादीप पाजळोनियां
गडे हो दीप पाजळोनियां
नैराश्याची निशा नाशकर सत्वर न्यावी लया
तर उठा झडकरी अतां
लावा न मुळिं विलंबता
द्या धीर दुर्बलां हतां
विजयाचा जयनाद घोषवा दुमदुमोन अंबर
जाऊं दे दुमदुमोन अंबर
स्वर्गीं गातिल युष्मन्महिमा मग नारद–तुम्बर ॥

—अमळनेर छात्रालय, १९२७.

## १३६ मातृभूमि-गान

हे शुभ-कीर्ते जगद्विश्रुते भारतमाते विमलतरे
मंगलमूर्ते मानसपूर्ते त्वन्नमनें जन सकल तरे ॥
अतिकमनीये शुभ रमणीये नमनीये स्तवनीय-वरे
विद्यानंदे वैभवकंदे वंदेऽहं त्वां प्रेम-भरें ॥
जगद्भूषणे मनस्तोषणे विपच्छोषणे मधुरतरे
सकलपावने अघविनाशने कलिमलदहने पुण्यपरे ॥
तत्त्वपंडिते सुमुनिमंडिते वाङ्मयसरिते विजयवरे
शुभगिरिभूषित सुसरित्-पूरित सुवनालंकृत अतिरुचिरे ॥
सदय-मानसे वात्सल्यरसे प्रसादपूर्णे दैन्य-हरे
अजरे विश्वंभरे देवते कविस्तुते परमार्थपरे ॥
अन्नदायिनी ज्ञानदायिनी जगन्मोहिनी प्रभुप्रिये
तपोभूमि तूं, कर्मभूमि तूं, निस्तुल निरुपम निरंतरे ॥
त्वद्‌गुणगायन, त्वत्पदवंदन, त्वत्सेवन, मत्कर्म खरें
त्वत्सुत हें मद्‌भूषण, माते ! परमोदारे स्नेहसरे ॥ हे शुभ० ॥

—त्रिचनापल्ली तुरुंग, सप्टेंबर १९३०.

---

## १३७ गाऊं मी कसलें गाणें ?

हें जीवन केविलवाणें । गाऊं मी कसलें गाणें ॥
जगिं झालों आम्ही दीन
जीवनावीण जणुं मीन
ही अमुची स्थिति किति हीन
मन जळतें मम अपमानें ॥ गाऊं० ॥
आमुचें असें ना कांहीं
सत्तेची वस्तू नाहीं
सुतळीचा तोडा नाहीं
दुर्दशा देखणें नयनें ॥ गाऊं० ॥

ना गायिगुरें तीं दिसतीं
वांसरें न तीं बागडतीं
दूध तूप शब्दची उरती
दुर्मिळ तें झालें खाणें ॥ गाऊं० ॥

जी अन्न जगाला देई
ती उदार भारत माथी
किति रडते धायीधायी
मिळती ना चारहि दाणे ॥ गाऊं० ॥

अन्नास माय मोताद
घेई न तिची कुणि दाद
सुत घालित बसती वाद
पोट का भरे वादानें ॥ गाऊं० ॥

उद्योग सकलही गेले
बेकार सर्वही झाले
जगताती अर्धे मेले
श्रेयस्कर याहुन मरणें ॥ गाऊं० ॥

देण्यास नाहिं तो कवळ
यासाठीं माता विकळ
अर्पिती नद्यांना बाळ
जळतोंच ऐकुनी कानें ॥ गाऊं० ॥

उपजलीं न मरती तोंची
प्रिय बाळें भारतभूचीं
मेजवानि मृत्युस साची
मांडिला खेळ मरणानें ॥ गाऊं० ॥

ना वस्त्रहि अंगीं घ्याया
ना मीठहि थोडें खाया
ना तेल दिवा लावाया
मृति येना म्हणनी जगणें ॥ गाऊं० ॥

लागल्या शेकडों जळवा
संपत्ती नेती सर्वा
आमुची न कोणा पर्वा
अम्हि हताश होउन रडणें ॥ गाऊं० ॥

जाहले लोक फटफटित
निःसत्त्व भुतांसम दिसत
पावलें सर्वही अस्त
किति दिवस असें हें पडणें ॥ गाऊं० ॥

भारतीय जनता रोड
निःसत्त्व करित काबाड
मोजुन घ्या हाडन् हाड
पोटभरी न मिळे खाणें ॥ गाऊं० ॥

तेजस्वी विद्या गेली
ती पोपटपंची उरली
जी गोष्ट पाश्चिमें लिहिली
ती आम्हां श्रुतिसम माने ॥ गाऊं० ॥

सत्कला मावळे सारी
सच्छास्त्रें मेलीं सारीं
अनुकरणें करित भिकारी
शेणांत सदा हो सडणें ॥ गाऊं० ॥

ती थोर संस्कृती गेली
ती गजान्त लक्ष्मी गेली
पुरुषार्थ सत्त्वता गेली
उरलीं ती स्मृतिचीं चिन्हें ॥ गाऊं० ॥

सोन्याचा जेथें धूर
द्रव्याचा जेथें पूर
ती चितेमाजी चूर
भारतभू कैशी बघणें ॥ गाऊं० ॥

भरलेली होती बाग
भरलेलें होतें भाग्य
तें गेलें परि सौभाग्य
अपमानें आतां जगणें ॥ गाऊं० ॥

तो बाग मनोहर गेला
हा मसणवटा हो झाला
दैवाची भेसुर लीला
अम्हि गुलाम म्हणुनी जगणें ॥ गाऊं० ॥

कुणि उंदिर आम्हां म्हणत
ती मेयो निंदा करित
जग अस्पृश्य अम्हां गणित
किति निंदा ऐकूं कानें ॥ गाऊं ०॥

अज्ञानपंकगत लोक
आढळे घरोघर शोक
नांदतात सांथि अनेक
ठाण दिलें दृढ रोगानें ॥ गाऊं० ॥

शेतकरी मागे भीक
शिकलेला मागे भीक
तो भिकारि मागे भीक
धंदा ना भिक्षेवीणें ॥ गाऊं० ॥

हृदयाची होई होळी
आपदा सदा ही पोळी
खाऊं का अफुची गोळी
मज सहन होइ ना जगणें ॥ गाऊं० ॥

खाऊन अफू परि काय ?
ही रडेल संतत माय

---

१ टीप—अमेरिकेचा उद्दाम अध्यक्ष रूझवेल्ट यानें भारतीयांस उंदीर म्हटलें होतें !

बंधूंची न हरे हाय
काय मिळे मज मरणानें ॥ गाऊं० ॥

हा हिमालय दिसे खिन्न
या सरिता दिसती दीन
पशुपक्षिवनस्पती हीन
सोडिती श्वास दुःखानें ॥ गाऊं० ॥

हे परात्परा भगवंता
हे अनंत करुणावंता
हे जगदीशा बलवंता
ऐकावें हें रडगाणें ॥ गाऊं० ॥

वाजवी मनोहर पांवा
मोहांधतिमिर हा जावा
खडबडुनी लोक उठावा
उघडावीं अस्मन्नयनें ॥ गाऊं० ॥

दे स्फूर्ति अम्हांला दिव्य
कृति करुं दे उत्कट भव्य
स्वातंत्र्य येउं दे नव्य
हंसवावीं अस्मद्वदनें ॥ गाऊं० ॥

—त्रिचनापल्ली तुरुंग, सप्टेंबर १९३०.

---

## १३८ स्वातंत्र्य

प्राण अर्पावे । स्वातंत्र्यसौख्य मिळवावें ॥
केवळ बडबड ना कामाची
केवळ इच्छा ना कामाची
गरज असे निशिदिन कष्टांची
कष्टत जावें ॥ स्वातंत्र्य० ॥
विलास– सुखभोगांना सोडा
मोह सकळ ते मारक तोडा
स्वार्थांकुर चित्तांतील मोडा
निर्मळ व्हावें ॥ स्वातंत्र्य० ॥
देशभक्तिचा मनांत काम
भारतभूचें वदनीं नाम
दृष्टि दिसावी तेजोधाम
निर्भय व्हावें ॥ स्वातंत्र्य० ॥
द्वेष कलह ते विसरुन जावें
बंधुबंधुचेपरी सजावें
हातीं हात प्रेमें घ्यावे
पुढें दौडावें ॥ स्वातंत्र्य० ॥
उचंबळोनी वृत्ती जावी
उचंबळोनी हृदयें जावीं
वेडावुन जणुं मति ती जावी
तन्मय व्हावें ॥ स्वातंत्र्य० ॥
गुलामगिरिवर हाणा घाव
दास्या देशीं नुरोच ठाव
प्रयत्नावरी ठेवुन भाव
सदा झुंजावें ॥ स्वातंत्र्य० ॥
स्वातंत्र्याची जया तहान
धांवून जावूं घेऊं ठाण

गांठूं ध्येया देऊं प्राण
व्रत हें घ्यावें ॥ स्वातंत्र्य० ॥

परवशतेचे तोडा पाश
तोडा तोडा हरपो त्रास
चीड न येते काय तुम्हांस
चला चमकावें ॥ स्वातंत्र्य० ॥

परदास्याच्या पंकीं कीट
असणें, याचा येवो वीट
होउन सावध नीट सुधीट
निजपद घ्यावें ॥ स्वातंत्र्य० ॥

स्वातंत्र्याचा ईश्वर–दत्त
हक्क करोनी घेऊं प्राप्त
करुं यत्नाची अपूर्व शर्थ
मरुनी जावें ॥ स्वातंत्र्य० ॥

निज मरणानें मंगल येइल
निज मरणानें वैभव येइल
निज मरणानें मोक्ष मिळेल
मरण वरावें ॥ स्वातंत्र्य० ॥

—अमळनेर छात्रालय, जानेवारी १९३०.

## १३९ स्वातंत्र्य–देवीचें शुभ आगमन

आनंदाचा । उगवला दिवस सोन्याचा ॥

मालिन्यरात्र लोपली
सौभाग्य–उषा उजळली
सत्कीर्ति–गुढी उभविली
चला रे नाचा ॥ उगवला० ॥

गंभीर भेरि–गर्जन
शंखादि मंगल–स्वन
देवता येतसे दुरुन
मांगल्याचा ॥ उगवला० ॥

ते पहा मराठी भाले
चपळेपरि चमकत आले
मंदील पाठिवर खेळे
तच्छौर्याचा ॥ उगवला० ॥

शत्रुच्या पिउन रक्ताला
यज्जीव निरंतर धाला
तो आला रजपुत भाला
तत्तेजाचा ॥ उगवला० ॥

ते पहा शिवाजी राजे
तो प्रतापसिंहही साजे
पृथ्विराजहि तेथ विराजे
धन्यत्वाचा ॥ उगवला० ॥

ती जिजा तुम्हां दिसली का
ती उमा तुम्हां दिसली का
लक्ष्मीहि तुम्हां दिसली का
पावित्र्याचा ॥ उगवला० ॥

दुंदुभी नभीं दुमदुमली

माणिकमोतीं उधळिलीं
स्वातंत्र्यदेवता आली
जयघोषाचा ॥ उगवला० ।

सर्वैक्य--सुंदरासन
मांडिलें बहुत सजवून
देवता दिसतसे खुलुन
मोक्षश्रीचा ॥ उगवला० ॥

सुखसिंधु किति उचंबळे
भाग्यांत चित्त दंगलें
मोदांत विश्व रंगलें
कैवल्याचा ॥ उगवला० ॥

—अमळनेर छात्रालय, १९२८.

---

## १४० स्वातंत्र्यानंदाचें गाणें

( लाहोरला स्वातंत्र्याचा ठराव पास झाला ती वार्ता ऐकून केलेलें गाणें)

मंगल मंगल त्रिवार मंगल पावन दिन हा धन्य अहो
भारत प्यारा स्वतंत्र झाला जय बोला जय बोला हो ॥

मेवाडाच्या रणशार्दूला उठा, उठा शिवराया हो
माता अपुली स्वतंत्र झाली जय बोला जय बोला हो ॥

दिशा आज कां प्रसन्न दिसती निर्मळ दिसती सांगा हो
भारत झाला स्वतंत्र म्हणुनी जय बोला जय बोला हो ॥

पवन आजचा पावन वाटे कारण मजला सांगा हो
भारतमाता मुक्त म्हणोनी जय बोला जय बोला हो ॥

पाषाणांचीं फुलें जाहलीं कां तें मजसी सांगा हो
गतबंधन भू झाली म्हणुनी जय बोला जय बोला हो ॥

मातीचीं हीं माणिकमोतीं झालीं कां मज सांगा हो
भारत झाला स्वतंत्र म्हणुनी जय बोला जय बोला हो ॥
कांटचांची मखमल मृदु झाली चमत्कार कां झाला हो
भारत झाला स्वतंत्र म्हणुनी जय बोला जय बोला हो ॥
सतेज आजी अधिकच दिसतो दिनमणि कां मज सांगा हो
आई झाली मुक्त म्हणोनी जय बोला जय बोला हो ॥
पर्वतांतुनी खोऱ्यांतुनिही दुर्गांतुन कां गाणीं हो
भारत झाला स्वतंत्र म्हणुनी जय बोला जय बोला हो ॥
नद्या आज कां तुडुंब भरल्या वहावयाचें विसरुन हो
भारत झाला स्वतंत्र म्हणुनी जय बोला जय बोला हो ॥
उचंबळे कां अपार सागर सीमा सोडुन आज अहो
भारत झाला मुक्त म्हणोनी जय बोला जय बोला हो ॥
गगनमंडपीं विमानगर्दी झाली कां मज सांगा हो
भारत झाला स्वतंत्र म्हणुनी जय बोला जय बोला हो ॥
स्वर्गांतुन सुमवृष्टि होतसे अपार कां मज सांगा हो
भ.रत झाला स्वतंत्र म्हणुनी जय बोला जय बोला हो ॥
नारद तुंबर गाणीं गाती सुरमुनि हर्षित ते कां हो
भारत झाला मुक्त म्हणोनी जय बोला जय बोला हो ॥
कैलासावर डमरु वाजतो नाचे शिवशंकर कां हो
भारत झाला स्वतंत्र म्हणुनी जय बोला जय बोला हो ॥
चार मुखांनीं चतुरानन कां सामगायना करितो हो
भारत झाला स्वतंत्र म्हणुनी जय बोला जय बोला हो ॥
सृष्टि नाचते विश्व हांसतें चराचर भरे मोदें हो
भारत झाला स्वतंत्र म्हणुनी जय बोला जय बोला हो ॥

* * *

पहा पहा ते विश्वजन बघा, भेट घेउनी आले हो
भारत झाला स्वतंत्र म्हणुनी जय बोला जय बोला हो ॥

चिनी जपानी अमेरिकन ते आले वंदन करण्या हो
'भारतजननि ! क्षमस्व' म्हणती जय बोला जय बोला हो ॥
तार्तर मोंगल अफगाणादी शेजारी ते आले हो
'भारतजननि ! क्षमस्व' म्हणती जय बोला जय बोला हो ॥
युरोपांतले सारे गोरे सविनय साश्रू आले हो
'भारतजननि क्षमस्व' म्हणती जय बोला जय बोला हो ॥
भारतमाता अनाथनाथा प्रेमें कुरवाळीत अहो
आपपर तिला नाहीं ठावें जय बोला जय बोला हो ॥

*          *          *

आज जगाचें भाग्य उदेलें वैभव फुललें अगणित हो
उचंबळे सुखसागर मंगल जय बोला जय बोला हो ॥
दैन्य पळालें दुःख गळालें कलहद्रोह दुरावति हो
नव्या मनूचा उदय जाहला जय बोला जय बोला हो ॥
चुकलि माकलीं जगांतील तीं राष्ट्रें जवळी घेउन हो
प्रेमें न्हाणी त्यांना भारत जय बोला जय बोला हो ॥
पिवळीं ढवळीं काळीं सारीं भुवनामधलीं बाळें हो
भारतमातेजवळ नाचती जय बोला जय बोला हो ॥
"भलेपणानें खरेपणानें प्रेमें सकळहि वागा हो
सुखास निर्मा बोले भारत जय बोला जय बोला हो ॥
"शांति नांदु दे अतां अखंडित आनंद सदा नांदो हो
विसरा मागिल" बोले भारत, जय बोला जय बोला हो ॥
"परमेशाचीं सकळ लेंकरें सुखेन भुवनीं खेळू हो
स्वर्ग निर्मु या" बोले भारत जय बोला जय बोला हो ॥
"परस्परांचे हात धरूं या फेर धरूनी नाचूं हो
शांतिगीत गा" बोले भारत.जय बोला जय बोला हो ॥
"थोर भारता ! मार्गदर्शका ! तूंच आमुचा सद्गुरु हो,"
वदती सारीं राष्ट्रें सद्गद जय बोला जय बोला हो ॥

अनंत झाली सुपुष्पवृष्टी गगनामधुनी तेव्हां हो
थै थै थै थै नाचुं लागले गाउं लागले जयजय हो ।।
जयजय भारत प्रियतम भारत जयजय भारत बोला हो
जयजय जयजय जयजय जयजय जय भारत जय बोला हो ।।
आनंदानें डोला हो
आनंदाश्रू ढाळा हो
जयजय भारत जयजय भारत जयजय भारत बोला हो ।।
हृदयकपाटें खोला हो
बांधा चित्सुखझोला हो
नाचा त्यावर नाचत बोला जयजय भारत बोला हो
जय बोला जय बोला हो
जय भारत जय बोला हो
जयशब्दानें अंबर कोंदो जय भारत जय बोला हो ।

* * *

भारत प्यारा स्वतंत्र झाला जयजय म्हणुनी बोला हो
सृष्टि सकलही स्वतंत्र झाली जयजय म्हणनी बोला हो ।।

—अमळनेर छात्रालय, २६ जानेवारी १९३०.

---

# १४१ भारतास

मनोहरा भारता ! मदंतर–देवा ! त्वन्मुखकळा
शोभेल कधीं दिव्यें तेजें कळे कळेना मला
मोहरात्र संपेल कधीं ही उषा कधीं येइल
सद्भाग्याचीं सुंदर किरणें कदा बरें प रिल
स्वार्थ कधीं जाईल लयाला, कलह कधीं सरतिल
सद्धर्माचीं परमैक्याचीं फुलें कधीं फुलतिल
हे भाइभाइचे परी होतील कधीं हिंदिजन
कधि हृदया मिळतिल हृदयें, जोडेल मनाला मन

उठतील कधीं तेजानें हातांत हात घालुन
अलौकिक अपूर्वा कृति करितिल त्वत्सुत कधिं निर्मळ
आनंदाश्रू त्वन्नयनांतुन वाहवतिल घळघळ ॥

* * *

अस्मन्माता करूं स्वतंत्रा ध्येय हेंच लोचना
त्वत्पुत्रांच्या दिसुनी केव्हां उठतिल त्वन्मोचना
जपती अजुनी निज शरिरांना अमूल्य ठेव्यापरी
मरणाची ती भीति क्षुद्रा अजुन तदीयांतरीं
निज आप्तांच्या निज गेहांच्या मोहीं हे अडकती
रडती, पडती, प्रखरता न ती पेटवि चित्ताप्रती
तोडितील आई ! केव्हां त्वत्सुत हे मायापाश
त्वत्स्वातंत्र्याचा केव्हां लागेल एक त्यां ध्यास
त्वद्भक्तीचा तो केव्हां दरवळेल तन्मनिं वास
देशभक्त तो रक्त एकच व्रतीं इतर विसरुन
घेइ करीं जो वाण सतीचें वज्रमूर्ति होउन

* * *

नयनीं, वदनीं, भाळीं, ज्यांच्या देशभक्ति रेखिली
नररत्नें ना अशीं सहस्रावधि अजुनी देखिलीं
ज्यांचें जीवन तहानलेलें स्वातंत्र्यसुधेस्तव
तळमळतें जळतें मन ज्यांचें, धीर न धरितें लव
उच्चारीं आचारीं ज्यांच्या अखंडित प्रगटते
स्वातंत्र्याची मंगल गंगा, तरुण असे कितिक ते ?
भोगावरतीं दृष्टि तयांची विलासैकजीवन
अनंतभोगीं भ्रमरसम रमे नित्य तयांचें मन
भावना उज्वला नाहीं मेल्यापरि दिसती तरुण
स्वातंत्र्यरवीचें ज्यांनीं आगामी व्हावें अरुण
हंसवावें निजजननीचें मुखकमल जयांनीं करुण

व्यसनशरण ते तरुण बघोनी जीव किती तडफडे
मदंतराला ठावें, माते ! अश्रुसडा मम पडे ॥

*    *    *

तुझ्या भारता! वातावरणीं जिकडे तिकडे कदा
स्वातंत्र्याचे वारे उठतिल पळवाया रिपु–मदा
स्वातंत्र्याचे पुरुषार्थाचे पराक्रमाचे तसे
विचार केव्हां रोमरोमिं ते भरतिल भरपूरसे
देशभक्ति पाजितील केव्हां माता निज लेंकरां
देशप्रेमें दिव्यें भरतिल कधीं तदीयांतरा
अज्ञानसागरीं बुडती, भारतीय माता अजुनी
देशभक्ति पाजिल कोण माता जरि पडती निजुनि
देशभक्ति खेळे जों ना मातांच्या नयनीं वदनीं
तोंवरि नाहीं आशा, देशा ! त्वदुद्धृतीची मला
दृश्य असें हें नैराश्याचें पाहुन दाटे गळा

*    *    *

मातापितरें शिक्षक रमतील देशभक्तिसागरीं
जेव्हां, तेव्हां आशेला मम पल्लव फुटतिल तरी
जिकडे तिकडे एक दिसावें दृश्य देशभक्तिचें
कानीं यावे जिकडे तिकडे शब्द देशभक्तिचे
विचारविद्युत् एकच खेळो सर्वांच्या हृन्मनीं
ध्येय दिसावें एक सर्वदा सर्वांना निशिदिनीं
सर्वांच्या दृष्टीपुढतीं स्वातंत्र्यचित्र शोभावें
सर्वांनीं यत्न करावे त्यासाठीं जीवेंभावें
प्राणचित्त वित्त असे जें सर्वस्व सुखें वेंचावें
लाखों जेव्हां अशा विचारें उठतिल मग तळपला
भाग्यसूर्य तव समज भारता ! संशय नाहीं मला

*    *    *

प्रसन्न होतिल दिशा, निराशानिशा नष्ट होइल
त्वद्भाग्याचे जगीं पवाडे सत्कवि मग गातिल

त्वन्मुखकंजीं लावण्याची दिव्य चढेल प्रभा
गगनमंडपीं वृंद सुरांचा राहिल येउन उभा
पुष्पवृष्टि करितील तुझ्यावर मग गंधर्वस्वर
यशोगान तव गातिल डोलत प्रेमानें निर्भर
होईल त्रिभुवनिं तेव्हां सोहळा महानंदाचा
बोलतील एकमेकां जन सारे नाचा नाचा
शांतीचा मांगल्याचा स्नेहाचा सौभाग्याचा
तो दिन येइल त्वत्पुत्र जरी वेडे त्वद्‌भक्तिनें
होतिल, करितिल शर्थ जिवाची मरतील स्फूर्तीनें ।।

—धुळें तुरुंग, जून १९३०.

---

## १४२ भारता ऊठ

ऊठ ऊठ, भारता ! तूं ऊठ उज्वला !
अभिनवबलवैभवयुत शोभ मंगला ।।
दशदिशांत कीर्ति—गंध मधुर दरवळो
त्वत्पावन—नामबळें दुरित तें पळो
धैर्य तुझें शौर्य तुझें अमित ना ढळो
जीर्ण शीर्ण सकळ आज जें तुझें गळो
दास्यें ना फिरुन कधीं मुख तुझें मळो
शांता, दांता, कांता
रुचिर थोर कृति कर तूं सतत निर्मळा ।। ऊठ० ।।

—त्रिचनापल्ली तुरुंग, ऑगस्ट १९३०

---

## १४३ वंदे मातरम्

वंदे मातरम् वंदे मातरम्
वंदे मातरम् वंदे मातरम् ॥
तव गत--वैभव पुनरपि मिळवूं
तव सत्कीर्ति न पुनरपि मळवूं
उज्वल करुं तव वदन त्रिभुवनि
करुं कष्ट तुझ्यासाठीं निशिदिनि
वंदे मातरम् वंदे मातरम्
वंदे वातरम् वंदे मातरम् ॥
तुज पुनरपि जननी गे हंसवूं
तुज राष्ट्रांच्या शीर्षी बसवूं
सकळ जगाची होशिल माता
देशिल हतपतितां तूं हाता
वंदे मातरम् वंदे मातरम्
वंदे मातरम् वंदे मातरम् ॥
अश्रु न आई ! आतां ढाळी
आइ ! न आतां पाही खालीं
त्वत्सुत आम्ही पराक्रमानें
मिरवूं तुज जगिं सन्मानानें
वंदे मातरम् वंदे मातरम्
वंदे मातरम् वंदे मातरम् ॥
ऊठ, पहा अम्हि सारे भाई
एक जाहलों द्रोह न राही
घसरूं पुढती मिळवूं विजया
दास्य क्षणीं तव नेऊं विलया
वंदे मातरम् वंदे मातरम्
वंदे मातरम् वंदे मातरम् ॥

विद्यावैभवविकास येइल
तववदनांबुज, आइ ! फुलेल
तुज भाग्यगिरीवरि बघ नेऊं
त्वच्चरणीं रत संतत राहूं
वंदे मातरम् वंदे मातरम्
वंदे मातरम् वंदे मातरम् ॥

—त्रिचनापल्ली तुरुंग, ऑक्टोबर १९३०.

---

## १४४ भारतजननी तव शरणम्

भारतजननी तव शरणम् । भारतमाते तव शरणम्
मोददायिनी बोधदायिनी अन्नदायिनी तव शरणम् ॥
विद्यावंते तव शरणम्
वैभववंते तव शरणम्
अनंत-तेजःप्रसवे अस्मन्मानससुखदे तव शरणम्
विक्रमकारिणि तव शरणम्
पवित्रकारिणि तव शरणम्
पुण्यकर्मसत्प्रभावतंसे हे ज्ञानरसे तव शरणम्
लावण्यमये तव शरणम्
अनाद्यनंते तव शरणम्
अति-रुचिरे सुचिरस्थिरकीर्ते परमोदारे तव शरणम्
अति-महनीये तव शरणम्
अति-रमणीये तव शरणम्
सुरवर-मुनिवर-नरवर-प्रत्यह-नमनीये हे तव शरणम्
विमले कमले तव शरणम्
नित्यानंदे तव शरणम्
शरणागतजन-अभयदायिनी तापहारिणी तव शरणम्

सुजले सुफले तव शरणम्
अजरे अमरे तव शरणम्
भक्तिज्ञानामृतसेविनि हे शांतरूपिणी तव शरणम्
तपस्विनी हे तव शरणम्
महायोगिनी तव शरणम्
भाग्याभाग्यें विजयापजयें सततहासिनी तव शरणम्
प्रभुप्रिये ! हे तव शरणम्
प्रभुपरिपाल्ये तव शरणम्
त्वत्पदकंजीं रुंझी घालूं मिलिंदसम अम्हि तव शरणम् ॥

—त्रिचनापल्ली तुरुंग, ऑक्टोबर १९३०.

---

## १४५ सुसंस्कृत कोण ?

अन्यां करील जगतीं निज जो गुलाम
तो दुष्ट, संस्कृति न त्या शठ तो हराम
तो रानटी मज गमे न मनुष्य खास
जो मानवा करुन ठेवितसे स्व-दास ॥

पापी कृतघ्न अतिदांभिक वित्तदेव
अन्यांस नित्य लुटणें कृति ही सदैव
ऐसें असून " अम्हि संस्कृत " बोलतात
ना लाज ती जणुं अणूहि तदंतरांत ॥

जातील तेथ करिती भयद स्मशान
अन्यांस नागवुनियां करितात दीन
जे कोणि या पशुंस संस्कृत नांव देती
त्यांना नसे लव विचार उदार चित्तीं ॥

अन्यास जो तुडवितो पशु त्या गणावें
त्या व्याघ्र वा वृक म्हणा, नर ना म्हणावें

तो रानटी पतित, संस्कृति ती न त्याला
न स्थान यन्मनि असे लव बंधुतेला ॥

ओतीत तोफ वरतीं फिरवी विमानें
माने तसा विहरतो मिरवे मदानें
ही संस्कृती जरि असे, वृकव्याघ्ररीस
त्यांना सुसंस्कृत म्हणा मनुजापरीस ॥

स्वार्थांध नित्य बनुनी करिती लढायी
शस्त्रें पहा अमुचि ! हीच सदा बढाई
रक्तार्थ जे तृषित चाटित ओट नित्य
माझे सुसंस्कृत तयां वदती न ओठ ॥

जेथें असे विजय, जेथ असेल वित्त
तेथेंच संस्कृति असे, न असेंच सत्य
मोठें यदीय मन, सर्व समान मानी
त्यालाच संस्कृति असे, नच ती विमानीं ॥

मानव्य ना अवगणी न कुणाहि जाची
जो काळजी निज करी करिही पराची
अन्यापदा बघुन धांवत शीघ्र जाई
त्याला सुसंस्कृत म्हणा न दुजा कुणाही ॥

कोणी न या जगिं असो कधिही गुलाम
नांदो स्वतंत्र सगळे, मनि हाच काम
दीनां सहाय्य करण्या निरपेक्ष धांवे
त्याला ' सुसंस्कृत ' विशेषण हें मिळावें ॥

ज्याला समस्त जग हें अपुलेंच वाटे
दुःखी कुणीहि बघुन स्वमनांत दाटे
ज्याला स्वदेश सगळे निजबंधु सारे
त्याला सुसंस्कृत म्हणाल तरी खरें रे ॥

पोळी तुपांत भिजवील न आपुलीच
संसार जो करि न अन्य लुटून नीच
मोदें मरेल इतरां हंसवावयाला
तुम्ही सुसंस्कृत खरा म्हणणें तयाला ।।

ना आढयता, सरलता मधुरा समीप
डोळे यदीय गमती अनुराग-दीप
कापटच ना मनिं, विनम्र विशुद्ध शील
त्याला सुसंस्कृत अशी पदवी खुलेल ।।

लावीत शोध म्हणुनी न सुधारलेला
ओतील तोफ म्हणुनी न सुधारलेला
ज्याचें उदार मन अंतर तें विशाल
त्याला सुसंस्कृत असें म्हणणें खुशाल ।।

जाईन मी मरुन, ना दुसरे मरोत
जाईन मी शिणुन ना दुसरे शिणोत
ऐसें म्हणे, हृदयिं जो धरि दीनरंक
त्याला सुसंस्कृत तुम्ही म्हणणें विशंक ।।

—त्रिचनापल्ली तुरुंग, मार्च १९३१.

---

# १४६ खरा हुतात्मा

सत्याचा जगतांत खून करिती, सत्यास फांसावरी
देती हे मदमत्त पापनिरत स्वार्थांध हे आसुरी
अन्याया अभिषिक्त आज करिती निर्लज्ज सिंहासनीं
जें जें सत् अवकाश त्यास नुरला त्या ना विचारी कुणी ।।

दंभाला कवटाळिती सतत हे पापांसची पूजिती
संपद्दैवत अर्चिती गरिब जे त्यांचे बळी अर्पिती
सारासार-विवेक अल्प न दिसे सद्बुद्धि झाली मृत
लोकीं या भरलें किती तरी पहा सर्वत्र हें दुष्कृत ।।

ऐशा या समयीं जगास सगळ्या सत्पंथ जो दावितो
ध्येयध्यास उदात्त आत्मकृतिनें लोकांस जो लावितो
क्रांती जीवनिं जो अपूर्व घडवी पाडी उभारीतसे
विश्वा उन्नत जो करी मनिं धरा कीं तो हुतात्मा असे ॥

विश्वाला कवटाळितो पसरुन प्रेमें भुजा आपुल्या
प्रेमानें बदलावया बघतसे ज्या कल्पना हो खुळ्या
क्रांती रक्तविहीन जो करितसे दीनां जनां उद्धरी
सोशी कष्ट अनंत त्यास पदवी शोभे हुतात्मा खरी ॥

क्लेशानें हंसतो न धीर खचतो हांसेल फांसावरी
ध्येयप्राप्ति करावयास पशुता ती ना कधीं आदरी
होवो अल्प तरीहि तुष्ट हृदयीं आशा सदा अंतरीं
कर्तव्यार्थ जगे, तयास पदवी शोभे हुतात्मा खरी ॥

येती संकटराशि घोर ठिकऱ्या त्यांच्या प्रतापें करी
स्वार्थापासुन नित्य दूर, अचल श्रद्धा अमर्त्या वरी
ज्याचे निर्मळ हेतु, दंभ लव ना, निष्पाप बाळापरी
वैराग्याकर थोर, त्यास पदवी शोभे हुतात्मा खरी ॥

केलें साध्य जगांत काय न बघा, ते यत्न केले किती
साध्यासाठिं नरें, तयावरुनियां घ्या तत्परीक्षेप्रती
ध्येयासाठिं उदंड यत्न करि जो आजन्म, जाती जरी
सारे बंधु विरुद्ध, त्यास पदवी शोभे हुतात्मा खरी ॥

सोशी नित्य दुरुक्ति शांत हृदयें, दारिद्र्य ज्याचें धन
जाई धांवुन देखतांच दुबळा दुःखार्त कष्टी जन
पापीही जवळी करी निजगुणें पावित्र्य देई, धरी
प्रेमें त्या हृदयीं, तयास पदवी शोभे हुतात्मा खरी ॥

धिक्कारी न कुणा, गुणास बघतो, तत्त्वा न सोडी कधीं
द्वेषद्रोह धरी दुरी, शिरति ते ज्याच्या मनीं ना कधीं
देवा एक भजे तयास हृदयीं ध्यातो, न भीती धरी
कोणाचीहि जगीं, तयास पदवी शोभे हुतात्मा खरी ॥

द्रव्यें मानमरातबें न, पदवीदानें न होई वश
सत्तेनें दबला न जात विलसे निर्दोष ज्याचें यश
चारित्र्यावर डाग नाहीं इवला, घालून तेला जरी
डोळ्यांमाजि बघाल, त्यास पदवी शोभे हुतात्मा खरी ॥

ध्येयीं जीवनिं भिन्नता न उरली तें ध्येय यज्जीवन
ना रात्री दिन वा बघे श्रमतसे खर्ची तदर्थ क्षण
ध्येयाचें अनिवार वेड, न जगीं त्यागा यदीया सरी
ऐशा थोर नरास दिव्य पदवी शोभे हुतात्मा खरी ॥

ऐशी थोर महा विभूति दिसते जेव्हां धरित्रीवरी
स्वार्थी दुष्ट असत्य दंभमति जे ते कांपती अंतरीं
सत्या स्थापुन प्रेम निर्मुन जगा देतो धडे उज्वल
जे होते पडले तयांस उठवी दे दुर्बळाला बळ ॥

ऐसा एक जगांत आज मजला गांधी महात्मा दिसे
दीनांसाठीं सदा जळे तळमळे सत्यास पूजीतसे
होती जी मळली धुळींत पडली ती भारती संस्कृती
देवोनी उजळा तिला करि नवी वानूं किती तत्कृती ॥

गांधी धर्मच, मूर्त सत्य गमती, धर्मार्थ तज्जीवन
गांधी प्रेमच मूर्त, निर्मळ सदा प्रेमार्द्र त्यांचें मन
गीता चालति बोलती मज गमे, गीतार्थ त्यांची कृती
ऐशी थोर विभूति लाभत अम्हां भाग्यास नाहीं मिती ॥

—त्रिचनापल्ली तुरुंग, जानेवारी १९३१.

## १४७ ऊठ, झुगारुन देई बेडी

उज्वला ! निर्मला
हे भारतवर्षा
हे मंगल देशा
ऊठ झुगारुन देई बेडी दवडी स्वक्लेशा ॥

कितितरि, बापा ! काळ लोटला तुजला रे निजुनी
सकल बंधनें तोडि तडातड तेजस्वी बनुनी
अमृता ! भारता !
शिर वर कर आतां
ऊठ झणीं आतां
त्वत्पदावरी त्रैलोक्य उभें ठेविल रे माथा ॥

पराक्रमानें तेजें आतां दास्या तुडवावें
तुझे पवाडे जगांत जरि रे सकळांनीं गावे
पावना ! मोहना !
रमणीया भव्या
स्तवनीया दिव्या
राष्ट्रांच्या तूं शिरीं शोभ रे अभिनव सत्सेव्या ॥

तुझी संस्कृती अनंत, रुचिरा, निर्मल, अमरा, ती
धुळींत परके मिळवुं पाहती, ऊठ, सोड भीती
दुर्जया ! निर्भया !
सुरवरमुनि–पूज्या
त्रिभुवन–संस्तव्या
अनंत कीर्ती दिगंतांत तूं मिरवी निज दिव्या ॥

तुझें बळ किती तुझी धृति किती तें आणी ध्यानीं
अवनीवरतीं धन्य होउनी शोभे स्वस्थानीं
प्रेमळा ! कोमळा !
प्रखर बने बापा
हटवी निज तापा

दीनापरि ना पडुनी राही दूर करी पापा
स्वातंत्र्याच्या स्वर्गीं नांदे, दास्यातें तोडी
दैन्य निराशा निरानंदता सकल क्षणीं मोडी
सद्व्रता ! सुव्रता !
विक्रांता दावी
भाग्याला मिरवी
दु:स्थिति अपुली विपत्ति अपुली विलयाला न्यावी ॥

डोळे उघडुन केवळ पाही धैर्य मनीं धरुनी
नसेल अवनी सारी निजबळ येइल तुज कळुनी
दुर्धरा ! गंभिरा !
सागरसम धीरा
मेरूपरि धीरा
वीरा ! वासरमणिसम तळपे करि आत्मोद्धारा ॥
समय असा ना पुनरपि येइल विलंब ना लावी
व्हावा स्वातंत्र्योदय आतां भाग्यवेळ यावी
सिंहसा भीमसा
ऊठ त्वेषानें
झळके तेजानें
दुर्गति अपुली विक्रमसिंधो त्वरित लयाला ने ॥

स्वाभिमानधन तूं रे होई खितपत न पडावें
धांवे, विजयें जगीं वैभवें तूं रे शोभावें
ऊठ रे ! ऊठ रे !
तूं तर जगजेठी
कृति करि तूं मोठी
त्वद्भाग्येंदूवरी लोभुं दे सकल–जगत्–दृष्टी ॥
स्वतंत्र होउन सच्छांतीच्या सुंदर संदेशा
तूंच जगा दे हीच असे रे इच्छा जगदीशा

उज्वला ! निर्मला
हे भारतवर्षा
हे मंगल देशा
ऊठ झुगारुन देई बेडी दवडी स्व-क्लेशा ।।

—त्रिचनापल्ली तुरुंग, ऑगस्ट १९३१.

---

## १४८ प्रभु-प्रार्थना

करुणाघन अघशमन मंगला जनार्दना श्रीहरी
मुकुंदा मनोहरा श्रीहरी
कृपाकटाक्षा क्षण तरि फेंकी, देवा ! दीनांवरी
हतबल विकल, प्रभो ! जाह्लों निराधार केवळ
खड़ोखर निराधार केवळ
पदारविंदा तुझ्या मुकुंदा पूजितसों दे बळ
पसरला निबिड अंधार
दे कर हितकर तूं तार
होउं दे अस्मदुद्धार
शिर वर करुनी जगीं वावरूं भाग्यश्रीला वरूं
वैभवा संपत्तीला वरूं
प्रपंच सुंदर करुनी देवा परमार्थाही करूं ।।
* * *
संकटांबुधीवरुनी येती पवन परम भीषण
भयंकर पवन परम भीषण
आशेचा ते दीप टाकिती क्षणीं, प्रभो, विझवुन
पुनःपुन्हां परि पाजळीतसों आशादीपाप्रती
उज्वला आशादीपाप्रती
धैर्यानें पाउलें टाकितों पुढतीं रे सत्पथीं

त्वत्कृपा अम्हांवर असो
त्वद्ध्यान मानसीं वसो
भयभीति न चित्तीं असो
सद्धर्माचा सत्कर्माचा विजयध्वज उभवुन
सुमंगल विजयध्वज उभवुन
भूमातेच्या यशें मंगलें उजळूं हें त्रिभुवन ॥

*    *    *

प्रगतिपथावर पराक्रमानें, गोविंदा, शोभवूं
भारता या अमुच्या शोभवूं
तद्भाग्येंदूवरी सृष्टिची दृष्टि सदा लोभवूं
अद्वैताचा आनंदाचा शांतीचा सुंदर
शुभंकर शांतीचा सुंदर
संदेश जगा वितरिल भारत सकलकलहसंहर
ही पवित्र मंगल कृती
करण्यास अम्हां दे धृती
कर निर्मळ अस्मन्मती
जय जगदीशा ! जय परमेशा ! जयजय हे श्रीहरी
मुरारे जयजय हे श्रीहरी
धीबल वितरी, प्रेरणा करी, दे स्फूर्ती अंतरीं ॥

—अमळनेर, छात्रालय १९२८.

## १४९ राष्ट्राचें उद्यान

राष्ट्रीय जीवन
ओसाड मैदान
या रे निर्मूं तेथें
या रे सारे जण
स्वार्थाचे पाषाण
करूं त्यांचें चूर्ण
भीषण भुजंग
मारा आधीं साचे
ठायीं ठायीं त्यांचीं
टाका विध्वंसून
अज्ञान–दलदली
होवो शुद्ध हवा
रूढींचे हे दुष्ट
कराच विध्वंस
दुष्ट आचारांचीं
जाळावीं हीं सारीं

भेसूर भयाण
भगभगीत
रमणीय उद्यान
श्रमावया
भेदांचे पाषाण
चला आधीं
क्रोध मात्सर्याचे
प्राणघेणे
वारुळें भयाण
आधीं आधीं
साऱ्या या आटवा
आरोग्याची
भरोतच डांस
त्यांचा आधीं
जाळीं हीं कांटेरी
माजलेलीं

* * *

दिव्य स्वार्थत्याग
पसरूं ती हातीं
ऐक्याचें भरपूर
बाग सुशोभित
प्रयत्न अनंत
उद्यान समस्त
सद्विचार–वृक्ष
पवन वाहेल
मंदार सुंदर

अमोलीक माती
आधीं आधीं
घालूं या रे खत
तरि होई
हाच सद्वसंत
शोभवील
सद्वृत्तीचे वेल
पावित्र्याचा
शुभ मांगल्य

बकुळ भाग्याचे फुलावेत
सच्छील पुष्पांचा गोड परिमल
प्रेम अलिकुल गुंगूं गुंगो
सत्कर्म ताटवे फुलोत सर्वत्र
उद्यान पवित्र भरारो हें
सद्‌गुण–विहंग करोत कूजना
विश्वजनमना वेडावोत
खरी समानता दिव्य स्वतंत्रता
यांच्या कल्पलता फोंफावोत
आशेचे अखंड हौद ते वाहोत
स्फूर्तीचे तळपोत दिव्य मीन
नाचोत कारंजीं खऱ्या उत्साहाचीं
खऱ्या श्रीमंतीचीं अंतरींच्या
श्रद्धेचीं बाळकें सच्चिदापीतटीं
खेळोत गोमटीं कौतुकानें
अशा राष्ट्रोद्यानीं तो जगन्मोहन
मांडील स्वासन शुभंकर
सुखाचा सोहळा भाग्या चढे कळा
पाहेल जो डोळां तोची धन्य

—अमळनेर छात्रालय, १९२९.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
स्थळ प्रत
सं. नं.
ता.
ग्रा. से.

## १५० राष्ट्र–पताका

करुं वंदना प्रभातीं । करुं कीर्तना प्रभातीं
राष्ट्रप्रभा पताका । वंदून पूजुं हातीं
स्वातंत्र्यमंत्रपूते । स्वातंत्र्यगीतगीते
ज्योतिर्मये अखंडे । स्वातंत्र्यसद्विभूते
हे उज्वले पताके । तेजस्वि हे पताके
तुज पाहुनी सदैव । कळिकाळ पोटिं धाके
खुलतात तीन रंग । किति गोड गोड गोड
हे तीन रंग म्हणजे । शम–शौर्य–धर्म–जोड
शांतीस दावि हरित । सत्त्वास दावि धवल
शौर्यास केशरी तो । दावीत अर्थ विमल
चरका वरी विराजे । श्रमगौरवास दावी
समता स्वतंत्रतेचें । हें चिन्ह सुप्रभावी
रमवील उद्यमांत । सर्वांस नित्य झेंडा
देईल सर्व लोकां । साधा स्वतंत्र धंदा
जाळील दास्य सारें । नमवील मत्त लोक
वितरील सौख्य सर्वां । दवडील दीन–शोक
हे निर्मळे पताके । तूं मोक्षमार्गदीप
न दिसेल दैन्य दास्य । जरि तूं सदा समीप
तूं मूर्त राष्ट्र–वृत्ति । तूं मूर्त राष्ट्र–कीर्ती
तूं त्याग मूर्तिमंत । तूं मूर्त राष्ट्र–दीप्ती
तूं शौर्य धैर्य वीर्य । तूं स्वाभिमान–सूर्य
जें स्तव्य सेव्य भव्य । तें सर्व तूं अपूर्व
राष्ट्रास तूंच आस । राष्ट्रा तुझीच कास
आधार तूं जनांचा । विश्वास तूं अम्हांस
तूं ना तरी न कांहीं । ना राष्ट्रनाम राही
ना वित्त अब्रु जीव । स्वातंत्र्यलाभ नाहीं

शोभेल राष्ट्र–देह । जरि डोलसी अजेय
स्वातंत्र्य–चारु–गेह । तूं निस्तुला अमेय
विलसे त्वदीय रूप । झळके नभीं सुरूप
जरि लोचनां समोर । भरतो मनीं हुरूप
तुज लोचनीं बघून । तुज डोलतां बघून
गगनांत वायुसंगें । मन ये उचंबळून
देशाभिमान–वारा । हृदयीं भरे भरारा
लोभादि क्षुद्र भाव । जाई विरून सारा
भयभीति लेश नुरते । निर्धास्त वृत्ति होते
तुज पाहुनी समोर । हा प्राण तुच्छ वाटे
करुं कोट छातिचा या । होमूं स्वकीय काया
प्राणांस या त्वदर्थ । अर्पूं, धरूं न माया
तुज रंगवूं स्वरक्तें । पूजूं तुला स्वहस्तें
तूं देवता त्वदर्थ । करिजे न काय भक्तें ?
हे तारके पताके । दुर्दांत निष्कलंके
हे मंगले अनंते । हे पावने विशंके
हृदयीं तुझा निवास । प्रिय सेव्य तूं अम्हांस
तुज सर्व कांहि देऊं । घे नम्र वंदनास

—त्रिचनापल्ली तुरुंग, सप्टेंबर १९३०.

## १५१ प्रतिज्ञा

निघालों अम्ही हो सुखानें मराया । स्वतंत्र स्वदेशा प्रयत्नें कराया
नका आमुचे पाय कोणीहि ओढूं । अम्ही आइचीं बंधनें आज तोडूं ।।

नसे यावयाचें, तरी जा घरांत । अम्हां अडथळा ना करावा पथांत
अम्ही दूर लोटून तुम्हांस जाऊं । अम्ही पेटलों प्राण हे आज देऊं ।।

चला सर्व ते ते जयांची तयारी । कराया स्वतंत्र स्वभू दिव्य प्यारी
निखारा सुखाच्यावरी ठेउनियां । चलावें विलासादिकां सोडुनीयां ।

उठा रे उठा जाहलां काय षंढ । उठा रे उठा थोपटून स्वदंड
उठा रे उठा क्षोभ ना काय येतो । न का दास्य पाहून तो त्वेष येतो ।।

मृताच्यापरी ना पडोनी सडावें । पशूच्यापरी ना पडोनी रडावें
उठावें नटावें तुम्ही दिव्य तेजें । असे पाप तें लोळणें आज शेजे ।।

उठा रे तुम्हां काय ना क्रोध येतो । उठा रे तुम्हां काय ना त्वेष येतो
करायास कार्य प्रभावें उठावें । तुम्ही आपुलें आज स्वातंत्र्य घ्यावें ।।

उठा सर्वही ना पडा दैन्यवाणे । चला आज तो मोक्ष ओढून घेणें
उठा रे प्रतापी बना सिंह धीर । मृतीची न पर्वा बनूं शूर वीर ।।

चला घ्या पताका करीं दिव्य भव्य । नसे सत्य देशाहुनी अन्य सेव्य
उठा वाजवा रे नगारे प्रचंड । करूं दास्यतेचे क्षणीं खंड खंड ।।

चला जे न घेतील केव्हांहि मागें । चला जीव ज्यांचा कधींही न भागे
चला चित्त ज्यांचें जळे फार पेटे । चला मोक्ष संपादण्या सर्व नेटें ।।

रुचे ना सुचे ना अम्हां आज कांहीं । दिशा ओस दाही नसे सौख्य कांहीं
नसे जों स्वतंत्र स्वभू आमुची ही । सदा तोंवरी शल्य चित्तांत राही ।।

अतां एकचि ध्येय आहे समोर । स्वतंत्र स्वदेशा करूं दाउं जोर
निज प्राण घेऊनियां ते करांत । चला आणुं स्वातंत्र्यदेवी घरांत ।।

नको दास्य आतां पुरे पारतंत्र्य । उठा रे उठा होउं आज स्वतंत्र
बना निर्भयस्वांत उत्साहशाली । स्वतंत्र स्वभू पाहिजे आज केली ।।

करा गर्जना घोर ऊर्जस्वला ती । जिला ऐकुनी कांपती ते अराती
उठावें अतां एकदांची समस्तीं । चला झाडुनी जीवनांतील सुस्ती ॥
अम्हां थोर वीरां जगीं कोण वारी । अम्हां दिव्य वीरां जगीं कोण मारी ॥
करूं मुक्त आम्ही प्रिया भारतातें । प्रतिज्ञा अशी ऐकवीतों जगातें ॥
—त्रिचनापल्ली तुरुंग, ऑक्टोबर १९३०.

---

## १५२ झेंडागीत

उठा, बंधुनो ! प्रभात झाली झेंडा–वंदन करूं चला
प्रतापशाली गगनीं फडके अमरध्वज तो पाहुं चला ॥
जेंवि चराचरिं वायु वाहुनी जीवनरस तो ओतितसे
प्रभात–काळीं तेवीं ध्वज हा अस्मन्मानस फुलवितसे ॥
प्रभात–काळीं दिनकर कोमल सुमगण जेवीं हंसवितसे
संदर हंसरा ध्वज हा विजयी तेंवि मनाला खुलवितसे ॥
हंसवी चित्ता, आशा निर्मी, स्फूर्ति अंतरीं संचरवी
तेजोदायक तिमिरविदारक तळपे ध्वज हा जसा रवी ॥
पहा स्वकीया करा हलवुनी आपणांस तो बोलवितो
माझ्याखालीं गोळा व्हा रे तमाम सारे तो वदतो ॥
झेंड्याखालीं तमाम सारे जमाव करूं या मोदानें
अंतरंग रंगवूं चला रे शौर्यें धैर्यें वीर्यानें ॥
राष्ट्राचा हा प्राण अमोलिक राष्ट्राचें हें जीवन हो
सर्वस्व असे अपुलें जें जें तें तें झेंडा दावित हो ॥
ज्या राष्ट्रातें झेंडा नाहीं त्यातें नाहीं जगिं मान
मान तयाची वरी न होई करिती त्याचा अपमान ॥
विद्या–वैभव–कला–कीर्तिचें अरूचें अभिमानाचें
संरक्षण होतसे जरि वरी गगनीं झेंडा हा नाचे ॥
झेंडा म्हणजे जीवन अपुलें झेंडा म्हणजे स्वप्राण
झेंडा म्हणजे राष्ट्र आपुलें झेंडा दैवत ना आन ॥

स्वातंत्र्याचें चिन्ह सुमंगल म्हणजे झेंडा हा आहे
झेंडा फडके झळके जोंवरि तोंवरि वैभवयश राहे ।।
झेंडा चमके जोंवरि अपुला विश्वीं विजयी विक्रांत
राहूं तोंवरि आपण तेजें निर्भय निर्मळ निभ्रांत ।।
झेंड्याला या वित्ताहून प्राणांहुनहि जपा सदा
झेंडा अपुला जीव धर्महि झेंडा अपुला देव वदा ।।
ऐक्याच्या वातावरणाचा झेंडा असतो निर्माता
स्वातंत्र्याच्या संगीताचा झेंडा असतो उद्गाता ।।
झेंड्यासाठीं नाना देशीं नाना वीरीं निजरक्त
दिलें, प्राणही फेंकुन दिधले, झेंड्याचे व्हा तुम्हि भक्त ।।
लाखों करिती बलिदान मुदें एका या झेंड्यासाठीं
झेंड्याचा महिमा न वर्णवे कधीं कुणाही या ओठीं ।।
सर्वस्वाचें सर्वैक्याचें राष्ट्रत्वाचें हें चिन्ह
एकचित्त संमूर्त जाहलें धरा अंतरीं ही खूण ।।
एका अत्तर थेंबामध्यें लाखों कोटी सुमनांचें
ओतिलें असे सर्वस्व तसें झेंड्यामध्यें राष्ट्राचें ।।
झेंडा दावी परंपरेला झेंडा संस्कृति गात असे ।
झेंडा तुमच्या पूर्ववैभवें सद्गुणवृंदें चमकतसे ।।
मधमाशा त्या पोळ्यासाठीं निशिदिन जेवीं जपताती
झेंड्याला या राखूं आपण करूं प्रतिज्ञा प्राणांतीं ।।
जें आतांचें जें पूर्वीचें भविष्य काळांतीलहि जें
अपुलें मंगल सुंदर उज्वल तें या झेंड्यामधें सजे ।।
झेंडा सुंदर थोर तिरंगी ललामभूत त्रिजगातें
त्रैलोक्य उभें अभिराम अशा या झेंड्याला नत नमतें ।
प्रातःस्मरणीया रमणीया वरणीया झेंड्या नमन
तुला करितसों, तव भक्तीनें जावो अमुचें भरून मन ।।
—त्रिचनापल्ली तुरुंग, सप्टेंबर १९३०.

## १५३ नवयुवक

हंसो दिवस या असो निशा ती ! असो पौर्णिमा असो अमा ती
अम्हांस नाहीं लवही भीती । पुढेंच घुसणें ठरली नीती
अदम्य आम्ही पुढेंच जाऊं । धैर्ये शौर्ये पुढेंच धावूं
स्मशान–शांती अम्हां रुचेना । भयानकाला करुं आव्हाना
प्रचंड पर्वत पायीं तुडवूं । लोळ विजेचा हातीं अडवूं
छातीवर ती झेलूं गोळी । करूं मृत्युशीं खेळीमेळी
दिव्य असीम प्रताप अमुचा । पुढेंच घुसणें नेम सदाचा
ध्रुवाजवळची थंडी येवो । तन अमुचीही गोठुन जावो
सहारांतली येवो आग । पुढेंच जाऊं काढित माग
अफाट दर्या मना न भिववी । प्रचंड तटिनी मना न डरवी
भीषण दाट प्रचंड कानन । दऱ्याखोरिं जीं फिरवित नयन
असोत किल्ले कडे असोत । जाऊं दृढ निज पाय रोवित
धूमकेतु ते अभद्र येवो । तुफान डोक्यावर घोंघावो
आपत्तींचे पर्वत येवो । मृत्यु येउनी सन्मुख राहो
मृत्यु असे तो मित्र आमुचा । संकट तो तर सखा जिवाचा
हे प्रिय सगळे सखे संवगडी । आम्हांवरि ते करितिल न कडी
रडवाया जे आम्हां येतिल । हंसवुन आम्हां तेची रडतिल
अम्हां कशाची तमा न तिळभर । रणधीर अम्ही निर्भय वीर
नवभारतसुत आम्ही दिव्य । घ्याया जातों उत्कट भव्य
जसा मारुती वरींत उडाला । जन्मतांच धरण्यास रवीला
तेजार्थ तसे असों भुकेले । राहुं न आतां मृत पडलेले
रडत झुरत ना अम्हि बसणार । भाग्यगिरीवर दृढ चढणार
खुशाल कोणी करो विरोध । झुंजार अम्ही निर्भय योध
प्राणांची ना अम्हां फिकीर । नसे कशाची अम्हां जिकीर
त्यागानें तळपणार हीर । झालों आम्ही खरे फकीर
भारतांत या आणूं तेज । भारतांत या आणूं वीज

भारतांत या आणूं जोम । भारतांत या निमूं प्रेम
प्राण भारतीं सतेज आणूं । ज्ञान भारतीं जिवंत आणूं
जन्म सफल हा तरीच मानूं । स्वतंत्रता भारतांत आणूं
आम्ही युव नव-भारत-पुत्र । व्रती पवित्र ज्वलच्चरित्र
घालित न बसूं वाद वितंड । केवळ जमवित वसूं न फंड
भैरव आम्ही दुर्जय चंड । करुं दास्याचे तिळतिळ खंड
तेज आमुचें दिव्य उदंड । जाळिल अवघें हें ब्रह्मांड
हिमालयाला गदगद हलवूं । सिंहालाही हिसडे देऊं
कोण अम्हांला करिल विरोध । झुंजार अम्ही निर्भय योध
प्राणांवर जाहलों उदार । कोण अतां घेइल माघार
विचार केवळ रुचे न संतत । कृती करावी हें अमचें व्रत
लंबकापरी आंदोलनता । देइल कधि न स्थिति समुन्नता
या जे उत्सुक नव कार्याला । चला उठा या दिव्य रणाला
काय काम तें विचारतां का ? । ऐका तरि तें उरो न शंका
राजकीय वा सामाजिक तें । दास्य अम्हांतें सहन न होतें
या दास्याला पाँदे तुडवाया । अन्यायाला पाँदे तुडवाया
जगद्दुष्टता ही बदलाया । दुःखनिराशा दूर कराया
दुष्ट रूढिंना बुडवायाला । दुष्ट धर्म ते उडवायाला
वैषम्याला दूर कराया । दारिद्र्याला दूर कराया
रोगराइला दूर कराया । दुष्काळाला दूर कराया
पापाला त्या दूर कराया । अज्ञानाला दूर कराया
संकुचिताला दूर कराया । संचयबुद्धिस दूर कराया
मदोद्धतांचा मद उतराया । उद्दामांची रग जिरवाया
पुंजिपतींची पत हरवाया । सत्ता त्यांची ती हरवाया
अम्हि उठलेले युव तेजाळ । अम्हि आगीचे जळते लोळ
करीं घेतलें सतिचें वाण । उठलों आम्ही युव बेभान

झालों आतां जसे तुफान । अम्हां कशाची नसे गुमान
मान अतां ही वर करणार । कुणास आतां ना उरणार
बेडर बेशक बेदरकार । पुढेंच आतां अम्हि घुसणार
वाटेमध्यें जें जें वाइट । टाकूं करुनीच नायनाट
अवास्तविक जें जुलमाचें जें । रास्त नसे जें पांक्त नसे जें
भ्याड असे जें मलिन असे जें । दुष्ट असे जें नष्ट असे जें
जें सडलेलें जें कुजलेलें । निरुपयोगि जें जें मेलेलें
विरोध जें जें करिल विकासा । त्याच्या त्याच्या करूंच नाशा
त्या सर्वांना पृथ्वीवरुन । सुदूर देऊं भिरकावून
या जे उत्सुक या कार्याला । तेज आणुं या स्वजीवनाला
या या सगळे सखे सहोदर । या जे नवयुव परम उदार
या रे सगळे, समानतेची । माधुर्याची मांगल्याची
सर्वैक्याची सारल्याची । स्वतंत्रतेची समृद्धतेची
सच्छांतीची सत्-ज्ञानाची । सद्‌भक्तीची सत्स्फूर्तीची
निर्मूं पावन मंगल गंगा । अनंतरंगा दिव्य अभंगा
सत्प्रेमाला करुं अभिषेक । सत्याला या करुं अभिषेक
मानव्याला करुं अभिषेक । बंधुत्वाला करुं अभिषेक
यात्रेकरु हो आपण सारे । यात्रेलागीं चला निघा रे
दिव्य निशाणें हातीं घ्या रे । सद्ध्येयाचीं गाणीं गा रे
खरे तरुण नव आपण होऊं । भारतास या शोभुन राहूं
ध्रुवबाळाचे प्रल्हादाचे । सत्त्वसिंधु चिमण्या चिलयाचे
रोहिदास अभिमन्यू यांचे । सत्यकाम नचिकेता यांचे
शुकसनकांचे उपमन्यूचे । ज्ञानेशांचे शिवबाजींचे
जनकोजीचे विश्वासाचे । वंशज आपण पवित्र साचे
परंपरा ही आहे थोर । तिचा आपणां अनंत जोर
परंपरा ही पुढें चालवूं । परंपरा ही कधिं न मालवूं

परंपरेचा नंदादीप । सदैव पेटत ठेवुं समीप
स्वप्राणांचें घालूं तेल । सदा दीप हा मग तेवेल
यथार्थ आपण होऊं तरुण । नव्या मनूचे होऊं अरुण
परमेशाचें करुन ध्यान । हीच घेउं या मनांत आण
" हंसो दिवस वा असो निशा ती । असो पौर्णिमा असो अमा ती
अम्हांस नाहीं लवही भीती । पुढेंच घुसणें ठरली नीती "

—अमळनेर छात्रालय, १९२९.

---

## १५४ बाल-वृद्ध-संवाद

शाळा सुटली कटकट मिटली बाळें मग जमलीं
वदनें तेजानें फुललीं
शाळा सुटते कधीं अशी ते वाट बघत होते
बाळक तेजस्वी हो ते
सगळे जमले एके ठायीं रांग झालि नीट
दिसती उल्हासी धीट
झेंडा घेउन नायक झाला सर्वांच्या पुढती
मग मिरवणूकीस निघती
हुकूम झाला कूच कराया मग वानरसेना
निघाली गात दिव्य गाना
उत्साहानें उल्हासानें बाळें तीं निघती
मुखानें संगीत म्हणती
जों न निघालीं तोंच भेटला वृद्ध एक त्यांस
विचारी प्रश्न बालकांस
वृद्धः— कुठें, मुलांनो ! जातां तुम्ही निशाण हें कसलें ?
सांगे काम कोण असलें ?

लहान तुम्ही बाळ मजेनें हांसत खेळावें
मांडीवरतीं लोळावें

खावें प्यावें मौज करावी चिंता ना करणें
हंसुनी इतरां हांसविणें

बाल वय असे अजुनी तुमचें हंसण्या रडण्याचें
क्षणांत रुसण्याफुगण्याचें

कुठें जातसां निशाण घेउन ? दिसतां मज वेडे
परता मागें घ्या पेढे

मुलांमुलींनीं घरीं बसावें आईशेजारीं
जावें कधीं न बाहेरी

चला सकळही परता तुम्ही माझें ऐकावें
वृद्धा सदैव मानावें

परता, बघतां काय असे रे ऐकावें माझें
तुम्हि तर गोड बाळराजे "

एक मुलगा–" अमुचा आहे नायक हा हो तुम्हां सांगेल
कसला खेळतसों खेळ

बोलत नाहीं आम्ही कोणी शिस्त असे अमुची
आज्ञा ऐकतसों याची

सांग गड्या रे यांना सारें यांना समजावी
शंका त्यांचि न ठेवावी

आम्ही सगळे उभे राहतों रांगेमधिं नीट
त्यांना सांग, तूंच धीट " ॥

वृद्धः– " नायक तुमचा ? काय बोलतां ? पाळितसां शिस्त ?
ठेउन त्याच्यावर भिस्त ?

शिपायीच जणुं झालां ? करतां थट्टा वृद्धाची
नसावी बुद्धि अशी साची ?

नायकः—"अहो खरोखर आम्ही सगळे आहोंत शिपायी
खोटें सांगुन करुं कायी ?
शिस्त पाळतों, नीट वागतों, जातों खेळाया
कसला खेळ सांगतों, या
गाणीं गावीं सुंदर सुंदर भारतमातेचीं
चित्तें हरण्या लोकांचीं
देशभक्तिचीं स्वदेशिचीं तीं दिव्य गाणिं गातों
रस्त्यांतून गात जातों
निशाण अपुल्या देशाचें हें झेंडा राष्ट्राचा
सुंदर अपूर्व तेजाचा
तीन रंग हे पहा केशरी हिरवा हा धवल
वरतीं चरका हा विमल
धर्मैक्याचें स्वातंत्र्याचें झेंडा हें चिन्ह
झेंडा समानता—खूण
थोरामोठ्यांनीं हा केला झेंडा निर्माण
भारतसेवेची खूण
या झेंड्याचीं गाणीं गातों करितों तत्पूजा
तेव्हां वाजवितों बाजा
लोकां करणें जागृत, जागृत करणें व्यापारी
म्हणुनी अमुचि निघे स्वारी
दुकानदारापाशीं जाउन जोडुन त्या हात
वदतों काय अम्ही गोष्ट
नका विकूं हो नका विकूं तो परदेशी माल
होती बंधूंचे हाल
नका खरेदी करूं नव्यानें परदेशी माल
होती देशाचे हाल

परदेशांतिल मोहक वस्तू वस्त्रें न विकावीं
भारतमाय न रडवावी
घरोघरींही जातों आम्ही आळीआळींत
गातों देशभक्ति-गीत
जो जो आम्हां वेळ सांपडे सांभाळुन शाळा
देतों तो या कार्याला
खेळ आमुचा हाच, अम्हांला यांतच आनंद
नाहीं इतर अम्हां छंद
कशास पेढे देतां ? त्यांतहि साखर परदेशी
वाइट वाटे आम्हांसी ॥

वृद्धः- मला वाटतें भय, बाळांनो ! साहस न करावें
झडकर तुम्ही घरिं जावें
वाट तुमचि ते पहात असतिल घरीं आइबाप
होइल त्यांस किती ताप
जा परतुन माघारे, ऐका आगित न शिरावें
स्वगृहीं शांतपणें जावें
जा माघारे म्हाताऱ्याचा ऐकावा बोल
मना निज ठेवा समतोल ॥ "

गायकः-" भीती न शिवे थोडी देखिल अमुच्या चित्ताला
नो भितों जगांत कोणाला
निःशंक अम्ही सारे जातों गात देशगीतें
आम्ही नाहिं मुळीं भित्रे
गांधीजींचें नांव नाचतें ओंठावर नित्य
नाहीं कळिकाळा भीत
भारतमातेचे हो आम्ही छोटे सरदार
नाहिंचे खेळ, न घरदार

भारतमातेचे हो आम्ही भावी आधार
घेऊं कधीं न माघार
अमुच्यामध्यें असे पहा हा सुभान त्या नांव
त्याचें तेज किति अपूर्व
लहान आहे तरि तो आहे सिंहाचा छावा
भीति न शब्द त्यास ठावा
लहान दिसतो तरि तो आहे दिव्य बालवीर
अद्‌भुत त्याचा तो धीर
पलीकडे तो बालक दुसरा नामें शिवराम
मोठा निश्चयि अभिराम
पलीकडे तो बाळ हांसतो 'साधु' त्यास म्हणती
त्याच्या निश्चयास न मिति
प्रल्हाद, भिका, रामदास तो त्रिंबक तो चौथा
त्यांची स्मृति राहो चित्ता
कितिकांचीं मी सांगूं नांवें बालवीर सारे
काळहि त्यांच्याशीं हारे
भीतीच्या ना सांगा गोष्टी आम्हां भय नाहीं
हृदयीं देशदेव राही
गांधीजींचें नांव मुखीं मग भीति कशी राही
भीती सर्व पळुन जाई
तीन रंगि हा झेंडा अमुचा तिन्ही जगीं फिरवूं
याच्या तेजानें मिरवूं
त्यास सारी चित्तामधली भयभीती जावी
सेवक देशाचे भावी
अम्ही भयाचे गिरवित बसलों धडे जरी आज
होइल पुढें केंवि काज

स्वातंत्र्याला मिळवायाला मिळलें राखाया
झिजवूं आम्हि मुर्दे काया
नसे मोह तो आतां आम्हां खाण्यापीण्याचा
मोह न उरला नटण्याचा
गाणीं गालीं झेंडा घ्यावा यांतच आनंद
आम्हां इतर नुरे छंद
खेळायाला जरी आवडे वेळ नसे त्याला
करणें स्वतंत्र देशाला
स्वस्थ न आतां अम्हां बैसवे आम्ही जरि बाळ
होऊं काळाचे काळ
बाळच होता ध्रुव परि सोडुन अन्यायी बाप
जाई देवाचे समिप
अढळपदावर जाउन मिरवे ध्रुव तो तेजानें
त्यागें अढळ निश्चयानें
भारत आम्ही अढळपदावर नेउनियां बसवूं
त्याला स्वातंत्र्यें नटवूं
रोहिदास तो बाळच होता सोशी किती कष्ट
छळि जरि कौशिक तो दुष्ट
सत्त्व न त्यानें तें हारविलें तेजें तळपतसे
होऊं बाळहि आम्हि तसे
लहान होते किती लवांकुश तरि ना डगमगले
लढण्या रामाशीं सजले
लहान होता चिमणा चिलया सत्त्वास्तव मेला
भूषण भारतास झाला
कड्यावरुन लोटिती घालिती जळत्या खाईंत
परि तो प्रल्हाद न भीत

तप्त-तैल-कढईंत टाकिती बाळ सुधन्वा तो
हंसतो कृष्ण कृष्ण म्हणतो
मान न लववी श्रीशिव भूपति परक्या सत्तेला
नव्हतीं वर्षें तें सोळा
लहान होते समर्थ तरि ते त्यागिति घरदार
त्यांच्या धृतिस नाहिं पार
जनकोजी विश्वासराव ते ते माधवराव
देती भीतीस न ठाव
सोळा सतरा वर्षें त्यांचीं सेनापति होती
लाखों लढायांत लढती
लहान आम्ही तरि ना भीती, काळाचे काळ
ना अळुमाळ न लडिवाळ
म्हणूं नये कीं लहान आहे छावा सिंहाचा
घेइ प्राण गजेंद्राचा
म्हणूं नये कीं लहान पिलूं तल्लख नागाचें
चावे कडकडून साचें
स्फुलिंगकण तो लहान न म्हणा लहानशी ठिणगी
लाविल आग समस्त जगीं
लहान न म्हणा त्वेषें सणणण करित जाइ तीर
तोडित रिपुचें झणिं शीर
लहान म्हणुनी अम्हां भिववितां भिणार ना आम्ही
येऊं देशाच्या कामीं
डी व्हॅलेरा होता म्हणती तीनच वरषांचा
तुडवी ध्वज रिपुचा, वाचा.
असे मॅझिनी बाल्यापासुन देशास्तव दुःखी
राहे सदोदित सुतकी

काळा पट्टा शोकनिदर्शक हातावर बांधी
वाचा गोष्ट त्याचि आधीं
लहान म्हणुनी गोंजारूनी घरांत ठेवून
फळ तें काय? जाउं मरून
मरावयाचें तुम्हां आम्हां आहे सगळ्यांतें
किमर्थ धरणें भीतीतें
कर्तव्याचा रस्ता दिसतो आम्हांस समोर
येवो संकटेंहि घोर
कर्तव्य अम्हीं करणें त्यांतच आम्हां आनंद
नाहीं रुचत इतर छंद"

वृद्धः- "मरावयाचें असे एक दिन जरि तें सगळ्यांतें
आजच कां जा मरण्यातें
लहान तुम्ही, करा तयारी, धष्ट पुष्ट व्हावें
खावें प्यावें खेळावें
अभ्यास करा ज्ञाना मिळवा उतावीळ व्हा न
अजुनी बाळ तुम्ही सान
कर्तव्यच्युत व्हा न सांगतों, कर्तव्य कराया
आहे वेळ अजुनि राया!
मोठें व्हावें तनामनानें ज्ञानहि मिळवावें
मग तें कर्तव्य करावें
अपक्व बुद्धी अजुनी तुमची, तुम्हांस ते म्हणती
मर्कट वानरसेना ती
खोडया करणें, गंमत करणें, स्वभाव हा तुमचा
काळ प्रसन्न बाल्याचा
करा तयारी, धरून हुषारी, भावी कार्याची
ठेवा स्मृति चित्तीं त्याची

नका हटाला पेटूं त्यानें न घडे कल्याण
अंतीं रडतिल हे नयन

कमवायाची वेळ असे तनु ना गमवायाची
मिळवा जोडहि ज्ञानाची

घाई न करा सकळ नासती कार्यें घाईनें
घ्यावें सकळहि धीरानें

जा माघारे हात जोडतों होतिल रे हाल
मातें बघवतिल न बाळ

राजस सुंदर बाळ तुम्ही रे मृदु जणुं नवनीत
माझें अंतरंग भीत

फुलापरिस सुकुमार अरे कुणि येउन तुडवील
पायें तुम्हां कुसकरिल

सद्‌गुण मिळवा, ज्ञाना मिळवा, करा निजविकास
यावें पुढती कामास

सुंदर शरिरें मनें सुंदरें करा आधि तुम्ही
पूजा पुढें मातृभूमी

भविष्य आहे अपार तुमच्या समोर कां घाई
मन्मन कळवळोन जाई

अविचार नका करूं मुलांनो वृद्धाचें ऐका
सोडा सर्व तुम्ही हेका

जा माघारे आइबाप ते अपुले हंसवावे
त्यांच्या सन्निध नाचावें "

नायकः— " पोक्त असे जरि सल्ला तुमची न रुचे हृदयास
न पटे अमुच्या बुद्धीस

केवळ वाचुन घरांत बसुनी ज्ञान तें न मिळतें
ज्ञान प्रसंगेंच कळतें

देशभक्तिचे धडे वाचुनी केवळ ना अर्थ
पुस्तक केवळ तें व्यर्थ

आली आहे संधि शिकाया देशभक्ति चीज
घेऊं केविं घरीं नीज

वस्तुपाठ हा देशभक्तिचा समोर असतांना
वाचिल कोण पुस्तकांना

प्रत्यक्षाचें ज्ञान असे जें महत्त्व त्या फार
उपयोगी न ग्रंथभार

भावी कार्या करण्यासाठीं आजपासुनीच
मिरवूं धडे जे महोच्च

धैर्य, धडाडी, त्याग, अभयता, बाणा सत्याचा
शिकतों ओनामा त्याचा

घरांत बसुनी मोठा झाला कोणी ना केव्हां
बसलां फसे, समय जेव्हां

वानर म्हणती ! चेष्टा ना ती, तो ना अपमान
अमुचा तोच खरा मान

वानरांस त्या संगें घेई प्रभू रामचंद्र
जिंकी बलाढ्य असुरेंद्र

पालाखाऊ वानर करिती जगताला चकित
करुनी रावण रणिं चीत

पालाखाऊ वानर करिती करणीस अचाट
घाली जग तोंडीं बोट

वानर होते परी तयांनीं सुरवर सुखवीले
स्वयश त्रिभुवनिं मिरवीलें

वानर झाले पूज्य तयांचा नायक हनुमंत
झाला देव थोर संत

वानर नांवाची न वाटते आम्हां तिळ लाज
करणें मातृभूमि–काज

गांधि महात्मा करितिल अमुचें प्रेमें कवतुक
अमुचें तेंच सर्व सुख

लहान आम्ही तरी जागवूं देशभक्ति हृदयीं
सुखवूं भारतभू–मायी

लहान तारा असे तरी तो चमके तेजानें
तिमिरा अल्प तरि लया ने

लहान असलें फूल तरी तें करुनी छायेला
रक्षी मृदु दंर्वाबिंदूला

लहानासहि यथाशक्ति ये करावया काम
नलगे कीर्ति नको नाम

क्षमा करा हो मदवज्ञेची, हेतु असे शुद्ध
व्हावें अम्हांवरि न क्रुद्ध

तुम्ही जाहलां वृद्ध परि असे उल्हासी अमुची
वृत्ती निर्भय तेजाची

नका रोखुं हो स्वदेशकार्या अडथळा न आणा
अमुचा निश्चय तुम्हि वाना

आशीर्वादा द्या आम्हांतें अमुच्या हातून
होवो दूर माय–शीण

आशीर्वादा द्या भय न शिरो अमुच्या चित्तांत
देऊं मातृभूस हात

आशीर्वादा द्या स्वार्थानें तनमन न मळावें
झिजुनी देशास्तव जावें

आशीर्वादा द्या कीं निश्चय राहो अविचलित
निर्मळ असो सदा चित्त

त्रास, हाल, हीं अम्हां भूषणें थोर अलंकार
सांगूं काय तुम्हां फार
मनीं शुभेच्छा तुम्ही बाळगा " स्वतंत्र हा देश
करुं दे लौकर जगदीश "
जगदीशाला स्मरा अम्हांला उत्तेजन द्यावें
अमुचें कौतुक करावें
जरी आमुचे आइबाप ते विरोध करितील
आम्हां ओढुन नेतील
त्यांना वळवा कथुन शब्द ते धीराचे चार
कीं हे " दिव्य बाळ वीर
घडो स्वभूमीसेवा यांचे हातुन हे हीर
देऊं यांस चला धीर "
नायक वृद्धाला हे ऐसे बोलत जों बोल
जे स्फूर्तीचे कल्लोळ
तोंच तिथें तो पिता तयाचा अकस्मात आला
पकडी घट्ट नायकाला
बापः- " अरे कारट्या ! येथें अससी शोधुन मी दमलों
वणवण करुनी मी श्रमलों
डोळा चुकवुन अहो कारटा निसटुन कीं आला
नाहीं धाक मुळीं याला
कितीदां तुला बजावलें कीं सांड सकल फंद
असले नकोतची छंद
नको गळ्याला लावूं अमुच्या फांस घरीं नीघ
नीघच, उचल पाय शीघ्र "
नायकः- " बाबा ! बाबा ! नका असें हो बोलुं नका मातें
होतें दुःख मन्मनातें

कटु विष वमतां मला ताडितां या वाग्बाणांनीं
घेतें मन्नयनीं पाणी
घरीं न बाबा मला राहवे करूं तरी काय
मारी हांक देशमाय
घरीं बैसणें नरक वाटतो मला मूर्तिमंत
तगमग होते चित्तांत
मारुन टाका मुलगा तुमचा, तुमचा अधिकार
जावा जरि ना बाहेर
घरीं बैसण्यापेक्षां मरणें रुचे तात ! मातें
मारा तुमच्या पुत्रातें
अनेक निघती मजसम मुलगे कसा घरीं राहूं
माझें तोंड कुणा दावूं
बाबा ! राग न तुम्ही करावा, धरितों मी पाय
सांगा मी तरि करूं काय ?

( गाणें )

हृदयीं मम भरतभूमि "जा" वदे मला
"जा" वदे मला
घरि बसणें हा न गमे मार्ग मज भला
मार्ग मज भला
भारतभू मारि हांक
'ये सेवेसाठि टाक
करि महास्यास खाक
पुसुन टाक मत्कलंक
उठुनियां मुला"
हृदयीं मम भरतभूमि "जा" वदे मला
"जा" वदे मला ॥

भारतमातेच्या हांकेला ओ न कसा देऊं
कैसा घरामध्यें राहूं ?

बापः– "तत्त्वज्ञानें तुझीं नको तूं मजला शिकवाया
येथून शीघ्र काढ पाया
मोठ्या गप्पा नकोत मजला येथन चल निमुट
ऐके वदतों जी गोष्ट
बापाचा ना राग तुझ्या का ठाउक रे तुजला
चल निघ, उचल पाउलाला
खपणार मुळीं नाहीं मजला तव वेडे चाळे
चल तूं घरीं बऱ्या बोलें
गांठ असे बघ माझ्यापाशीं ध्यानीं धरि नीट
चल, बघ घरास तूं थेट"

नायकः–"ठार करा परि मी ना येइन घरास माघारा
तनु ही तुमची तुम्हि मारा
देहास तुम्ही माराल परी मना न माराल
तनुचे करा हालहाल
घरें सोडुनी असलीं जाऊं भारतभूमींत
हिंडूं स्वतंत्र अम्हि मुक्त
चला, मुलांनो ! गीत म्हणा रे, मी ना जाणार
होवो जें जें होणार"

बापः– " फरफटीत मी नेइन ओढुन गुरापरी तुजला
तमाशा दिसेल जगताला
घरीं ये खरा थोबाड तुझें पहा रंगवीन
इंगा तुला दाखवीन
बांधुन ठेविन माळ्यावरतीं चार दिवस तुजला
कांहिं न देइन खायाला

धरुन बकोटी नेइन ओढुन काय पाहतोसी
चल बघ अपुल्या भवनासी
चल घरिं, पोरा ! कुठें जाशि रे, पोरा ! फिर मागें
आतां शेवटचें सांगे"

नायकः– "गांधि महात्मा पिता आमुचा सकळहि बाळांचा
धरितों पंथ अम्ही त्यांचा
भरतभूमि ही माय माउली आम्हां बाळांची
सेवा सदैव करुं तीची
चला, मुलांनो ! गीत म्हणा रे देशाचें दिव्य
करुं या कृति सुंदर भव्य
चला, काय रे बघतां ? बाबा जातील माघारे
म्हणुं या दिव्य गीत सारे"

बापः– "तमाशा न मी जगास इच्छित दावाया पोरा
परि करि विचार मनिं सारा
पुन्हां न तुजला घरांत घेइन दावुं नको वदन
माझें बंद तुला सदन
मी न कुणि तुझा, तं ना माझा, ऐसें समजावें
ध्यानीं नीट, आणि जावें
मेला माझा मुलगा म्हणुनी साखर वांटीन
माझें बंद तुला सदन

नायकः–"बाबा ! तुम्ही पूज्य मला जरि मज ना राहवतें
जाणें भाग मला पडतें
दारावरुनी झेंडा जाई तो मज बोलावी
जणुं तो बोटानें खुणवी
झेंडा मजशीं किती बोलतो, मारी मज हांक
माझें मलाच ठाऊक

घरांत आतां ना माझ्यानें वसवे क्षणभरही
डसती विंचु तसें होई
रागावा ना, बाबा! घ्या ना घरांत, परि हृदय
राहो सदैव तें सदय
मनीं तरि म्हणा, जनांत न जरी, " बाळक गुणवंत
माझा ध्रुवचिलयामित्र "
भीति तुम्हां जरि माझी वाटे, तरि मत्संबंध
सोडा असो प्रेमबंध
" मिळो न खाया परी असो हा चित्तीं भगवान "
वदला तुकाराम धन्य
" मिळो न खाया मरूं उपाशीं सत्त्व न परि गमवूं "
वदला हरिश्चंद्र राऊ
परि जाऊं दे त्या हो गोष्टी, मी ना येईन
तुमचें घर न बाटवीन
हृदयसदन परि असो मोकळें, द्यावी ही भीक
मागत मी ना आणीक
नका घेउं हा बाळक अपुल्या घरांत माघारा
देऊं नका तिथें थारा
मी न तुम्हांला सतावयाला घरांत येईन
घेतों चरणांची आण
सांगा आइस, बाबा! माझे प्रणाम सप्रेम
करितों मातृभूमिकाम
आईची मज आइ बोलवी काय वदूं फार
येई लोचनांत नीर
मनांत तुमचें कृतज्ञतेनें भक्तीनें स्मरण
करिन, स्रवतिल मन्नयन

कुठें तरी मी बसेन जोंवर जीवन राहील
थारा भारत देईल
विशाल अंबर वरी, धरित्री खालिं पसरलेली
प्रेमें स्नेहें भरलेली
दमलेलें हें मदंग, बाबा ! तिजवर टाकीन
जाइन आनंदें निजून
कंदमुळें मी खाइन देतिल फळें वृक्षराज
माझी राखितील लाज
कधीं कधीं मी गोड कोंवळ्या बोख्या खाईन
करवंदीच्या तोडून
कोकंबीचीं, चिंचेचीं तीं पानें खाईन
चिंता कांहिं न मी करिन
अडुळशाचि तीं फुलें तशीं तीं फुलें अगस्त्याचीं
देतिल मधु मज मध साचीं
भारतभूमी समृद्ध सुंदर देइल खायास
फळमुळ अथवा पाल्यास
खाइन पाला कृतज्ञतेनें मानिन मोदास
कंठिन सुखें जीवनास
नद्या, अरे, ते देतिल पाणी स्फटिकासम छान
सांभाळितील मत्प्राण
वारा मजला वारा घालिल हरील श्रम शीण
पल्लव सुंदर पांघरिन
भारतमाता पडूं न देइल कसलीही वाण
घरिं परतून न येईन
धरांत घ्यावें न मला, वाटे जरि मी अपराधी
जो मी देशकार्य साधी

माघारा मज घेउं नका जरि तुमचें नुकसान
उघडें असो हृदयसदन
मातेहूनी स्वपित्याहूनी देव देश थोर
मजला देशाचा घोर
मातृभूमिची सेवा करितां तुमचीही सेवा
होते, कळे देव-देवा
मुलावरी या प्रेम असूं दे, माया ठेवावी
माझी स्मृती असों द्यावी
काय किती मी सांगूं, बाबा ! उघडा मम हृदय
तेथें दिसेल भूमाय
हनुमंताच्या हृदयामाजी सदा रामराय
हृदयीं मम भारतमाय
तुमच्यास्तवही आहे हृदयीं भरलेलें प्रेम
पहिलें परी देश-काम
घ्या शेवटचा नमस्कार हा सविनय सप्रेम
धरितों भवत्पादपद्म
चला, मुलांनो ! म्हणा गीत रे भारतमातेचें
आपण तत्सुत तेजाचे
चला, म्हणा रे ध्वज-गीतातें, जनता-चित्तांत
निर्मूं स्फूर्तीचा स्रोत "
मुलें लागलीं गीत म्हणाया आप बघे रागें
नायक परि न बघे मागें
" झेंडा भारतमातेचा हा आला फडफडत
झळकत तेजें विक्रांत
झेंडा उन्मत्तांना नमविल दीनां सुखवील
झेंडा जुलुम संहरील
झेंडा देइल राष्ट्राला या दिव्य स्वातंत्र्य
झेंडा हरिल पारतंत्र्य

झेंडा भारतमातेचा हा भाग्यवंत आला
बोला जय भारत बोला "
मुलें निघालीं गात, राहिला पिता तेथ बघत
गात्रें कांपें थरथरत
वृद्ध तिथें तो होता तो मग पित्याजवळ गेला
बोले सौम्य वचें त्याला
" आपण झालों पिकलीं पानें उपयोग न अपुला
आतां राम राम बोला
नवी पिढी ही पुढेंच जाइल, त्यांतच आनंद
मानूं, घालुं न निजबंध
गुलाम न करूं प्रेमें अपुल्या, देउं मोकळीक
करोत उड्डाण विशंक
आशीर्वादा त्यांना देऊं करोत सत्कार्य
आपण भारतीय आर्य
चला, फिराया जाऊं आपण दोघे म्हातारे
बोलूं मनांतील सारें
दिन मावळला टेंकडीवरी बैसूं जाऊन
झालों पिकलेलें पान "
म्हातारे ते गेले, गेलीं मुलें गीत गात
आला भाग्योदय खचित
बाळें जीं जीं गाणीं गातिल, गोष्टी करितील
जे जे खेळ खेळतील;
भविष्यकाळाचें तें असतें त्यांतच सद्बीज
आली जवळ भाग्य-बीज
स्वतंत्र होइल, सुंदर होइल भारत हा खचित
लवकर सत्य सत्य सत्य "

—अमळनेर, सप्टेंबर १९३१.

## १५९ एकच वेड

मातृभूमि ! माझ्या चित्ता एक वेड लागे
मायभूमि ! चिंतनिं लव गे जीव नित्य जागे
झोंपवीप न सुचे मातें हायहाय वाटे
हीन दीन त्वस्थिति बघुनी अंतरंग फाटे ॥

काय आइ ! करुं मी कोटें जाउं गे त्वदर्थ
पारतंत्र्य पाहुन वाटे जन्म सर्व व्यर्थ
चित्त वित्त बुद्धी माझी देह हा मदीय
जरी तुझ्या कामीं येती धन्य धन्य होय ॥

मला सदा वाटे द्यावें सर्वही त्वदर्थ
तुला वैभवावर नेतां होउं दे मदस्त
देह इंद्रियें हीं सारीं सर्वदा खपावीं
त्वदुद्धारकार्यीं आई धन्यधन्य व्हावीं ॥

तुझ्या ध्यानरंगीं रंगो हें मदंतरंग
मुखीं वसो गोड तुझ्या सत्कीर्तिचे अभंग
हात पाय बुद्धि अखंड श्रमो त्वदुद्धारा
दूर करिन झिजुनी झटुनी पारतंत्र्यभारा ॥

थोर महात्म्यांना जे जे स्फुरति गे उपाय
आचरेन न गणीन मनीं संकटें अपाय
तुझा शिपायी मी आई ! 'कां' न मी म्हणेन
पुढें घुसुन धारातीर्थीं झुंजतां पडेन ॥

घाव घालण्याला उत्सुक, शृंखला तुझ्या मी
तोडुनी, तुला चढविन गे आइ ! मोक्षधामीं
तुझ्यासाठिं आई ! लाखों सुत तुझे खपोत
तुझ्या शृंखला भंगूं दे अंगिं ना खुपोत ॥

विपत् तुझी जाइल विलया दैन्य हें हरेल
तेज दिव्य त्वन्मुखकंजीं माउली ! फुलेल

कलाज्ञानवैभव-योगें आइ ! शोभशील
निकट विश्व घेशिल राष्ट्रें सर्व हर्षतील ॥
धन्य तो न दिन येइल का जों असे मदायु ?
न यो, त्वदुद्धारीं परि मज्जन्म सर्व जाऊ
आइ ! सर्व जीवन तुझिया अर्पिलें पदाला
हा विचार देइल अंतीं शांति मन्मनाला ॥

तुझ्या पोटिं जन्म पुन्हां मी घेइन प्रमोदें
पुनः पुन्हां जन्मुन सेवा करुनियां मरूं दे
आइ गोड सेवा तव गे अमृतमधुर मेवा
प्रभो ! देइ जन्मोजन्मीं मला मातृ-सेवा ॥

मातृसेवनाविण देवा ! मागणें न कांहीं
एक मात्र आनंद असे मजसि हाच पाही
चंदनापरी मद्‌गात्रें सर्वदा झिजूं दे
अहर्निश श्रमुनी श्रमुनी शांतिनें पडूं दे ॥

—त्रिचनापल्ली तुरुंग, सप्टेंबर १९३०.

---

## १५६ स्वातंत्र्य-दिव्य-दर्शन

अजि घुमघुमली स्वतंत्रतेची भेरी
दुमदुमली दुनिया सारी
अजि राष्ट्रानें स्वतंत्रतेची केली
घोषणा धीर या काळीं
अजि राष्ट्रानें सर्व शृंखला अपुल्या
तोडुनियां फेंकुन दिधल्या
अजि राष्ट्रानें गुलामगिरिचे पाश
फेंकियले दाहि दिशांस
तरि उठा उठा हो सारे

मार्तण्ड दिग्दर्शन
ग्रंथ नं. ९११
ता.

जयनादें गगन भरा रे
निज झोंप सर्व झाडा रे
जय–घोष करा कोण तुम्हांते वारी
दुमदुमली दुनिया सारी ॥

निज राष्ट्रानें आज मांडिलें ठाण
त्या हातिं सतीचें वाण
व्हा सिद्ध तुम्ही प्राणार्पण करण्यातें
त्यागाविण कांहि न मिळतें
सूं येणाऱ्या बंदुकिच्या गोळ्यांना
सुकुमार फुलांसम माना
निज छातीला निष्कंप करा झेला
तोफेचा तीवर गोळा
डोळ्यांत विजेचें तेज
लखलखो तुमचिया आज
प्राणांचे घाला साज
त्या स्वतंत्रता–देवीच्या शुभ शरिरीं
दुमदुमली दुनिया सारी ॥

बहुधन्य तुम्ही यशस्वी करा काज
देशार्थ मरोनी आज
अजि सुख माना जन्म आपणां माना
कीं देतां येतिल माना
या मातेला मोक्षामृत तें द्याया
अर्पा या अपुली काया
श्रीशिव वाजी तानाजी जनकोजी
तत्त्याग दाखवा आजी
कष्टांची पर्वा न करा
हालांची पर्वा न करा
प्राणांची पर्वा न करा

हो संधि असे आली सोन्यासारी
दुमदुमली दुनिया सारी ॥
हे पहा किती तरुण तरणि–तेजाळ
हे सजले कोमल बाळ
हे स्वतंत्रतेसाठीं सारे उठले
अभिनव–नव–तेजें नटले
तुम्हि धन्य खरे धन्या तुमची माय
हर्षेल आज शिवराय
हे तरुणांनो तेजस्वी वीरांनो
बाळांनो सुकुमारांनो
पाहुनी तेज हें तुमचें
मन खचेल त्या काळाचें
ते रविकर फिक्कट साचे
व्हा आज पुढें मोक्ष घेतले दारीं
दुमदुमली दुनिया सारी ॥
त्या लहरींच्या लहरी पाठोपाठ
सागरांत उठति अलोट
त्या ज्वाळांच्या ज्वाळा पाठोपाट
वणव्यांत नाचती दाट
त्यापरि तुम्ही टिप्परघाई खेळा
ही स्वातंत्र्याची वेळा
घरदार अतां सारें राहो दूर
भारतभू करणें थोर
मरण्याला उत्सुक व्हा रे
मोक्षास्तव उत्सुक व्हा रे
हालांस मिठी मारा रे
मग कोण तुम्हां दवडिल जगिं माघारी
दुमदुमली दुनिया सारी ॥

या ललनाही मरण्यासाठीं आल्या
मर्दानी झांशीवाल्या
अम्हि ना अबला जगता हें कळवाया
देशास्तव उठति मराया
निज बांधिति त्या धैर्यें शौर्यें पदर
करिती न कुणाची कदर
त्या पहा पहा वीरांपरि हो सजल्या
जगताच्या दृष्टी थिजल्या
पाजावें बाळां ज्यांनीं
न्हाणावें बाळां ज्यांनीं
प्रेमांत रमावें ज्यांनीं
त्या मरणाला कवटाळिति ह्या नारी
दुमदुमली अवनी सारी ॥

कधिं मरणा ना भारत-कन्या डरती
मरणातें मारुन जाती
ती सावित्री मरणासन्मुख ठाके
मनिं यत्किंचितहि न धाके
ती असुराशीं लढते भास्वर भामा
रामासम लढली रामा
ती संयुक्ता दिव्य पद्मिनी देवी
खाईंत उडी ती घेई
ती उमा लढाया जाई
ती रमा सती हो जाई
ती लक्ष्मी तळपत राही
ही परंपरा राखिति भारत-नारी
दुमदुमली दुनिया सारी ॥
या मातेच्यासाठीं मरण्यासाठीं
उठुं देत बाळकें कोटी

ते धैर्यानें मरण मानुं दे खळ
मोक्षाची आली वेळ
निज कष्टांनीं स्वातंत्र्यातें आणूं
मोक्ष असे मरणें जाणूं
तें मज दिसतें दिव्य असें स्वातंत्र्य
तो भारत दिसतो मुक्त
तें दर्शन दिव्य बघा रे
मत्प्रतिभा दाविल सारें
ही दिव्य दृष्टि तुम्हि घ्या रे
तें दृश्य पहा, ऐका ती ललकारी
दुमदुमली दुनिया सारी ॥

ते अवनिवरी सुरवर–मुनिवर आले
पुण्यात्मे सारे जमले
ते श्रीराम श्रीकृष्णार्जुन येती
शिबि हरिश्चंद्र ते येती
ते वाल्मीकि व्यास मुनीश्वर आले
सनकादिक ऋषिवर आले
ते बुद्ध पहा महावीरही दिसती
शंकराचार्य लखलखती
ते पृथ्विराज दिसले का
ते प्रताप तरि दिसले का
शिवछत्रपती दिसले का
ते सर्व पहा आले पुण्याकारीं
दुमदुमली दुनिया सारी ॥

श्रीभारतभू मंगलासनीं बसली
ती अपूर्व सुंदर दिसली
रवि कोटि जणूं एके ठायीं मिळले
तत्तेज तसें लखलखले

किति वाद्यें तीं मंगल वाजत गोड
या प्रसंगास ना तोड
किति हार तुरे मोतीं माणिक-राशी
मातेच्या चरणांपाशीं
अभिषेक कराया उठती
स्वातंत्र्यमंत्र ते म्हणती
" ॐ समानी व आकूतिः "
ती अभिषिक्ता जननी शोभे भारी
दुमदुमली दुनिया सारी ॥
तें वस्त्र पहा दिव्य अमोलिक दिधलें
परिधान जननिनें केलें
ती रत्नांचे अलंकार ते ल्याली
भारतभू तेजें फुलली
ते सप्तर्षी नक्षत्रांचे हार
अर्पिती अमोलिक फार
त्या दाहि दिशा तत्तेजानें धवल
धवळलें विश्व हें सकळ
सर्वांनीं भेटी दिधल्या
मेरूपरि राशी पडल्या
सुख-कथा अपूर्वा घडल्या
ती श्रुति तेथें शांतिगीत उच्चारी
दुमदुमली दुनिया सारी ॥
त्या पतिव्रता स्वर्गामधुनी येती
श्रीसीता श्रीसावित्री
त्या भारतभूमातेची शुभ भरती
प्रेमानें मंगल ओटी
शुभ शंखादी वाद्यें मंगल झडती
ध्वनि अनंत तेथें उठती

जयघोषाची एकच झाली टाळी
आनंदें सृष्टी भरली
अक्षता स्व–पुण्याईची
पिंजर ती पावित्र्याची
घेऊन करीं निज साची
त्या थोर सती लाविति भारत–भाळीं
दुमदुमली दुनिया सारी ॥
मग सकळ मुलें मुली आइच्या जवळी
आलीं त्या प्रेमें कवळी
तीं झळंबलीं प्रेमें मातेलागीं
बिलगलीं आइच्या अंगीं
ते देव मुनी मुलांस आशीर्वाद
देतात धन्यता–वाद
सत्कन्यांची सत्पुत्रांची आई
शोभते भरतभू माई
आनंदाश्रूंचे लोट
प्रेमाश्रूंचे ते लोट
खळखळा वाहती तेथ
किति सुख पिकलें देव भारता तारी
दुमदुमली दुनिया सारी ॥

—अमळनेर छात्रालय, १९३०.

## १५७ भारतांतील मुलें

( एक अविवाहित तरुण भगिनी स्वतःला उद्देशून म्हणते )

भारतांत या नसे मुलांचा तोटा तो तिळभरी
नाहीं वाढविणारा परी
विचारहीनापरी वागती मायबाप बापुडे
बघति न काय मुलांचें घडे
बाळें घरांत खंडीभर
नाहीं वस्त्रहि अंगावर
नाहीं खायाला भाकर
विचारमेवा दूर राहिला, रोगी अति चिरचिरीं
बाळें दिसति किति घरोघरीं ॥

* * *

कशास तरि तूं विवाह करिशी, आधिच जे बाळक
त्यांची होई तूं पाळक
त्यांची होई खरीखुरी तूं माता प्रेमाकरा
निर्मी निर्मळ सेवा–झरा
ठायींठायिं अभागी मुलें
जैशीं किडिनें खाल्लीं फुलें
बघुनी अंतरंग हें उले
जा ते बाळक जवळी घेई प्रेमानें सत्वरी
होई त्यांची जननी खरी ॥

* * *

भारतमातेच्या बागेंतिल सुमनें हीं विकसवी
सजवी नटवी तूं हांसवी
खाया देई, ल्याया देई, मनोबुद्धि वाढव
यांतच जावो जीवन तव
याहुन धन्य काय अन्य तें
फुलवी फुल जरि कुणि एक तें
प्रभुपद त्याला तें लाभतें

हाचि धर्म गे हाचि मोक्ष गे ध्येय अंतरीं धरी
या सेवेसी न दुजी सरी ॥

* * *

( ती पुढील ध्येय निश्चित करते )

गरीब कोणी कुणबी हमाल । तदीय संवर्धिन गोड बाळ
तयांस मी सुंदर वाढवीन । फुलांपरी निर्मळ मी करीन ॥
तयांस मी घालिन न्हाण नित्य । तयांस मी देइन स्वच्छ वस्त्र
तयांस साधीं शिकवीन गाणीं । न घाण देईन पडूंहि कानीं ॥
तयांस नेईन सदा फिराया । नदीतटाकीं, गिरि वा चढाया
तयांसवें खेळ मुदें करीन । तयांविणें कोणि जणूं मला न ॥
मुलेंच माझे बनतील देव । करीन तत्पूजन मी सदैव
मुलांस संवर्धुन भारताच्या । पडेन पायावरतीं तयाच्या ॥
कळ्या मुक्या या प्रिय भारताच्या । विकासवोनी चरणीं तयाच्या
समर्पुनी प्रेमभरें, मरेन । सुखें, प्रभूच्या चरणीं मिळेन ॥

—नाशिक तुरुंग, जानेवारी १९३३.

---

## १५८ महाराष्ट्रास

महाराष्ट्रा ! ऊठ दंष्ट्रा शत्रुमर्मी रोवुनी
सिंहसा तूं साज शौर्ये ठाक तेजें खवळुनी ॥
दिव्य गाणीं विक्रमाचीं दुर्ग तूझे गाउनी
अंबरस्थां निर्जरांना हर्षवीती निशिदिनीं ॥ महा० ॥
दरीखोरीं खोल, गेलीं वीर–रक्तें रंगुनी
शेष तीं संतोषवीती त्वद्यशाला गाउनी ॥ महा० ॥
अंबुराशी करित सेवा त्वत्पदा प्रक्षाळुनी
त्वत्कथेला दशदिशांना ऐकवीतो गर्जुनी ॥महा० ॥
म्लानता ही दीनता ही स्वत्त्व–दाही दवडुनी
स्वप्रतापें तळप तरणी अखिल धरणी दिपवुनी ॥ महा० ॥

—अमळनेर, १९२८.

---

## १५९ राणा प्रताप

स्वातंत्र्यसूर्य राणा । चित्तीं प्रताप आणा
चारित्र्य दिव्य त्याचें । त्याचा अभंग बाणा
रजपूत पूतकीर्ती । कुळशील बाटवीती
परि थोर पूर्वजांची । राखी प्रताप नीती
तो मानसिंग तैसे । दुसरेहि अन्य मोठे
स्वार्थांध होउनीयां । ठरले जगांत खोटे
अभिमान-शून्य झाले । रिपु-गौरवास गाती
स्व-करींच पूज्य धर्मा । देतात मूठमाती
स्वार्थादि नीचवृत्ति । यांचाच पंक माजे
परि त्यामधून दिव्य । रमणीय पुष्प साजे
रजपूत-भूमि-पंकीं । कमनीय दिव्य गंध
कमल प्रताप एक । दे भूस सौख्य-कंद
सर्वत्र अंधकार । भरला भयाण घोर
त्यांत प्रताप शोभे । शुभ-कांति चंद्रकोर
रिपु-सैन्य-सागरांत । भूमाय तारण्याला
धैर्यें प्रताप एक । नौका अभंग झाला
जयमत्त शत्रु मार्गे । लोटावया न कोणी
परि एकटा प्रताप । ठाके सुरेंद्रवाणी
समरांत सेलिमाला । दावून दिव्य भाला
तत्तेज हारवीलें । निस्तेज शत्रु केला
हळदींत खळखळाट । रिपु-रक्त वाहवीलें
निज अल्प सैन्य तरिही । आश्चर्य थोर केलें
केले अनंत कष्ट । रानावनांत गेला
निज शत्रुशीं सदैव । लढण्यांत जन्म नेला
विख्यात सत्कुलाची । ती कीर्ति निष्कलंक
राहो, म्हणून मानी । झाला प्रताप रंक
घेईन ना जरी मी । मत्प्राण तो चितोड

पेंढ्यावरी निजेन । कोंडाच अन्न गोड
सुखभोग सर्व वर्ज्य । रिपु जों धरी चितोड
करुनी अशी प्रतिज्ञा । पाळी न त्यास तोड
सिंहासमान शूर । मेरूपरी सुधीर
भीष्मापरी प्रतिज्ञा । पाळीत थोर वीर
आपत्ति घोर आल्या । तरि त्यां न तो जुमानी
तारामती-पतीच्या । सम सत्त्व स्वत्व मानी
निज-मायभूमि-सेवा । करितां, न तें कुटुंब
स्मरलें, सदैव हृदय । भू-भक्तिनें तुडुंब
स्वातंत्र्य-रक्त वीरा । रिपु-दुर्जया सुधीरा
देवी-स्वतंत्रतेच्या । कंठामधील हीरा
स्मरण प्रभावशाली । तेजस्वि त्वत्कृतीचें
देशास जोंवरी रे । भय तों न तें मृतीचें
त्वन्नाम दिव्य-मंत्र । उठवील भारताला
देईल दिव्य शक्ति । अर्पील वैभवाला
स्वातंत्र्यरक्त जीवां । त्वन्नाम स्फूर्ति देई
स्वार्थादि नीच वृत्ति । सगळ्या लयास नेई
भ्याडां करील शूर । निःसत्त्व चेतवील
उठवील धूलिपतितां । त्वन्नाम दिव्य-शील
तूं लाज भारताची । तूं आस भारताची
चंद्रार्क जोंवरी तों । तूं कीर्ति भारताची

—अमळनेर, १९२८.

## १६० महात्माजींस

विश्वाला दिधला तुम्हींच भगवन् संदेश मोठा नवा
ज्यानें जीवन सौख्यपूर्ण करणें साधेल या मानवा
तें वैराग्य किती ! क्षमा किति ! तपश्चर्या किती ! थोरवी
कैशी एकमुखें स्तवूं ? मिरवतां भास्वान् जसा तो रवी ॥

आशा तुम्हि अम्हां सदभ्युदयही तुम्हींच आधार हो
तें चारित्र्य सुदिव्य पाहुनि अम्हां कर्तव्यसंस्फूर्ति हो
तुम्ही भूषण भारता, तुमचिया सत्कीर्तिचीं भूषणें
हें त्रैलोक्य धरील, धन्य तुमचें लोकार्तिहारी जिणें ॥

बुद्धाचे अवतार आज गमतां, येशूच किंवा नवे
प्रेमांभोधि तुम्ही, भवद्यश मला देवा ! न तें वानवे
इच्छा एक मनीं सदा मम भवत्पादांबुजा चिंतणें
त्यानें उन्नति अल्प होइल अशी आशा मनीं राखणें ॥

गीता माझि तुम्ही श्रुतिस्मृति तुम्ही तुम्हींच सत्संस्कृति
त्यांचा अर्थ मला विशंक शिकवी ती आपुली सत्कृती
पुण्याई तुम्हि मूर्त आज दिसतां या भारताची शुभ
घ्यावे दिव्य म्हणून आज भुवनीं या भूमिचा सौरभ ॥

तुम्ही दीपच भारता अविचल, प्रक्षुब्ध या सागरीं
श्रद्धा निर्मितसां तुम्हींच अमुच्या निर्जीव या अंतरीं
तुम्ही जीवन देतसां नव तसा उत्साह आम्हां मृतां
राष्ट्रा जागविलें तुम्ही प्रभु खरें पाजूनियां अमृता ॥

तुम्ही दृष्टि दिली, तुम्ही पथ दिला, आशाहि तुम्ही दिली
राष्ट्रा तेजकळा तुम्ही चढविली मार्गीं प्रजा लाविली
त्या मार्गें जरि राष्ट्र संतत उभें सश्रद्ध हें जाइल
भाग्याला मिळवील, भव्य विमल स्वातंत्र्य संपादिल ॥

विश्रांति क्षण ना तुम्ही जळतसां सूर्यापरी संतत
आम्हांला जगवावया झिजवितां हाडें, सदा राबत

सारें जीवन होमकुंड तुमचें तें पेटलेलें सदा
चिंता एक तुम्हां कशी परिहरूं ही घोर दीनापदा ।।

होळी पेटलिसे दिसे हृदयिं ती त्या आपुल्या कोमल
देऊं पोटभरी कसा कवळ मद्बंधूंस या निर्मळ
ह्याची एक अहर्निश प्रभु तुम्हां ती घोर चिंता असे
चिंतांचितन नित्य नूतन असे उद्योग दावीतसे ।।

कर्में नित्य भवत्करीं त्रिविध तीं होती सहस्रावधी
ती शांति स्मित तें न लोपत नसे आसक्ति चित्तामधीं
शेषीं शांत हरी तसेच दिसतां तुम्ही पसाऱ्यांत या
सिंधु क्षुब्ध वरी न शांति परि ती आंतील जाई लया ।।

गाभाऱ्यांत जिवाशिवाजवळ तें संगीत चाले सदा
वीणा वाजतसे अखंड हृदयीं तो थांबतो ना कदा
झोंपे पार्थ तरी सुरूच भजन श्रीकृष्ण श्रीकृष्णसें
देवाचा तुमचा वियोग न कदा तो रोमरोमीं वसे ।।

वर्णूं मी किति काय मूल जणुं मी वेडावते मन्मती
पायांना प्रणति प्रभो भरति हे डोळ्यांत अश्रू किती
ज्या या भारतिं आपुल्यापरि महा होती विभूती, तया
आहे उज्वल तो भविष्य, दिसते विश्वंभराची दया ।।

—अमळनेर, १९२६.

## १६१ खरे सनातनी

मी मांडितसें विचार साधे सरळ
हें अमृत नसे हें गरळ
मी सनातनी धर्माचा सद्‌भक्त
मी पूजितसें ऋषिसंत
निज संस्कृतिचा अभिमान असे मातें
मी पूजित भूमातेतें
निज संस्कृति व्हावी थोर
ती होवो ना अनुदार
हा एकच मजला घोर
मी नम्रपणें वदतों ओतुन हृदय
तुम्हि ऐका सारे सदय ।।

*　　*　　*

ज्या नवनव हो संतत पल्लव फुटती
त्या सनातन असें म्हणती
जें नवनव हो ज्ञान शुभंकर येतें
तो वेदच मातें गमतें
तो वेद असे अनंत, हळुहळु मूर्त
होऊन दिसे जगतांत
नवविचार मी घेईन
मी पुढतिपुढति जाईन
सौंदर्य-सिंधु जोडीन
जो ज्ञानाला सादर संतत घेई
तो खरा सनातनी होई ।।

*　　*　　*

जें नित्य नवें सनातन तया वदती
जीर्णा न सनातन म्हणती
श्रीगीतेचें नित्य नवीनच सार

ज्ञानेश्वर[1] म्हणती थोर
ती वाढ पुरी ज्याची झाली त्यातें
मरण्याचें केवळ उरतें
सद्धर्म सदा वाढेल
नवनविन रंग दावील
नव अर्थ अंगिकारील
हें वाढतसे सदैव जीवन–शास्त्र
तद्विकास असतो होत ॥

*　　*　　*

त्या शब्दांचा अर्थ वाढतो नित्य
तो अनंत असतो अर्थ
त्या यज्ञाचा बघा तुम्ही इतिहास
किति झाला अर्थ–विकास
जन मरताती कल्पना न परि मरते
ती संतत वाढत जाते
ते विचार होती खोल
होतील कल्पना विमल
हा विकास संतत सकल
जगिं चालतसे मानव जातो पुढतीं
मुंगीपरि जरि ती प्रगति ॥

*　　*　　*

तें ठरलें ना अजुनि जीवनीं कांहीं
सिद्धांत न एकहि पाहीं
जगिं हितकर ती हिंसा अथवा प्रेम
ना झाला अजुनी नेम
तें सत्य सदा पूजावें वा अनृत

---

१ तेथ हर म्हणे नेणिजे। देवी जैसें का रूप तुझें।
तैसें नित्यनूतन देखिजे। गीतातत्त्व ॥　　—ज्ञानेश्वरी

अद्याप न मत निश्चित
हे प्रयोग सारे अजुनी
करितात महात्मे झटुनी
कां बिळांत बसतां घुसुनी
निजबुद्धीला स्वतंत्र करुनी उठणें
नवरंगें उत्कट नटणें

*   *   *

हें बाल्यदशेमाजी जीवनशास्त्र
ना निश्चित कांहीं त्यांत
ज्याबद्दल ना शंका तिळभर कोणा
जगिं ऐसें कांहि दिसे ना
तो घेउनियां सादर पूर्वानुभव
संपादा ज्ञानास नव
ते पूर्वज सर्व-ज्ञानी
जरि म्हणाल तुम्ही कोणी
ते हंसतिल तुम्हां वरुनी
ते फरक सदा होते देखा करित
ऋषि ऋषिला नाहीं मिळत ॥

*   *   *

तो मागतसे देवा विश्वामित्र
मति सतेज निर्भय मुक्त
तो गायत्रीमंत्र सनातन दिव्य
मागतसे बुद्धी भव्य
तो धर्माचा पाया म्हणतां वेद
वेदार्थें ज्ञानच सिद्ध
ज्ञानासम पावन नान्य
तें मिळवुन व्हा रे धन्य
परि घरांत बसतां घुसुन

जो घरिं बसला त्यास मिळे ना कांहीं
त्या एकच मरणें राही ॥

* * *

तुम्हि उघडा रे बंधूनो निज डोळे
ना अंध असावें भोळे
जे इतर जगीं थोर विचारां करिती
जे प्रयोग नव दाखविती
तुम्हि त्याचाही विचार सादर करणें
उपयुक्त असे तें घेणें
ज्ञानाचा मक्ता न कुणा
अधिकार सर्व राष्ट्रांना
अभिमान देतसे मरणा
ते ऋषिमुनि ना केवळ येथें झाले
हें बघणें उघडुन डोळे ॥

* * *

हें कलियुग ना सत्ययुगचि हें माना
प्रभुच्या न करा अपमाना
जो रवि उगवे तारा ज्या लखलखती
तें तेज न त्यांचें कमती
हें कलियुग ना गंगा पावन तीच
फळपुष्पें तरु हे तेच
प्रत्येक दिवस जो दिसतो
तो अनंततेंतुन येतो
पावित्र्यें तिळ ना कमि तो
तो मूर्खपणा बाष्कळपण तें सोडा
सद्विचार नवनव जोडा ॥

* * *

ते ऋषिमुनि हो काय एकदां झाले
ते काय आज ना उरले

ते पुनःपुन्हां ऋषिमुनि अवतरतात
भुवनांत सदा सर्वत्र
तो लेनिन तो तैसा सन्यत्सेन
हे ऋषीच जनतामान्य
नव मंत्र जगा जो देई
नव तेज जगा जो देई
वैषम्य लयाला नेई
तो ऋषि जाणा जाणा तोची संत
तुम्हि उघडा अपुले नेत्र

* * *

श्रीज्ञानेशें संस्कृतांतलें ज्ञान
सर्वांस दिलें वाटून
श्रीनाथांनीं चालविलें तें काम
परि त्यांना छळिती अधम
तीं ज्ञानाचीं खुलीं कराया दारें
झगडले संत ते सारे
तुम्हि अनंत छळिलें त्यांना
परि आज देतसां माना
ह्या गोष्टी ध्यानीं आणा
त्या संतांचें काम चालवा पुढती
सर्वांना देण्या मुक्ती

* * *

ह्या भारतभूमाजी आजहि संत
आहेत करुं नका खंत
हे संत खरे गांधी पावनचरित
दीनास्तव संतत झिजत
तो धर्म खरा त्यांनाच कळे सत्य

जे गीता आचरतात
अंबरांबुधीचें कळतें
गांभीर्य कुणाला जगिं तें
बुडि घेत उडत वा त्यातें
सद्धर्माचा गाभा संतच मिळवी
तो पंडित साली चघळी ॥

* * *

ती पांघरुनी शालजोडि जे बसती
प्रेमा न जगा जे देती
जगिं अन्याया पाहुन जे ना उठती
जें वैषम्यें ना जळती
जगिं दास्याला दंभा दैन्या बघुन
उठतात न जे पेटून
त्या जडां कळे का धर्म ?
त्या मृतां कळे का वर्म ?
जे घोकित बसती धर्म
तो धर्म कळे आचरतो जो त्यास
ना धर्म कळे इतरांस ॥

* * *

निज धर्माला ओठावर ना मिरवा
सत्तत्वें जीवनिं जिरवा
तुम्हि प्रेम करा विचार करणें नित्य
जगतांत बघा सर्वत्र
या देशाला दिवस चांगले आणा
नव मंगल मिरवा बाणा
बंधुता जीवनीं येवो
तो विचार हृदयीं येवो

तें धैर्य कृतीचें येवो
सत्‌-ज्ञानानें सत्करणीनें मिळवा
गेलेल्या अपुल्या विभवा ॥

* * *

निजधर्माचें करा मुख तुम्ही उजळ
मति उदार होवो विमल
ज्या बंधूंचें छळण आजवर केलें
पशूहून नीच ज्यां गणिलें
त्या अस्पृश्यां हरिजन पावन म्हणणें
प्रेमानें हृदयीं धरणें
आचारीं येवो समता
प्रेमाची वाहो सरिता
दंभाची न उरो वार्ता
तुम्हि संसारीं अंध-धी न रे व्हावें
मति हृदय निज न मारावें ॥

* * *

ती सोडावी क्षुद्र सकल आसक्ती
ध्येयाची लागो भक्ती
तुम्हि मानव्या उठणें पूजायास
निज मोक्षहि मिळवायास
निज कातडिला न कुणी कुरवाळावें
ध्येयास्तव सर्वहि द्यावें
सत्तेज भारतीं भरुं दे
सद्‌भाव भारतीं भरुं दे
सद्‌विचार रवि उगवूं दे
ती संपूं दे कार्पण्याची रजनी
राहोत कुणी ना निजुनी ॥

* * *

हे सनातनी सकळ खरे होवोत
ज्ञानातें मिठि मारोत
नव ऐकुनियां विचार हे नाचोत
नव करणीस्तव जागोत
हे वैषम्या दंभा दुरि नेवोत
त्यागानें हे तळपोत
यज्ञ हें सनातन तत्त्व
ज्ञान हें सनातन तत्त्व
मोक्ष हें सनातन तत्त्व
तुम्हि त्याग करा, ज्ञान वरा, व्हा मुक्त
व्हा खरे सनातन-भक्त ॥

—पुणें, फेब्रुवारी, १९३५.

# खंडकाव्य

( सत्याग्रही ह्या नांवाचें एक खंडकाव्य मी १९३० मध्यें त्रिचनापल्लीस असतांना लिहिलें होतें. त्यांतील जो भाग आज प्रसिद्ध करण्यासारखा आहे. असा भाग येथें देत आहे. सबंध खंडकाव्य कधीं प्रसिद्ध होईल तें देव जाणे, या खंडकाव्यांतील थोडा संदर्भ देतों.

श्रीमंत आईबापांचा एकुलता एक मुलगा होता. त्याचें वय अठरा वर्षांचें होतें. त्याचें आठनऊ वर्षाच्या एका मुलीशीं लग्न लागलेलें होतें. तो सत्याग्रहांत स्वयंसेवक झाला होता. तो तुरुंगांत अतिसारानें मरण पावला. त्याच्या आजारीपणाची तारही खेड्यांत वेळेवर पोंचली नाहीं. मरणाचीच तार एकदम घरीं गेली. आईबापांस जबर धक्का बसला. तो मतपुत्र रात्रीच्या वेळीं दिव्य वेष धरून आईबापांची समजूत घालण्यासाठीं येतो. रात्रभर विचारवार्ता करून त्यांचें समाधान करून प्रभात होतांच परत जातो. )

## १६२ मातेचा शोक (गाणें)

कैसा बाळ निमाला
न दया भगवंताला ॥ कै० ॥

"लडिवाळा बाळा
बाळा वेल्हाळा
ये भेटायाला ॥ कै० ॥

तुजविण कोणि न मजला ॥ कै० ॥

येशिल माघारा
माझ्या पांखरा
राजस सुकुमारा
धीर असा रे धरिला ॥ कै० ॥

येशिल भेटाया
आशा ही सखया
होती मम हृदया
काळ कसा परि फिरला ।। कै० ।।

बाळा काय करूं
प्राणां केंवि धरूं
शोका केंवि तरूं
शोक सखा मम ठरला ।। कै० ।।

हे क्रूरा काळा
कैसा रे नेला
पाझर ना फुटला
घालिशि घोर घाला ।। कै० ।।

एकुलता बाळ
माणिक बिनमोल
मोतीं तेजाळ
लुटली मी अबला ।। कै० ।।

शून्य दिसे सृष्टी
माता मी कष्टी
भरते ही दृष्टि
अंत न पार न दुःखाला ।। कै० ।।

घेउं कुणा जवळ
देउं कुणा कवळ
बोलुं कुणा जवळ
तव मुखचंद्र अंतरला ।। कै० ।।

मुख–शशि न हंसेल
हृदय न सुखवील
बोल न रिझवील
राम न जीवनिं उरला ।। कै० ।।

वत्साविण गाय
मोकलिते धाय
तळमळते माय
प्राण जावया सजला ॥ कं० ॥

सुख सगळें आटे
कंठ तिचा दाटे
हृदय तिचें फाटे
शरणागत ती मरणाला ॥ कं० ॥

हंबरडा फोडी
सुसकारे सोडी
बुडते हो होडी
करुणासागर भरला ॥ कं० ॥

डोळे डबडबले
मानस गजबजलें
अंतर गहिंवरलें
माता पडली धरणीला ॥ कं० ॥

( माता शोकानें धरणीवर पडते. जवळच पिता असतो, त्याची स्थिति )

## पित्याची स्थिति

पिता बैसलाहे शोक—मग्न खिन्न
पुशीत नयन वारंवार
कालवाकालव हृदयीं होतसे
सर्प जणूं डसे अंतरंगीं
धीर धरी परी पुन्हां येई नीर
डोळ्यां लागे धार अनिवार
"ध्यानीं मनीं बाळा नव्हतें मरण
लौकर सुटून भेटशील

मरावयासाठीं बाळ हा चालला
विचार ना आला कधीं मनीं
मेघाची चातक चंद्राची चकोर
घनाची मयूर वाट पाहे
तृषार्तास जल क्षुधार्तास अन्न
तसें होतें मन तुझ्याकडे
तुझ्या वाटेकडे होते सदा डोळे
शतवार ओले झाले बाळा
होती रे माउली दिन ते मोजीत
घास नसे घेत अश्रुवीण
आठवण तिला क्षणक्षणां यावी
सद्‌गदित व्हावी वृत्ति बाळा
आशावेलीवरी वज्र रे कोसळे
हृदय हें जळें काय करूं
कोणाचा आधार संसारीं आम्हांला
तुझ्या या मातेला कोण बाळा
कोणाला ती प्रेमें हांक रे मारील
हात फिरविल कोणावरुनी
बाळा कैसा काय गेलास टाकून
दोघांस लोटून दुःखपूरीं
तुरुंगांत माझ्या नको जाऊं बाळा
सांगितलें तुला वारंवार
अश्रु मी ढाळिले पदर पसरीला
दृढनिश्चयाला वरिलें तुवां
नाहीं तूं एकीलें तुरुंगीं गेलास
होती परी आस भेटशील
भेटशील आम्हां सुखाचा सोहळा
पाहूं आम्ही डोळां होती आशा

आतां कसची आशा आकाश फाटलें
हृदय दाटलें माझ्या बाळा
आशेचे जळून झाले रे कोळसे
जळावीण मासे तैसे आम्ही
एक माझा बाळ तोही देव नेत
आम्हांला ठेवीत रडावया
आणि लग्न केलें नुकतें रे थाटानें
अभागी पित्यानें बाळा तुझें
मांडोनी सोहळा मानिला आनंद
अभागी मतिमंद ठरलों परी
आठ वरुषांची लहानशी बाळा
जाणे ना मरणाला अजून जी
लग्न म्हणजे वाटे जिला एक खेळ
तोंच आली वेळ वैधव्याची
वैधव्य तें काय मरण तें काय
संसार तो काय ना कल्पना
हंसावें खेळावें सुखें खावें प्यावें
जनांनीं म्हणावें विधवा तिला
मांडीवरी जिनें प्रेमानें लोळावें
जनांनीं म्हणावें विधवा तिला
तिच्या जीवनाची आम्ही केली माती
कल्पना परी ती नाहीं तिला
तिच्या जीवनाची केली आम्ही राख
नाहीं तें ठाऊक परी तिला
मांडीवरी मान तिनें ठेवियेली
आम्ही मुरगळिली रूढिदासी
रडतांना आम्हां पाहुनी रडेल
परी न समजेल गंभीरता

मोडिली हो मान गोड या मैनेची
हृदयास जाची शल्य तीव्र
करोनीयां आम्ही विवाह–सोहळा
दाबियेला गळा कोकिळेचा
फुटेल जैं कंठ गावया स्फुरेल
मैना ना काढील गोड शब्द
बाळ–कोकिळा ही मोठी जैं होईल
मनांत झुरेल अपरंपार
शोक–गीतें सदा बाळा आळवील
टिपें ती गाळील टपटप
घळघळ अश्रु– धार ती सोडील
हातांना जोडील जगन्नाथा
जळेल अंतरीं जेव्हां का कळेल
मरणाचा खोल अर्थ तिला
जळेल अंतरीं जेव्हां तो कळेल
विवाहाचा खोल अर्थ तिला
आग लागो आम्हां आग त्या रूढीला
बळी हो दिधला बाळिकेचा
काय आईबाप तिचे ते करतील
दुःखानें जळतील क्षणक्षणीं
नयनांसमोर घाळेला पाहोनी
जातील जळोनी अंतरंगीं
घेतील पोटाशीं कन्या ती अजाण
अश्रूभरें स्नान घालितील
काय करूं देवा कोठें तरी जाऊं
कोठें बाळा पाहूं राजसाला
कशाल हा पैसा कशाला व्यापार
एक जो आधार तोही गेला

ज्याच्यासाठीं सारी केली आटाआटी
त्याशीं ताटातुटी केली देवा
शोक–वन्हि आतां जिवंत जाळील
प्राण न घेईल परी माझा
दाही दिशा ओस भरला अंधार
डोळ्यांना ही धार आतां सदा
हिचें तरी केवीं करूं समाधान
देईल ही प्राण शोकवेडी
आम्ही दोघे आतां कोणाकडे पाहूं
एकमेकां दाऊं दीन अश्रु
हाय काय झालें केवढा आकांत
केवढा आघात आम्हांवरी "
मनीं हे विचार मनीं हे उद्‌गार
मनावरी भार फार पडे
असह्य तो झाला वृक्ष उन्मळला
भार फार झाला पिता पडे
माय धरणीला पिता धरणीला
तेथ उचंबळला शोकसिंधु

(त्या उभयतांचें सांत्वन करण्यास शेजारी येतात).

जमुनियां जन ते समजाविती
रडुं नका रडणार तरी किती
जशि असेल तया प्रभुची मती
मिळतसे सकळांस तशी गती ।।

रडुनि काय, विवेक मनीं धरा
उपजणें मरणें न चुके.नरा
अजि स्वदेशहितार्थ मरे सुत
सुकृति तो करि वंश समुन्नत ।।

जरि जगीं मरणें, मरणें तरी
करुनियां कृति, जी जन उद्धरी
वदति संत असें वच संतत
करुनि तेंच कृतार्थ भवत्सुत ॥

रडुं नका मुळि, ना मळवा मुख
गिळुनि दुःख मनीं धरणें सुख
अमरता मिळवी मिरवी यश
धवळितो सुत आज दिशा दश ॥

रडुं नका मुळि धीर मनीं धरा
अमरता न जगांत कुणा नरा
सुत गुणी रुचला परमेश्वरा
धरिल तो हृदयीं प्रिय लेंकरा ॥

करुं नका हृदयीं मुळि खंत ती
नुरलि कीं अपणांप्रति संतती
भरतभूमिमधें किति बाळक
तुम्हि बना करुणाधन पाळक ॥

रडुं नका मुळि अश्रु न ढाळणें
भरत–माय–मुलें तुम्हि पाळणें
निजसुतानन तेथच पाहणें
मति धरून अशी जगिं राहणें ॥

(लोक जातात. अंधार पडूं लागतो. मातापितरें खिन्न बसतात).

ते माय–बाप पुशिती निज लोचनांतें
अश्रूच ते न उरले मुळि मोचनातें
ते बसले वरुनि शांत मनीं सचिंत
ना दुःख पुत्रनिधनासम ह्या महींत ॥

राहे कुणी, सकल ते बहुतेक गेले
येतीच अश्रु फिरुनी भरतीच डोळे

आकांत ना परि अतां रडणें मुक्यानें
ये हुंदका मधुनि ऐकुं कुणास कानें ॥
अंधार आज भरला भरल्या घरांत
त्याहून दाट भरला भरल्या मनांत
लावी कुणी तरि तदा सदनांत दीप
आशा नसे तिळ परी हृदयासमीप ॥
तीं बैसलीं उभयतां पुतळेच खिन्न
आधारहीन सुमनें जणुं वृंतहीन
भूमीवरी उभय तीं पडलीं अशांत
डोळा क्षणैकभर लागतसे तशांत ॥

(बाहेर रात्र बरीच होते. जगांत शांतता असते).

## रात्रीचें बाहेरचें स्वरूप

अंधार । निबिड पसरला बाहेर
आकाशीं । मावळला उगवून शशी
अश्रु जसे । तारे चमकति नभीं तसे
गार सुटे । वारा, पर्ण–ध्वनि उमटे
सळसळती । पानें जणुं तीं तडफडती
रातकिडे । त्यांचा कानीं ध्वनी पडे
फांद्यांत । वटवाघुळ तें फडफडत
वरि फिरत । पुंज तमाचा जणुं उडत
शांत परी । सृष्टी होती ही सारी
जग दमलें । दमुनी झोंपीं तें गेलें
एक घरीं । जागें मधुनी कुणी तरी
अश्रु–सरी । पडती तेथें घरेवरी

(अशा त्या रात्रीं मृतबालक दिव्य वेष धरून आईबापांचें सांत्वन करण्यास येतो. तुळशीवृंदावनाजवळ उभा राहून तो आई, बाबा अशी मंजुळ हांक मारतो. माता दचकून उठून बाहेर येते–वगैरे).

रात्रींच्या त्या समयिं निजली शांतशी सृष्टि सारी
"आई, बाबा," कुणि तरि अशी हांक मंजळ मारी
झालें शांत क्षणि परि, जशी लाट मंदा उठोनी,
शांतांभोधीवर पुनरपि जावि तेथें विरोनी ॥
वृक्षच्छाखातति तुळशिच्या हालती अंगणांत
अंधाराला जणुं निजविण्या वक्ष ते आंदुळीत
झाला होता जणुं कि अखिल प्रांत तो स्तब्धतेचा
"आई, बाबा," मृदु करुणशी ये पुन्हां ऐकुं वाचा ॥
"आईबाबा, पुनरपि तुम्हां बाळ भेटावयाला
वात्सल्यानें विरुन तुमच्या येथ बाहेर आला
आई, बाबा ! तुम्हि तुळशिच्या अंगणामाजि याना
द्यावा प्रेमें मजसि तुमचा अंतिम प्रेम–पान्हा" ॥
"आईबाबा" पुनरपि उठे शब्द माधुर्य–राशी
"मारी का हो" दचकुनि वदे "बाळ हांका अम्हासी ?"
"आईबाबा" पुनरपि असे शब्द ती म्लान माता
ऐके, धांवे, भ्रम जणुं तिला दुःख–दग्धा अनाथा ॥
"आला आला फिरुनि अपुला बाळ आला घराला
हांका मारी, झणि तुम्हि उठा बाळ बाहेर आला"
धांवे वेगें, पदर अथवा केशही सांवरी न
"आल्यें बाळा", करुण वदली गायशी माय दीन ॥
"आई," "आली, बघ बघ तुझी पाडसा माय आली"
शोकावेगें हलत कदली, मागचें दार खोली
"कोठें आहे ? दिसत नयना ना कसा बाळ माझा
झाला भास क्षणिक? न दिसे राजस प्राणराजा" ॥
"आई, पाही तव सुत इथें, येत कैसे न तात ?"
"आले, तेही बघ," "तुम्हि बसा शांत, ऐका निवांत"
माता धांवे, परि करितसे खूण तो दिव्य बाळ
बोले "आई, हृदयिं धरणें तो न गे आज काळ" ॥

देवाचा मी, परि तुमचिया भेटिलागूनं येत,
युष्मच्छोकें गहिवरुन मी जाहलों सद्‌गदीत;
आलें चित्तीं समजवुं जरा आपुले तात माय
आलों आई म्हणुनि, दुरुनी वंदितों पूज्य पाय ॥

आई, माझ्यावरि जरि तुझें प्रेम आहे अपार
संसारीं या अमर असला देखला ना प्रकार
भूमातेच्या प्रिय जननि गे मोचनासाठिं आज
लाखों जावे मरुनि, जरि ती राहिलीसेल लाज ॥

माता तूं मत्प्रिय खरि परी आज सर्वांजणांची
ही भूमाता रडत बसली दास्यदारिद्र्य जाची
मातांची जी परम सदया मंगला थोर माता
आता नाहीं तिजसि उरला झालि लोकीं अनाथा ॥

यासाठीं मी त्यजुनि सगळें आइ धांवून गेलों
गेलों, देवें मज उचलिलें, मी तुम्हांलागि मेलों
मोहत्यागें भरतजननीकारणीं लागतील
सारे बंधू, मजसि मग तूं धन्य गे मानिशील ॥

झाले ना गे मुळिं बघ तिथें आइ थोडेहि हाल
क्लेशांची ती अम्हि मिरविलों नित्य कंठांत माळ
मृत्यूला ना मुळिं भरत-भू-पुत्र आतां भिणार
हें त्वद्‌बाळें सकल जगता दाविलें थोर सार ॥

होते माते जवळ किति ते थोर स्नेहार्द्र मित्र
भूमातेचे भजक सगळे दिव्य ज्यांचें चरित्र
कांहीं मातें पडुं न दिधलें तें उणें त्या सख्यांनीं
नाहीं होऊं स्मरण तुमचें तें दिलें, सत्य मानी ॥

माझ्या ओंठावरि तुळशिचें ठेविलें पूज्य पान
मद्देशाचें स्मरण करुनी सोडिले शांत प्राण

माते, माझ्यास्तव न रडणें, कां म्हणोनी रडावें ?
देशासाठीं फिरफिरुनी हें प्राण माझे पडावे ॥ "

(त्या मातेला हें पटत नाहीं. शतस्मृति तिच्या हृदयांत उचंबळतात. हृदय भरून येऊन ती पुढीलप्रमाणें बोलते:–)

काय बाळा हे बोलसी कठोर
भरुनि येतो मम शोकभरें ऊर
प्रेम करुन किती तुला वाढवीलें
जाशि विसरुन का सर्व बाळ बोले ॥

तुला हातांचा करुनि पाळणा रे
खेळवीलें झेलिलें किती बारे
जरा दुखलें खुपलें कि जपें बाळा
स्मरण तुज उरलें काय न वेल्हाळा ॥

तुझा पाहुनि मुखचंद्र बाळराजा
हृदयसिंधु उचंबळुन जाइ माझा
जरी मूर्ति तुझी अंगणांत खेळे
दुरुनि बघति तुला हे मदीय डोळे ॥

जरी जाशी क्षण दूर, हूरहूर
सुरू होई मम चित्तिं हळूवार
तुझा कानीं पडतांच गोड सूर
पुन्हां यावा मत्सौख्यरसा पूर ॥

तुला लावावी दृष्ट तिन्ही सांजा
तुला जपलें मी सांगु किती राजा
असे आम्हांला एक तुझी जोड
म्हणुन झाला संसार सर्व गोड ॥

जसा वणव्यामधि भाजतो कुरंग
तसा तुजला जाचील का तुरुंग

याच चिंतेनें झोंप मुळि न यावी
रामनामावळि उठुन म्यां जपावी ॥
रामराया बाळास सुखी ठेवी
हाल सोसाया शक्ति तया देई
बाळ माझा सुखरूप घरा आणी
असें विनवित मी नयनिं येइ पाणी ॥
रात्र व्हावी जग सर्व हें निजावें
परी निद्रासुख नाहिं अम्हां ठावें
आळवावा भगवंत जिवेंभावें
तुला बाळा हृदयांत आठवावें ॥
दिवस होत्यें मी मोजित रे बाळा
मला ठाउक कंठिलें कसें काळा
पोटिं प्रेमाचा भरुनि ये उमाळा
गळति गालांवर अश्रु ते घळाळा ॥
परी रडणें हें अशुभ मनीं येई
पुसुनि नयनां विनवित प्रभू-पायीं
मातृ-हृदय तुला ज्ञात असे रामा
ठेवशील कसा दुःखि सदा आम्हां ॥
जीव माझा धरि आस, जरी झुरला
एक महिना तो फक्त अतां उरला
बाळ माझा येईल धरिन पोटीं
अश्रु वदतिल, वदवेल जरि न ओठीं ॥
सुखाचा तो पाहीन सोहळा मी
बाळ माझा येईल पुन्हां धामीं
अशी आशा हृदयांत खेळवीत
बाळ होत्यें रे दिवस रात्रि नेत ॥
अकस्मात परी मरण आयकोन
रडत बाळा मी धाय मोकलून

कसा गेलासी टाकुनियां बाळा
कसा काळ तुला ओढित वेल्हाळा ।
किती आले हृदयांत रे विचार
हृदयदाहक जे शोक देति फार
कशी बाळाची जाहली असेल
स्थिती तेथें, तो कोमल जणुं फूल ।।

तुरुंगांत तिथें एकला असेल
जवळ त्याच्या कुणि तेथ ना बसेल
कोण मातेसम दयाक्षमा दावी
आइनेंच जगीं शुश्रुषा करावी ।।

दिली असती मृदु मांडि मी उशीला
तुला असतें निजविलें रे कुशीला
तुला मृदु गादी दिली असति बाळ .
तुझें असतें चेपलें मी कपाळ ।।

सदोदित मी राहून उशापाशीं
तुझी बाळा रे बनुन एक दासी
तुझी सेवा प्रेमार्द्र असति केली
परि काय पहा दैवगती झाली ।।

जरी असतें मी जवळ तुझ्या बाळा
धैर्य होतें ना न्यावयास काळा
तुझे असते मी प्राण वांचवीले
परी बाळा हें काय बरें झालें ।।

कोण होतें रें औषधास द्याया
कोण होतें तव चरण ते चुराया
कोण होतें पडतांच हात द्याया
कुणी दाविल का तुरुंगांत माया ।।
शब्द तेथें मधु ऐकण्या न येई

कुणि न कोणाची वास्तपुस्त घेई
दुधाताकाचा थेंब नसे कोणा
जरी पडला आजारि दीनवाणा ॥

सुखामाजी तूं बाळ वाढलास
दहिंदुधाविण तव जात नसे घास ॥
जरा येई जरि वास तो तुपास
रुसुन जाशो तूं करिशि रे उपास ॥

केवि कारागृह सौख्य तुला देई
बाळ जाणे रे सर्व तुझी आई
तुझा घुटमळला जीव रे असेल
घोट न दुधाचा लाभला असेल ॥

कशासाठीं गेलास रे तुरुंगीं
सुखें असतासी मातृ–मृदूत्संगीं
कशालागीं आगींत बाळ गेला
पुन्हां भेटाया नाहिं जगीं उरला ॥

तुझ्या आजारीपणाची कथा ती
दगड परिसुन होतील विरुन माती
बाळ कैसे मम अश्रु थांबतील
हृदय फुटतें रे तुटत तीळ तीळ ॥

मरण चुकलें जरि नाहिं जगीं कोणा
मत्यु यावा ना असा दीनवाणा
निज–प्रिय–जन–मधु–संगतींत यावा
मृत्यु होइल तो सह्य तरी जीवा ॥

तुझीं बाळा तीं दूर मायबापें
तुला भेटूं शकलीं न पूर्वपापें
तुझें दर्शन घडलें न शेवटील
कसे अश्रू हे बाळ थांबतील ॥

तुझे गेले असतील गाल खोल
तसे नयन तुझे तारका-विलोल
शक्ति उठण्याची उरलि ती नसेल
कसे अश्रू हे बाळ थांबतील ॥
जरी उघडें ग्लानींत पडे अंग
हळुच पांघरुणा कोण घालि सांग
जरी तुजलागिं लागली तहान
दिलें अविलंबें जळ कुणी उठून ॥
कोण केंसावरुनियां हात फिरवी
कोण मदु बोलें हृदय तुझें रिझवी
कोण प्रेमभरें मुके तिथें घेई
कोण प्रेमानें स्निग्ध तुला पाही ॥
सुकुनि गेला असशील तहानेनें
काळवंडुनि गेलास का भुकेनें
गारठुनियां गेलास काय शीतें
कोण आस्थेचें तेथ तुला होतें ॥
अनास्थेनें मद्बाळ मला मुकला
अनास्थेनें मद्बाळ अहा सुकला
बाळ आम्ही उभयतां रे अभागी
कांहि करुं शकलों तें न तुझ्यालागीं ॥
घरीं गायिगुरें केवढें खिलार
किती संपत्ती तव पिता कुबेर
घरीं होती ती कशाची न वाण
परी कारागृहिं जाइ तुझा प्राण ॥
आम्हि घरिं होतों बाळ रे सुखांत
तूपसाखर जरि रडत तरी खात
तुला नव्हता सुग्रास त्याच वेळीं
कसे अश्रु न गळतील बाळ गालीं ॥

तुझा बाळा श्रीमंत किती बाप
परी ओढवलें पहा पूर्व पाप
एक पैहि न खर्चतां बाळ आली
कसे अश्रु न गळतील बाळ गालीं ॥

कोण कुरवाळी तेथ तुझ्या अंगा
कोण दावि तिथें प्रेम–हृत्तरंगा
कुणी मांडी का दिली प्रेमरंगा
कुणी घातलि का सांग मुखीं गंगा ॥

बाळ जातें फाटून चित्त माझें
कसें कुसकुरलें फूल मधुर ताजें
बाळ माझा ना वांचविला कोणी
मृत्युवार्ता ती फक्त पडे कानीं ॥
फत्तरासहि फुटतील झरे राजा
किती पडतिल हृदयास घरें माझ्या
काय समजाविशि ? बोलशी कशाला
जगीं समजावी कोण माउलीला ॥
भेटि होउं न दिलि गायसवांसराची
काय पूर्विल तें पाप बाळ जाची
पुत्रनिधनासम अन्य न हृद्रोग
बाळ साहे ना क्षण तुझा वियोग ॥

तुला बिलगूं दे धरिन तुला पोटीं
मुके अगणित घेईन देइ भेटी
निकट राही तूं सदा पांखरा रे
खेळ बागड मधुरा न दूर जा रे ॥

(असें बोलून माता मुलास पोटाशीं धरण्यास धांवते. परंतु तो देवाघरचा सोंवळा बाळ दूर होतो व आईला दूर होण्यास खूण करतो. आईचा विलाप चालला असतां पित्याची मनःस्थिति कशी होती ती पहाः—)

पिता परी खिन्न उगीच राहे
मध्येंच नेत्रांतुन नीर वाहे
उदास ऐके हृदयार्द्र बोल
रुतोनि चित्तीं बसती सखोल ।

सचिंत राही मिटि लोचनातें
तुटोनि जाई अजि पुत्रनातें
विचारकाहूर उठे मनांत
निवांत राहे हृदयीं अ–शांत ।।

न दुःख जें शब्दविभाव्य होई
मनास अत्यंत असीम दाही
तसा न अंगार तनूस जाळी
उफाळ जैसा तनुलागिं पोळी ।

समुद्र जसा वडवानळानें
पिता जळे आंत तसा मनानें
न बोलला शब्द, वदेल कायी
फुटे तदीयांतर जेविं लाही ।।

मुकेपणा दावि तदीय शोक
गमे तया शून्य समस्त लोक
मुखावरी खिन्न दिसे निराशा
शिरे मनींही करण्या निवासा ।

मनावरी तो जरि दुःखभार
करीत होता स्वमनीं विचार
विचार ते ऐकुन बाळकाचे
तरंग येती हृदयीं तयाचे ।।

मनांत होता जरि दुःखमग्न
पिता दिसे खोल–विचारमग्न
दिसावया लागत त्या स्वदेश
यदर्थ तत्पुत्र वरी मृतीस ।।

(बाप मुका व खिन्न आहे असें बघून मातेला पुन्हां उमाळा येतो. ती मुलाला "ये रे" म्हणते व "मुलाला कांहीं सांगा" असें पतीला विनविते).

येई येई रे
मनोहरा
सुकुमारा सुदरा
राजस पाडसा
स्नेहाळा
बाळा गुणगभीरा ॥ येई० ॥

सांगा हो तुम्ही
लवलाहीं
बाळ कसा तरि राही
येथें ज्या योगें
नच जाई
सुखविल दुःखी आई ॥ येई० ॥

तुम्ही मूक कसे
पुत्राला
चार शब्द तरि बोला
मातृ–प्रेमाचा
ओलावा
आणा तद्हृदयाला ॥ येई० ॥

प्रेमाचा पान्हा
पाजुं कुणा
येइ न कोणा करुणा
हे करुणावंता
दयाघना
दे मज मम बाळ पुन्हां ॥ येई० ॥

(ती माता पुन्हां पुत्राला कवटाळावयास धांवले. तो स्वर्गीय पुत्र अुणावतो व दूर होतो. तो तिची पुन्हां समजूत घालतो).

आई नाहीं हृदय मम हें जाहलें गे कठोर
आहे मातें परि निशिदिनीं अंतरीं एक घोर
त्वत्प्रेमाची स्मृति विमल ती कैशि जाईल आई
पूज्या मूर्ती तव सतत ह्या अंतरंगांत राही ॥

आई वाटे तुजसि करुणा फक्त त्वद्बाळकाची
दुःखीं सारीं खितपत परी लेंकरें भारताचीं
वाटे पुत्रें तव कितितरी सोशिले हाल कारीं
पाही डोळे उघडुन परी बाळकें दीन सारीं ॥

ना खायाला मिळत कणही ना करीं पाव आणा
आपद्–ग्रस्ता सकल जनता ना मिळे एक दाणा
राहायाला घर न उरलें वस्त्र ना नेसण्याला
आई नाहीं उरलि मिति गे भारतीं आज हाला ॥

कित्येकांना घरिं न मिळतें देतसे जें तुरुंग
होती गादी मजसि जननी तेथ लाभे पलंग
होते तेथें नियमित भिषग् औषधें द्यावयातें
केव्हां केव्हां मिळत जननी दूधही प्यावयातें ॥

लाभे कोणाप्रति जननि गे तेथ ती पावरोटी
सायंकाळीं कधि कधि मिळे लाकही अर्धलोटी
राहे कोणी कधिहि न तिथें एकही तो उपाशी
राहे अन्नाविण जरि कुणी येति ते चौकशीसी ॥

बाहेरी ह्या कितिक जननी बंधुंना तो दवा न
दारिद्र्यानें तडफडत ते नित्य गेहांत वाण
नाना सांथी चिमुकलि मुलें नित्य लाखों मरावीं
आई, बाबा, करुण तुमच्या कल्पना चित्ति यावी ॥

या पुत्राला परम जपतां, पुत्र कोटी उपाशी
मातें देतां घृत मधु दधी, ना पुशी कोणि त्यांसी

हिंदुस्थानीं हरहर किती जाहलीसे हलाखी
कोणा ये ना हृदयिं करुणा, सर्व आई उदासी ॥
श्रीमंतांचे सजति उठती बंगले ते महाल
मोटारीही उडति, बघतो बंधुचे कोण हाल
पाषाणाचेहुन अदय हे गांजिती सावकार
हाहाःकार ध्वनि उठतसे; ना दया, ना विचार ॥
वाडे बागा उठति इमले बंधुच्या अश्रुपूरें
त्यांच्या रक्तावरच जगती पोसती दुष्ट सारे
त्यांच्या घामें अविरत पहा चालती कारखाने
नाहीं खाया परि घरिं तयां एकही मूठ दाणे ॥
माझें रात्रंदिन तळमळे चित्त बंध्वापदेनें
धुव्वा जावें उडवित गमे भीमसेनी गदेनें
सौख्यीं नांदे हंसतमुख तो नित्य श्रीमंत एक
दारिद्र्यीं हा मरत दुसरा ना जगीं या विवेक ॥
एकें सौख्यीं सतत असणें अन्य लाखों मरावें
एकासाठीं झिजुनि झिजुनि बाकिचे दीन व्हावे
श्रीमंताचे घरिं झडतसे रोज ती मेजवानी
लाखों अन्नाविण मरति हे बंधु गे दीनवाणी ॥
माझ्या नेत्रीं अविरल जळा घोर वैषम्य आणी
मच्चित्तावें विरघळुनियां आइ हें होइ पाणी
ऐके आर्तस्वर उठतसे अंबरीं जाय हाय
आई नाहीं हृदय सधनां शुद्ध पाषाण काय ? ॥
आलस्याला मिळति सगळे भोग सारे विलास
कष्टे रात्रंदिन परि तया ना पुरे दोन घास
अन्याया या सहन करिती वेदवेदान्तवाले
गीता ओठीं परि विषमता घोर ही त्यांस चाले ॥
अन्नाभावें मरत असतां बंधु, जाई घशांत

लाड जिल्बी, हरहर कसें चित्त लागे अशांत
कैसे झाले स्वजन कठिण–स्वांत कारुण्यहीन
बंधू लाखों तळमळति हे मीनसे वारिवीण ॥

चित्तीं आई लव तुम्हि विवेका करा धर्म काय
मानव्याचें निज मनिं बघा उज्वल ध्येय काय
विश्वामाजीं किति विषमता दुःखद प्राणघेणी
झाला येथें नरक दुसरा लक्ष देई न कोणी ॥

श्रीमंताच्या सदनिं भरल्या रम्य गाद्या पलंग
रस्त्यामध्यें श्रमुन पडतो दीन टाकून अंग
श्रीमंताचे घरिं झळकतो दिव्य विद्युत्प्रदीप
अंधारीं तो मजुर मरतो सर्प विंचू समीप ॥

श्रीमंताचे ललितभवनीं नृत्यसंगीत होत
होत प्राणांतिक कहर त्या चंद्रमौळी घरांत
श्रीमंताचे किति सुखि शुक श्वान मार्जार मैना
मद्बंधूंची हरहर परी काय ही हाय दैना ॥

श्रीमंतार्थ श्रमत असतां घर्मधारा सुटाव्या
पर्जन्यीं त्या जमिनिंत जशा उंपळा हो फुटाव्या
सारा जावा दिन परि घरीं कांहि ना खावयातें
नाहीं त्याला मिळत तुकडा ना पुरें ल्यावयातें ॥

थंडीवाऱ्यामधिं चिमकुलीं लक्ष बाळें मरावीं
आईबाप व्यथितमति तद्वृत्ति वेडीच व्हावी
हिंदुस्थानीं गरिब विपदे अंत ना पार देखा
श्रीमंताचा तरिहि पुरवी दानवी देव हेका ॥

"गंगे गोदे" वदुनि जननी अर्पिती बाळकांना
पोटामध्यें तटिनि धरिती दीन त्या अर्भकांना
खाया नाहीं म्हणुन किति ते आत्महत्या करीत
आई नाहीं मुळिच उरली भारतीं न्यायनीत ।

दारिद्र्यानें मरत असतां पोटचे गोड गोळे
देवाला हें बघवत कसें त्यास ना काय डोळे
गेला गेला सदय तुमचा देव आई मरून
घ्यावा आम्ही झगडुन निजोद्धार आतां करून ॥
पाडायातें सकळ असती उद्धराया न कोणी
मारायातें सकल उठती तारण्या नाहिं कोणी
साहाय्याला कुणि न, वदती शब्द ना सानुकंप
आई आतां अम्हिच करणें स्वोद्धृती ती विकंप ॥
राहे पायांवर निज उभा भाग्य त्यालाच लाभे
जो जो आई जगति वरितो स्वावलंबास शोभे
ऐश्वर्याची कधि न घडते प्राप्ति आशाळभूतां
होते प्राप्ति त्वरित परि ती उत्कटोत्साहयुक्तां ॥
सूर्याचें तें विभव उसनें घेतसे चंद्र मिधा
अर्धा केव्हां कधि मुळिच ना डागही नित्य बंदा
तारे कैसे मिरवति परी नित्य तेजें स्वतंत्र
स्वोद्धारातें करुनि मिरवूं घेउं स्वातंत्र्यमंत्र ॥
अन्नाभावें तडफडत हे जोंवरी आइ बंधू
मद्रक्ताचा पसरिन सडा सांडुनि बिंदु बिंदु
अन्नावस्त्राविण न भुवनीं जीव कोणी रहावा
त्याच्यासाठीं झिजुनी झिजुनी आइ मज्जन्म जावा ॥
माझे बंधू अधन अधमीं सावकारीं पिळावे
तैसे नानाविध कर किती लागती त्यांस द्यावे
बंधूंना ना लवणहि मिळे चाटिती[१] भूमि खारी
आई, ऐशी सुकरुण कथा चित्त माझें विदारी ॥
लोकांपाशीं कण न उरला तो उरे शोकपूर
बोलायाचें बळ न उरलें तो उरे शोकसूर
नाहीं धंदा इतर उरला मृत्युवांचून आतां

१ टीप—मद्रासप्रांतांतील ही सत्यकथा आहे.

त्राता नाहीं निजजनहि ना देति साहाय्य हाता ॥
खेडोपाडीं दिसत सगळे लोक बेरोजगार
दारूमध्यें बुडति विपदा वर्णवे ती न घोर
दारूमध्यें धुळिस मिळती खानदानी घराणीं
आई ऐशी सुकरुण कथा लोचनीं पाणि आणी ॥

(मुलगा भावनाभरांत भारताची दैन्यदशा वर्णन करीत असतो. परंतु मातेला पटत नाहीं. ती एकदम पुढीलप्रमाणें बोलूं लागते ).

मला ना कळलें बाळा         समजावी तुझा पिता
म्हणती खोटि स्त्रीबुद्धि         ऐकेन तुमच्या कथा ॥
पित्याला पटवी बोल         जरि त्या पटती तरी
मला त्यांतच आनंद         तन्मना तुष्ट तूं करी ॥

तुमचा हित–संवाद         बसुनी येथ ऐकतें
प्रकाश पडला चित्तीं         अल्पसाही खरेंच तें ॥
तुझ्या गोड मुखा बाळा         बसतें येथ पाहत
तुझ्या गोड कथा बाळा         बसलें येथ ऐकत ॥
जरि ना कळले मातें         त्वद्बोल मज अमृत
ऐकतें लक्ष लावून         मुक्याचें घेउनी व्रत ॥

( पिता मुलाजवळ बोलूं लागतो ).

बाळ मी ऐकले बोल         तुझे जे खोल गंभिर
ऐकतां कंठही दाटे         शोकानें भरतो उर ॥
देशाची स्थिति ही हीन         लोक सर्वहि निर्धन
समस्त दिसती दीन         येतें हें भरुनी मन ॥
उपाय ना परी बाळा         आम्हांला एकही दिसे
बघून तुमचे यत्न .         सारेंच जग हें हंसे ॥
ईश्वराच्या कृपेनेंच         येतील दिन चांगले
अंधारामागुनी जेंवीं         प्रकाशकर ते भले ॥

(हा दैववाद ऐकून मुलगा त्वेषानें बोलूं लागतो)

बाबा हें बोलतां काय
प्रयत्नदेव तो तरे
प्रयत्नास सदा आधीं
धरावें हृदयीं नरें ॥

नरका नंदनाचें तें
यत्न तो रूप देतसे
प्रयत्न करिती राष्ट्रें
पृथ्वीवर पहा कसे ॥

यत्न जो करि, त्या देव
साहाय्य करितो सदा
संकटांत पुढें जातो
हरि देव तदापदा ॥

गोवर्धनास ते काठ्या
आधि गोपाळ लाविती
मग तो लावितो बोट
श्रीकृष्ण वदुं मी किती ॥

बोलती फक्त मद्बंधू
कृतीचा शंख तो परी
करील देव तो काय
बघतो कोण अंतरीं ॥

भावनांचा अस्त झाला
विचार उरला नसे
दिसती निजले सारे
मद्बंधु पशु ते जसे ॥

झाले सकल मद्बंधू
शिश्नोदरपरायण
नारायण कसें त्यांना
करि मोक्षसमर्पण ॥

(लोकांच्या मनोवृत्तीचें तो तरुण पुत्र वर्णन करितो).

न केवळाहि भावना
न केवळाहि वल्गना
विचार भावना कृती
तरीच होइ उन्नती ॥

उदार भावना नसे
विचार ना मनीं वसे
कृती म्हणाल शून्य ती
कशी घडेल उन्नती ॥

मनास टोंचणी नसे
मती सखोल ती नसे
खुशालचेंडु बैसती
कशी घडेल उन्नती
जिवंत भाव ना तिळ
तुटे न चित्त तिळतिळ
न मान–कीर्ति–चाड ती
कशी घडेल उन्नती ॥

पशूसमान जीवन
पशूंतही किती गुण
न सत्य–वस्तुची रती
कशी घडेल उन्नती ॥

स्वदेश न स्वधर्म न
उगीच व्यर्थ जल्पती
स्वकर्म न स्वशर्म न
कशी घडेल उन्नती ।।

स्ववस्त्र न स्ववस्तु न
उगीच नंदि डोलती
स्वशस्त्र न स्वशास्त्र न
कशी घडेल उन्नती ।।

मत स्व न मति स्व न
अजागळापरी गती
कुठेंच कांहि राम न
कशी घडेल उन्नती ।।

समस्त हे परभुत
करीत आत्म–आरती
खरा न एक पंडित
कशी घडेल उन्नती ।।

मदांध ग्रस्त मत्सरें
घमेंड कीं अम्हां मती
प्रमत्त देत उत्तरें
कशी घडेल उन्नती ।।

सदैव वृत्ति उर्मट
करी टवाळि दुर्मति
सदैव एक तर्कट
कशी घडेल उन्नती ।।

गभीरता विशुद्धता
सदैव छद्म दाविती
न ठाउकीच उद्धटां
कशी घडेल उन्नती ।।

स्ववर्तनांत वक्रता
बगास तुच्छ लेखिती
स्वभाषणांत आढ्यता
कशी घडेल उन्नती ।।

जगांत आम्हि शाहणे
पदोपदीं परि च्युति
नसे जणूं अणू उणें
कशी घडेल उन्नती ।।

हुशार राजकारण
अशी करून स्वस्तुती
अम्हीच जाणतों खुण
कशी घडेल उन्नती ।।

अम्हीच डाव जाणतों
अशी करून स्वस्तुती
अम्हांस कोण सांगतो
कशी घडेल उन्नती

सदुक्ति ती पटेच ना
वदे तशी नसे कृती
सुबुद्धि ती असेच ना
कशी घडेल उन्नती ।।

समीप बुद्धि ती नसे
मनीं सदा अहंकृती
दिली तरी न घेतसे
कशी घडेल उन्नती ।।

दिवाळखोर हा असे
हंसें जगांत होतसे
मनीं परी न लाज ती
कशी घडेल उन्नती ॥

स्वतांस मार्ग ना दिसे
परांस नित्य जो हंसे
न यत्न ना पुढें गती
कशी घडेल उन्नती ॥

टपे सदा बकापरी
स्वरूप साजिरें वरी
मध्येंच चोंच मारिती
कशी घडेल उन्नती ॥

महान् खरे जगद्गुरु
सदैव यत्पदां धरूं
करी न त्या नमस्कृती
कशी घडेल उन्नती ॥

जगांत काय चाललें
स्वभूंत काय चाललें
न हें कुणीहि पाहती
कशी घडेल उन्नती ॥

पलंगपंडितां-करीं
घडेल केविं चाकरी
न जोंवरी खरे व्रती
कशी घडेल उन्नती ॥

असावि एकतानता
असावि भाव-तीव्रता
तरीच होतसे कृती
कृतीविणें न उन्नती ॥

परंतु काय ही दशा
बघून दुःख मानसा
न देशभक्ति ती दिसे
खुशाल खातपीतसे ॥

बघून देशदुर्गती
खुशाल खेळ खेळती
क्षुधार्त बंधु पाहुन
सुचे तयांस भोजन ॥

खुशाल नाच चालती
अनंत द्रव्य ओतिती
विचार येइ ना मनीं
दरिद्रता किती जनीं ॥

सहानुभूति-बिंदु न
सुखी समस्त निंदुन
न चिंधि एक देतिल
परस्व मात्र घेतिल ॥

न सत्य तें मुळीं उरे
कसा समाज हा तरे
असत्यदेव पूजिती
असत्य नित्य वागती ॥

न बंधुभाव अल्पही
दया क्षमा न नांवही
न ऐक्य तें कुठें दिसे
सदैव भांडखोरसे ॥

घरांत रोज भांडती पथांत नित्य भांडती
मनीं सदैव भांडती जनीं समस्त भांडती ॥
भजेंत खेळ मांडिती तिथेंहि भांडुं लागती
गभीर प्रश्न काढिती तिथेंहि भांडतो किती ॥
करंट लोक हे असे कशास भाग्य येतसे
विदीर्ण होइ मन्मन बघून आपुले जन ॥
यदा सुबुद्धि येइल तदाच कार्य होइल
विचार भावना मनीं कृती घडेल हातुनी ॥
म्हणून म्हणतों बाबा विचारा पेटवूं जरी
पेटवूं जनचित्तातें कृति होईल ती खरी ॥
तुरुंगीं असतांना मी होउनी भाव-निर्भर
लिहिलें गीत मी एक म्हणुं का गोड सुंदर ॥

(एकदम प्रेमानें आई बोलूं लागते).

बाळ माझा कवी झाला केव्हांपासून रे गड्या
लबाडा गीत तूं केलें सुरानें म्हण रे खड्या ॥
आवाज तव आकर्षी आधींच हृदया मम
त्यांत स्वकृत गीतास वदतां अमृतासम ॥
केव्हांपासून झालास कवि पंडित शाहणा
गाइ तें गीत तूं बाळा आनंदें भरि मन्मना ॥
पहा हा थांबला वारा त्वद्गीत परिसावया
सखया तें तुझें गाणें लाग रे लाग गावया ॥

( मुलगा गाणें म्हणतो ).

दीनशरण्या शुभलावण्या धन्या तूं माउली
होतिस तप्त जगा साउली ॥
तुझ्या विचारें येतें माझें गहिंवरून गे मन
येतो कंठ किती दाटुन
इतिहास तुझा क्षणैक बसतां येतो नयनांपुढें

सं. ३०७४ खंडकाव्य

शोकें पिळवटतें आंतडें
हृदय गजबजे दृष्टी भरते पडति अश्रुचे सडे
वाटे सकळ चराचर रडे
अनंत देखावे भरभर गे चलच्चित्रपटसम
दिसती हृदयीं निर्मिति तम
उदात्त वाङमय कुठें, कुठें त्या कला, कुठें ज्ञान तें
वैभव माते ! आहे कुटें ?
किती तपस्या त्याग किती तव वैराग्य तुझें किती
सत्त्वा नव्हति तुझ्या गे मिति
झाला अंतर्बाह्य भिकारी पुत्र तुझा आज गे
गुलाम केवळ म्हणुनी जगे
अनुकरण करी दुसऱ्यामागुन मंद जातसे सदा
पूजी भक्तीनें परपदा
कला असो साहित्य असो वा असो राजकारण
जाई जगताच्या मागुन
स्वयंस्फूर्तिचा झरा आटला स्वतंत्र मति ती नुरे
प्रतिभा दिव्य सर्व ती मरे
जुनी संस्कृती जिवंत नाहीं उरलें केवळ मढें
तरि किति कवटाळिति बापुडे
नव संस्कृति ती कळली नाहीं विचार कुणि ना करी
दारें लावुन बसती घरीं
नवीन-गंभिर-विचार-गगनीं उड्डाणा मारुनी
तारक येइ न कुणि घेउनी
जसा मारुती गगनिं उडाला जन्मतांच निर्भय
दिसतां रक्तभास्करोदय
मृत्युसमीपहि नचिकेता तो ज्ञानास्तव जातसे
आजी त्वत्सुत कोठें तसे
विद्या नाहीं, सद्गुण नाहीं, बसलों कर जोडुन

जाई भाग्य अम्हां सोडुन
दया नसे सद्धर्म नसे तो नुरला एकहि गुण
जाई भाग्य म्हणुन सोडुन
गुणांजवळ नांदते अखंडित लक्ष्मी चंचल नसे
चंचळ जनमन माते ! असे
अम्ही भांडलों म्हणुनि कष्टलों, कष्टतसों रडतसों
कृतकर्मफळें भोगीतसों
सद्‌गुण येतिल तेव्हां होइल भाग्योदय आमुचा
तोंवरि पाश राहि शत्रुचा ॥
माते! अमुच्या दुष्कृत्यांनीं रडत अहा असशिल
कसचे पुत्र मनीं म्हणशिल
एक सिंह तो बरा नको हे पस्तिस कोटी किडे
जाती चिरडुन जे बापुडे
एक चंद्र तो बरा कशाला अनंत त्या तारका
ज्या ना अंधकारहारिका
विशालशाखा पसरून उभा एक पुरे वटतरु
नलगे क्षुद्रवनस्पतिभरु
देत असे असतील तुझ्या का विचार मनिं अंबिके !
विमले स्नेहाळे सात्त्विके
अम्ही करंटे दुर्गुणखाणी सुत न तुझे शोभत
बसलों श्वानासम भुंकत
परिस्थिति न आकळ कळेना सांगितलें ना वळे
पडलों तरिहि गर्व ना गळे
सरपटणारे सरडे सकळहि गरुत्मान् कुणी नसे
जो तो बिळांत घुसुनी बसे
चिखलामध्यें खडे फेंकिलों तिथेंच घेतों उड्या
घेइ न कोणि सागरीं बुड्या
कूपमंडुकापरि अद्यापी उगाळितों गे जुनें

एकच वाजवितों तुणतुणें
जगीं नगारे प्रचंड भेरी वाजत माते ! किती
सुस्त त्वत्सुत परि बैसती
ध्येयवाद तो नुरला, परि जरि दिसला, करिती दूर
झाले पशूच उदरंभर
हंसू कीं रडूं उदास होतें निराश होतें मन
येइ प्रकाश का कोठुन
चैतन्याची कळा आमुच्या अंतरंगि संचरो
दिव्य स्फूर्तीनें मन भरो
उत्कटता उज्वलता येवो भव्य नव्य आवडो
ध्येयीं विशाल दृष्टी जडो
अनंत तेजें ज्वलन्निव असे धगधगीत लोळसे
पेटुन करुं रूढी–कोळसे
किती विषारी किती भिकारी रान गवत माजले
सगळें पाहिजेच जाळलें
नव प्रकाशा पहावयाला होवो सुरु धडपड
करुं दे जीवात्मा तडफड
बंदिवास हा सरो, विचारा विश्व असो मोकळें
पंखा फडफडवूं दे बळें
सकळ बंधनें जीवात्म्याचीं बुद्धीचीं स्फूर्तिचीं
तुटुनी जाउं देत आजची
विशाल सुंदर नवीन गंभिर प्रश्न किती जीवनीं
जाऊं भेटाया त्यां क्षणीं
होवो विक्रम मृतवत् अस्मत्–स्थिति आतां पालटो
त्वन्मुखशशि नवतेजें नटो
जाउं दे जाउ दे देवा । अस्तास सर्व दुर्भाग्य
येउं दे येउं दे देवा । तें मंगल शुभ सौभाग्य
होउं दे होउं दे बंधू । त्वत्कार्य कराया योग्य

शोभो पुनरपि भारतमाता जशि पूर्वी शोभली
सत्या शिवा सुंदरा भली। दीनशरण्या० ॥
(मुलाचें गाणें संपतांच माता गहिंवरून म्हणते)
बाळा अतीव मधुरा कविता तुझी रे
कोणी तुला शिकविलें मति ही भरे रे
गाणीं परी कवण ऐकवि बाळ आतां
जाशील सोडुन मला करुनी अनाथा ॥
बाळा तुझीं हृदयहारि रसाळ गाणीं
साधीं किती सरळ सुंदर रम्य वाणी
तूं आणिशी अमुचिया नयनांत पाणी
जाशील रे करुनियां मज दीनवाणी ॥
त्वत्काव्यगंध मुळिं ना कळला जगाला
आला कसा तुजवरी घनघोर घाला
बाळा कळीसमच जीवन जों तुझें रे
येतें तुला मरण, निघृण काळ तो रे ॥
(मुलगा आईची समजूत करावयासाठीं बोलतो).
स्वातंत्र्यसंगीत तो दिव्य भगवंत निर्मीतसे मायभूमीवर
हीं जीवनें आमुचीं त्यांत होतील तानांपरी आइ गे सुंदर
मज्जीवनाची तिथें गुंफिली जात सत्तान झालों असत्यांपरी
आई नसे स्वार्थ, या भारताची प्रभा फांकुं दे रम्य विश्वांतरीं ॥

जरि ना लिहिलें काव्य काव्याचा विषय स्वतां
आइ मी जाहलों आज तूं मान मनिं धन्यता
स्वातंत्र्य–सत्कथा निर्मूं तदर्थ मम जीवन
आई ना दुःख तें वाटों तूं शांत करि गे मन ॥
मोक्षाची पावना गंगा निर्माया भारतांतरीं
मज्जीवन–सिंध्द मिळाला शोक ना करी ॥
बाबा तेथें तुरुंगांत विचार मनिं खेळत
पेटवावें जागवावें हें समग्रहि भारत ॥

जेथवां तीव्र वृत्तीचे उत्कट—स्वांत ते नर
उठतील हजारांनीं आपल्या भारतावर ॥

तेथवां तेज येईल देव ना सुखलोलुपा
देव येईल मागूनी मरा आधीं तुम्ही खपा ॥

जेव्हां राष्ट्रामधि निपजति उन्नत ध्येयवादी
त्यागी तेजोमय तरुण ते सुव्रती सत्यवादी
खेडोपाडीं करितिल जरी ते विचारप्रसार
देशोद्धारा मग तुम्हि वदा काय लागे उशीर ॥

खेडोपाडीं झणि उडवुनी कल्पनांचे फवारे
स्वातंत्र्याचे प्रबळ भरुनी भारलीं दिव्य वारे
" कैसे तुम्ही मनुज असुनी राहतां रे गुलाम
याच्यापेक्षां मरण बरवें या म्हणूं सर्व राम ॥

मेलेलें ना पडुनि असणें मर्दसें हो उठावें
स्वीय स्थानाप्रति पुनरपि पौरुषें शीघ्र घ्यावें "
ऐसें लोकांप्रति कथुनियां पेटवूं अंतरंग
पाशां तोडूं करुं उठुनियां शृंखलांचा विभंग ॥

कोणी नाहीं धरणिवरि या आपणांवीण दीन
तेजें तुर्क स्थिर मिरवतो तो उभा चंड चीन
पोलादाचे परि चिमकुला धन्य पोलंड देश
अफगाणातें नमुन असतो आंग्लभूचा नरेश ॥

झालें जागें खडबडुन तें आज ईजिप्त सुप्त
दावी तेजःप्रसर प्रगटी स्वीय सामर्थ्य गुप्त
ईशान्येला डुलत असतो वैभवानें जपान
छोटा मोठी कृति परि, तया अग्रराष्ट्रांत मान ॥

आयर्लंड प्रथित भुवनीं मेळवी स्वीय मोक्ष
भव्य क्रांती करित रशिया विस्मयें पाहि विश्व

देशोदेशीं सकळ जनता पेटलेली पहा ती
हिंदुस्थानीं परि न उठती सर्व झोंपाच घेती ॥
स्वातंत्र्यानें हंसति खुलती राष्ट्रकें सानसान
हिंदुस्थानाहुन शतपटीनें जरी तीं लहान
उत्कर्षाला करुन करिती चित्कलावाग्विलास
विश्वा देती, जरि लघु तरी, संस्कृतीचा प्रकाश ॥
दुःखी पंगू पतित दुबळे राहिलों हो भिकारी
आतां पृथ्वी दिपवुं उठुनी तेज दावून भारी
शक्ती आहे जगति अतुला एक ती निश्चयाची
लक्ष्मी, ज्याचा अविचल असे नित्य निर्धार, त्याची ॥

(बाप म्हणतो "आपणांत भांडणें किती, धर्मही बुडत चालला. महारांना म्हणतात शिवा. आचार उरला नाहीं तर कसें होणार ?").

काय सांगाल लोकांस लोकांमध्यें नसे बळ
ऐक्य नाहीं धर्म नाहीं कोठें दाबाल रे कळ ॥
स्पृश्यास्पृश्य तसे अन्य वाद माजून राहिले
भ्रष्टता माजली सारी हलकल्लोळ माजले ॥
ब्राह्मण–ब्राह्मणान्यांची खडाजंगी असे सदा
जागा न उरली कोठें बाळा टाकावया पदा ॥
हिंदु आणि मुसलमान पाण्यांत बघती जसे
विश्वास लव ना उरला बाळ होईल रे कसें ॥
धर्मास लागतो डाग धर्म श्रेष्ठ सनातन
आचारा बुडवीतात माझें हें करपे मन
धर्म हा प्राण जीवाचा धर्मार्थ सर्व पाहिजे
त्याच धर्मास टाकोनी बाळा चित्तांत लाजिजे ॥

(मुलगा बोलतो)

बाबा होत किती मदीय हृदयीं ती कालवाकालव
अस्पृश्यापरि मानितों तरि कसे ते आपुले बांधव

श्रेष्ठाश्रेष्ठ समस्त ढोंग, न असे अस्पृश्य हा मानव
नाहीं थोर विचार तात दिसतो लोकांतरंगीं लव ॥
देवाचे घरिं पाप घोर करितों अस्पृश्य यां लेखुनी
आले नाहिं जगांत खास समजा अस्पृश्य ते होउनी
आम्ही मानव हीन दीन करितों त्या धर्म हो मानितों
ऐसा धर्म जळो मनुष्यहृदयें जो भाजण्या सांगतो ॥
कुत्रीं पोपट डांस ढेंकुण तशा मुंग्या तशीं मांजरें
यांनीं तीं न विटाळती अपुलिं हो स्वप्नांमध्येंही घरें
येती पक्षिपशू खुशाल बसती देवालयीं निर्भय
जातां ये परि मानवास न तिथें धिक् धिक् असा हा नय ।
कोल्हीं ओरडती, स्मशान–वसती, तेथें तयां राखुनी
धंदे सर्व गलिच्छ जे सकळ ते प्रेमें तयां देवूनी
"तुम्ही स्वच्छ बना, सुसंस्कृत बना, मालिन्य दूरी करा"
ऐसें हें वदणें गमे खुपसणें घोरव्रणीं तो सुरा ॥
बाबा एकहि त्यांजला न दिधला ज्ञानप्रकाशांशु तो
बाबा क्रूरपणा असीम बघुनी मज्जीव हा कांपतो
वर्षें कैक हजार मानव परी केलें तयांना पशू
नाहीं दाखविलें कधींहि चुकुनी तें प्रेम वा तें असूं ॥
बाबा घोर कलंक हा अपुलिया ह्या थोर धर्मावरी
डागा मानितसों सुभूषण सदा हा ! हा ! कसे अंतरीं
मानव्या अवमानितों मनुज तो धिक्कारितों प्रौढिनें
पाषाणासम जाहलीं तरि कशीं हीं आपुलीं हो मनें ॥
देवा मानितसां तरी क्षणि उठा अस्पृश्यता ना उरो
त्यांचे क्लेश विपन्नता विकलता दुर्भाग्य सारें सरो
सारे बंधु बनूं खरे निज मनें प्रेमें अतां रंगवं
मातेला कलहाविकीं मुळि अतां ना तांत हो खंगवूं ॥

("बाबा, मुसलमानांस आपण सदा नांवें ठेवतों परंतु ते सारेच वाईट नसतात; भलेबुरे सान्यांत आहेत" अशी विचारसरणी मुलगा मांडतो).

हिंदू धर्म समानतेस शिकवी आचार उल्टा परी
इस्लामी जन वागती अधिक ते एकत्र बंधूपरी
अन्या बंधुस आगगाडिमधिं तो भेटे मुसल्मान जरी
बोलूं लागति, एक होति, मिळती, खातील एकत्रही ॥

आम्हां संकुचितांतरांस गमतें कीं तो मुसल्मान अरी
दृष्टी नाहिं विशाल, तीन शतकें मागें विहारा करी
देऊं घालवुनी अम्हांस गमतें येथून बाहेर त्या
ज्यांच्या येथ अनेक आजवरि त्या झाल्या पिढ्या नांदत्या ॥

मातेचे परशत्रु ते विसरतों, आहे मुसल्मान तो
ऐसें नित्य कथांतुनी अजुनही काव्यांतुनी दावितों
पोवाडे अजुनी म्हणूं गरजती कापा मुसल्मान जे
राष्ट्राचे नव प्रश्न खोल बघण्या धी आमुची ना धजे ॥

इस्लामी म्हणजे कठोर ठरला दुर्वृत्त पापी ठक
नाहीं तद्-हृदयास पाप म्हणुनी वस्तू जणूं ठाउक
हिंदूंच्या बळजोरिनें पळवुनी न्याव्या स्त्रिया संतत
ऐसें नित्य अम्ही जनां शिकवितों कीं हें मुसल्मान्-व्रत ॥

ना हें सत्य मुळीं, तयांतहि पहा ते नांदती सद्गुण
प्रामाणीकपणांत नाहि कमती ते तात हिंदूहुन
इस्लामी गवळी न नीर मिसळी, हिंदू कसा तो असे
जो पूर्वग्रह-दूषितांतर नसे त्या सर्व कांहीं दिसे ॥

नाना गांव पहा, घरोघर तिथें ते भृत्य प्रामाणिक
इस्लामी दिसतील खेळविति जे प्रेमें मुलें बाळक
जे श्रीमंत कुबेर तद्भवनिंही इस्लामि ते चाकर
निष्ठापूर्वक कामधाम करिती संपादिती भाकर ॥

होतों घेत समस्त एकवटुनी अन्योन्य-सत्-संस्कृती.
तीं रामायणभारतोपनिषदें भाषांतरीलीं किती

इस्लामी कविनीं, सुकाव्य लिहिलें येथील भाषांतुनी
प्रेमें वाढविलें कलांस नमुने उत्कृष्ट ते निर्मुनी ॥
केलीं जीं रणकंदनें विसरुनी हिंदूमुसल्मान जनीं
माता भारत एक ही सकळिकीं वृत्ती मनीं आणुनी
जो जो भारतभूमिला पदतळीं ठेवील तो तो रिपू
मानोनी, करण्या स्वतंत्र निज–भू या तात सारे खपूं ॥
मोठें संकट दूर आधिं करुं या बारीक राहो दुरी
मातेच्या हृदयांत खोल घुसली ही दास्यरूपी सुरी
होऊं या झणि एक, एक हृदयीं तो राष्ट्रधर्म स्मरूं
इस्लामी जन तोहि बंधु समजूं वृत्ती उदारा करूं ॥
धर्माचा जरि खोल पाहुं तरि तो आत्मा असे एकच
आम्हांलाच नको, पहा पडतसे रूढ्यादिकांचा खच
जे तुम्हां दिसतात भेद असती काळ स्थितीच्यामुळें
त्या भेदांसच मुख्य मानुन पहा हे भांडताती खुळे ॥
कां हा धर्म सनातन प्रथित हो, त्याचा कळे अर्थ का
रूढीच्या भजकांस तात मुळिं तो नाहींच हो ठाउका
जें सत्तत्त्व कुठें दिसेल जगतीं जें सत्य कोठें दिसे
तें तें घेइ सनातनी जरि खरा, तद्दृष्टि कोती नसे ॥
तत्त्वाची महती असे, न महती व्यक्तीस; सत्याप्रत
सांगो शंकर, बुद्ध, खिस्त, मनु वा पैगंबर प्रेषित
ज्ञानोबा कथु वा कबीर कथुं दे एका तुका नानक
जो जो धर्म सनातनी असत तो सत्तत्त्व–संग्राहक ॥
देखा धर्मिं सनातनीं सगुणही आहे तसें निर्गुण
आहे यज्ञच फक्त देवहि नसे मीमांसकालागुन
बुद्धाला अवतार मानित असों, केला तया आपुला
ही संग्राहकता असे म्हणुन हो हा धर्म आहे भला ॥
जैसे ते अवतार मानित असों श्रीरामकृष्णादिक
बुद्धखिस्तमहंमदासहि चला मानूं जगत्तारक

होते सांगत सर्वदा शिकवित श्रीरामकृष्ण प्रभु
आलिंगील जगा सनातन जरी हा धर्म आहे विभु ॥
(बाबा,इतर धर्मातील उदात्त गोष्टीच आपण वधाव्या.
महान् धर्मसंस्थापकांची निंदा करणें बरें नव्हे )
जो देवास भितो असे अधिक तो, तो उच्च, तो सत्कृती
नाहीं वंश कुळास मान लिहिलें ऐसें कुराणीं किती
झाल्या थोर विभूति या जगांत ज्या हें विश्व ज्या वंदितें
त्यांना तुम्हिहि मान द्या अरब हो ऐसें कुराण् सांगतें ॥
लोखंडाहुन अग्नि थोर, जल तें अग्नीहुनी उद्बळ
वारा वारिहुनी, तयाहुन असे मोठा गिरी निश्चळ
त्या अद्रीहुन थोर जें सदय जें निष्पाप जें अंतर
ऐसें या जगतास नित्य करितें श्रीमत्–कुराण् जाहिर ॥
आकारीं प्रभु तो नसे, विभु महान् ना मूर्तिमर्यादित;
तुम्ही बंधु समस्त, ईश्वर मनीं भावोन जा वागत
शेजाऱ्यास जरी नसे तरि तुझी तूं देत जा भाकर
साध्या सुंदर गोष्टि, सांगत अशा शिष्यांस पैगंबर ॥
बुद्ध प्रीति कथी अनंत, न असे जी वस्तुमर्यादित
युष्मत्प्रेमजलांबुधींत सगळें राहो जगत् डुंबत
कोणाला दुखवा मुळीं न, न कुणा जीवास लावा ढका
आचारा मधुरा सुरम्य असल्या बुद्धोपदेशीं शिका ॥
पश्चात्ताप खरा मनास तरि तो घेईल विश्वंभर
प्रेमानें जवळी, जरीहि असला दुर्वृत्त पापंकर
घाली अंध्वपराध पोटिं सगळे, जैसे तुझे देव तो
तत्त्वें ऐशि उदार सुंदर जगा तो ख्रिस्त हो अर्पितो ॥
जें जें सुंदर सत्य हृद्य, उचलूं सर्वांहि धर्मांतुनी
होऊं थोर सनातनी तरि खरे थोरांस या सेवुनी
"आकाशामधला तुझा मज असे ठाऊक तो बाप रे"
ऐसें बोलुं न, पूज्यनिंदन करी तो जीव कैसा तरे ॥
कांही अन्य म्हणोत मी करिन मच्चित्तास मोठें खरें

जें जें सत्य दिसेल तें नमुनि मी घेईन अत्यादरें
ऐशी वृत्ति सनातनी कुठुनही येवो प्रकाशप्रभा
ओलावा कुठलाहि तो मिळवुनी सद्वृक्ष राहे उभा ॥

ओलावा हृदयास द्या मिळवुनी ठेवा न तें कोरडें
द्वेषानें जगतांत तात उपजे तो द्वेष, वाढे नडे
प्रेमातें प्रकटोनियां गुण दिसे तो मुख्य मानूनियां
दूरी दुर्गुण ते करून, झगडूं तो स्वर्ग निर्मावया ॥

रामोपासक गाणपत्य कुणि वा श्रीकृष्णनामीं रत
जैसे एक घरांत आज दिसती प्रेमें सुखें नांदत
ख्रिस्तोपासक रामभक्त अथवा पैगंबराला नत
हे एक्या घरिं नांदण्यास नसती कां तात हो संमत ॥

बाबा थोर अपाप ह्या सकळही श्रीमद्विभूती शुभा
पूजावें मनुजें तयांस मिळते जेथून ज्याला प्रभा
सन्यत्सेन असून ख्रिस्ति, बनला तो चीनराष्ट्राग्रणी
राष्ट्राच्या जनकापरी समजती त्या लोक सारे चिनी ॥

तो सेनापति नोगि ख्रिश्चन जगद्विख्यात शौर्याकर
त्यातें देइ जपान मान न मनीं आणीत धर्मांतर
तैसे आपणही खुशाल कुठल्या धर्मास मानो कुणी
होऊं चित्तिं उदार, सत्यमय तो पूजूं बनोनी गुणी ॥

निष्ठा राखुन आपुली, न दुखवूं जी अन्यनिष्ठा खरी
अन्याच्या हृदया जरा दुखविणें ती होय हत्या तरी
सांभाळून परस्परांस करुनी घेऊं विकासा चला
देणें हाच धडा समग्र जगता या भारतानें भला ॥

राहे जीव धरून देश अपुला कंगाल दुःखी मुका
आहे ध्येय तयास काय ? पडतो चित्तीं प्रकाशांशु का ?
आहे हा जगला कशास जगतीं प्राचीन हो भारत
देवोनी टकरा अनंत टिकला काळाशि हा झुंजत ? ॥

स्वातंत्र्या मिळवून काय जगतीं सांगेल हा भारत ?
दास्यीं लोटिल काय अन्य जनता होऊन सत्तारत ?
ऐश्वर्यी मिरवेल काय जगतीं मत्तोन्मदांधापरी,
विश्वाला लुटुनी जगास करुनी दुर्मीळ ती भाकरी ॥

व्हावा भारत शीघ्र मुक्त तरि तो व्हावा किमर्थं वदा
नाहीं खास जगामधील असती त्या पोसण्या आपदा
शांतीचा जगतास सत्पथ भला दावावया भारत
होतो मुक्त, म्हणून ईश्वरकृपे तो जाहला ना मृत ॥

युद्धाचा जगतास वीट लढुनी येईल तो अंतरीं
शांतीची मग त्या तहान हृदयीं लागेल तीव्रा खरी
तेव्हां भारत हा स्वतंत्र जगता दावावया सत्पथ
अग्रे होइल, नीट चालविल हा विश्वंभराचा रथ ॥

नाना धर्म विभिन्न ते असुनिही प्रेमादरें राहती
शेजारीं, शिकवील सर्व जगता ही भारती संस्कृती
हिंदु ख्रिश्चन पारसीक शिखही ते जैन बौद्धादिक
इस्लामी अणखी कुणीहि सगळे नांदोनि निर्मू सुख ॥

घेऊं सर्वहि तात ! थोर हृदयें अन्योन्य जें चांगलें
होऊं उन्नत उत्तरोत्तर गळां घालून भावें गळे
शांती शांतिविहीन युद्धनिरतां दावावया भारत
आहे हा जगला, न ईश्वरकृपे तो जाहला हो मृत ॥

बाबा उदार शुभ उन्नत हे विचार
सर्वत्र भारतजनीं करणें प्रसार
निःशंक निर्भय बनोनि कथावयास
यावें पुढें जनहितास करावयास ॥

ते आग पेटविति सर्वहि हाय बाबा
खोटीच दाखविति ऐट अणी रुबाबा
ना भांडणें मिटविती परि वर्धमान
बाबा करोनि अजि कापिति देश–मान ॥

लावावया सजति लोक समस्त आग
ना शांतिचा कुणिहि दाखविण्यास मार्ग
ओतीत तेल सगळे विझवी न कोणी
प्रत्येक देशहित हेंच मनांत मानी ॥

लागे कधीं तरि जगीं मनुजा शिकाया
ना भांडणें हित असे, श्रम वेळ वायां
होऊनियां स्वमनिं कोणि तरी उदार
लागेच शांत करणें हलके विकार ॥

ना ह्यांत तो कमिपणा नच हानि यांत
होण्यांत उन्नत सदा सुख थोर तात
तो देव ना हृदयि मात्र समीप ओठा
पूजीतसों सकळही अभिमान खोटा ॥

जो व्यापितो सकल विश्व, तदर्थ तात
भांडावया उठति, दुर्मति वाटतात
ना देवभक्ति हृदयीं अभिमान-भक्त
भांडोनियां सतत सांडिति बंधुरक्त ॥

बंधूवरी कर कधीं न कुणी उगारी
जो लेंकरें प्रभुचि मानि मनांत सारीं
ना बंधु-रक्त सुखवी जगदीश्वराला
देवा न पूजिति, परी अभिमानतेला ॥

होऊन सर्व मनिं एक, स्वतंत्र होऊं
विश्वास विक्रम अनंत सुतेज दाऊं
स्वातंत्र्यही मिळविणें न मुळीं रणानें
मारूं न, आम्हि मिळवूं अमुच्या मृतीनें ॥

न तात युद्ध-मार्गानें स्वातंत्र्य भारता मिळे
न अत्याचार करुनी सत्य हें मन्मना कळे ॥

ऐक्याचा एकजूटीचा निःशस्त्राचा तसा नव
संदेश द्यावया लोकां हजारों लागती युव ।

विचार–जागृती मोठी यदा देशांत होइल
उठतील भय–त्यागें तेव्हां स्वातंत्र्य येइल ॥
तात म्यां काय सांगावें उठोनी मातृभूस्तव
प्रेमें त्यागें जरी शोभूं वेळ मोक्षार्थ ना लव ॥

(बाप बोलतो)

विचार बाळ हे खोल जनांस रुचतील का
शंका चित्तांत ही माझ्या म्हणून बसतों मुका ॥
धर्माच्या कल्पना रूढ स्वातंत्र्यप्राप्तिच्या तशा
तद्विरुद्ध जनां गोष्टी वद तूं रुचतील का ॥

(हें ऐकून मुलगा एकदम आवेशानें म्हणतो).

ध्येयाचा एक माणूस हलवील उभी धरा
तात! गंभीर चित्तांत विचार करणें जरा ॥
म्हणेल जनता मूर्ख हंसेल अवमानिल
ध्येयाचा नर तो थोर पद मागें न घेईल ॥
नवीन कल्पना लोकां रुचते नच तत्क्षणीं
उपहासास्पद ठरे कल्पनाप्रसु जो जनीं ॥
निश्चयानें परी ठाण मांडितो वीर तो यदा
वंदाया येति तत्पाद टाकुन स्वमनोमदा ॥

धैर्यानें प्रथम नभांत एक तारा
ठाके, नंतर उडुवृंद येत सारा
छातीचा नरच धजे जलीं शिराया
येती मागुन सगळेच येति बाया ॥
निर्मी जो पदसगरा[१] तयास मान
त्याला या जगिं मिळतें महोच्चस्थान
लागे हो पुढति. कुणीतरी घुसाया
लागेच प्रथम कुणी तरी मराया ॥

टीपः १ पदसगर–पायवाट ( खानदेशी शब्द )

कोणीच प्रथम जरी पुढें न येई
सारे प्रेक्षक, जगदुन्नती न होई
ध्येयाचे नरच वरी समाज नेती
घेऊन ध्वज पुढतीं सदैव हो ती ।।
यद्-दृष्टी नच रममाण पार्थिवांत
आकर्षी निशिदिन यन्मना उदात्त
श्रद्धेनें मरति असे कितीक संत
ध्येयातें जगिं करण्यास मूर्तिमंत ।।
ध्येयाला चिकटुन नित्य राहतात
आघातां निजशिरिं सर्व साहतात
ना घेती पदहि कधीं भिऊन मागें
ज्योति प्रज्वलित यदंतरींग जागे
सत्याला धरुनि मनांत सर्वदाही
तेजानें नरवर तो पुढेंच जाई
सांगाती मिळति जरी तरी बरेंच
थांबे ना पुढति निघेच एकलाच ।।
मोहाला करुन दुरी असत्य सांडी
लोभातें करुन दुरी मदा विभांडी
श्रद्धेचा धरुन करीं प्रशांत दीप
ध्येयाचे हळुहळु जातसे समीप ।।
लोकांचा प्रबळ सुटे विरोध-वारा
दीपातें विझवि विनिर्मि अंधकारा
आशेनें ज्वलित करी पुनः पुन्हा तो
पाऊल स्थिरमतिनें पुढेंच घेतो
सत्याचा धरुन मनीं प्रचंड जोर
विघ्नांचा करुन समस्त चूर चूर
निद्रा ना, तळमळ होत फार जीवा
अत्युत्कंठित बघण्या स्वध्येय-देवा ।

चित्ताची तगमग होइ, नाहिं शांति
दृष्टीला दिसत अखंड दिव्य सृष्टी
कष्टा आमरण करीत, कार्यनिष्ठा
ही दिव्या उठविल अंति सुप्त राष्ट्रा ॥

लोकांच्या कळकळ जिंकिते मनाला
विश्वास प्रगटवुनी, करी कृतीला
सौख्याचा अनुपम सोहळा पहाया
लागेल प्रथम जगांत या मराया ॥

निंदेनें न खचत ना चढे स्तुतीनें
अंधारीं बिकट चढे कडे धृतीनें
ज्यावेळीं सकळहि बंधु झोंपलेले
थोरांनीं समयिं तशाहि कष्ट केले ॥

ज्यावेळीं सकळहि बंधु घोरताती
हाकांनीं मुळि न कदापि जाग घेती
खोली ना[१] नयन जरीहि हालवीलें
थोरांनीं समयिं अशाहि कष्ट केले ॥

एकाकी झटति जगास हर्षवाया
एकाकी उठति तमास संहराया
एकाकी निघति विपत्ति दूरवाया
एकाकी मरति समस्त उद्धराया ॥

ध्येयाचे वरि अपुले सदैव डोळे
ठेवून स्थिर, करि काम तो न बोले
सत्याचा मम पथि अंश तो असेल
मातें सद्यश तरि अंति तें मिळेल ॥

ऐशी ती हृदयिं अखंड वृत्ति शुद्ध
ठेवोनी, करित विरुद्धलोकिं युद्ध

---

१ टीपः—उघडीत नाहीं.

सं. ........ नं. ........
ता. ..............
ग्रा.

सत्याचा ध्रुव नयनांसमोर तारा
राखोनी करित अखंड यत्न सारा
एकाकी शिरत पुढें, पडोहि काया
एकाकी धजति पहाड वांकवाया
एकाकी करित कमाल शर्थ यत्न
बांधाया निज पदरांत सत्य–रत्न ।।

लावोनी तनमनवित्त तें पणाला
ध्येयार्थी झिजवित, तात, आपणांला
ओतोनी सकल सुखावरी निखारे
कष्टांना करित सदा मरे अहा रे ।।

जाताती मरुन असे जगांत थोर
हालांना सहन करून घोर घोर
मेलेली मति अजिबात ना जयांची
ते तेव्हां उघडिति दृष्टि एकदांची ।।

सत्याला कसुन पहाति मृत्युपाशीं
सत्त्वाला बघति कसून संकटाशीं
ज्वाळांच्या मधुन घुसून वीर जाई
लाटांशीं प्रबळ करीत हातघाई ।।

घालोनी स्वशिरिं किरीट कंटकांचा
हालाचा मिरवुन कंठि हार साचा
मृत्यूला निरखुनिही करीत चाल
भेटाया मुदित अशास विश्वपाळ ।।

सोसोनी छळ करुनी अहिंस युद्ध
त्यागानें तळपति दिव्य ख्रिस्त बुद्ध
आपत्ती कितिक तया महंमदाला
आल्या त्या तुडवुन विश्ववंद्य झाला ।।

ब्रूनोला हरहर जाळिलें जिवंत
सॉक्रेटीसहि मरणा वरीत शांत
सोसोनी सकलहि हाल ते अपायो
प्रस्थापी स्थिरमति सत्य गॅलिलीओ ॥

एकाकी प्रथम महान् उठे शिवाजी
होते ना प्रथम कुणी तयास राजी
निष्ठेनें जनमन तो करी स्वकीय
त्यागानें मिळवित अंति दिव्य ध्येय ॥

ऐसा या भुवनिं सदा असे प्रकार
ध्येयार्थी बनुन जिवावरी उदार
वाटेला न बघत होइ अग्रगामी
ईर्षेनें विफल करी न आयु नामी ॥

मागोनी मग अनुकारशील लोक
येती हो, धरुन मनांत नीट रोख
यासाठीं प्रथम कुणी तरी उठावें
लागे, हें खडतर तत्त्व आयकावें ॥

(ध्येयार्थी पुरुषाचें वर्णन करून मुलगा म्हणतो कीं आज ह्या भारतांत कवींद्र रवींद्रनाथ व मुनींद्र महात्मा गांधी हे दोन थोर ध्येयवादी पुरुष जगाला मार्ग दाखवीत आहेत).

आजी या सकलहि भारतांत दोन
ध्येयार्थी अचल विशालधी महान
ध्येयाच्यास्तव झटती सदैव तात
अश्रांत श्रम करिती पुढेंच जात ॥

टागोर प्रथित तसेच थोर गांधी
पुण्यात्मे उभय प्रसिद्ध ध्येयवादी
दोघांनीं बघुन जगांतले प्रकार
केला हो निशिदिन अंतरीं विचार ॥

युद्धें हीं बघुन जगांतलीं अघोर
स्वार्थाची निरखुन लालसा अपार
सत्तेची बघुन जगांतली घमेंड
दोघांचें हृदय विदीर्ण तें दुखंड ।।

सत्तेचा करुन विशंक दुष्प्रयोग
लोकीं या सृजुन अनंत दुःखभोग
तोफांनीं करुन जगास या गुलाम
गर्वानें मिरवति हे खल प्र-काम ।।

लोकांना लुटुन करून स्वीय दास
शक्तीनें हरुन मुखामधील घास
दावोनी अहरह पाशवी कृतीतें
गर्वानें स्तविति पुन्हां स्वसंस्कृतीतें ।।

कल्याणा करित असों अम्ही जगाचे
टेंभा हा मिरविति, सर्व दंभ साचे
मारोनी शर, वदतात पुष्पवृष्टि
दुःखानें भरिति नृशंस सर्व सृष्टि ।।

पाहोनी सकल जगामधील दंभ
दुष्टावा बघुन जगांतला अबंध
स्वार्थाचें बघुन हिडीस हें स्वरूप
दोघांच्या हृदयिं विचार ये अमूप ।।

जीवात्म्या करित निबद्ध यंत्रशक्ति
निर्मोनी हृदयिं अदम्य स्वार्थभक्ति
देहाचे सकळ गुलाम होत दास
आळा ना मुळिंहि असेच वासनांस ।।

मी मोठा प्रबळ जगांत श्रेष्ठ मीच
तोरा हा मिरविति उद्धतांत नीच
देहाला सुखविति पुष्ट तो करोनी
जातें हें हृदय सदा परी मरोनी ।।

लाभाची निजतनुलागिं तूपपोळी
अन्यांची करित खुशाल राखहोळी
बांधाया निज रमणीय बंगल्यांस
ठेवावें करुन जगास सर्व दास ॥

होवोनी सकल जगांत जीव देव
दास्यीं ठेवुन इतरांस सर्वदैव
ना लज्जा तिळहि मनांत, थोरवीच
वाटे ही, किति तरि लोक होत नीच ॥

मोटारी उडविति तेविं तीं विमानें
मोठाले अमित अजस्र कारखाने
याला ते वदति समस्त संस्कृती कीं
ठेवावे खितपत मात्र अन्य पंकीं ॥

'मारावे इतर' वदेल संस्कृती न
चित्ताची पशुसम वृत्ति ही निहीन
सर्वांचा जरि रमणीय तो विकास
जागा ती तरिच असेल संस्कृतीस ॥

तुम्हांला जरि रुचते स्वतंत्रता ती
अन्यां कां पकडुन ठेवितां स्वहातीं
पृथ्वीचा जणुं दिधलाच ताम्रपट्ट
राष्ट्रांना अबल करीत नित्य गट्ट ॥

गर्वांध प्रबळ बनून पाश्चिमात्य
औद्धत्या प्रगट करी सदैव नात्य
ना त्याला हृदय जणूं नसेच भाव
चोराचेपरि लुटुनी फिरून साव ॥

"ज्याची जी प्रियकर भूमि तेथ त्यानें
नांदावें, प्रगति करीत ती सुखानें
राष्ट्रें हीं सकळ असोत हो स्वतंत्र
सांभाळूं सकल मिळून विश्वयंत्र ॥

घेऊं या करुन समस्तही विकास
दावूं दे निखिल जन स्वयोग्यतेस
दावूं दे अखिल जनां स्व-सुंदरत्व
सर्वांना प्रकटवुं दे विशिष्ट स्वत्व ॥

उद्यानीं सकल फुलोत या जगाच्या
जावें ना पथि मुळिंही कुणी कुणाच्या
राष्ट्रांनीं करुनि अशी जगीं व्यवस्था
निर्मावें मधुर अपूर्व शांतिगीता ॥

घेवोनी गुणलव जो असे पराचा
सांठा तो करुं हृदयीं अमोल त्याचा
वक्षाचीं पसरति दूर दूर मूळें
ओलावा मिळविति, ना म्हणून वाळे ॥

तैसें या जगति करून मानवांनीं
घेवोनी किरण समीप वा दुरूनी
उत्कर्षा झटुन करीत हो रहावें
वाढोनी, जगति सुखास वाढवावें ॥

सत्पुष्पें विविध फुलोत संस्कृतीचीं
अर्पूं त्या प्रभुस मनोज्ञ माळ त्यांची
ती निर्मी मधुर जसा ध्वनी सतार
सद्गंधा वितरिल हाहि दिव्य हार ॥

भेटूं या, ग्रहण करूं परस्परांचा
आनंदें जरि दिधला सदंश साचा
ना घ्यावा ग्रह विपरीत तो करून
मोतीं तें मिळत बघाल जें बुडून ॥

शेवाळ प्रथम वरी तुम्हां दिसेल
मोतीं ना वरवर खोल तें असेल
पंकातें विसरुन पंकजा विलोकी
नांदावें गुणवरणार्थ सर्वलोकीं ॥

लोकीं या किति तरि दुःख हो स्वभावें
भांडोनी सतत किमर्थ वाढवावें
केला या भुवनिं विनाश मानवांनीं
सामक्षा[१] दिसति पहा स्वलोचनांनीं ।।

झालें जें विसरुन सर्व आज जाऊं
देवाला निशिदिन अंतरंगिं गाऊं
निर्मूं या सकल जगांत बंधुभाव
वाढाया विपुल असो सदैव वाव " ।।

संदेशा वितरित ह्या जगा रवींद्र
वाणीनें मधुर नितांत हा कवींद्र
वाटे हा रवि म्हणजे मुकुंद–वेणु
वंदावा निजशिरिं तत्पदाब्ज–रेणु ।।

विश्वाला विसरविती दुराग्रहातें
सध्यांचीं उपनिषदें यदीय गीतें
आकाशीं विहरत जो सदा पवित्र
मांगल्या पसरित नित्य यच्चरित्र ।।

जो अंतर्बहि रमणीय निष्कलंक
मोठें यद्–हृदय गभीर जें विशंक
जेथें ते अगणित स्वार्थ माजलेले
तेथेंहि धृतिमति हे रवींद्र गेले ।।

गावोनी नव हृदयंगम स्वगीतें
स्थापोनी गुरुतर विश्वभारतीतें
एकत्र स्थिर करि पूर्व–पश्चिमेला
जो होता भ्रम विलयास आज गेला ।।

गांधीही असुन असेच ध्येयवादी
स्वातंत्र्य स्वजनहितार्थ घेति आधीं

टीपः १ खुणा.

होईल स्वजन यदा खरा स्वतंत्र
देतां येइल जगतास शांतिमंत्र ॥
गांधी हे परम पवित्र दीन–बंधु
दारिद्र्यीं समरस होति प्रेमसिंधु
उद्धारा कथिति नवीनसा उपाय
त्यागानें तळपति तेज तें न माय ॥

फुलासमान कोमळ मुलासमान निर्मळ
विशाल अंबरासम गभीर अंबुधीसम ॥
वसुंधरेसम क्षमी गिरीपरी सुनिश्चळ
पवित्र गांगतोयसा विशुद्ध सत्य यद्बळ ॥
अपाप कोंकरापरी सतेज केसरी जसा
अथांग प्रेमसागर तमास दूर सूर्यसा ॥
अनाथ–दीन–वत्सल उदार अब्द–सदृश
सहानुभूतिनिर्झर सुधेसमान यद्यश ॥
विरक्त जो शुकापरी सहा रिपूंस जिंकिता
प्रबुद्ध वाक्पतीसम धुरीण सर्व जाणता ॥

(गाणें)

धरुं चरणासी। वंदुं या महापुरुषासी ॥
फांसावरि जरि कुणि चढवील
देइल त्याला प्रेम निर्मळ
अशुभ मनीं ना कधींहि चिंतिल
मंगल–राशी ॥ वंदुं० ॥
दारिद्र्याशीं समरस होत
कटिला पंचा एक लावित
अनाथ–रोगग्रस्तां धरित
निजहृदयासी ॥ वंदुं० ॥
अगणित अनुभव नानापरिचे
मेळवुनी ते बहुमोलाचे

प्रश्न सोडवीत जीवनाचे
थोर महर्षी ॥ वंदुं० ॥

लाखों लोकांचीं चपल मनें
घेतो वेधुन निज वचनानें
सर्वांनाही शांत ठेवणें
यत्कृति ऐशी ॥ वंदुं० ॥

घोर समयिंही पुढें जो सदा
पुढें टाकिलें फिरवी न पदा
लागूं देई ना मदबाधा
निजचित्तासी ॥ वंदुं० ॥

स्वकीय दोषां उघडे करितो
दुसऱ्याचे गुण सदैव बघतो
चूक पदरिं घेउनी दावितो
थोर मनासी ॥ वंदुं० ॥

अविरत करणें सत्यशोधन
अविरत करणें सत्य-चिंतन
अविरत करणें सत्याचरण
ध्यास हा ज्यासी ॥ वंदुं० ॥

जगा अहिंसा व्यापक शिकवी
मनानेंहि जो कुणा न दुखवी
आपण करुनी इतरां करवी
कृति-शूरासी ॥ वंदुं० ॥

निःशस्त्राचें शस्त्र निर्मुनी
पद-दलितांचे करीं देउनी
प्रयोग पाही सदैव करुनी
कर्मयोग्यासी ॥ वंदुं० ॥

क्षमा सहनशीलता अभयता
सत्यभक्ति तशि सत्याग्रहता
यांच्या जोरावरी मिळविता
स्वातंत्र्यासी ।। वंदुं० ।।

जगांतून या तरवारीला
जगांतून पाशवी बलाला
दूर कराया उभ्या राहिल्या
धृति–मूर्तीसी ।। वंदुं० ।।

जगांतून या दारिद्र्याला
जगांतून या गुलामगिरिला
दूर कराया घेता झाला
संन्यासासी ।। वंदुं० ।।

गरिबांना जो बंधू वाटे
पतितांना जो पावन वाटे
दुःखितास जो त्राता वाटे
अहा ऐशासी ।। वंदुं० ।।

बुडत्याला जो तारक वाटे
बद्धांना जो मोचक वाटे
स्फूर्तिप्रद जडजीवा वाटे
चला हो त्यासी ।। वंदुं० ।।

हास्य जयाचें अतीव सुंदर
संकटांतही शांत मनोहर
प्रेम पिकविणें या पृथ्वीवर
ठावें ज्यासी ।। वंदुं० ।।

लोकां कैशी मिळेल भाकर
स्वातंत्र्य कसें मिळेल लौकर
हृदयीं कसा येइल परमेश्वर
चिंता ज्यासी ।।वंदुं०।।

विश्वधर्म सत्याचा पाळी
विश्वधर्म प्रेमाचा पाळी
सत्यप्रेमास्तव ती जगली
मूर्ती ज्याची ॥ वंदुं० ॥

स्वतंत्रता अर्पणें भारता
परिहरणें ही जगत्क्रूरता
दाखवुनी प्रेमाच्या पंथा
ध्येय हें ज्यासी ॥ वंदुं० ॥

केवळ सुखलालसा नसावी
सत्यसुंदरा कृती असावी
प्रेमानें ही सृष्टि भरावी
इच्छा ज्यासी ॥ वंदुं० ॥

असे हे गांधि पुण्यात्मे करीत चिंतना सदा
भारतामधली माझ्या कशी ही हरुं आपदा ॥

सदैव ही मना चिंता लागली शांति ना असे
अंतर्ज्वलित ज्वालाद्रि तेवि तन्मूर्ति ती दिसे ॥

हंसे वरी जरी गोड आंत ती आग पेटली
कशी मी हंसवूं माझी थोर भारत माउली ॥

पस्तीस कोट हे बंधु दरिद्रदेव हे सखे
गलाम, सुखशांतीला ज्ञानाला सर्व पारखे ॥

संस्कृती मारिली जाते व्यसनेंही बळावती
कशी मी थांबवूं माझ्या राष्ट्राची ही अधोगती ॥

उपाशी असती लोक शोकपीडित आतसे
अंधार भरला सारा यांना मी सुखवूं कसे ॥

तळमळे तडफडे जीव महात्मा गांधिचा सदा
स्वातंत्र्य–सुख–संल्लाभ बंधुंना होइ तो कदा ॥

लढला आफ्रिकेमाजी चंपारण्यामध्यें लढे
खेडाजिल्ह्यांतही भांडे भांडे बार्डोलिच्या मध्यें ॥

हजारों करिती कष्ट नाम गेलें दिगंतर
वंद्य स्तव्य महान् गांधी वेधी सर्व जनांतर ॥

लोकांच्या सुखदुःखाशीं एक होईल जो नर
जिवाचें करुनी रान तन्मनें तोचि जिंकिल ॥

महात्मा गांधि हे थोर दुःखार्त–जन–तारक
मरतात जनांसाठीं म्हणुनी होति नायक ॥

त्याग प्रेम तथा सेवा विशाल मतिही तया
उलगडी जाहले गुंते म्हणून मिळवी जया ॥

ध्येयवादी असोनीही व्यवहार न सोडितो
समोरे संकटें देखे ध्येय ना परि टाकितो ॥

निर्भय–स्वांत शांतात्मा व्यवहार–विदग्रणी
स्फूर्ति–दाता भीतिहर्ता तो धुरीण बने जनीं ॥

ठेवून दिव्यदृष्टीही व्यवहारपटुत्वही
जनांस उठवी कार्या संन्यासी दिपवी मही ॥

विशाल दृष्टि ती आहे अपार त्याग तो असे
धडाडी शांतिही आहे उणें कांहींहि तें नसे ॥

उदार नीतिधर्मानें सत्यानें जगिं निर्भय
सार घेती, करोनीयां सर्व–धर्मसमन्वय

अजात–शत्रुसे झाले मुक्तात्मे रिपु ना जया
परि हें दास्य दारिद्र्य पाववीन, वदे, लया ॥

रूढींचा दंभपापांचा अन्याय्य–राजनीतिचा
कराया नाश हा ठाके हराया भार भूमिचा ॥

भारतांतील हे हाल बघून उठती अतां
प्रतिज्ञा करिती घोर मिळवीन स्वतंत्रता ॥

माझें निःशस्त्र हें युद्ध असे अंतिम जीवनीं
आणील मजला मृत्यु न वा स्वातंत्र्य मज्जनीं ।

जिथें चिंतन तें केलें सोडिती स्वीय आश्रम
भारता करण्या मुक्त निघती करण्या श्रम ॥

अनवाणी दंडधारी सानुली मूर्ति ती उभी
राहिली निकरें धैर्ये दिपली धरणी उभी ॥

सोडी सात्त्विक शक्तीचे फवारे भारतामधीं
सत्स्फूर्ति संचरे दिव्य उठती मृत तीं मढीं ॥

चालला विश्ववंद्यात्मा निघाला हललें जग
तेजाचे स्रोत ते सोडी उठले बंधुही मग ॥

धर्मयुद्धार्थ ती मूर्ति निघे बाहेर उज्वल
असें युद्ध कधीं झालें ? निःशस्त्राचें जिथें बळ ॥

धर्मयुद्ध नसे झालें असें कोठें महीवर
अपूर्व घडवी गोष्ट भारतीं परमेश्वर ॥

तात, ते चालले गांधी पायांनीं जरि ऊन तें
सत्त्वाची दिव्य शक्तीची प्रभा विश्वांत फांकते ॥

लाखों येऊन ते लोक घेती दर्शन मूर्तिचें
अंतरीं स्फूर्तिचे लोट उठती देशभक्तिचे ॥

"मदीय रणविद्येंत सेनानी पहिला मरे
या तुम्हां दावितों" बोले " मरावें केंवि तें खरें " ॥

असें बोलून तो दिव्य धीर गंभीर उत्कट
निघतो मरण्यासाठीं तेजःसंदीप्त उद्भट ॥

माते, रात्रंदिन तळमळे थोर गांधी महात्मा
भूमातेची बघुन विपदा तो जळे अंतरात्मा
वार्धक्यींही अनुपम तपें पेटवी राष्ट्र सर्व
कष्टें मोठ्या भरतभुवनीं आणिती मोक्षपर्व ॥

मोठ्या कष्टें जशि भगिरथें आणिली मर्त्यलोका
स्वर्गंगा, तत्कृतिसम महात्मा करी हें विलोका
आणायातें किति तरि महायास स्वातंत्र्यगंगा
तत्त्यागाला मिति न तुलना निश्चया ना अभंगा ॥

आई पूर्वी सुखरत असे जे विलासी अमीर
देशासाठीं त्यजुन सगळें आज होती फकीर
लोळावें गे पसरुनी मऊ गादिगिर्दी पलंगीं
देशासाठीं उठुन बनती आइ ते झाडु भंगी ॥

जातें कारागृहि सकळ तें नेहरूंचें कुटुंब
देशप्रीती हृदयिं भरली शुद्ध त्यांच्या तुडुंब
होते लाखोपति परि भिकारी जवाहीरलाल
देशासाठीं श्रमति किति ते, ते जसे लाल बाल ॥

टाकावे गे मजसम तुवां कोटि ओंवाळुनीयां
आई! ज्यांचेवरुन, मरती देति ते स्वीय काया
मायामोहां तुडवुन अम्हां देशकार्यार्थ जाणें
प्राणां देणें गुणगुणत गे अंतरीं दिव्य गाणें ॥

जो जो आहे तरुण म्हणुनी त्यास ना राहवेल
सौख्यें त्याला विषसम, पलंगीं तया आगलोळ
दीपीं घाली उडिस निकरें त्या पतंगासमान
जावूं धावूं भडकलि चिता देउं देशार्थ प्राण ॥

तारुण्याचे समयिं असते वृत्ति निःस्वार्थ माते
तेजस्वी जें झणि रुचत तें मोहितें अंतरातें
भीती चित्ता तिळ न शिवते भावनाही उदार
माते, ऐशा तरुण युवकांचेवरी देशभार ॥

देशोदेशीं तरुण करिती क्रांति ताता सदैव
त्यांचे हातीं जननि असतें सर्वदा देश-दैव
तुर्कस्थानीं तशिच रशियामाजि तैशी चिनांत
केली क्रांती तरुण युवकीं तत्त्व आणा मनांत ॥

होतो अग्रेसर तरुण जो, वृद्ध तो पाय ओढी
उन्मत्तातें तरुण नमवी, वृद्ध त्या हात जोडी
उत्साहातें तरुण वरितो, वृद्ध नैराश्यवादी
स्वातंत्र्यातें तरुण वितरी, वृद्ध तो नित्य बांधी

भूमातेला सतत विपदीं अस्मदाधार एक
आम्ही तीतें सजवुं करुनी आमुचा रक्त-सेक
देशामाजी तरुण जन ज्या कल्पना बाळगीती
तैसी देशस्थिति बनतसे सांगती वंद्य मूर्ती ॥

"माझ्यासाठीं मरतिल मुदें पुत्र माझे" जपान
बोले, तेवीं वदति सगळे अन्यही देश जाण
ऐशी प्रौढी परि न वदतां येइ या भारताला
आई आम्हां तरुणतरुणां लागला डाग काळा ॥

भूमातेच्या बघुनि विपदा चैन ना गे पडावें
तट्टास्याला झणिं चुरडण्या आइ आम्ही मरावें
आनंदानें निज तनु सुखें मातसेवेस द्यावी
काळोखी जी निजशुभयशा लागली ती पुसावी ॥
तान्हाजीची कृति कशि ? अम्हां काय बोलेल बाजी ?
आई, सारे वरुन वदती "प्राण द्या मातृ-काजीं"
आलिंगावे निज सुत तयां राखणें गे घरांत
आईबाबा परम अघ तें घ्या विचारा मनांत ॥

आई वातावरण भरलें दिव्य-विद्युत्प्रवाहें
राहे गेहीं कवण युव तो आज गे सौख्यमोहें
नाहीं तो गे तरुण, दिसतो वृद्ध नामर्द षंढ
राहे स्वस्थ स्वगृहि जरि हें पेटतां यज्ञकुंड ॥

यावी स्फूर्ति प्रबळ-तर ती रक्त तें सळसळावें
भूमातेच्यास्तव मृति वरायास आम्हीं उठावें
राहो ना ती अशनशयनाची स्मृती अंतरंगा
वेडावोनी अम्हि जननिच्या धांवणें बंध-भंगा ॥

नांदे गेहीं जननि सुत जो आजला खातपीत
आलापीत स्वनित कवनें तो पशू गे खचीत
नीच प्राणी परम तदधःपात गे जन्म सात
मातेच्या उद्धृतिसमयिं जो लक्ष तेंही न देत ॥

आई माझ्याहुन कितिक ते कोंवळे सान बाळ ॥
हालांमध्यें हंसत असती नाहिं कां गे कमाल ?
“देशासाठीं तनु झिजवुं ही” बाळ ते बोलताती !
मोठ्यांच्याही वच परिसुनी अश्रु नेत्रांत येती

स्वातंत्र्याची घुमघुमतसे भारतीं आज भेरी ॥
व्हावें जागें अणि तरि अतां, झोंपलों आजवेरी
माते, मातें अडविशि कशी पाडिशी केविं मोह ?
देशद्रोहा करुं म्हणशि का ? मी असें घट्ट लोह ॥

मायापाशां झटदिशि झुगारून देतात बंधू
होती सिद्ध प्रमुदित मनें तो जरि क्लेश-सिंधू
गेहीं राहूं ? मरण बरवें त्याहुनी तें विशंक
लावूं कैसा प्रियभरतभूमाथिला मी कलंक ॥

प्राणत्यागें निजयश टिको, नीति ही पूर्वजांची
रोमीं रोमीं भरलि अमुच्या गोष्ट ही सत्य साची
देऊं प्राणां फिकिर न करूं सोडुं ना स्वाभिमान
सत्त्वासाटीं करित असती थोर ते देहदान ॥

न करा अल्पही शोक आई बाबा मदर्थ तो
दुःखाची ही नसे गोष्ट पारतंत्र्यास मी धुतों ॥

उपाशी बंधु जे कोटी त्यांना अन्न मिळावाया
करिती यत्न जे थोर त्यांत गेलों मरोनियां ॥

धन्य या निधना माना वदवें मज फार ना
आई बाबा सुखा माना नीर आणा न लोचना ॥

(इतक्यांत एकदम एक गाणें ऐकूं येतें. तेव्हां मुलगा विचारतो).

तात, कोठून हें येतें गीत ऐकावया बरें
कोण गातो दिव्य गाणें मोहितो मन्मना खरें॥

(बाप सांगतो)

बाळ, शेजारच्या गेहीं कवि एक रहातसे
देशाचा ध्यास त्या नित्य पहांटे रोज गातसे ॥
स्वातंत्र्याचीं दिव्य गाणीं खिडकींत बसूनियां
गातसे होत तल्लीन वृत्ति ती पावुनी लया ॥

(मुलगा म्हणतो).

तात तें ऐकुं या गीत अपूर्व मज वाटतें
अधीर मम हे कान ऐकाया गान दिव्य तें ॥

(स्वातंत्र्य-शाहिराचें स्फूर्ति-गीत)

समुद्रलाटा आदळताती कविचित्ता ज्या सदा मोहिती
निळें मनोहर सागरपाणी अनंत रत्नांची ती खाणी
अस्तोदय ते रविचे सुंदर दिनरजनी वा प्रशांत अंबर
अनंत तारे सुरम्य इंदु तरुवेलिलता ते दंवबिंदु
फुलें सुगंधी मुलें मनोहर विहंगगण पांखरें खेळकर
मयूर कोकिळ चकोर चातक हरिणपाडसें तैसे हंस
चक्रवाक वा भेसुर घूक गजेंद्र वा ते सिंहशावक
चंचळ चपळा अंबद काळे चपळ वायुचे वेडे चाळे
सरित्सरोवर कमळें सुंदर मिलिंद मंजुल-गुंजारवकर
वनें उपवनें आम्रबकूल अशोक चंपक कदली मृदुल
पुष्करिणी कारंजीं निर्झर चंदनचर्चन माळा सुंदर
हिरवें हिरवें गवत चिमकुलें दऱ्या खोल ज्या भिववित डोळे
पहाड मोठे प्रचंड पर्वत नभास शिर जे देउन उचलित
प्रेमें विव्हल रमणी रमण लताकुंज तें प्रेमाराधन
चुंबन आलिंगन-प्रकार विषयि जनांचे हे शृंगार

काव्य सृष्टिच्या ह्या संसारीं मला न गोडी भरे शिसारी
ह्या वस्तूंचा मी ना भक्त यांवर मन्मन ना आसक्त
असें भिकारी खरा फकीर ह्या वस्तूंची मज न फिकीर
हृदय कवीचें परि मम आहे प्रबळ भावनाधारा वाहे
प्रतिभा स्फुरते मदंतरंगीं काव्य नाचतें मनस्तरंगीं
चिता भडकली मदीय चित्तीं गीत थरथरे ओठावरतीं
गीत कशाचें ? मद्देशाचें स्वातंत्र्याचें समानतेचें
स्वतंत्रतेचीं गाइन गाणीं जनांत अथवा निर्जन रानीं

स्वतंत्रतेचे विचार–वारे वातावरणीं भरीन सारे
स्वातंत्र्याचे रणसंग्राम हृदयोद्दीपक जगदभिराम
स्वातंत्र्याचे झगडे भीषण जेथें चाले मारण मरण
त्यांचीं गाणीं विशंक गाइन मन तुमचें मी टाकिन भारुन
भूमातेचीं गाणीं गाइन तद्भक्तांचीं गाणीं गाइन
प्राण अर्पिले ज्या वीरांनीं त्यांना गुंफिन माझ्या कवनीं
स्वतंत्रतेचा मी शाहीर करीत आहें जगजाहीर
नसानसांतुन ओतिन जोम स्वार्थाचा मग कराल होम
सिंहाचे परि तुम्ही उठाल धीर गर्जना तुम्ही कराल
देशभक्तिचा प्रवाहपूर खळखळाट वाहवीन धीर
देशभक्तिचा सागर खोल हृदयीं निर्मिल माझा बोल

कठोर हृदयें मृदु नवनीतें करितिल माझीं नवीन गीतें
मृदु नवनीता वज्र करीन दिव्य असें मी निर्मिन कवन
पाषाणाला फोडिल पाझर ऐसें निर्मिन काव्य मनोहर
शुष्क तरुला पल्लव फुटतिल ऐसे निर्मिन वाक्कल्लोल
वेदजडांची वृत्ति हलेल ऐसें निर्मिन काव्य रसाळ
षंढहि होतिल रणझुंजार ऐसा ओतिन कवनीं जोर
त्यागा उन्मुख मरणा सन्मुख मानितील त्यामध्यें खरें सुख
अशी जनांची वृत्ति करीन स्वातंत्र्याचीं गीतें निर्मुन
होय, कशाला विचारतां रे स्वातंत्र्याचा असें कवी रे
हंसा, हंसा, परि रडाल अंतीं मद्ध्येयाची मला संगती

स्वातंत्र्याचे सरोवरांत मरालिनी मत्कविता रमत
स्वातंत्र्याचे सुमंदिरांत विचार माझे सदैव गुंगत
स्वातंत्र्याचे स्वर्गामाजी सदैव चमके प्रतिभा माझी
स्वातंत्र्याचें नभोवितान तेथें घेतों मी उड्डाण
स्वातंत्र्याचें विशाल गगन तेथें घेतों विशंक तान
स्वतंत्रतेच्या, मायभूमिच्या प्रियकर माझ्या भारतभूच्या
पवित्र माझ्या भारतभूच्या उज्वल माझ्या भारतभूच्या
मंगलतम मम भारतभूच्या स्वातंत्र्योन्मुख भारतभूच्या
कवी असें मी धीर नवीन सदैव पूजिन भारत–चरण
भारतभूची मंगल धूळी धरीन संतत माझ्या भाळीं
भारतमाते तव शुभ गान मजला वाटे अमृतपान
तुलाच गाइन तुलाच ध्याइन तुलाच वंदिन मी गहिंवरुन
हीच प्रतिज्ञा माझी माते पुरवी प्रेमाकरे अमृते
स्वांवंदेऽहम् सदैव गेऽहम्

(गाणें संपतांच माता म्हणते).

सुंदर कितितरि हें गाणें वेडावुन जावें प्राणें
पहा तरू हे गहिंवरले टपटप गळली अश्रुजलें
पहा तुटे तो नभि तारा ऐकुन गीता मनोहरा
गुप्त खालतीं येवोनी गीताचा ऐकत ध्वनी
बाळ, कसें रे हें गाणें वेडा जणुं हा कवी मनें
वेडा इतरांनाहि करी हृदयिं भावनापूर भरी

(मुलगा म्हणतो)

चित्रकार कवि हे सारे माते होतिल एकसरें
भूमातेचे हे भक्त भाग्य तिचें ते वाढवित
भारतभूच्या भाग्याची तहान सर्वांना साची
देशामाजी स्वतंत्रता आणायाला उत्कटता
कवीचित्रकारांनाही दास्य तयांचें मन दाही

देशासाठीं तव गेला सुत, न नवल हें, हा झाला
धर्म आइ गे सकळांचा ध्यास समस्तां देशाचा

(इतक्यांत एकदम दुसरें गाणें ऐकूं येतें)

कोठुन दुसरा ध्वनि येतो हळुहळु मोठा हा होतो

(आई म्हणते)

प्रभातफेरी करावया मुलें चाललीं रे सखया
रुचे तयांना ना शय्या निघती जागृति ती द्याया

(मुलगा म्हणतो)

ऐकूं आई तरि त्यांचें गीत रोमहर्षण साचें

(प्रभातफेरीचें गाणें)

उठा बंधुनों! पहा उगवला भास्कर वेळेवरी
तमोहर भास्कर वेळेवरी
प्रकाश पसरी जिकडे तिकडे
धरणीवरि अंबरीं ॥
झोंपेची का वेळ असे ही उघडा रे लोचन
आपुले उघडा रे लोचन
झोंपुन बसलों म्हणून आले आले हे दुर्दिन
झांपड उडवा डोळे उघडा पहा काय चाललें
सभोंवतिं पहा काय चाललें
स्वातंत्र्याच्या दिव्य विचारें राष्ट्र सर्व रंगलें
गुलामगिरिचा अजुन न आला वीट तुम्हांला कसा
बंधुनो, वीट तुम्हांला कसा
स्वातंत्र्यास्तव कष्ट कराया कम्मर आतां कसा
ऐशीही सोन्यासारी । संधी न पुन्हां येईल
जरि उठाल झडकरि सारे । भाग्योदय तरि होईल
प्रगटवा आपुलें तेज । स्वातंत्र्य माय मिळवील
उठा, करावी अचाट करणी, झोंप नसे ही बरी

बंधुनो झोंप नसे ही बरी
उठा उठा रे मायभूमि ही मुक्त करा सत्वरी ।। उठा० ।।
हिंदुमुसल्मान् एक होउनी स्वातंत्र्यास्तव उठा
उठा रे एक दिलानें उठा
स्वातंत्र्याचा निजसत्तेचा फडकूं दे बावटा
ब्राह्मण अब्राह्मण बंधूंनो पुरे करा भांडणें
क्षुद्र तीं पुरें करा भांडणें
श्रेष्ठकनिष्ठ न कोणी उठुनी देशास्तव झुंजणें
मायभूमिच्यासाठीं जो ना धांवे अस्पृश्य तो
समजणें मनांत अस्पृश्य तो
बंधुबंधुसे उठा उठा रे भारत बोलावितो
मायभूमिसाठीं आतां होउनियां भाई भाई
भांडणा तुम्ही विसरावें ही स्वातंत्र्याची घाई
ही स्वतंत्र भूमी करणें आपुली भरतभूमाई
गुलाम म्हणुनी जगणें न अतां आपण धरणीवरी
अत:पर आपण धरणीवरी
स्वतंत्र भारत करावयातें उठा उठा सत्वरी ।। उठा बंधुनो० ।।

(मुलगा म्हणतो)

आई पाहि हें दृश्य सर्व या भारतावरी
सर्वत्र जागृती झाली तम ना जनतांतरीं ।।
मुलें बाळें पहा एक विचारें भारलीं जशीं
हंसेल दिव्य तेजानें भारताननसच्छशी ।।
भारताचें दिव्य भाग्य मदीय नयनां दिसे
आनंद शांति ती नांदे वाव ना कलहा असे ।।

(गाणें)

प्रियकर भारत, गुणमणि भारत, स्वातंत्र्या पावो
सकल विकलता

विलया जाउन
निजतेजा लाहो ॥ प्रियकर० ॥

संहारुन संसार–विषमता
निर्मुन धरणीवरतीं समता
शांतिपथा दावो ॥ प्रियकर० ॥

मोहमलिनता दुरभिमानता
असुर–समरता सत्ता–रसता
जगतांतुन जावो ॥ प्रियकर० ॥

मनुज–दिव्यता विश्वबंधुता
उदया येवो मरुनी पशुता
वरति जगा नेवो ॥ प्रियकर० ॥

धर्म सकल होवोत उदार
हंसासम जन निवडो सार
स्नेह विपुल होवो ॥ प्रियकर० ॥

करुनि निजांतर–तिमिर–निरास
करुन घेउं दे जगा विकास
प्रतिबंध न राहो ॥ प्रियकर० ॥

उत्साहाचा आनंदाचा
सहृदयतेचा जगदैक्याचा
पवन मधुर वाहो ॥ प्रियकर० ॥

ज्ञानहि वाढो आदर वाढो
श्रद्धा वाढो सद्‌गुण वाढो
परमात्मा येवो ॥ प्रियकर० ॥

उत्तरोत्तर प्रकाश लाभुनी
पूर्णतेकडे डोळे लावुनी
प्रभुस मनुज पाहो ॥ प्रियकर ० ॥

(मुलगा हें दिव्य दर्शन पित्यास घडवितो व विचारतो "बाबा, तुम्ही भारतमातेसाठीं नाहीं का मरणार, नाहीं का झिजणार?" तेव्हां बाप म्हणतो,)

बाळ मी सर्व देईन — सेवा हातून ह्या घडो
जनांची करितां सेवा — मदीय देह हा पडो ॥
आम्ही दोघें जीवनातें — उदासतर रे करूं
बाळा हे गुण–लावण्य — संसार लीलया तरूं ॥
पुत्र तूं आमुचा धन्य — अंजना घालुनी अम्हां
दिधली दिव्य तूं दृष्टी — हरुनी मोहता तमा ॥
प्रकाश तो पहा येतो — पसरेल महीवरी
त्यापरी सत्प्रभा येते — आमुच्या सुप्त अंतरीं ॥

(मुलगा म्हणतो "खरेंच बाबा, प्रभातप्रभा फांकत आहे व भाग्याची प्रभाही भारतावर फांकेल; भारतमाता स्वातंत्र्यानें तळपेल")

प्रकाश आला पहा तरी । स्वतंत्रता भारतावरी
अमरत्वाची प्रभाचशी । उषा चमकते आकाशीं
सकल लोपला अंधार । सृष्टी दिसले मनोहर
पवन वाहतो
सुमगण फुलतो
परिमल भरतो
हृदयाल्हादक दिगंतरीं ॥ प्रकाश० ॥

चराचरा ह्या विश्वाला । चैतन्याची चढे कळा
निद्रातंद्रा दुरावली । जागृति सकलांतरिं आली
तरु डोलती
विहंग उडती
कलरव करिती
सुरम्य मंजुळ शुभ स्वरीं ॥ प्रकाश० ॥

हरित–श्यामल–तृणावरी । नाचत किरणें सोनेरी
मोत्यांसम हें दंव दिसतें । प्रकाश हृदयीं सांठवितें
मऊ गालिचे

लावण्याचे
हे मोत्यांचे
सृष्टिदेवता ही पसरी ॥ प्रकाश० ॥

पहा पहा तो उभा रवी । विश्वाचा तो मुका कवि
काव्य ओतितो विश्वांत । श्रद्धा वाची हृदयांत
तेजोराशी
चराचराशी
देतो आशी
आशा देतो खरीखुरी ॥ प्रकाश० ॥

जगीं लोपुनी अंधार । प्रकाश येतो बाहेर
उत्साहाचें माहेर । बना सांगतो प्रभाकर
दुःख न राही
अभ्र न राही
प्रकाश येई
पडला उठतो पुन्हां परी ॥ प्रकाश० ॥

प्रकाश येतो जन उठती । बंध भराभर ते तुटती
मायामोहांतुन सुटती । आशेला पल्लव फुटती
वैभव येतें
भाग्य हांसतें
तेज फांकतें
विकास येइल घरोघरीं ॥ प्रकाश० ॥

दिव्य कोंदला आनंद । शुभ मंगल परमानंद
नाचति गाणीं गाऊन । हातीं हाता घेऊन
विद्या येते
कला शोभते
मूर्ती दिसते
प्रभुची मज भारतांतरीं ॥ प्रकाश० ॥

(मुलगा म्हणतो "बाबा, माझी वृत्ति सद्‌गदित झाली आहे. भारतमातेचें ग्रहण सुटलेलें दिसत आहे– पहा पहा")

(गाणें)

ग्रहण सुटलें ग्रहण सुटलें ॥
माझ्या मातेचे पाश सारे तुटले ॥ ग्रहण० ॥
पारतंत्र्याचें नांव आतां कुटलें ॥ ग्रहण० ॥
आतां बुद्धीवर नुरतिल पटलें ॥ ग्रहण० ॥
द्वेषकलहादि दिसतिल मिटले ॥ ग्रहण० ॥
भारतमातेचे पांग आज फिटले ॥ ग्रहण० ॥
प्रतिभेला हो पाझर फुटले ॥ ग्रहण० ॥
आमच्या प्रेमाला पल्लव फुटले ॥ग्रहण० ॥
दैन्य नैराश्य सकळहि हटलें ॥ ग्रहण० ॥
जयजयकाराचे ध्वनि शत उठले ॥ ग्रहण० ॥
किति आनंद सुख किति पिकलें ॥ ग्रहण० ॥
भारतमातेचें मुख तेजें नटलें ॥ ग्रहण० ॥

(मुलगा आईला म्हणतो "आई ,तुलासुद्धां माझ्या मरणाचें आतां वाईट वाटणार नाहीं; भारतमातेचीं हजारों मुलें स्वतःचीं समज. मला प्रेम दिलेंस तें त्यांना दे. आई, मी निष्ठुर नाहीं.")

आई ना मनिं आण बाळ तव हा निष्प्रेम पाषाणसा
आहे प्रेम कृतज्ञता किति मनीं शब्दांत वर्णू कसा
तूं स्नेहार्द्र मदर्थ ते पिकविले प्रेमामृताचे मळे
आई मी विसरेन का ? पुरविले माझे सदा तूं लळे ॥

आई तूं जपलीस संतत मला प्राणांपरी आपुल्या
आई तूं श्रमलीस गे निशिदिनीं ह्या वाढवाया मुला
आई ना ऋण तें फिटे कधिं तव प्रेमास सीमा नसे
माझें अंतर त्वद्विचार करतां वोसंडुनी येतसे ॥

गंभीरांबुधिहून खोल गगनाहूनी असे विस्तृत
माते प्रेम तुझें न गे वदवतें वाणी तिथें कुंठित
पृथ्वीचे अणुरेणु तारक तसे ते मोजतां येतिल
त्वत्प्रेमामृत–मापनीं मति परी वेडावुनी जाईल ॥

आई जीव मदीय संतत तुझ्या प्रेमामृतें पोसला
भूमातेस तिला सुखीं बसविण्या मी तो सुखानें दिला
खेदातें न करी, हंसे जननिये, प्रेमें बघे मन्मुख
आतां शेवटचें, पहा पसरते तेथें प्रभा सन्मुख ॥

आई भूमिवरी जनांस सुखवी मानी तुझीं हीं मुलें
प्रेमस्नेह तयांस दे मज दिलें जें, हांसवी हीं फुलें
कर्तव्या परमादरें करुनियां, येशील भेटावया
तेथें बाळ बसेल हा तुजकडे दृष्टीस लावूनियां ॥ "

वदुन वचन ऐसें जाहला सद्‌गदीत
नयनिं घळघळां ते तेधवां अश्रु येत
परि फिरुन पुसोनी लोचना बाळ बोले
परत जरि मधूनी नेत्र होतात ओले ॥

(मुलगा स्वतःच्या विधवा नववधूबद्दल सांगतो).

अजुनी जननी मला असे
वदणें एक परी वदूं कसें
अविनीत मला न तूं गणी
मम शब्दा परिसोनियां मनीं ॥

कठिणा करुणा किति स्थिती
मम पत्नी अजुनी लहान ती
विधवा वदतील लोक, हें
मनिं येऊन मदीय धी दहे ॥

अवहेलन ना तिचें करा
मुळि आबाळ तिची न ती करा
न तिला श्रमवा, करा सुखी

फुलवावी कलिका हसन्मुखी
न ढका हृदयास लाविजे
जननी काळजि नीट घेइजे
लतिका हळुवार वाढवा
गुण-शीलें रमणीय शोभवा ॥

शिकवून करा सुधी तिला
तुम्हि देणें सु-विचार-शक्तिला
मनुजास जरी सु-शिक्षण
तरि होईल जगांत रक्षण ॥

कसलीहि असो परिस्थिती
सुविचार[१]-प्रभु नित्य रक्षिती
जरि बुद्धि विनीत होइल
न पडे वक्र कधींहि पाउल ॥

जरि पालक इच्छिती तिचे
तरि माहेर असो तिला तिचें
जरि ती असली कुठें तरी
तिजला होउ न दुःख अंतरीं ॥

"मम भर्वांनि हिचे हे पांढरे पाय आले
म्हणुनि मम सुताचे प्राण हा हाय गेले,"
जननि नच वदावें त्वां असें लोक-रीती
कठिण कटु नृशंसा ही असे लोक-नीती ।

"अशुभ अवदसा ही कैशि आली घरांत
मिळवित सुखि माती ही करी मत्सुतान्त
परम अवकळा ही आजि आली घराला
हरहर हर सारा हा हिनें घात केला;" ।
वचन वदुनि ऐसें, मानसातें तदीय
तुम्हि कधि दुखवा ना, काय तद्दोष होय ?

---

टीपः १ चांगले विचार हेच देव.

कळतवळत नाहीं सान बाळा बिचारी
जननि! हृदय तीचें ना कधीं तूं विदारी ॥
मृदु मधुर तऱ्हेनें वागवावें मुलीला
सहज कधिं मदीय ध्येयही सांग तीला
हंसत शिकत मोठी नीट होईल जेव्हां
भवजलधिमधूनी पार जाईल तेव्हां ॥
परत जरि करावा वाटला तो विवाह
तरि परम सुखानें तो करो सौख्यवाह
गमत अ-परिणीता बालिका आइ मातें
करुनि निजविवाहा सेवुंदे सत्सुखातें ॥
जरि करिल विवाहा पाप ना तें गणावें
उलट विमल धर्मा अंगिकारी म्हणावें
तुम्हि तिजसि सुखानें संमति स्वीय द्यावी
मति करपुन आई ती तदीया न जावी ॥
करणें क्षम तुम्हि तन्मति
निज कर्तव्य करावयाप्रती
मग बोल तुम्हांस तो नसे
जननी मी वदुं काय फारसें ;

(माता सद्गदून बोलते)

करि न लवहि चिंता बाळ मी वाढवीन
तव करुण वधूला सर्वदा मी जपेन
हृदय न दुखवीन प्राण गेल्याहि माझा
तुझिच शपथ माझ्या मोहना प्रेम-राजा ;
नयन-बुबुळ तेवीं तीस मानीन नित्य
सुखविन शिकवीन प्रेम देईन सत्य
मुळि न मनिं करावी व्याळ वेल्हाळ खंत
जरि जगांत मदीया अश्रुला तो न अंत "

जमलें जल लोचनांमधीं
किति हेलावुन ये हृदंबुधी
पदरें आणि ती पुशी परी
मग गांभीर्य वरी मुखावरी ॥

आईच्या डोळ्यांत पुन्हां अश्रू जमलेले पाहून मुलगा शेवटचें सांगतो

किति मी समजाविलें तुला
न रडे देइ निरोप तूं मुला
नच मोहदरींत तूं पडे
परि कर्तव्यगिरीवरी चढे ॥

धरि धीर मनांत गाढसा
न रडावें जननी ढसाढसा
जगता सुखवी सदा सये
किति मी सांगुं बरें तुला बये ॥

रडणें प्रभुजीस नावडे
रडणें द्रोह तदीय तो घडे
हंसुनी मज दे निरोप तो
मरणानें तव पुत्र शोभतो ॥

मृति ही सदलंकृती मला
मृति देते मज कीर्ति निर्मळा
सुत धन्य खराच जाहला
जननी तूं करि थोर सोहळा ॥

करुनी निज नेत्र कोरडे
निज कर्तव्य करावया पुढें
आणि सिद्ध विशंक आइ हो
मति मोदें तव दुःख हें सहो ॥

(मातेचें म्हणणें)

ठेवून हृदयीं तूतें स्मरून त्वद्वचा सदा
हृदयीं भगवंताच्या धरुनी पावना पदा ॥

प्रेमस्नेहामृताचा मी सुकाळ धरणीतळीं.
करीन बाळका नित्य वाञ्छ्य हे हृदयीं असे ॥
येईल लोचनीं पाणी त्वत्स्मृती मज येउन
कर्तव्य करण्यासाठीं पुसून परि टाकिन ॥
दोन हीं पिकलीं पानें श्रमुनी गळती यदा
भेटाया तुजला येऊं बघाया प्रभुच्या पदा ॥

(मुलगा म्हणतो)

मोहतिमिर नाशाया आला देवाचा हा बाळ
आई बाबा निरोप द्यावा देव करिल सांभाळ
येतो बाळ अतां
सुखवा भारत–माता ॥ येतो बाळ अतां ॥

(मुलगा आतां कायमचा जाणार हा विचार मनांत येऊन मातेला फार दुःख होतें. ती मुलाला सद्‌गदित होऊन म्हणतेः—

अपार पान्हा हृदयांत दाटे
अपार पाणी नयनांत लोटे
पुसूनियां ती परि लोचनांस
अतीव कष्टें वदते मुलास ॥

" उभा रहा नीट जरा समोर
गड्या तुला पाहिन एकवार
असे तुझें दर्शन शेवटील
पुन्हां न तें ह्या भुवनीं मिळेल " ॥

समोर येऊन सुपुत्र राही
तयास माता अनिमेष पाही
बघूं न देती भरतीच डोळे
पुशी, पुन्हां ते बनतीच ओले ॥
न बोलवे तृप्ति न ती बघून
भरेच पाणी नयनीं फिरून

पुनःपुन्हां लोचन ते पुसून
तयास ठेवी मनिं सांठवून
पिते जणूं बाळकरूप आई
पिताहि साश्रु स्व–सुतास पाही
उचंबळे वत्सलता अनंत
न वर्णनाला कवि हा समर्थ ॥

पुनः पुन्हां बाळक–मूर्ति पाही
न तृप्ति ती मातृमनास होई
“ मदीय माते ! मम वेळ आली ” ॥
वदून ती मूर्ति अदृश्य झाली ॥

*   *   *

टवटवीत तीं तरुचीं पानें । विहंग गाती मंजुळ गाणें
सृष्टि सांगते दुःख गिळावें । कर्तव्यास्तव पुन्हां उठावें

# माझी पत्री

कुठून आणूं सुमनें सुवासी
उदार माते तव पूजनासी
न बाग येईल कधीं फुलून
सुपुष्प–रोपें जळती सुकून ।।

जुई न जाई न गुलाब राही
न मोगरा गे निशिगंध नाहीं
न पारिजातें न टिके बकूल
न रोप तें एकहि गे जगेल ।।

कुठून आणूं बहुमोल पानें
प्रयत्न केले किति लेंकरानें
जगे न आई तुलसी न बेल
जळेल दूर्वांकुर ना हंसेल ।।

सुपुष्प नाहीं न पवित्र पान
सदैव खालींच मदीय मान
सदैव माझी परडी रिकामी
श्रमूनिही बाग बये निकामी ।।

मदंतरांतील उदंड पाणी
अखंड देतों नयनीं भरोनी
तरी न ही बाग फुलून येई
बघूं किती वाट मनांत आई ।।

करावयाला तव पूजनाला
किती परी उत्कटता मनाला
किती तया दाबुं कितीक रोधूं
किती सदा मी समजावं बोधूं ।।

न वाट आतां बघतों कशाची
कुचंवणा ना करितों मनाची
असेल बागेंत मदीय जें जें
समर्पितों तें तव पाद–पूजे ॥

अनंत–मालिन्ययुतें विशीर्णें
निरस्त–तेजें कृश हीन दीनें
कशींतरी हीं परडींत पानें
करून गोळा भरिलीं मुलानें ॥

मदंतरांतील अपार पाणी
सु–दीन पानांवर शिंपडोनी
करून मी निर्मळ आणिलीं हीं
करून घे गोड तयांस आई ॥

हंसोत सारे मम पूजनाला
न तूं हंसावें जननी मुलाला
भिकार माझी म्हण तूं न पत्री
समर्पितों जी चरणीं पवित्रीं ॥

—पुणें २७।२।३५

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ | कविता | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| ५ | ६ | १३ | अघवनघन | अघवन घन |
| ३१ | ३३ | ८ | तुजा | तुज |
| ६२ | ५४ | २१ | वासरांत | वासरान्त |
| ,, | ,, | ,, | भास्करांत | भास्करान्त |
| ८० | ६४ | २१ | पानें | रूपानें |
| १०३ | ७८ | १० | लें | केलें |
| १०९ | ८२ | १ | मूल | मुल |
| ,, | ,, | १४ | विषादा | विषारी |
| ११२ | ,, | १० | स्कर | भास्कर |
| ११३ | ,, | १५ | मानच | भानच |
| ११६ | ,, | १२ | गंभीर | गभीर |
| १२४ | ८६ | १२ | दिसतील | दसतिल |
| १८४ | ११० | १२ | स्त्रोत | स्रोत |
| २३६ | १४० | १५ | कांळीं | काळीं |
| २३७ | १४१ | ४ | परिल | पसरिल |
| २३९ | ,, | १४ | रमतील | रमतिल |
| २४० | ,, | ६ | एकमेकांजन | एकामेकां |
| २४० | ,, | ६ | सारे | जन सारे |
| २६० | १५३ | ६ | खंद | खंड |
| २६१ | ,, | २ | उरणार | डरणार |
| २६८ | १५४ | १५ | पिलूं | पिल्लूं |
| ३०३ | १६२ | ५ | ये भेटायाला ॥कै०॥ | ये भेटायाला |
| ३११ | ,, | ८ | तहीन | वृंतहीन |
| ३१४ | ,, | ५ | हे | हें |
| ६२० | ,, | २५ | दु:खमग्न | दु:खभग्न |
| ६३४ | ,, | २६ | सब्दि | सद्‌बिंदु |

---

# विद्वानांचे अभिप्राय

—१—

पत्री ह्या नांवानेंच प्रस्तुत काव्यसंग्रहाचें स्वरूप ध्यानांत येतें. एका श्रेष्ठ कवीनें म्हटल्याप्रमाणें–काव्याचा आविष्कार म्हणजे जशी झाडाला नवी पालवी फुटते तसा असावा. श्री. साने यांची कविता झाडाच्या नव्या पालवीसारखी सहजस्फूर्त आहे; तेव्हां पत्री हें त्यांनीं आपल्या कवितेला दिलेलें नांव अन्वर्थक होय. दुसरें एक असें कीं वेळोवेळीं प्रभूचा धांवा करून कवीनें त्रिविध तापानें होरपळलेल्या आपल्या मनाचें सांत्वन केलें आहे. श्रीराम प्रभु हा एक कवीच्या जीवनाचा आधार–अशा भावनेनें ओथंबलेलें हें काव्य प्रभूला एक अर्पण केलेली पत्रीच नव्हे तर काय? फुलें, सुमनें म्हणण्याऐवजीं कवीनें आपल्या काव्याला पत्री हें नांव पसंत केलें, यांत कवीची विनयशीलता दिसून येते.

श्री. साने यांची पुष्कळशी कविता भक्तिपर आहे. प्रभुप्रेमाप्रमाणें त्यांची देशभक्तीही उत्कट आहे. प्रभुप्रेम आणि देशभक्ति हे त्यांच्या काव्याचे दोन मुख्य विषय. ह्याशिवाय त्यांचें फुलांमुलांवरील प्रेम, निरनिराळ्या प्रसंगीं त्यांना आलेले अनुभव, मित्रप्रेम, हेहि विषय प्रस्तुत काव्यसंग्रहांत आढळून येतील. विषय कोणचा का असेना, कवि त्या विषयांत रंगून जातो. विषयाशीं त्याची समरसता होते. श्री. साने यांचें हृदय अत्यंत संस्कारक्षम, नवनीतासारखें मृदु आहे. "अश्रु" नांवाच्या त्यांच्या कवितेंत त्यांनीं म्हटलें आहे,

> **"अश्रु माझा जीव**
> **अश्रु माझा प्राण"**
> **"अश्रु फुलवीती। जीवनतरु"**

असें हें हळुवार अंतःकरण असल्यामुळें श्री. साने हे सर्व विश्वावर प्रेम करीत असतील हें सांगावयास नको. विश्वावर आपण प्रेम करावें तथापि विश्वाच्या प्रेमाला सर्वस्वी आपण नालायक आहोंत, "फत्तराला कधीं पानें

फुटतील का," अशी ते पृच्छा करितात ; यांतही कवीची शालीनता दिसून येते.
असो. श्री. साने यांचें अंतःकरण मृदु असलें तरी त्यांच्यांत कोणत्याही प्रकारचा दुबळेपणा नाहीं. देशाची हीनदीन स्थिति पाहिली म्हणजे त्यांच्या प्रतिभेला स्फुरण चढतें; त्यांचें अंतःकरण भरून येतें. त्यांच्या सात्त्विक त्वेषाला, उत्साहाला, आवेशाला सीमा राहात नाहीं. आपल्या सर्वस्वाचा होम झाला तरी हरकत नाहीं, परंतु आपण आपल्या मायभूमीचें गतवैभव तिला प्राप्त करून देऊं अशी ते प्रतिज्ञा करतात. मार्दव, माधुर्य, लीनता या गुणांबरोबर कणखरपणा, जोम, ओज, तेज इत्यादि गुणांचा त्यांच्या काव्यांत उत्कर्ष झालेला दिसून येईल.

प्रस्तुत काव्यसंग्रहांतील श्री. साने यांनीं केलेला प्रभूचा धांवा वाचीत असतां आस्तिक्यबुद्धि नसलेला वाचकसुद्धां त्यांत तल्लीन होऊन जाईल. कवीची आपल्या विषयाशीं झालेली तल्लीनता पाहून त्याला आनंद होईल. आणि आतां जें त्यांच्या भक्तिपर काव्यासंबंधीं सांगितलें तें त्यांच्या देशप्रेमविषयक काव्यासंबंधींही खरें आहे. त्यांची देशभक्तिविषयक कविता वाचीत असतां देशभक्तीचा गंध नसलेला वाचकसुद्धां श्री. साने यांची विषयांशी झालेली समरसता पाहून त्यांच्या काव्याचें कौतुक करील. श्री. साने यांच्या या समरसतेमुळें काव्यांत शब्दार्थांचा एकजीव झालेला दिसून येतो. भावनेचा आवेश, कल्पनेचा विलास, उपमारूपकादि अलंकार, शब्द आणि वृत्त, या बाबतींत विसंगति किंवा ओढाताण झालेली आढळणार नाहीं. अशा प्रकारची काव्याची एकरूपता, साहजिकता आपल्याला क्वचितच पहावयास सांपडते. श्री. साने यांच्या भाषेंतील साधेपणा, प्रसाद आणि माधुर्य हे गुण कवीच्या सरळ निष्पाप मनाची साक्ष देतात. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे प्रस्तुत कवीच्या प्रेमळ, निःस्वार्थी, त्यागशील वृत्तीची छाया त्यांच्या कवितेवर सर्वत्र पसरलेली आहे; आणि या व्यक्तिनिष्ठ गुणांनींच त्यांचें काव्य सर्वांना आवडेल असा मला भरंवसा वाटतो.

श्री. साने यांच्या काव्याचा एक ठळक दोष म्हणजे संयमाचा अभाव. अश्रु, लहानपणची आठवण, बालवृद्ध-संवाद इत्यादि त्यांच्या कविता आहेत याच्यापेक्षां आटोपशीर आणि सुटसुटीत असत्या तर बरें झालें असतें. काव्यांतील प्रसंग चांगले; कल्पना, भावना, अलंकार आणि शब्द यांचीहि

वाण नाहीं; पण संयमाचा अभाव असेल तर रसहानि होते, वाचकांचा विरस होतो. कवीनें आत्मसंयमन केलें नाहीं तर वर्णनाचा पाल्हाळ, पुनरुक्ति, एकाच विचाराची लावलेली लांबण हे दोष काव्यांत निरंतरचें ठाणें देतात. आत्मसंयम नसेल तर काव्याची रचना शिथिल, विस्कळित होईल; आणि रचनासौष्ठव हें तर उत्तम काव्याचें मुख्य लक्षण होय. श्री. साने यांचा आणखी एक दोष म्हणजे ते शब्दांची काटकसर करीत नाहींत. अगदीं थोडया वेंचक शब्दांनीं जर आपला अर्थ व्यक्त करतां येत असेल, तर शब्दांचा पाऊस पाडूं नये. एखाद्या कद्रूप्रमाणें आपल्याजवळ असलेल्या शब्दसंग्रहाचा काटेकोरपणानें उपयोग करावा. व्यक्त अर्थापेक्षां अव्यक्तार्थाची व्यंग्यार्थाची—महती जास्त. ध्वनि हा काव्याचा आत्मा ही गोष्ट कवीनें कधींही विसरतां कामा नये. श्री. साने संस्कृतज्ञ आहेत. त्यांना चकोरचंद्रिका, चातक आणि मेघ इत्यादि संकेत सहज सुचतात. तथापि अशाप्रकारें संकेत त्यांनीं आपल्या काव्यांत वापरूं नये हेंच उत्तम.

वर सांगितलेले दोष सहज टाळतां येतील. यापुढील काव्यरचनेंत श्री. साने हे दोष टाळतीलही. असें झालें तर त्यांच्या काव्याची शोभा जास्तच खुलून दिसेल. दोषदिग्दर्शन हें काम कटु तर खरेंच, परंतु तें केल्याशिवाय गत्यंतर नाहीं; आणि "यदग्रे विषमिव तत्परिणामेऽमृतोपमं भवति" या न्यायानें कटु वचनांचाहि गोड परिणाम होतो. निदान श्री. साने यांच्या बाबतींत तरी हें भविष्य खरें ठरेल. कारण त्यांचे कोणी दोष दाखविले तर त्या माणसाचे ते उपकार मानितील; चवताळून त्याच्या अंगावर धांवून जाणार नाहींत.

सरते शेवटीं एक गोष्ट नमूद करावीशी वाटते; ती ही कीं प्रस्तुत काव्यसंग्रह प्रसिद्ध करण्यांत यशाचा हेतु नाहीं, धनाची अपेक्षा नाहीं; मानाची हांव तर नाहींच नाहीं. कवीच्या कांहीं मित्रांनीं पुस्तकाच्या छपाईचा खर्च आपण प्रथम तरी देऊं असें सांगितलें, यामुळें प्रस्तुत पुस्तक आज प्रसिद्ध होत आहे. महाराष्ट्रांतील रसिक वाचक कवीच्या गुणांचें चीज करितील अशी मला खात्री वाटते.

पुणें
ता. ३।८।१९३५

रामचंद्र कृष्ण लागू

—२—

श्री. साने यांनीं आपला 'पत्री' नामक काव्यसंग्रह मजकडे पाठविला आणि त्यावर अभिप्रायवजा थोडेंसें लिहावयास सांगितलें. पत्रींतील सुमारें एकशें साठ स्फुट कविता आणि 'सत्याग्रही' या खंडकाव्याचा अपुरा भाग मी बारकाईनें वाचला. त्यावरून मला जें काय वाटलें तेंच या ठिकाणीं लिहीत आहें.

पत्रींतील आरंभींच्या सुमारें ८५ कवितांत कवीनीं आपणाकडे साधकाची भूमिका घेऊन, आपल्या सुखदुःखांची, आशानिराशेची व कल्पनाध्येयाची करुणकहाणी, प्रभुचरणीं निवेदन केली आहे. उदात्त आणि प्रसन्न विचार, निर्मळ आणि हळुवार भावना आणि पवित्र वातावरण ह्यामुळें बहुतेक प्रार्थना आनंददायक झाल्या आहेत. वाणी आणि मन ह्यांना पावित्र्य मिळावें व आत्मशुद्धी व्हावी हा हेतु कित्येक प्रार्थनांच्या मुळाशीं दिसतो. 'वसंत वारा' 'हृदयाचे बोल' व 'देवाजवळ' हीं आत्मनिवेदनात्मक स्तोत्रें मधुर आहेत. 'नयनीं मुळिं नीरच नाहीं' 'सोन्याचा दिवस' 'देवा झुरतो तव हा दास' 'हे नाथ येईन तव नित्य कामीं' 'कांहीं कळेना कांहीं वळेना' व 'भाग्याचे अश्रू' या भावगीतांतून कल्पनानाविन्य व. आर्तता उत्कटतेनें व्यक्त झालीं आहेत.

ह्या सर्व प्रार्थनांचा एकत्रित विचार केल्यास असें दिसतें कीं ह्या प्रार्थना जरी निरनिराळ्या गेय वृत्तांत लिहिल्या आहेत तरी त्या सर्वांत प्रकट झालेली वृत्ति एकच म्हणजे करुणोत्कट आहे. सूक्ष्म रीतीनें पाहिल्यास ध्येयाच्या आभासापासून तों ध्येयसिद्धीपर्यंतचीं कवीच्या मानसिक स्थित्यंतरांचीं आंदोलनें येथें दिसतात. तसेंच संकटें आणि निराशा ह्यांतून मार्ग काढीत कवीचें मन आशा आणि आनंद ह्यांत असें स्थिर झालें आहे ह्याचाही प्रत्यय येतो.

स्वतंत्र विषयांवरील स्फुट काव्यांपैकी 'ग्रंथमहिमा' ह्या कवितेमधील व्यापक दृष्टिकोण, 'शांति कोण आणील' यांतील नवसंदेश, 'प्रेमाचें गाणें' यांतील आश्वासन आणि 'हंस रे माझ्या मुला' यांतील सूचक प्रेमभाव आपापल्यापरी हृदयहारी व अभिनव वाटतात.

पत्रींतील दुसऱ्या विभागांत स्वदेशभक्तिपर स्फुट कवनें आलीं आहेत आधीं केलें आणि मग सांगितलें हा रामदासांचा दण्डक त्यांच्या कवनांस लागू पडतो म्हणूनच त्यांचीं राष्ट्रीय कवनें वैशिष्टचपूर्ण उतरलीं आहेत. दे. भ. सावकर, से. बापट किंवा गोविंद शाहीर ह्यानीं लिहिलेल्या कवनांत जो आवेश व जी स्फूर्ति दृष्टीस पडते तिचें प्रत्यंतर श्री. साने यांच्या 'जारे पुढें व्हारे पुढें' 'नवयुवक' 'तुफान झालों' इत्यादि कवनांतून आपणास मिळतें. 'बलसागर भारत होवो' 'भारतास' व 'स्वातंत्र्यानंदाचें गाणें' ही गीतत्रयी प्रत्येक हिंदवासियानें मुखोद्‌गत करावी एवढा तींत जिवंतपणा आहे. उत्कट राष्ट्रप्रेम, दुर्दम आशावाद आणि अंत:करणाची खरी तळमळ ह्यांमुळें श्री. साने ह्यांचीं राष्ट्रीय गीतें स्फूर्तिदायक व मनोवेधक झालीं आहेत यांत शंका नाहीं.

'सत्याग्रही' हें खण्डकाव्य मला अपुरेंच वाचावयास मिळालें पण हिऱ्याची उज्वलता त्याच्या एका पैलूवरूनही दिसते, तसेंच ह्या काव्याबद्दल म्हणतां येईल. या खण्डकाव्यास कथानक फारसें नाहीच, तरी पण सतीचें वाण धारण करणाऱ्या सत्याग्रही वीरानें आपल्या देशाच्या सद्य:स्थितीविषयीं जे सडेतोड व भावनोत्कट विचार प्रगट केले आहेत ते प्रत्येकास आत्मसंशोधन करावयास लावतील इतके प्रभावी आहेत.

श्री. साने हे ध्येयवादी आहेत. स्वार्थत्याग व निरपेक्ष सेवा हें त्यांचें व्रत होय. 'विचार भावना कृती, तरीच होइ उन्नति' हें त्यांच्या जीवनाप्रमाणेंच त्यांच्या काव्याचेंही रहस्य दिसतें.

निर्मळ भावनेचें व ओघवती पण मधुर भाषासरणीचें 'जीवन' मिळाल्यामुळें त्यांची 'पत्री' टवटवीत दिसते हें खरें तरी पण प्रत्यक्ष कृतीवर अधिष्ठित झालेल्या त्यांच्या जीवनाच्या सूर्यकिरणांत तिची शोभा अधिक वृद्धिंगत झाली आहे यांत शंका नाहीं ! थोडक्यांत म्हणजे अगोदर स्वत:च ते काव्याचे विषय झाले आहेत आणि मगच त्यांनीं ही काव्यपत्री शारदेच्या पायीं अर्पण केली आहे. तिचें स्वागत मराठी रसिक मोठ्या आनंदानें व आदरानें करतील अशी मला पूर्ण खात्री वाटते.

पुणें
ता. ६।४।३५

**वामन भार्गव पाठक.**

-३-

रा. साने यांचा 'पत्री' हा काव्य-संग्रह वाचीत असतां त्यांच्या प्रत्यक्ष परिचयाच्या वाचकांसमोर खुद्द सान्यांची मूर्तीच उभी राहते. इतकी त्यांची कविता हुबेहुब त्यांच्यासारखी आहे. हें साम्य दोघांच्या अंतरंगांत व बाह्यांगांतहि सम प्रमाणांत दिसून येतें. सान्यांच्या हृदया-प्रमाणें त्यांची कविता प्रेमळ, मोकळी, निर्मळ, जरा हळवी पण निश्चित ध्येयासाठीं "हाल होवोत ते चित्त ना मुळिं भितें" असें ठासून सांगण्या-इतपत कणखर आहे. त्याचप्रमाणें त्यांच्या साध्या व विनीत बाह्याङ्गाला साजेल असेंच त्यांच्या कवितेचेंहिं बाह्यांग आहे. तिच्यांत नवीन जाति वृत्तादिकांचा डामडौल नाहीं, कलेचा बडेजाव नाहीं, पिशा प्रेमाचे नाचरंग नाहींत व कवित्वाचा अहंभाव तर नाहींच नाहीं. पण खुद्द साने व त्यांची कविता या दोघांनींहि "वेष असावा बावळा, अंतरीं असाव्या नाना कळा" या समर्थांच्या बोलाची पक्की खुणगांठ बांधून ठेविलेली दिसते !

आपल्या परमेश्वरपर काव्यांत सान्यांनीं ईश्वराला हृदय पिळवटून आर्तरवानें आळविलें आहे. सागरांतील आपल्या होडीला वल्हविण्यास थोडी मदत मागितली आहे, अंधारांत एकाददुसरा किरण याचिला आहे पण या याचनेंत शिरजोर भिकाऱ्याचा हट्ट नाहीं, आततायीपणा नाहीं कीं आक्रोश नाहीं. येथून तेथून विनयाचें बोलणें व लीनतेचें चालणें. रा. साने यांनीं अश्रूंचें एक नवीन तत्त्वज्ञान या कवितेंत मांडलें आहे. वाचकांस त्यांच्या कवितेंत क्वचित् निराशेचे सुस्कारे व सर्वत्र अश्रूंचे पूर दिसून येतील. याचें कारण त्यांचें चित्त फार हळुवार व भावनावश आहे. पण असे भावनाप्रेरित अश्रू येणें, देशबांधवांचीं व धर्मबांधवांचीं दुःखे बघून व सुखेंहि देखून गहिंवरून जाण्याइतपत हृदय जिवंत असणें हें खरोखर भाग्याचें लक्षण आहे. म्हणून ते म्हणतात "अश्रू माझी आशा, अश्रू माझे बळ" (अश्रू ७३।७४।५५ इत्यादि कविता पहा.)

"माझें ध्येय ५०" या एका कवितेंत सान्यांचें समग्र जीवनसर्वस्व ओत-लेलें दिसतें. श्रम हा त्यांचा देव आहे व श्रम हेंच त्यांचें पूजासाहित्य आहे. शहरींच्या तकलुबी व दिखाऊ जीवनाला कंटाळून ते खेडोपाडींच्या राहणीनें गरीब पण मनानें श्रीमंत असलेल्या आपल्या शेंकडो देशबांध-

वांशीं समरस झालेले आहेत. जानपदवाङ्मयाचा एक नमुना म्हणून यांतील बरींच काव्यें दाखवितां येतील. त्यांत खेड्यांच्या सुखदुःखाला कळवळ्याची वाचा फोडली आहे.

सदर कवितेला तिच्या साधेपणामुळें, तळमळीमुळें व कवीच्या खडतर तपस्येमुळें एक रमणीय वैशिष्ट्य आलें आहे. रा साने यांनीं असलें " देशीकार लेणें " मराठीवर चढविलें याबद्दल कोणासहि आनंदच होईल.

सर परशुरामभाऊ कॉलेज,
पुणें. १०-४-३५

के. ना. वाटवे

---

–४–

रा. पां. स. साने यांनीं वेळोवेळीं रचिलेल्या कवनांचा संग्रह 'पत्री' या नांवानें प्रसिद्ध होत आहे. रा. साने यांनीं 'पत्री' नांव या संग्रहास दिलें आहे तें त्यांच्या वृत्तीशीं फार जुळतें आहे. ज्या दयामय देवावर भरंवसा ठेवून आणि ज्याच्या पुढें आपला 'इवलासा अश्रु' टपटपां गाळून आपलें हृदय हलकें करण्याचा व्यवसाय साने अंतर्मुख होऊन चालवितात त्यालाच ही 'पत्री' त्यांनीं वाहिली आहे! 'पत्रं पुष्पं फलं तोयम्' या वर्गातली ही पत्री आहे. हिच्यांतच साने यांचें प्रसन्न, स्वत: हंसून दुसऱ्यास हंसविणारें 'निर्मळ हृदय' पुष्प सांपडेल. यांतच–'बांधील कारखाने शाळा उभारवील.' 'संन्यास हा नवीन राष्ट्रास वाचवील' अशा प्रकारच्या नवीन संन्यासाचें मधुर फळहि दिसून येईल आणि अशी ही पवित्र पत्री साने यांनीं ज्या 'अश्रूच्या बिंदूंत' माझा 'सुखसिंधू' मानिला आहे त्या सिंधूच्या तोयांत श्रद्धेनें भिजविली आहे. या अश्रूचे 'माणिकमोती' या पत्रींत सर्वत्र विखुरलेले दिसतात आणि त्यांचें 'पाणी' कोणालाहि क्षणभर तरी भारून टाकल्याशिवाय राहणार नाही.

काव्याचा आत्मा रस हा मानला आहे. त्या दृष्टीनें पाहिलें तर साने यांच्या पत्रींत अंगचा रस आहे. व्यापक अर्थानें भक्तिरस पत्रींत भरपूर आहे. दीनांच्या विषयीं अपरंपार तळमळ जागजागीं दिसते. तिला शाब्दिक रूप देतांना विविधता व सौन्दर्य हीं जर आजच्यापेक्षांहि अधिक पत्रींत असतीं तर पत्री फारच मोहक वाटली असती. जास्त तजेला पत्रींतील अश्रु (७९), कां मजला देतां प्रेम (७८), इत्यादि दहावीस कवनांत

चमकतांना स्पष्ट दिसतो. ' लहानपणची आठवण ' (१०३) वत्सलरसानें डवरलेली आहे. दास कवीच्या मनाची घडण मूळची कशी आहे तें यांत उत्तम प्रकारें प्रतिबिंबित झालें आहे. ' जा रे पुढें व्हा रे पुढें ' (१२०), हें कवन स्फूर्तिदायक उतरलें आहे. आणि ' स्वातंत्र्यानंदाचा जयजयकार ' (१४०) मनामध्यें हर्षानंदाच्या ऊर्मि उचंबळविल्याशिवाय राहात नाहीं.

तळमळ, सद्‌भावना, उच्च ध्येय, दीनसेवा, अर्पित जीवन यांचे प्रेरक सूर पत्रींतील कवनाकवनांत भरलेले आढळतात. खरें आहे कीं तेच तेच सूर सर्वत्र भरलेले, कधीं तेच तेच शब्द पुनः पुनः कानीं पडलेले पाहून या एकताततेमुळें कंटाळवाणेपणा वाटतो. चंचल मनाच्या भ्रामरी वृत्तीला हें रुचणार नाहीं. तथापि संयमी मनाला या पत्रीपासून निःसंशय सत्त्वभाव दाटून येतील. बापटांच्या चैतन्य गाथ्यानंतर त्याच जातीची ही पत्री मराठी वाङ्मयांत आपल्या तेजानें तळपेल.

चैत्र शु. १२ शके १८५७ } दत्तो वामन पोतदार
पुणें

---

—५—

रा. रा. पांडुरंग सदाशिव साने यांचा पत्री नामक कवितासंग्रह समग्र वाचला. पत्रीची एकंदर ' पर्ण ' ( पृष्ठ )संख्या सुमारें ३८० असून त्यांपैकीं ३०० पृष्ठांत गीतकवजा स्फुटप्राय अशा १६१ कविता असून बाकीच्या पृष्ठांत त्यांच्या ' सत्याग्रही ' या अजून अप्रकाशित अशा खंडकाव्यांतील जो भाग आज प्रसिद्ध करण्यासारखा आहे तो दिला आहे. संग्रहित केलेल्या कवितांचे लहान मोठे आकार आणि विषयांची विविधता यांच्या दृष्टीनें संग्रहाचा सरसकटपणा ' पत्री ' या अन्वर्थक नामांत सूचित झाला असून कवीच्या कवित्वशक्तीचें अभिनव कौमार्य आणि भक्त्युत्कट ईश्वर-समर्पणबुद्धि यांचाहि रम्य ध्वनि त्यांत प्रतीत होण्यासारखा आहे असें मला वाटतें.

संग्रहांतील बऱ्याचशा कवितांचा जन्म निरनिराळ्या ठिकाणच्या कारागृहवासाच्या अवधींत झाला आहे ही गोष्ट यांच्या शेवटीं दिलेल्या स्थाननिर्देशावरून प्रामुख्यानें प्रतीत होते व तिच्या द्वारें ' विपत्ति दे तीहि हवी विकासा ' ( क्रमांक ९२; पृ. १३४ ) या कवितेंतील कवीच्या उद्‌गारास

एक प्रकारचें विशेष करुणरसपूर्ण यथार्थत्व व स्वारस्य प्राप्त झालें आहे. म्हणून प्रस्तुत संग्रह केवळ फुरसतीचा बुद्धिविलास नसून, बाह्य कष्टप्रद परिस्थितीमुळें अधिकच उत्कट चिंतनात्मक होणाऱ्या अशा भक्तिपूर्ण, सात्त्विक, सुसंस्कृत व कर्तव्यनिष्ठ अंतःकरणांत अखंड उचंबळणाऱ्या आणि स्वयंस्फूर्तीनें व प्रबल वेगानें काव्यरूप पावलेल्या अंतर्वृत्तीच्या उद्गारजलानें निर्माण झालेलें हें रम्य व सात्त्विक आल्हाददायक असें 'अच्छोद सरोवर.' च आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यामुळेंच त्यांतील कित्येक कवितांचा सकृद्दर्शनीं भासणारा प्रमाणरहित दीर्घविस्तार केवळ काव्यरचनेच्या दृष्टीनें कित्येकास अयुक्त वाटण्याचा संभव असला तरी ' पूरोत्पीडतडागस्य । परिवाहः प्रतिक्रिया ( जळ तुंबतां तडागीं फोडावा लागतो जसा पाट) या न्यायानें, त्या त्या वेळच्या उत्कट वृत्तींना पुरी वाट करून देण्याच्या दृष्टीनें हा विस्तार स्वाभाविक व समर्थनीय वाटेल यांत शंका नाहीं.

सारांश, मनःपूर्वकता (Sincerity) हा जो कोणत्याही खऱ्या काव्याचा खरा निदर्शक असा मुख्य गुण तो पत्रींत सर्वत्र विपुलपणें निदर्शनास येतो. पत्रींतील कवितांचे मुख्य विषय ईश्वरनिष्ठा, ईश्वरप्रार्थना, स्वतःची हीन व अगतिक स्थिति, स्वतःच्या जीवनकार्याचें चिंतन, राष्ट्राची सद्यःस्थिति, प्रिय भारत भूमीचा उद्धार व तिची स्वातंत्र्यप्राप्ति हे आहेत. या सर्वासंबंधींही कवीच्या मनाची उत्कट तळमळ, भक्तिप्रवणता आणि सुसंस्कृत उद्बोधक विचारसरणी हे गुण चांगले प्रतीत होतात. आणि काव्यरचनाही त्या त्या वृत्तीस साजेशी विनम्र व उदात्त, सात्त्विक आवेश-पूर्ण, आशा व उत्साहप्रेरक आणि प्रसंगोपात्त अत्यंत हृदयस्पर्शी करुणरसो-त्कट व मार्दवयुक्त अशी आहे.

पत्रींतील भक्तिविषयक कवितांसंबंधीं जी एक गोष्ट प्रमुखपणें ध्यानांत येते ती ही कीं त्यांतील आत्माविष्कार व आत्मार्पण यांचें स्वरूप आपल्यांतील श्री तुकाराम नामदेवादिकांच्या उद्गारांत येणाऱ्या 'सख्यमात्मनिवेदना'पेक्षां सध्यांच्या कवित्रर्य रवीन्द्रनाथ टागोर, महात्मा गांधी, थिऑसॉफिस्ट वगैरेंच्या उद्गारांत दिसून येणाऱ्या आत्मार्पणाच्या व सेवाशरणतेच्या कल्पनांशीं त्यांचें जास्त सादृश्य आहे आणि सध्यांच्या परिस्थितीच्या संस्काराचें प्रति-बिंब या दृष्टीनें तें अगदीं स्वाभाविक आहे.

स्वातंत्र्य, राष्ट्राची सद्य:स्थिति व मातृभूमीच्या उद्धाराविषयींची तळमळ या संबंधाच्या कविता अलिकडच्या कित्येक पोषाखी व स्वसुखलोलुप कवींच्या कवितांप्रमाणें वरपांगी कळकळीच्या नाहींत, किंवा टरीव सांच्याच्या, खोडसाळ व अतिशयोक्तिपूर्ण नाहींत; तर ज्याचा वरील गोष्टीशीं जीवनकार्यद्वारा प्रत्यक्ष जिव्हाळ्याचा संबंध निगडित झालेला आहे आणि तत्प्रीत्यर्थ ज्या व्यक्तीनें स्वत: देहकष्टादिद्वारा खस्ता खाऊन, आश्रमादि जनताशिक्षणकार्याला स्वत:ला वाहून घेऊन आत्मार्पण करण्याचा सक्रिय उपक्रम चालविला आहे, अशा कवीच्या या राष्ट्रीय कविता असल्यामुळें खरें औचित्य व स्वारस्य त्यांत आहे आणि म्हणूनच पत्रीतील अनेक राष्ट्रीय कवितांतून सात्त्विक राष्ट्रकार्ययोगाची स्फूर्ति देणारी तेजस्वी विचारसरणी व उदात्त ध्येयात्मक रम्य कल्पना व आशाचित्रें भरपूर सांपडतात, यांत नवल नाहीं.

अभिप्रायारंभींच दर्शविल्याप्रमाणें पत्रींतील कवितांची विविधता व विपुलता फार असल्यामुळें कवीच्या निरनिराळ्या गुणांच्या निदर्शक अशा निवडक कवितांचा अवतरणें देऊन थोडक्यांत निर्देश करितां येणें शक्य नाहीं. हें जरी खरें असलें तरी मासल्याकरितां कवीचें जीवनध्येय व त्याची ईश्वरसमर्पणात्मक बुद्धी यांचीं द्योतक अशी दोनच अवतरणें खालीं देऊन बाकीच्या लक्षणीय कवितांचा फक्त क्रमांकासहित नामनिर्देश करितों.

**अश्रू पुसावे**
**जन हांसवावे**
**याहून नाहीं दुजें कांहीं नामी**

हें कवीचें जीवनध्येय आहे.

**तुझ्या करांतील बनून पांवा**
**कृतार्थ हा जन्म मदीय व्हावा**

यांत ईश्वरार्पणबुद्धी गोड रीतीनें दर्शविली आहे.

वेल (१४), जीवनतरु (१५). मजूर (२०), असो तुला देवा माझा सदा नमस्कार (२४), प्रभो काय सांगु तुला मी वदोनी (२५), वेणु (२६) आई तू मज मार मार (३७), दिव्य आनंद (३८), कैसें लावियलें मी दार (३९), हंस रे माझ्या मुला (४०), गाडी धीरे धीरे हांक (४४), आशा-

निराशा (४५), येवो वसंत वारा (४९), तुझ्या हातांत (५१), राम वेडा (५६), मयसभा राहिली भरून (८३), मेघासारखें जीवन (८९), वंदन (९०), मदीय त्या नमस्कृती (९१), विपत्ति दे, तीहि हवी विकासा (९३), प्रभुप्रार्थना (१४८), राष्ट्राचें उद्यान, (१४९), भारतीय मुलें (१५७), महात्माजींस (१६०), खरे सनातनी (१६१) ह्या कविता मला विशेषच आवडल्या.

रा. साने त्यांच्या अनेक लहान मोठ्या गद्यकृतींच्या द्वारें कसलेले लेखक म्हणून महाराष्ट्र वाचकांस चांगले परिचित आहेत. पत्रींतील काव्यरचनेंतहि त्यांचें भाषापटुत्व चांगल्या प्रकारें दृग्गोचर होत आहे. तसेंच यांतील काव्य-शैली सहजरम्य, आल्हाददायक, प्रौढ, सुश्लिष्ट व यथोचित असून, तिच्यांत सहजप्रवाहिता व गायनोचित शब्दलालित्य व नादानुकूलता हीं आहेत. कांहीं ठिकाणीं मात्र "रडवेलें वदन" "पाणरलेले नयन" अशासारखे कर्णकटु किंवा काव्यरसापकर्षक शब्दप्रयोग किंवा ओंठावर "थरथरणारी" प्रार्थना अशासारखे नादलुब्धतेच्या किंवा विदेशी वाङमयसंस्काराच्या अनिवार्य मोहवशतेचे द्योतक असे "अ–सुभग" कल्पनाविष्कार आढळतात. पण अशीं स्थळें फारच क्वचित् व पत्रींतील एकंदर रचनासौष्ठवाच्या मानानें पाहतां तीं गालबोटवजा समजण्यास हरकत नाही.

पत्रींतील एकंदर कवितांचें वैपुल्य आणि त्यांतील बऱ्याचशा भागाच्या रचनेनें व्यापलेला अल्पकाळ याचें व्यस्त प्रमाण यांचाहि विचार सहजगत्या डोळ्यांपुढें उभा राहण्यासारखा आहे; व त्यावरून कशाहि विषम परि-स्थितींत क्षणशःकणशश्चैव अशी मनाची सारखी अव्यग्र अनुसंधानपर, साध-नापर व उद्योगनिरत वृत्ति ठेविल्यास अल्प काळांत आत्मानंदकारी व प्रिय मातृभाषोत्कर्षाच्या कार्यास पोषक अशी किती तरी वाङमयनिर्मिति होऊं शकते याचाही आमच्यांतील तरुण व होतकरू कवि वर्गास रा. साने यांच्या पत्रीवरून स्फूर्तिदायक व मार्गदर्शक वस्तुपाठ मिळण्यासारखा आहे असें मला वाटतें. पत्रीच्या संकलनाच्या पाठोपाठ रम्य सौरभपूर्ण अशा पुष्पांचा संग्रहही अर्थात् कर्तव्यप्राप्तच आहे. त्यास अनुसरून यानंतर रा. साने यांच्या इतरही गद्यपद्य वाङमयपुष्पांचें प्रकाशन त्यांचा तरुण सेवकसंघ

करणार आहे. तो त्यांचा हेतु लौकरच सफल होवो व गुणग्राही महाराष्ट्र-जनता त्याला उत्तेजन देण्याचें कर्तव्य करीलच असा भरंवसा मी प्रगट करितों. रा. साने यांचे जनताशिक्षणाचे व्यावहारिक प्रयत्न आणि राष्ट्रीयत्व पोषक अशा गद्यपद्यात्मक वाङमय रचनेच्या द्वारें त्यांची अखंड चालू असलेली प्रिय मातृभाषेची व मातृभूमीची सेवा यांचा सदैव उज्वल उत्कर्ष व प्रगति होवो अशी अंत:करणपूर्वक इच्छा व्यक्त करितों.

१६।४।३४ श्री. नी. चाफेकर

---

–६–

वस्तुस्थितिनिरपेक्ष असें निकामी काव्य भरपूर निपजतें; परंतु श्री. साने हे रिकामटेकडे म्हणून कुडाला तुंबड्या लावणारांपैकीं नाहींत ही संतोषाची गोष्ट होय. त्यांच्या काव्यांत अंत:करणाची तळमळ व कळकळ पदोपदीं व्यक्त होत असल्यानें राष्ट्रजागृतीचें कार्य ह्या काव्यग्रंथामुळें सुलभ होणारें आहे. सद्य: परिस्थितीविषयींचे कवीचे विचार अहंकाराचा उन्माद न झालेल्या कोणालाहि मानवतील. कवीच्या निर्विकार सात्त्विक वृत्तीमुळें काव्याला प्रौढत्व व उदात्तत्व आलें आहे. ह्या ग्रंथांतील बहुतेक कविता तुरुंगांत रचल्या आहेत हें विशेष आहे. गीतारहस्यापासून प्रारंभ होणाऱ्या तुरुंगवाङमयाचा विचार केला तर तुरुंग हा प्रौढ वाङमयाचा पोशिंदा आहे असें म्हणावेंसें वाटतें.

ना. गो. चापेकर.

REFBK-0005343

REFBK-0005343

५३४३.